# लोकलेखा समिती

## (२०१७-२०१८)

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालामधील महसूल व वन (वन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक २.१) यावरील**

## एकसष्ठावा अहवाल

सत्यमेव जयते

**(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास**
**दिनांक जुलै, २०१९ रोजी सादर करण्यात आला)**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर

**जून/जुलै, २०१९**

# लोकलेखा समिती

## (२०१७-२०१८)

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालामधील महसूल व वन (वन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक २.१) यावरील**

## एकसष्ठावा अहवाल

# लोकलेखा समिती

## २०१७-२०१८

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

*(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

**(१०) श्री. प्रशांत ठाकूर वि.स.स.

(१०अ) श्री. पराग अळवणी, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

***(१२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

****(२१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

*****(२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

******(२४) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२५) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

*******(२६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**निमंत्रित**

*********(२७) श्री. प्रसाद लाड, वि.प.स.

**********(२८) श्री. रामदास आंबटकर, वि.प.स.

**सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (का),

(२) श्री. यू. के. चव्हाण, सचिव (EM),

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव,

(४) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.,

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव,

(६) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी,

(७) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी.

* **श्री. योगेश सागर, वि.स.स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी राज्यमंत्री म्हणून मंत्रीमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.**

** **श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर ॲड. पराग अळवणी, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

*** **श्री. सुरेश ऊर्फ बाळू धानोरकर, वि.स.स. यांनी दिनांक २२ मार्च, २०१९ रोजी आपल्या सदस्यपदाचा राजीनामा दिल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.**

**** **श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची पुन्हा दिनांक ५ सप्टेंबर २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

***** **श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

****** **श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे सदर जागा रिक्त झाली.**

******* **श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी निमंत्रित समिती सदस्य म्हणून दिनांक ६ सप्टेंबर २०१७ रोजी नामनियुक्ती केली होती. दिनांक २७ जुलै २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांची निमंत्रित समिती सदस्यत्वाची नियुक्ती संपुष्टात आली होती. ते विधानपरिषद सदस्य म्हणून पुन्हा निवडून आल्यामुळे मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची दिनांक ५ सप्टेंबर २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून रिक्त जागेवर नामनियुक्ती केली.**

******** **श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी दिनांक १ मार्च, २०१९ रोजी "विशेष निमंत्रित" समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

********* **श्री. रामदास आंबटकर, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी दिनांक २ मे, २०१९ रोजी "विशेष निमंत्रित" समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

## प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवाल यावर विचार करून लोकलेखा समितीचा एकसष्ठावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक ५ व १२ फेब्रुवारी, २०१९ रोजी प्रधान सचिव, महसूल व वन (वन) विभाग आणि इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई व महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरून बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट " अ " मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट " ब " मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक २८ जून, २०१९ रोजीच्या बैठकीत सन २०१४-१५ वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील महसूल व वन (वन) विभागासंदर्भात तयार केलेला प्रारूप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारूप अहवालाला मान्यता दिली.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २८ जून, २०१९.

**गोपालदास अग्रवाल,**
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

**अनुक्रमणिका**


| अनुक्रमांक<br>(१) | विभाग व तपशील<br>(२) | पृष्ठ क्रमांक<br>(३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** | (पाच) |
| | **महसूल व वन (वन) विभाग** | १ |
| | (परिच्छेद क्र. २.१) | १ |

महसूल व वन (वन) विभाग

१०१

BSÉ0É0 827--2

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेदासंदर्भात लोकलेखा समितीची बैठक.

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| 2.1.9. | CAMPA निधीचे व्यवस्थापन | | | |
| 2.1.9.1 | CAMPA निधीतून अग्राह्य खर्च:-<br>पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन आणि योजना प्राधिकरणाची (Compensatory Afforestation Fund Management and Planing Authority-CAMPA) स्थापना वनेतर कामाकरिता वळती केलेल्या वनक्षेत्राची क्षतिपूर्ती करण्यासाठी वनीकरण आणि पुनर्जीवन कार्ये वाढविणे यासाठी करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरण व वन मंत्रालयाने तयार केलेली मार्गदर्शक तत्वे, ज्यानुसार CAMPA निधी,एका संस्थेव्दारे,जी राज्य CAMPA या नावाने राज्यात गठित करावयाची आहे त्यास मंजुरी दिली.<br>पर्यावरण व वन मंत्रालयाव्दारे निर्गमित (जुलै २००९) CAMPA च्या मार्गदर्शक तत्वानुसार CAMPA मधील पैसा मंजुर कामांच्या वार्षिक योजनेनुसार (Annual Plan Of Operations) वने आणि वन्यजीव व्यवस्थापनेची विकास, परिरक्षण आणि संरक्षण यासाठी वापरावयाचा होता. पर्यावरण व वन मंत्रालयाच्या राष्ट्रीय CAMPA सल्लागार परिषदेने (National CAMPA Advisory Council NCAC) सुस्पष्टपणे (जून २०१०) खर्चाच्या काही बाबी जसे प्रशासकीय खर्च, वन मुख्यालयातील मुलभूत सुविधांना मजबूत करण्याकरिता खर्च,वाहनांच्या पेट्रोल, तेल व वंगण यावरील खर्च कार्यालये/रहिवासी इमारती,वन विश्रांती गृह आणि लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांचे निवासस्थान याचे बांधकाम, दुरुस्ती आणि नूतनीकरण आणि वाहनांची खरेदी यावर CAMPA निधीतून खर्च करणे प्रतिबंधित केले.<br>CAMPA ची मार्गदर्शक तत्वे आणि NCAC चे निर्देश या विरूध्द PCCF (HOFF) ने राज्य CAMPA मधून १६.४९ कोटी निधी मुख्य वनसंरक्षक, पुणे यांना २०१०-११ मध्ये पुणे येथे "वनभवन" बांधण्यासाठी त्याचा समावेश २०१०-११ च्या कामांच्या वार्षिक योजनेत करून दिला,तसेच एका मंडळ कार्यालयाने (अमरावती) आणि दोन निवडलेल्या विभागाने राज्य CAMPA निधीतून प्रशिक्षण अकादमी बांधकाम,रस्ते काम, विश्रामगृहाच्या सुरक्षा | पर्यावरण व वनमंत्रालयाच्या राष्ट्रीय समिती NCAC यांचेकडील मार्गदर्शक सूचनांनुसार कॅम्पा अंतर्गतचा झालेला खालील बाबीवरचा खर्च अग्राहय असल्याने तो स्वीकत करता येत नाही. असे नमूद करण्यांत आले की, पर्यायी वनीकरण कार्यक्रमा अंतर्गतचा रु. १९.१५ लक्ष चा निधी उपलब्ध होवु शकला नाही. त्याबाबत खालील बाबी स्पष्ट करयांत येत आहे.<br>१. वनभवन, पुणे यावर झालेला खर्च<br>वार्षिक नियोजन आराखडा २०१०-११ हा रु. ८९.०० लक्षचा तयार कारण्यांत आला असुन सदर आरखडयात वनभवन, पुणे इमारतीचा समावेश होता. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यतक्षेखाली झालेल्या बैठकीत, वार्षिक नियोजन आराखडा २०१०-११ ला सुकाणू समिती राज्य कॅम्पा यांच्या दिनांक २०.७.२०१० च्या सभेत मान्यता प्रदान करण्यांत आली. पुणे येथील वनविभागाची कार्यालये एकत्रित एकाच इमारतीत ठेवण्याचा उद्देशाने सुकाणू समितीचे दिनांक २०.७.२०१० चे सभेत चर्चा करण्यांत आली आणि चर्चे अंती वनभवन, पुणे येथील बांधकामाचे प्रस्तावासह वार्षिक नियोजन आराखडा २०१०-११ ला मान्यता प्रदान करण्यांत आली (सहपत्र - संलग्न) (1)<br>NCAC च्या दिनांक २४.६.२०१० च्या सभेस प्रधान मुख्य वनसंरक्षक , म. रा. नागपूर हजर राहु शकले नाही. आणि त्यास अध्यक्ष NCAC यांनी प्रधान मुख्य वनसंरक्षक, म. रा. नागपूर यांची अनुपस्थितीस मान्यता दिली. (सहपत्र-संलग्न). Ad-hoc कॅम्पा यांनी त्यांचे पत्र क्र.१३-१/२००९-CAMPA, दिनांक १२/८/२०१० ला पाठविलेल्या NCAC च्या दि. २४/६/२०१० च्या सभेचे इतिवृत्त पाठविण्या पुर्वीच वार्षिक नियोजन आराखडा २०१०-११ ला सुकाणू समितीच्या दि. २०/७/२०१० च्या सभेत मान्यता मान्यता प्रदान करण्यात आली.<br>वनभवन पुणे येथील इमारतीचे बांधकाम वार्षिक नियोजन आराखडा २०१०-११ प्रस्तावित केले आहे आणि त्यानूसार सुकाणू समितीने मान्यता प्रदान केल्यामुळे सदर काम करण्यात आले.<br>२. पर्यायी वनीकरणाअंतर्गत इमारत बांधकाम नाकारले बाबतचे अभिप्राय. | **Earlier comment by AG :-**<br>1) The CAMPA guidelines were issued in 2009 and it was mentioned that the funds were to be utilized for development., maintenance and protection of Forest Construction of Van Bhavan does not fall under the above categories. Even NCAC had clarified that the cost of construction activity cannot be met from CAMPA. The reply that the above direction was received after approval of Annual Plan of Operation(APO) is not acceptable.<br>**Earlier comment by AG :-**<br>2)Even if priority was given to Compensatory | १. पुणे शहरातील वनविभागाची कार्यालये एकाच इमारतीत स्थलांतरीत करण्याचा दृष्टीने वन भवन बांधकामाचा वार्षिक नियोजन आराखडा २०१०-११ मध्ये समावेश करण्यात आला. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 20/7/2010 रोजी झालेल्या सुकाणु समीतीच्या बैठकीत, वार्षिक नियोजन आराखडा २०१०-११ ला मान्यता प्रदान करण्यात आली. कॅम्पाच्या मार्गदर्शक सुचना दिनांक 12/8/2010 ला म्हणजेच वार्षीक आराखडा मंजुरीनंतर विभागास प्राप्त झाल्या. कॅम्पाचा मार्गदर्शक तत्वांमधील मूळ व व्यापक तत्वामध्ये इतर बाबी सोबत पायाभुत सुविधांचा विकास व त्याच्याशी संबंधीत किंवा अनुषंगिक बाबींचा समावेश होतो. वनविभागाची पुण्यातील विविध भागातील कार्यालय वनभवनात आल्यामुळे इमारतीचे भाडे, कर, विज, इधंन व वेळेच्या बचती बरोबरच या कार्यालयांच्या कार्यक्षमतेत वाढ झालेली आहे.<br>नविन प्रशासकिय इमारतीत मुख्य वनसंरक्षक (प्रा.) कार्यालया व्यतीरिक्त मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), कार्यआयोजना, संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण, विभाग इत्यादी कार्यालय स्थलातंरीत करण्यात आली आहेत, यामुळे वानिकी क्षेत्राशी संबंधीत सर्व कार्यालयामध्ये योग्य समन्वय साधला जाईल. त्यामुळे वनभवन या प्रशासकिय इमारतीचे बांधकामाकडे व्यापक दृष्टीकोणातुन पायाभुत सुविधांशी संबंधीत व अनुषंगिक गतीविधी म्हणुन पाहण्यात यावे असे सादर करण्यांत येते.<br>२ राज्य कॅम्पा यांनी पर्यायी वनीकरण कार्यक्रमास नेहमीच प्राधान्य देवून पर्यायी |

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |

**२ (विषय):**

मितींचे बांधकाम,विभागीय कार्यालयाची दुरूस्ती आणि सफेदी इत्यादींसाठी २.६६ कोटी रक्कम खर्च केली.याचा परिणाम पर्यायी वनीकरण कार्यक्रमाचा १९.१५ कोटी निधी हिरावून घेण्यात आला.

महाराष्ट्र शासनाने नमूद केले की "वन भवन" बांधकामावर CAMPA निधीतून खर्च करण्यात आला कारण खर्चाच्या काही बाबी CAMPA खात्यातुन करण्यावर प्रतिबंध करण्याचे NCAC चे निर्देश सुकाणू (Steering) समितीने २०१०-११ च्या कामाच्या वार्षिक योजनेस मंजुरी दिल्यानंतर प्राप्त झाले.महाराष्ट्र शासनाने पुढे असेही नमूद केले की इतर बांधकामावर करण्यात आलेल्या रू.२.६६ कोटीचा खर्च राज्य CAMPA च्या कार्यकारी समितीच्या मंजूरीनेच करण्यात आला.

उत्तर मान्य करणे योग्य नाही कारण २०१०-११ च्या कामाच्या वार्षिक योजनेतून "वन भवन" बांधकामाचा प्रस्ताव जून २०१० मध्ये NCAC चे निर्देश प्राप्त झाल्यावर परत घेता येवू शकला असता. तसेच,रू.२.६६ कोटी खर्च पर्यावरण व वन मंत्रालयाच्या पूर्व परवानगी शिवाय करण्यात आला आणि म्हणूनच तो अनियमित आहे.

**३ (विभागाचे अभिप्राय):**

राज्य कॅम्पा यांनी पर्यायी वनीकरण कार्यक्रमास नेहमीच प्राधान्य देवून पर्यायी वनीकरणाची कामे केलेली आहेत. कॅम्पा अंतर्गतचा एकूण तरतूदीच्या तुलनेत पर्यायी वनीकरणासाठी करण्यात आलेली वर्षवार तरतूद खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | वार्षिक नियोजन आराखडा वर्ष | वार्षिक नियोजन आराखडयातील एकूण तरतूद (रु. कोटी) | पर्यायी वनीकरणासाठी एकूण तरतूद | नक्त वर्तमान मूल्याअंतर्गत एकूण तरतूद (रु. कोटी) |
|---|---|---|---|---|
| १ | २०१०-११ | ८९.०० | ३५.७० | ५३.३० |
| २ | २०११-१२ | १३०.०० | ४९.४३ | ८०.५७ |
| ३ | २०१२-१३ | ११७.०० | ५२.०८ | ६४.९२ |
| ४ | २०१३-१४ | ११५.०० | ४१.०० | ७४.०० |
| ५ | २०१४-१५ | १५०.०० | ४६.०० | १०४.०० |
| ६ | २०१५-१६ | १९०.०० | ५५.०० | १३५.०० |
| ७ | २०१६-१७ | २००.०० | ६०.०० | १४०.०० |

वार्षिक नियोजन आराखडा तयार करतांना पर्यायी वनीकरणाचे कामास प्राधान्य देण्यात येते. MOEF यांनी मान्यता दिलेल्या अटीनुसार निधी वितरीत करतांना, नविन रोपवने, रोपवनाची निगा राखणे, बांधील कामे, कॅट प्लॅन वर्क्स इत्यादी कामाकरिता प्राधान्य देवून नंतरच उर्वरीत रक्कम नक्त वर्तमान मूल्याअंतर्गतची कामे करण्यास उपलब्ध करुन देण्यात येते. दिनांक २०.७.२०१० च्या राज्य सुकाणू समितीच्या सभेच्या कार्यवृत्ताचे अवलोकन केले असता वनसंवर्धन कायदा अंतर्गतची कामे अनिवार्य असल्याचे दिसून येते. (कार्यवृत्तांतील परि.९) (2)

३. वनप्रशिक्षण संस्था वरील खर्चाबाबत नमूद करण्यात येते की, कॅम्पाचे दि. २.७.२००९ मधील तरतूदीनूसार संशोधन, शिक्षण, प्रशिक्षण इत्यादी

**४ (महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय):**

Afforestation (CA) in APO, fact remains that out of 89 crore amount (with which the CAMPA account was opened). 19.15 crore was used for construction contrary to CAMPA guidelines.

**Earlier comment by AG :-**

3) Explanation to the point that the expenditure was incurred with the approval of

**५ (विभागाचे अभिप्राय):**

वनीकरणाची कामे केलेली आहेत. ही बाब प्रत्येक वार्षीक नियोजन आराखडयावरुन स्पष्ट होते. कॅम्पा अंतर्गतच्या एकूण तरतूदीच्या तुलनेत पर्यायी वनीकरणासाठी करण्यात आलेली वर्षवार तरतूद खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | वार्षिक नियोजन आराखडा वर्ष | वार्षिक नियोजन आराखडयातील एकूण तरतूद (रु.कोटी) | पर्यायी वनीकरणासाठी एकूण तरतूद (रु.कोटी) (CA) | नक्त वर्तमान मुल्यांतर्गत एकूण तरतूद (रु.कोटी) (NPV) |
|---|---|---|---|---|
| १ | २०१०-११ | ८९.०० | ३५.७० | ५३.३० |
| २ | २०११-१२ | १३०.०० | ४९.४३ | ८०.५७ |
| ३ | २०१२-१३ | ११७.०० | ५२.०८ | ६४.९२ |
| ४ | २०१३-१४ | ११५.०० | ४१.०० | ७४.०० |
| ५ | २०१४-१५ | १५०.०० | ४६.०० | १०४.०० |
| ६ | २०१५-१६ | १९०.०० | ५५.०० | १३५.०० |
| ७ | २०१६-१७ | २००.०० | ६०.०० | १४०.०० |

वार्षिक नियोजन आराखडा तयार करतांना पर्यायी वनीकरणाचे (Compensatory Afforestation) कामास प्राधान्य देण्यात येते. कारण ही कामे अनिवार्य असतात. MoEF यांनी मान्यता दिलेल्या अटीनुसार निधी वितरीत करतांना, नविन रोपवने, रोपवनाची निगा राखणे, बांधील कामे, कॅट प्लॅन वर्क्स इत्यादी कामाकरीता प्राधान्य देऊन नंतरच उर्वरीत रक्कम नक्त वर्तमान मुल्यांतर्गतची कामे करण्यास उपलब्ध करुन देण्यात येते. दिनांक २०/०७/२०१० च्या राज्य सुकाणू समितीच्या सभेच्या कार्यवृत्तांतील परिच्छेद - ९ मध्ये वनसंवर्धन कायदा अंतर्गतची कामे अनिवार्य असल्याचे स्पष्ट केले आहे. (इतीवृत्तातील परिच्छेद 9 ची छायांकित प्रत संलग्न आहे.) — (2)

3. पर्यायी वनीकरणांतर्गतचे (Compensatory Afforestation) कामास

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | बाबीसाठीची तरतूद आहे. वन कर्मचाऱ्यांना<br><br>प्रशिक्षणाची आवश्यकता आहे म्हणून सदर घटकाअंतर्गतची तरतूद ही राज्य कॅम्पाचे ध्येय व उद्दिष्टानुसार आहे आणि म्हणून राज्य कार्यकारी समितीचे दि. ३०.८.२०१३ चे सभेत सदर कामास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.<br><br>४. राज्य कॅम्पाचे मार्गदर्शक सुचना व उद्दिष्टानुसार क्षेत्रिय कर्मचाऱ्यांकरिता निवास सुविधा पूरविणे आवश्यक असल्याने निवास स्थानाचे दुरुस्तीकरिता निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.<br><br>५. राज्य कार्यकारी समिती यांनी दि. ३०.११.२०१३ चे सभेत ठाणे वृत्तांतील विभागीय कार्यालय दुरुस्ती, Type IV चे निवासस्थान, पडघा येथील विश्रामगृहाचे संरक्षक भिंतीचे कामास राज्य कॅम्पास, प्राप्त होण्याऱ्या व्याजाचे रकमेतून खर्च करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.<br><br>६. राज्य कार्यकारी समितीचे दि. १६.२.२०१३ चे सभेने मान्यता प्रदान केल्यानूसार अमरावती वनवृत्त कार्यालयाचे दुरुस्तीचे काम, कॅम्पा अंतर्गत प्राप्त झालेल्या व्याजाचे रकमेतून करण्यात आले.<br><br>७. कोल्हापूर वनवृत्तातील सांगली वनविभागातील चौरंगीनाथ सप्तश्रृंगी रस्त्याचे कामाचा समावेश वार्षिक नियोजन आराखडा २०१२-१३ मध्ये करण्यात आला. त्याअंतर्गत सदर कामाचे वाढीस रकमेस कार्यकारी समिती राज्य कम्पाचे दि. १६.२.२०१३ चे सभेत मान्यता प्रदान करण्यात आली.<br><br>८. वार्षिक नियोजन आराखडयातील प्रस्तावित असलेली, विविध प्रकारची कामे वेळीच पुर्ण करणे, कॅम्पा निधीचा पुर्ण विनियोग करणे. कामाचा दर्जा व गुणवत्ता इत्यादी बाबी विचारात घेऊन वार्षिक नियोजन आराखडयातील मंजूर बाबीवरील खर्च पुर्ण करण्याकरिता, कार्यकारी समिती राज्य कॅम्पा यांचे सभेत कॅम्पाचे निधीचे पुर्नविनियोजन करण्यात आले. आणि त्याप्रकारचे सन २०१२-१३ अंतर्गत पुर्नविनियोजन प्रस्ताव सुकाणू समिती राज्य कॅम्पा यांनी दि. १२.३.२०१३ च्या सभेत मान्यता प्रदान केलेली आहे. | Executive Committee is not acceptable as the CAMPA guidelines is clear that the funds are to be utilized for development, maintenance and protection of Forest. | प्राधान्य देऊन पुणे येथील प्रशासकीय ईमारतीचे बांधकाम नक्त वर्तमान मुल्यांतर्गतचे (Net Present Value) बाबी मधून खर्च करण्यात आलेला आहे. हे काम करतांना वनांचा विकास, परिरक्षण अथवा संरक्षण विषयक कोणत्याही कामाचा निधी कमी करण्यात आलेला नाही. |

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| 2.1.9.2 | **तदर्थ CAMPA खात्यात राखीव निधी हस्तांतरीत न करणे**<br><br>सर्वोच्च न्यायालयाच्या मे 2006 मध्ये निदर्शनास आले की CAMPA अद्याप कार्यान्वित झाले नाही आणि त्यांनी जो पर्यंत CAMPA कार्यान्वित होत नाही तोपर्यंत एक तदर्थ संस्था (तदर्थ CAMPA असे संबोधले जाईल) गठित करावयाचे आदेश दिले. न्यायालयाने आदेश दिले की CAMPA च्या वतीने वसूल करण्यात आलेले सर्व पैसे जे राज्य शासनाच्या विविध कार्यालयांकडे आहे ते तदर्थ CAMPA खात्यात (ज्याचे नियंत्रण पर्यावरण व वन मंत्रालयाकडे आहे) हस्तांतरीत करावयास पाहिजे. महाराष्ट्र वन विभागाने क्षेत्रीय कार्यालयांना आदेश निर्गमित केले (जुलै 2008) की उपयोगकर्ता संस्थांकडून तदर्थ CAMPA स्थापित व्हावयाच्या आधी मिळालेले आणि राखीव निधीत ठेवलेले सर्व पैसे तदर्थ CAMPA खात्यात हस्तांतरीत करण्यात यावे. परंतु महाराष्ट्र शासनाच्या वर्ष 2010-14 च्या वित्त लेख्याच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की, राखीव निधीत जमा केलेले रू.38.33 कोटी अद्याप तदर्थ CAMPA खात्यात हस्तांतरीत करण्यात आले नाही (डिसेंबर 2015) तसेच,निवडलेल्या 13 पैकी सात विभागांत रू.2.08 कोटी राखीव निधीत ठेवले आहे.यामुळे न केवळ रू.38.33 कोटी नऊ वर्षापेक्षा (2006 ते 2015) जास्त कालावधीसाठी निष्क्रिय ठेवण्यात आले परंतु विविध पर्यायी वनीकरण कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी तेवढा CAMPA निधी अथवा त्याप्रमाणात निधी उपलब्धतेपासून राज्य वन विभागास विनांवापर वंचित ठेवण्यात आले.<br><br>महाराष्ट्र शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि मेळ घातल्यानंतर ही रक्कम तदर्थ CAMPA खात्यात हस्तांतरित करण्यात येईल असे आश्वासित केले. | सन २००५-०६ या आर्थीक वर्षामध्ये CAMPA च्या वतीने वसूल करण्यांत आलेली रक्कम महालेखाकार कार्यालय यांचे कडे मुख्य लेखाशिर्ष ८२३५ गौण लेखाशिर्ष २००- पर्यायी वनीकरण या अंतर्गत जे-राखीव निधी मध्ये जमा करण्यांत आलेला होता. परंतु महालेखाकार, नागपूर यांचे [] कार्यालया मार्फत गौण शिर्ष २००-food grain reserve fund या लेखा शिर्षात दर्शविण्यांत आला. या कार्यालयाचे पत्र क्रमांक २५०० दिनांक ०१/०१/२००७ अन्वये वरील लेखा शिर्षात दुरुस्ती करुन सुधारीत लेखाशिर्षात वळतीकरणेबाबत महालेखाकार, नागपूर (लेखा व हकदारी)-II यांना कळविण्यांत आले जेणे करुन सदरहू रक्कम कॅम्पा कडे वर्ग करण्यांत येईल. या संदर्भात महालेखापाल, नागपूर यांनी त्यांचे अर्धशासकीय पत्र दिनांक १०/०१/२००८ अन्वये महालेखापाल-१, मुंबई यांना झालेल्या चुकीच्या नोंदीची दुरुस्ती करुन लेखा शिर्षात दुरुस्ती करणे. वनविभागाचे उपलब्ध लेख्यानुसार रु. १९.९४९५ कोटी शिल्लक रक्कम २००-food grain reserve fund या लेखा शिर्षात दर्शविण्यांत आल्याचे निदर्शनास येते. लेखाशिर्षात चुकीच्या नोंदीची दुरुस्ती झाल्यानंतरच सदरहू रक्कम कॅम्पा कडे वर्ग करता येणे शक्य आहे.<br><br>महालेखाकार यांनी माहे डिसेंबर २०१५ मध्ये निवडलेल्या १३ पैकी सात वनविभाग अनुक्रमे अलीबाग, गडचिरोली,जळगांव,सांगली,सातारा,सिरोंचा आणि यावल यांचे कडे रु. २.०८ कोटी रक्कम राखीव निधीत ठेवले असल्याबाबत आक्षेप घेण्यांत आले आहे. त्यास अनुसरुन या कार्यालया मार्फत उपरोक्त वनविभागाने कोणत्या कारणास्तव सदर निधी राखीव निधीत ठेवला आहे याची शहानिशा करण्यांत येत असून जर ही रक्कम ॲडहॉक कॅम्पाच्या खात्यात वळती करण्याची गरज असेल तर तशी कार्यवाही तातडीने करण्यांची उपाययोजना करण्यांत येईल. केंद्र शासनाच्या दिशा निर्देशानुसार वृक्षतोडी व वन्यजीव कामासाठी लागणारी काही रक्कम विभागीय स्तरावर राखीव निधीत ठेवण्याची तरतूद असून याबाबत खात्री करणे आवश्यक आहे. | **Earlier comment by AG**<br>1) Copy of letter number 2500 dated 01-01-2007 addressed to Accountant General (A&E)-II. Maharashtra Nagpur and letter dated 01-01-08 addressed to Pr. Accountant General (A&E)-I Maharashtra Mumbai stated to be enclosed was not found enclosed. Copy of the same may be furnished along with further progress made in respect of reconciliation<br><br>**Earlier comment by AG**<br>2) Further progress made in depositing amount of Rs. 2.08 crore in adhoc CAMPA Fund may be stated. | १. आक्षेपात उल्लेखीत पत्र दिनांक ०१/०१/२००७ व १०/०१/२००८ च्या प्रती माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे. सदर प्रकरण महालेखाकार कार्यालयाचे स्तरावर अद्याप प्रलंबित आहे.<br><br>महालेखाकार (लेखा)महाराष्ट्र, नागपूर कार्यालयाने १०.१.२००८ च्या पत्रानुसार प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालयास ताळमेळासंदर्भात उचित कार्यवाही करण्यास विनंती केली आहे. या संदर्भात पुढील कार्यवाही प्रधान महालेखाकार मुंबई यांच्या स्तरावर प्रलंबित आहे. त्या अनुषंगाने अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि.४.७.२०१८ अन्वये प्रधान महालेखाकार मुंबई कार्यालयास या प्रकरणात त्वरित निर्णय घेण्याबाबत विनंती केलेली आहे. सदर पत्राची प्रत संलग्न आहे.<br><br>२. निवड करण्यांत आलेले 7 विभाग अलिबाग, गडचिरोली, जळगाव, सांगली, सातारा, सिरोंचा व यावल या विभागाचा रु. 2.08 कोटी रक्कमेचा समावेश रु. 38.33 कोटीचा राखीव निधीत आहे. या संबंधीचा निर्णय महालेखाकार कार्यालयाकडे विचाराधीन आहे. |

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| २.१.१.३ | निव्वळ विद्यमान मूल्याची वसूली न करणे<br>पर्यावरण व वन मंत्रालयाने (ऑक्टोबर २००६) सर्व राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांना वन जमीन वनेत्तर प्रयोजनास्तव वळती करण्यात आल्यास निव्वळ विदयमान मूल्य (NPV) वसूल करावयाचे आदेश दिले,या आदेशानुसार ज्या प्रकरणांत, ३० ऑक्टोबर २००२ पूर्वी तत्वत: मंजूरी देण्यात आली होती आणि ज्यासाठी अंतिम मंजूरी ३० ऑक्टोबर २००२ पूर्वी अथवा त्यानंतर देण्यात आली होती,अशा प्रकरणात सुध्दा निव्वळ विदयमान मूल्य वसूल करावयास पाहिजे.<br>लेखापरिक्षेस असे निदर्शनास आले की महाराष्ट्रात ३२ प्रकल्पांत उपभोगी संस्थांनी,ज्यांना ४७८.८१ हेक्टर जमीन वनेत्तर उपयोगासाठी दिली होती व अंतिम मंजूरी ऑक्टोबर २००२ नंतर देण्यात आली. त्यांनी निव्वळ विद्यमान मूल्याची (NPV)रक्कम ३०.१८ कोटी डिसेंबर २०१५ पर्यंत अदा केली नव्हती. महाराष्ट्र शासनाने नमूद केले की संबंधित उपभोगी विभागांच्या सचिवांना तसेच इतर उपभोगी संस्थांना त्वरेने निव्वळ विद्यमान मूल्य अदा करण्याबाबत विनंती केली आहे. | मा.सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक ०३.१०.२००६ चे आदेशानुसार ज्या प्रकल्पांचे वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत चे प्रस्तावांस केंद्र शासनाने दिनांक ३०.१०.२००२ नंतर अंतिम मान्यता दिली आहे, अशा सर्व प्रस्तावांत यंत्रणेकडून नक्त वर्तमान मूल्य (Net Present Value) वसूल करणे आवश्यक आहे. ज्या प्रस्तावांना तत्वत: मान्यता ३०.१०.२००२ पुर्वी प्राप्त झाली होती व अंतिम मान्यता ३०.१०.२००२ नंतर देणेत आली आहे, अशा प्रस्तावांसाठीही नक्त वर्तमान मूल्य वसूल करणे आवश्यक आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक ०३/१०/२००६ चे आदेशाची अंमलबजावणी पूर्वलक्षी प्रभावाने असल्यामुळे याबाबत वनविभागाकडून विशेष कार्यक्रमानुसार अशी रक्कम मंजूर करण्याचे कार्यवाही करण्यांत आली आहे. त्यानुसार सन २००८-०९ मध्ये असे सर्व प्रस्तावांच्या व त्यात शिल्लक असलेल्या वसूल करावयाच्या नक्त वर्तमान मुल्याचा आढावा घेण्यांत आला. त्यानुसार सुमारे११० प्रस्तावा मध्ये रु. २११.४१ कोटी थकीत नक्त वर्तमान मुल्य वसुलीस प्रलंबित असले बाबत दिसून आल्याने प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बलप्रमुख)म.रा. नागपूर यांचे कार्यालयातर्फे महालेखाकार, नागपूर यांना देखिल कळविण्यांत आले होते. या रक्कमे पैकी आता एकूण ३२ प्रकरणांमध्ये रु. ३०.१८ कोटी नक्त वर्तमान मुल्यांची रक्कम वसूल करावयाची प्रलंबित आहे.<br>याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०३/१०/२००६ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार सुमारे ३२ प्रस्तावातील रक्कम थकीत असलेल्या प्रकल्प यंत्रणा यांना नक्त वर्तमान मुल्याचा भरणा करणेबाबत प्रकल्प यंत्रणेला या कार्यालयाचे पत्र दिनांक १५/१०/२००७ व १९/१०/२००७ अन्वये तसेच पत्र दिनांक ०५/१०/२०१३,०८/११/२०१३ अन्वये व प्रधान सचिव (वने) यांचे दिनांक ०८/११/२०१३ संबंधित शासकीय प्रकल्प यंत्रणेचे सचिव, प्रधान सचिव यांना थकीत नक्त वर्तमान मुल्याची रक्कम भरणे बाबत कळविण्यांत आले आहे. तसेच या कार्यालयाचे पत्र दिनांक १६/१२/२०१३, २१/०१/२०१४, ०४/०४/२०१५, ३०/०१/२०१६,१३/०५/२०१६ अन्वये थकीत नक्त वर्तमान मुल्याची | **Earlier comment by AG**<br>The Collection of outstanding NVP from 32 use agencies may be expedited and may be intimated to PAC. | प्रकल्प यंत्रणेला वनविभागाकडून प्रलंबित नक्त वर्तमान मुल्य (NPV) लवकरात लवकर जमा करणेबाबत कळविण्यात आले आहे. तसेच त्यांना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना कळवून नक्त वर्तमान मुल्य (NPV) भरले नाही तर प्रकल्पाची मंजुरी रद्द करण्यात येईल असे कळविले आहे. या कार्यालयाकडून संबंधित प्रकल्प यंत्रणेच्या प्रमुखांना प्रलंबीत नक्त वर्तमान मुल्य (NPV) रक्कम वसुली करण्याबाबत सुचना दिल्या आहेत.<br>ज्या प्रकल्पांना ऑक्टोबर २००२ पर्यंत प्रथम मान्यता प्राप्त झाली व अंतिम मान्यता दिनांक 30/10/2002 नंतर प्राप्त झाली आहे. अशा 30 प्रकल्पाकडे एकुण रु. 19.24 कोटी इतके नक्त वर्तमान मुल्यापोटी (NPV) थकित आहेत.<br>प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) यांचे कार्यालयाकडून प्रकल्प यंत्रणेकडील थकित नक्त वर्तमान मुल्य (NPV) वसुल करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले. त्या अनुषंगाने दिनांक १५/१०/२००७, १९/१०/२००७ व अर्ध शासकीय पत्र दिनांक १०/०७/२०१७ रोजी संबंधित प्रकल्प यंत्रणा यांना कळविण्यास संबंधित वनवृत्तास कळविले आहे. दिनांक ०५/१०/२०१३ चे अर्ध शासकीय पत्राने देखील संबंधित विभागाचे प्रधान सचिव /सचिव यांना नक्त वर्तमान मुल्य (NPV) प्रलंबित निधी बाबत कळविले आहे. प्रधान सचिव वने यांनी देखील त्यांचे दिनांक ०८/११/२०१३ व १०/०४/२०१७ चे अर्ध शासकीय पत्राने संबंधित विभागाचे प्रधान सचिव /सचिव यांना प्रलंबित नक्त वर्तमान मुल्य (NPV) भरणेबाबत कळविले आहे. याव्यतिरिक्त अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी यांनी त्यांचेकडील अ. शा. पत्र दि. १०/०७/२०१७ अन्वये संबंधित मुख्य वनसंरक्षक यांना प्रलंबित नक्त वर्तमान मुल्याची रक्कम वसुल करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. |

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | रक्कम भरणे बाबत कळविण्यांत आले आहे. याबाबत मुख्य वनसंरक्षक, (प्रादेशिक)/ उपवनसंरक्षक यांचे स्तरावरुन सुध्दा संबधित यंत्रणेला थकीत नक्त वर्तमान मुल्याची रक्कम भरणे बाबत पाठपुरावा सुरु आहे. प्रकल्प यंत्रणेला असेही कळविण्यांत आलेले आहे कि, केंद्र शासनाचे निर्देशा प्रमाणे प्रलंबित नक्त वर्तमान मुल्य अदा न केल्यास त्यांचे प्रकल्पाची मान्यता रद्य करण्यांत येवू शकते.<br><br>निव्वळ विदयमान मुल्यांची वसूली प झालेल्या निव्वळ विदयमान मुल्याची प्रकल्प निहाय स्थिती सोबत जोडलेल्या सहपत्रात दर्शविली आहे. | | |

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| २.१.१० | **महसूलाची हानी**<br>वन उत्पादन राज्याच्या सामाजिक आर्थिक विकासात एक महत्वपूर्ण भाग अदा करतो.ग्रामीण लोक जे वन क्षेत्रात आणि त्या आसपासच्या विभागांत राहतात: त्यांच्या वाजवी गरजा भागविण्याव्यतिरिक्त, वन उत्पादनाच्या विक्रीतून राज्य राजकोषात मोठया प्रमाणात निधी येतो. इमारतीचे लाकूड,इंधन लाकूड,बांबू आणि इतर बरीच अकाष्ठ वन उत्पादने जसे तेंदु पत्ता,मोहफुले इत्यादीही महत्वाची वन उत्पादने आहेत. | | | |
| २.१.१०.१ | **बांबूचे समुपयोजन न केल्यामुळे हानी**<br><br>कार्य नियोजनानुसार बांबू कूपांचे तीन पातन मालिकांत विभाजन केले जाते आणि प्रत्येक पातन मालिका कापणी दर तीन वर्षाने नियत असते. बांबू कूपाची कापणी न झाल्यामुळे नवीन कोंब जे तीन वर्षानंतर कापणी करणे योग्य होतात. त्यांना पुनर्जीवित होण्यास अडथळा येतो.<br><br>निवडलेल्या १३ पैकी चार विभागांत कार्य नियोजनात नेमल्याप्रमाणे २०१०-१५ दरम्यान बांबूची कापणी करण्यात आली नाही.त्यामुळे कापणीसाठी नियत क्षेत्र आणि प्रत्यक्ष कापणी केलेले क्षेत्र यांची तुलना करता त्यात २३ ते ९४ टक्के तूट होती. परिणामी २०१०-१५ दरम्यान रू.३७.५२ कोटी अंदाजित महसूलाची हानी बांबूची कापणी न झाल्यामुळे झाली.<br><br>महाराष्ट्र शासनाने असे नमूद केले की, बांबू मुख्यत: चंद्रपूर आणि गडचिरोली वन मंडळात आहे. जे असामाजिक घटकांनी प्रभावित आहेत. परिणामी,त्यांच्यामुळे बांबूच्या कापणीच्या कामात अडथळे येतात. आणि काही वेळी तर काम बंद करावे लागते. या अडचणी असतानाही तेथे बांबू चोरीच्या कोणत्याही घटना नाहीत आणि वाढून राहिलेले बांबू अप्रभावित राहिले आहेत, आणि | गडचिरोली वन वृत्तामधील वनरक्षकांच्या एकूण मंजूर पदांपैकी ९५% वनरक्षक कार्यरत आहेत. सबब गडचिरोली वनवृत्तामध्ये वनरक्षक पदांची संख्येची कमतरता नाही.<br><br>नक्षलवादासारख्या गंभीर समस्यामुळे वनविभागाच्या कामावर झालेला प्रतिकूल परिणामी खालील प्रमाणे विषद करण्यांत येत आहे.<br><br>१. गडचिरोली जिल्हयातील नक्षलवादाच्या घटना सतत होत असतात. सन २०१२-२०१५ या कालावधीत सहा वन परिक्षेत्र कार्यालये आणि २ शासकीय ट्रक नक्षलवाद्यांद्वारे जाळण्यात आले. याच कालावधीत वन कर्मचा-यांना गंभीर मारहाणीच्या ६ घटना देखील घडलेल्या आहेत. या घटनांचा गडचिरोली वन वृत्तामधील कर्मचा-यांचे मानसिक दृष्टया खच्चीकरण झाले. व त्याचे परिणाम कूप कामावर सुध्दा झाले.<br><br>२. पैसा कायद्याची अंमलबजावणी - अनुसूचित भागातील नैसर्गिक संसाधनांचा वापर ग्रामसभा स्वयंशासनाद्वारे करेल या उद्देशाने २४ डिसेंबर १९९६ पासुन पंचायत (अनुसूचित क्षेत्र विस्तार) कायदा, १९९६ केंद्र शासनाने लागू केला. हा कायदा भारतीय संविधानातील भाग IX मधील पंचायतआणि अनुसूचित क्षेत्र या तरतूदींना अधिक बळकट होतो.<br><br>गडचिरोली जिल्हयातील ८०% भाग अनुसूचित क्षेत्रात येत असून यामध्ये जिल्हयातील १३१४ गावांचा समावेश होतो. गडचिरोली जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रातील बहुतांश भागात नैसर्गिक साधन | <u>Earlier comment by AG</u><br>Brief note prepared by Maharashtra Forest Department in February 2015 indicated that due to under-deployment of operational staff, there was loss of 42.65 crore and 1.09 crore on account of illicit cutting of trees and fire incidents. As on March 2015 there was shortage of 890 Foresters and Forest Guards . Regarding PESA it is to state that this was neither, stated during exit conference nor in reply to audit observation. Further, under PESA. Villages were notified in August 2014 whereas audit has pointed out the position for non-exploitation of bamboos as targeted during 2010-14 may be stated to PAC. | सन २०१० ते २०१४ या कालावधीत बांबू निष्कासन न होण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.<br>१. <u>नक्षल समस्या</u> :- गडचिरोली जिल्हा हा नक्षलिदृष्टया अतिशय संवेदनशील आहे. सन २०१२-२०१५ या कालावधीत नक्षलवाद्याकडून वनविभागाचे ६ परिक्षेत्र कार्यालय जाळपोळ व अभिलेख नष्ट करण्याच्या घटना घडलेल्या आहेत. तसेच वनविभागाचे २ ट्रक नक्षलवाद्यांनी जाळलेले आहेत. तसेच याच कालावधीत वनकर्मचा-यावर प्राणघातक हल्ले झाल्यामुळे त्यांच्या मनोधैर्यावर परिणाम झालेला आहे. परिणामी एकुणच वानिकी कामावर परिणाम झाला आहे.<br>२. <u>न्यायालयीन प्रकरणे</u> :- मे.बिल्ट व महाराष्ट्र शासन यांच्यात दि. ११.३.२००४ रोजी झालेल्या करारानुसार सन २००४-०५ ते २०१३-१४ या १० वर्ष कालावधीकरिता बांबू पुरवठा करण्याबाबत करार करण्यात आला. बांबू पुरवठ्याचा दर पहिल्या ५ वर्षासाठी प्रती मे.टन रु.६५०/- आणि पुढील ५ वर्षाकरिता यावर ५% वाढ किंवा भाववाढ निर्देशांक यापैकी जे जास्त असेल त्या दराने पुरवठा करण्याची तरतूद होती. शासनाने दि. १५.७.२००१ अन्वये बांबू पुरवठ्याचे सन २००५-०६ पासून सुधारित दर प्रती मे.टन रु.१४९५/- व पुढील वर्षाकरिता ५% किंवा भाववाढ निर्देशांक यापैकी जे जास्त असेल याप्रमाणे दरात सुधारणा केली. मे.बिल्ट यांना सुधारित दर मान्य नसल्यामुळे त्यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर येथे रिट पिटीशन क्र. ३६५९/२००९ दाखल केली. सदर प्रकरणात मा. उच्च न्यायालयाने दि. ८.२.२०१० रोजी अंतरिम आदेशाद्वारे बांबू पुरवठ्याचे दर प्रती मे.टन रु.८००/- याप्रमाणे निर्धारित करून दिलेले आहे. सदर न्यायालयीन आदेशानुसार शासन आदेश क्रमांक एस-३०/२००९/प्र.क्र.२२३/ फ-१, दिनांक २१.४.२०१० प्राप्त झाले.शासनाकडून मे.बिल्ट यांना बांबू कूप वाटपासाठी उपलब्ध करून देण्याबाबत आदेश प्राप्त झाले. परंतु सन २००९-१० वर्षात बांबू तोडीसाठी फारच कमी कालावधी मिळाल्यामुळे या वर्षात बांबूची तोड पूर्णपणे होवू शकली नाही.<br>सन २०१०-११ पुरवठा वर्षाकरिता मे.बिल्ट यांना कोणत्या दराने बांबू पुरवठा करावे याबाबत संभ्रम होता. मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर यांचे दि. १.३.२०११ रोजीचे आदेशानुसार शासनाकडून दराची फेररचना होईपर्यंत दि. ८.२.२०१० चे दर लागू राहतील असे आदेश प्राप्त झाले. शासनाकडून सदर दरानुसार २०१०-११ वर्षात मे.बिल्ट यांना बांबू कूप वाटप करण्याबाबत शासन पत्र |

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | भविष्यात कधीही कापणीसाठी नेहमी उपलब्ध आहे. म्हणूनच येथे शासनास कोणतीही हानी होत नाही.<br><br>उत्तर मान्य करण्यायोग्य नाही कारण (अ) जानेवारी २०१५ पर्यंत महाराष्ट्र वन विभागात ८९० वनपाल आणि वन रक्षकांची कमतरता होती. जर पुरेसे कर्मचारी वर्ग तेथे नियुक्त करण्यात आले असते तर असामाजिक तत्वांची अडचण बऱ्याच प्रमाणात सोडविता आली असती आणि या क्षेत्रातील बांबूची अबाधित कापणी सुध्दा शक्य झाली असती. महाराष्ट्र वन विभागाने फेब्रुवारी २०१५ मध्ये तयार केलेल्या संक्षिप्त अहवालावरून असे निर्देशित होत आहे की कर्मचाऱ्यांच्या कमी नियुक्तीमुळे रू.४२.६५ कोटी आणि रू. १.०९ कोटीची हानी अनुक्रमे वृक्षांच्या अवैध कापणीमुळे आणि आगीच्या घटना घडल्यामुळे झाली. याशिवाय ७१.८७६ हेक्टर वन क्षेत्रसुध्दा अतिक्रमणाखाली होते आणि (ब) जर एखाद्या वर्षात एका पातन मालिकेतील बांबूची कापणी झाली नाही तर त्या पातन मालिकेची कापणी तीन वर्षानंतरच करण्यात येवू शकते.ज्यामुळे बांबूच्या दर्जात ऱ्हास होवून महसूलावर हमखास प्रभाव पडतो. | संपत्ती विपुल प्रमाणात आढळते. या कायद्याच्या अनुषंगाने मान, राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १९/०८/२०१४ रोजी अधिसूचना जारी करुन अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांना बांबू निष्कासनाचे अधिकार प्रदान करण्यांत आलेत. यामुळे सन २०१४ पासून अनुसूचित क्षेत्रात वन विभागाला बांबू निष्कासनाचे अधिकार नाही. | | दि. ६.४.२०११ अन्वये आदेश प्राप्त झाले. त्यानुसार सन २०१०-११ वर्षात मे.बिल्ट यांना बांबूचे कूप वाटप करण्यात आले. परंतु बांबू तोडीसाठी फारच कमी कालावधी मिळाल्यामुळे या वर्षात बांबूची तोड पूर्णपणे होवू शकली नाही.<br>सन २०१३-१४ हे वर्ष मे.बिल्ट यांना कूप वाटपाचे अंतिम वर्ष होते. परंतु या कालावधीत नक्षलवादी समस्या अतिशय तीव्र असल्यामुळे या वर्षात अगदी नगण्य बांबू उत्पादन झालेले आहे.<br>3. पेसा कायद्याची अंमलबजावणी :- अनुसूचित भागातील नैसर्गिक संसाधनाचा वापर ग्रामसभा स्वयंशासनाद्वारे करेल या उद्देशाने २४ डिसेंबर,१९९६ पासून (अनुसूचित क्षेत्र विस्तार) कायदा १९९६ केंद्र शासनाने लागू केला. हा कायदा भारतीय संविधानातील भाग IX मधील पंचायत आणि अनुसूचित क्षेत्र या तरतुदींना अधिक बळकट होतो. या कायद्याच्या अनुषंगाने मा. राज्यपाल महोदय यांनी दिनांक १९.८.२०१४ अन्वये अधिसूचना जारी करून अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांना बांबूचे मालकी अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे.<br>गडचिरोली जिल्ह्यात 1394 खेडी पेसा अंतर्गत अधिसुचित करण्यातआलेली आहेत. जी गडचिरोली जिल्हयाचा एकुण क्षेत्राचा 80 टक्के इतकी आहेत. यामध्ये अधिकांश वन ससांधनाचा समावेश होतो. त्यामुळे 2014 नंतर अधिसुचित क्षेत्रामध्ये वनविभागाव्दारे बांबु निष्कासनाला परवानगी नाही. |

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| 2.1.10.2 | चुकीच्या धारणा किंमती (Upset Price) चा अवलंब:-<br><br>महसूल व वन विभागाने निर्गमित केलेल्या (नोव्हेंबर १९८०) शासन निर्णयानुसार मुख्य वन संरक्षकाने त्यांच्या अखत्यारीतील प्रत्येक विक्री डेपोसाठी इमारती लाकडाच्या प्रत्येक प्रजाती आणि दर्जाची वर्ष निहाय दर अनुसूची तयार करून लिलावासाठी धारणा किंमत (Upset Price) निश्चित करण्यासाठी सूचित करावयास पाहीजे.जर इमारती लाकडाच्या मागील लागोपाठ तीन लिलावांतील प्रत्यक्ष विक्री किंमतीची सरासरी,दर अनुसूची नुसार ठरविण्यात आलेल्या किंमतीपेक्षा जास्त असेल तर सरासरी विक्री किंमत ही लिलावासाठीची धारणा किंमत असेल.<br><br>लेखापरिक्षेस असे निदर्शनास आले की मुख्य वनसंरक्षक गडचिरोली यांनी सागवन लाकडाच्या प्रत्येक प्रजाती आणि दर्जाची दर अनुसूची तयार करून त्यांच्या अधिपत्याखालील विक्री डेपोना कळविण्यास सहा ते आठ महिन्यांचा विलंब केला. परिणामी,२०११-१४ मध्ये करण्यात आलेल्या ७,३२३.६४ घनमीटर सागवान लाकडाच्या लिलावासाठी वनसंरक्षक, परिवहन व पणन विभाग बल्लारशा यांनी मागील वर्षाच्या दर अनुसूची नुसार धारणा किंमत निश्चित केली जी त्या वर्षाच्या लिलावासाठी लागू असणाऱ्या चालू दर अनुसूची पेक्षा आणि इमारती लाकडाच्या प्रत्यक्ष विक्री किंमतीच्या मागील लागोपाठ तीन लिलावांच्या सरासरीपेक्षा कमी होती.<br><br>महाराष्ट्र शासनाने नमूद केले की, लिलावासाठीची धारणा किंमत फक्त बोलीदाराने नमूद केलेल्या दराच्या मंजुरीसाठी मार्गदर्शकपर होती आणि म्हणूनच खुल्या लिलावात बोलीदाराने देवू केलेल्या दरांसोबत दर अनुसूचीचा काहीही संबंध नव्हता. परंतु मुख्य वनसंरक्षकास दर अनुसूची वेळेवर मंजुर करून सुसूचित करण्याचे निर्देश दिले आहे.<br><br>उत्तर मान्य करण्यायोग्य नाही कारण नोव्हेंबर १९८० | खुल्या लिलावात लाकडाची किंमत बाजारात चालू दराप्रमाणे मिळते. खरेदीदारांना धारणा किंमत माहिती राहत नसल्याने लाकडाची मिळणारी किंमत धारणा किंमतीवर आधारित राहत नाही. त्यामुळे धारणा किंमत चुकीची लावल्यामुळे शासनाचे नुकसान झाले असा निष्कर्ष काढणे संयक्तिक नाही. तथापि, अनुसुचित दर वेळेवर लावण्याबाबत मुख्य वनसंरक्षक यांना निर्देश देण्यांत आले आहेत. तसेच वनसंरक्षक, उपवनसंरक्षक यांना देखील प्रचलित नियमाप्रमाणे धारणा किंमत ठरविण्याचे निर्देश दिले आहेत.<br><br>तथापि, सदर प्रकरणात शासनाचे नुकसान झाले किंवा कसे या बाबींची खात्री करण्यांत येईल. तरी सदर परिच्छेद वगळण्यांत यावा, ही विनंती. | <u>Earlier comment by AG</u><br>The reply is not acceptable because, had the upset price been fixed correctly based on the average of actual sale price of timber for previous three consecutive auctions, the sale proceeds would have higher. In case if in auction if bidder quotes price lower than upset price then it is to be re-auctioned. Thus contention of department is not acceptable. Please state whether the revision of schedule rate was done in time after these observations were made by audit. | वनविभागाच्या बल्लारशाह येथिल मध्यवर्ती ईमारती आगारा मध्ये वनसंरक्षक, वाहतुक व विपणन, बल्लारशाह यांचे द्वारे ईमारती मालाचा जाहिर लिलाव शासन निर्णय दिनांक २९ एप्रिल, १९८६ मध्ये नमुद शर्ती व वेळोवेळी वरीष्ठांकडुन प्राप्त मार्गदर्शक सूचना नुसार करण्यात येतो. मध्यवर्ती आगारात विक्री साठी प्राप्त होणारा ईमारती माल प्रामुख्याने गडचिरोली वनवृत्तातील वनविभागातून आणल्या जातो. सदर लिलावासाठी ईमारती मालाची अपेक्षित किंमत मुख्य वनसंरक्षक, (प्रा.) गडचिरोली यांनी मंजूर केलेल्या अनुसुचित दराप्रमाणे लावण्यात येते. तसेच अपेक्षित किंमतीचे निर्धारण करतांना मागील ३ लिलावात प्राप्त झालेल्या किंमतीच्या सरासरीचाही विचार करण्यात येतो. अनुसुचित दर मंजूर करतांना मुख्य वनसंरक्षक (प्रा.) गडचिरोली हे विविध बाबींचा विचार करतात आणि या बाबीच्या माहिती मध्ये तफावत नसल्यास तेच दर कायम ठेवून सदर अनुसुचित दर हे पुढील सुधारणा होई पर्यंत अंमलात राहतात.<br>अशा प्रकारे अनुसुचित दर हे मागील ३ लिलावाच्या सरासरीचेच स्थिर असतात. प्रत्येक लिलावात प्राप्त होणारी किंमत ही प्रामुख्याने बाजारपेठेतील मागणी व पूरवठयातील कमतरता तसेच बोलीदारांच्या स्पर्धात्मक बोली आणि सर्वसाधारण आर्थिक परिस्थिती यावर अवलंबून असते. अशा प्रकारे जर बाजारपेठेत पुरेसा ईमारती माल उपलब्ध असल्यामुळे पुरेशी मागणी नसल्यास उपस्थित बोलीधारक अपेक्षित किंमती एवढीही बोली किंमत देत नाही, परिणाम स्वरुप त्यामुळे बरेचसे गट हे विक्री विना शिल्लक राहतात. सदर गट पुढील लिलावापर्यंत आगारात राहत असल्याने, त्यावर बाह्य वातावरणाचा जसे सूर्याच्या तिव्र किरणाचा, उष्ण व थंड हवामानाचा, पावसाचा इ. चा त्यावर विपरीत परिणाम होवून इमारती मालाचा दर्जा खालावतो. बऱ्याचशा प्रकरणी कमी दर्जाच्या प्रती मुळे ईमारती मालाच्या गटास अपेक्षित किंमत प्राप्त होत नसल्याने ते बऱ्याच काळ पर्यंत विना विक्री पडुन रहातात. त्यामुळे त्यानंतर होणाऱ्या लिलावात त्याला अपेक्षित किंमती पेक्षा कमी किंमत प्राप्त होत असल्याने व मालाचा दर्जा अधिक खालावू नये म्हणून प्राप्त किंमत मंजूर करणे क्रमप्राप्त ठरते. अर्थातच, त्यामुळे प्राप्त महसुलात निश्चितच घट दिसून येते. असे जरी असले तरी काही अपवादात्मक परिस्थितीत तसेच बाजारपेठेत अचानक मागणीत वाढ झाल्याने सदर मालास अपेक्षित किंमत किंवा त्यावरील बोली प्राप्त होते. परंतु हे क्वचितच पहायला मिळते. अनुसुचित दराचे निर्धारण करतांना सर्वसाधारणपणे मागील कालावधीत प्राप्त झालेल्या/ विक्री झाल्याचे गृहीत धरुन किंमती विचारात घेण्यात येतात. तथापि पुढे होणाऱ्या लिलावात ठेवण्यात येणाऱ्या मालाशी त्याचा ताळमेळ होवू शकत नाही. जर लिलावात असलेल्या मालाचा दर्जा खराब असेल तर कधीकधी सदर गट पुरेशी अपेक्षित किंमत प्राप्त न झाल्याने विक्रीविना राहण्याची अधिक शक्यता असते. अशा प्रकारे अपेक्षित किंमत निर्धारीत करतांना अनुसूचीत दर किंवा मागील तीन लिलावात प्राप्त बोलीच्या सरासरीचा आधार घेण्याची पध्दत आहे. वास्तविक पाहता अपेक्षित किंमत निर्धारीत करण्यासाठी लावण्यात आलेले निकष हे केवळ निर्देशक असतात. परंतु प्रत्यक्ष लिलावाचे वेळी असलेली परिस्थिती, बोलीदारांमधील स्पर्धा मालाची उपलब्धता, सर्वसाधारण आर्थिक परिस्थिती व मालाचा दर्जा यावर प्राप्त बोली ठरतात. त्यामुळे सरासरी दर लावल्यामुळे कमी महसुल प्राप्त झाला व शासनाचे नुकसान झाले हे म्हणणे संयुक्तिक नाही. मात्र सध्या मागिल तीन लिलावात प्राप्त होणारी सरासरी किंमतीचे आकडे किंवा अनुसुचित दर यापैकी जे |

BSÉ¤É0 827--3

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | च्या शासन निर्णयानुसार लिलावासाठीची धारणा किंमत चालू वर्षाच्या दर अनुसूचीप्रमाणे ठरवावयास पाहिजे होती.<br><br>तसेच,लेखापरिक्षेने २०१०-१५ मधील ११३ लिलावांपैकी यादच्छिकरित्या निवडलेल्या नऊ लिलावांत जरी मागील तीन लागोपाठच्या लिलावांतील इमारती लाकडाच्या प्रत्यक्ष विक्री किंमतीची सरासरी दर अनुसूचीपेक्षा जास्त होती तरी वन संरक्षक,परिवहन व पणन विभाग बल्लारशा यांनी लिलावासाठीची धारणा किंमत सरासरी किंमतीपेक्षा कमी निर्धारित केली. विक्री नोंदवहयांची आणखी तपासणी केल्यावर लेखापरिक्षेस असे निदर्शनास आले की लिलावातून प्राप्त झालेले अंदाजित विक्री उत्पन्न हे सरासरी विक्री किंमत लागू केली असता मिळाल्या असत्या अंदाजित उत्पनापेक्षा कमी होते.यामुळे नऊ लिलावांत रू.१.२६ कोटी महसूलाची हानी झाली. लेखापरिक्षेने चाचणीसाठी निवडलेला नमूना मोठा असता व त्याची पडताळणी करण्यात आली असती तर परिगणित केलेली हानी यापेक्षाही जास्त असती<br><br>महाराष्ट्र शासनाने नमुद केले की जरी चुकीच्या पध्दतीचा अवलंब करून लिलावासाठीची धारणा किंमत करण्यात आली असती तरीही हानीचे अनुमान त्या किंमतीच्या आधारावर काढता येऊ शकत नाही. तथापि वनसंरक्षक (परिवहन व पणन) बल्लारशा यांना योग्य पध्दती अवलंबविण्याच्या सूचना जारी केल्या आहेत. | | | जास्त तेच अपेक्षीत किंमत म्हणुन निश्चित करण्यात येतात. तसेच पारदर्शिता आणि अधिक महसुल मिळण्याचा उददेशाने ई-लिलाव पध्दती सुरु करण्यातआली आहे.<br>मु. व.सं. (प्रा.) यांचे दि. 7/1/2016 च्या आदेशानुसार अनुसुचित दर सुधारित करण्यात आले आहेत. |

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| 2.1.10.3 | आरा गिरणीच्या कमी वापरामुळे हानी<br><br>महाराष्ट्र राज्यात वन विभागाकडे १९६४ पासून आलापल्ली येथे एक आरा गिरणी कार्यान्वित आहे या गिरणीत १० "आरा" यंत्रे आहेत. ज्यापैकी फक्त तीन चालू स्थितीत असून त्यांची क्षमता प्रति दिन ४.५ घनमीटर लाकूड कापण्याची आहे. २०१०-१५ मध्ये ही आरा गिरणी ०.७१ घनमीटर प्रति दिन या दराने परिचलित होती आणि महसूल वसूली केवळ रू.०.२१ कोटी होती जेव्हा की याच काळात प्रचालन खर्च रू.२.४४ कोटी होता.आरा गिरणीचा २०१०-१५ दरम्यान झालेल्या कमी वापरामुळे रू.२.२३ कोटीची हानी झाली.<br><br>महाराष्ट्र शासनाने नमुद केले की प्रचालन किंमत आणि महसूल वसूली यांच्यातील फरक कमी करावयासाठी आरा यंत्राव्दारे कापणी किंमतीत सुधारणा करण्यात येईल आणि आरा गिरणीस एक वर्धनक्षम घटक बनविण्यासाठी योग्य कारवाई करण्यात येईल.<br><br>शिफारस ३: (i) वन विभागाने कार्य नियोजनात मंजुर करून समाविष्ट केलेले भौतिक लक्ष्य विभागाद्वारे वेळेवर साध्य करता येईल. याची खातरजमा करावी कारण एका कामाचे लक्ष्य साध्य करण्यातील तूट इतर परस्पर आधारित कामांच्या लक्ष्य साध्यतेवर आणि महसूल अनुकूलतेवर प्रतिकूल प्रभाव पाडते. (ii) **CAMPA** निधीतून ज्या बाबींवर खर्च करणे ग्राह्य आहे त्यावर खर्च करण्यास परावृत्त करावयास पाहिजे कारण त्यामुळे पर्यायी वनीकरण कार्यक्रमाचा निधी हिरावून घेतला जातो. (iii) महसूल हानी टाळण्याकरिता वन उत्पादनाची कापणी योग्य वेळी करावयास पाहिजे. | नमुद परिच्छेदाच्या अनुषंगाने मुख्य वन संरक्षक (प्रा) गडचिरोली यांचे कार्यालयाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.<br><br>आल्लापल्ली वनविभागातील आरा गिरणीची स्थापना १९६४ मध्ये शासन व नागरिकांकरिता आवश्यक लाकूड कापण्याच्या उद्देशाने करण्यात आली. सद्यस्थितीत सदर आरा गिरणी द्वारे फर्निचर दुकान व सामान्य नागरिकांकरिता कापलेल्या लाकडांचा घर बांधणी कामाकरिता पुरवठा केला जातो. सदर आरा गिरणी ही या भागातील 50 पेक्षा अधिक फर्निचर दुकान धारकांकरिता उपजीविकेचा स्रोत आहे.<br><br>सद्यास्थितीत सदर आरा गिरणीची प्रतीवर्षी 250 घनमीटर लाकूड कापत आहे. सदर आरा गिरणीने आपल्या पूर्ण क्षमतेचा वापर केल्यास प्रतिदिन 4.5 घनमीटर लाकूड कटाई करू शकते. याप्रमाणे एक वर्षात अंदाजे १४०० घनमीटर लाकूड कापू शकते.(१ वर्षातील ३१३ कार्यालयीन दिवसांचा विचार केल्यास).<br><br>तथापि, आलापल्ली येथील शासकीय आरा गिरणीची या भागात आवश्यकतेची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.<br><br>१. आलापल्ली क्षेत्र हे नक्षल प्रभावित असून या भागातील लोकांची आजीविका वनावर आधारित आहे. स्थानिक नागरिक लिलावाद्वारे इमारती माल विकत घेतात आणि त्याद्वारे ते आपले लहान फर्निचर मार्ट चालवितात. या भागातील जवळपास ५० हून अधिक फर्निचर दुकाने या आरा गिरणीवर आधारित आहेत. या फर्निचर दुकानांची वार्षिक उलाढाल अंदाजित २ लक्ष पकडल्यास सदर लाकूड व्यवसाय जवळपास १०० लाखांचा आहे. या दृष्टीने हि आरा गिरणी या नक्षल ग्रस्त क्षेत्रामधील युवकांना आजीविकांच्या विविध संधी निर्माण करीत आहे.<br>२. "कौशल्य विकास अभियान " हा केंद्र शासनाचा अतिशय महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. आलापल्ली येथील तंत्र शिक्षण महाविद्यालयात विशेषतः सुतारकामाचे प्रशिक्षण दिले जाते. सुतारकामावर आधारित व्यवसाय आलापल्ली, भामरागड, सिरोंचा येथील युवकांना भरघोस आर्थिक लाभ देणारा ठरू शकतो. या कौशल्य विकासाच्या युगात, लाकडावर आधारित व्यवसायाच्या भविष्यातील मागणीची पूर्तता करण्याकरीता आल्लापल्ली येथिल आरा गिरणी महत्वाची कामगिरी बजावू शकते.<br>३. यापूर्वीचे लाकूड कापण्याचे दर १८००/- रुपये प्रती घनमीटर | No remarks | |

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | होते. या क्षेत्रामधील प्रचलित दरानुसार दर संशोधित करून नवीन दर २४००/- रुपये प्रती घनमीटर इतका निश्चित करण्यात आला. यामुळे आरा गिरणीकरिता लागणारा खर्च आणि मिळणारा महसूल यामध्ये घट होण्यास मदत होईल.<br>या क्षेत्रात एकही अधिकृत आरा गिरणी नसल्यामुळे, सदर आरा गिरणी बंद झाली तर अनधिकृतपणे लाकडे कापण्याचे प्रमाण वाढेल आणी याचा प्रतिकूल प्रभाव वन संरक्षणावर पडेल.<br>एकंदरीत या भागातील परिस्थितीचा विचार करता आलापल्ली येथील आरा गिरणीला केवळ नुकसान करणारा प्रकल्प या दृष्टीकोनातून न बघता या भागातील युवकांना रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या स्रोताच्या दृष्टीकोनातून बघण्यात यावे असे मत आहे. | | |

<table>
<tr><th>परि.क्र.</th><th>विषय</th><th>विभागाचे अभिप्राय</th><th>महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय</th><th>विभागाचे अभिप्राय</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td></tr>
<tr><td>2.1.11</td><td colspan="4">संनियंत्रण,मुल्यांकन आणि आंतरिक नियंत्रण:- कोणतीही योजना,कार्यक्रम किंवा प्रक्रिया यांच्या प्रगतीचा मग राखण्यासाठी संनियंत्रण आणि मूल्यांकन हे चुकांचा शोध घेऊन त्यावर तत्परतेने सुधार कारवाई करण्याकरिता आणि भविष्यातील नियोजनासाठी बळ शिकण्याकरिता,अत्यंत महत्वाचे आहे.</td></tr>
<tr><td>2.1.11.1</td><td>कार्य नियोजनाचे अपुरे संनियंत्रण<br>• नियंत्रण प्रपत्रे न ठेवणे<br>कार्य नियोजन विभागाने सर्व वनसंवर्धन कामांवर जसे वृक्ष पातन,सफाई,कापणी (Cut-back) कामे, विरळीकरण इत्यादींवर संनियंत्रण ठेवण्यासाठी कार्य नियोजनाच्या कालावधीची कूप नियंत्रण प्रपत्रे (CCControl forms) तयार करून ती ठेवावयास पाहिजे. तसेच,कार्य नियोजन विभागाने पाडण्यासाठी चिन्हांकित केलेल्या वृक्षांचे आणि तसेच,ठेवण्यात येणाऱ्या वृक्षांच्या दस्तावेजांचे संनियंत्रण ठेवण्यासाठी पातन नियंत्रण प्रपत्रे सुध्दा ठेवावयास पाहिजेत.<br><br>लेखापरिक्षेत असे निदर्शनास आले की, निवडलेल्या सहा पैकी पाच विभागात नियंत्रण प्रपत्रे ठेवण्यात आली नव्हती आणि त्यामुळे वृक्ष झाडांना पाडणे,यासह विविध वन संवर्धन कामांबाबत महत्वपूर्ण माहिती या कार्य नियोजन विभागांकडे उपलब्ध नव्हती. परिणामी,कार्य नियोजन विभाग महसूल निर्मिती कामांवर पुरेसे संनियंत्रण ठेऊ शकला नाही.<br><br>महाराष्ट्र शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की मुख्य वनसंरक्षकांना वनीकरण कामांवर उचित संनियंत्रण ठेवण्यासाठी नियंत्रण प्रपत्रे नियमितपणे सादर करावयाच्या सूचना जारी करण्यात येत आहेत.<br>• वळतीकरण प्रस्तावांच्या मंजुरीत विलंब<br>राष्ट्रीय कार्य नियोजन संहिता,2004 अनुसार जर कोणतीही वन संवर्धन कार्य करण्यात येत नसली अथवा एखादे काम कार्य नियोजनानुसार नसेल तर,ते मंजूर कार्य नियोजनातील कामाची वळवणूक असे समजण्यात येईल.<br>लेखापरिक्षेत असे निदर्शनास आले की, निवडलेल्या 13 पेकी चार विभागांत 2010-14 दरम्यान 30,370.73 हेक्टर क्षेत्राचे वळतीकरण प्रस्ताव संबंधित वनसंरक्षक/प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे कडे मंजूरीसाठी पाठविण्यात आले. जे प्रलंबित आहेत (डिसेंबर 2015)<br><br>महाराष्ट्र शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमुद केले की, प्रलंबित वळतीकरण प्रस्तावांवर निर्णय घेण्यासाठी संबंधित वनसंरक्षकास कळविण्यात येईल.</td>
<td>दरवर्षी उपवनसंरक्षक प्रादेशिक हे त्यांचे विभागांचे कुप कंट्रोल फॉर्म अद्यावत करतात व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांना प्रत्येक वर्षाचा अहवाल ऑक्टोबर महिन्यात पाठवितात. नंतर मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) हे त्या त्या विभागाची कूप कंट्रोल फार्मची तपासणी करुन अहवाल संबंधीत कार्य आयोजना विभागाला डिसेंबर अखेर पर्यंत सादर करीत असतात.<br><br>संबंधीत कार्य आयोजना अधिकारी हे प्राप्त झालेले अहवालावर पुढील कार्यवाही करतात. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांचेकडून कार्य आयोजना अधिकारी यांना कूप कंट्रोल फार्म सन २०१२-१३ए २०१३-१४ व २०१४-१५ या वर्षाकरिता प्राप्त झालेले नाही.करिता अ.प्र.मु.व.सं. (कार्य आयोजना) यांचेकडून पत्र क्र.कक्ष१४/लेप-२/४६१, दिनांक २८/०७/२०१६ स्मरणपत्र क्र.५१३, दिनांक ०६/०८/२०१६ व पत्र क्र. ६०६, दिनांक २९/०८/२०१६ देण्यांत आले असुन माहिती अद्यावत करणे बाबत पाठपुरावा सुरु आहे.<br><br>विचलन प्रस्तावास मान्यता मिळण्यास झालेल्या उशीरा बाबत: विचलन प्रस्ताव हे उपवनसंरक्षक (प्रा) हे तीन प्रतीत तयार करुन मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांना ऑक्टोबर अखेर पर्यंत सादर करतात. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) हे विचलन प्रस्तावाची तपासणी करुन संबंधीत कार्य आयोजना विभाग यांना डिसेंबर अखेर पर्यंत सादर करतात. कार्य आयोजना अधिकारी हे विचलन प्रस्ताव संबंधीत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांना पाठवित असतात. जर विचलन प्रस्ताव किरकोळ स्वरुपाचे असल्यासत्यावर शिफारस करुन प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) नागपूर यांचे कडून मंजूर करुन घेतात. विचलन प्रस्ताव मोठया स्वरुपाचे असल्यास त्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यांत येते.<br>कार्य आयोजना अधिकारी यांचेकडे मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांचेकडून सन २०१२१३ए २०१३-१४ए २०१४-१५ या वर्षाकरिता विचलन प्रस्ताव प्राप्त झालेले नाही. महसूलावर विपरित परिणाम होणार नाही म्हणून मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांना नियमितपणे विचलन प्रस्ताव सादर करण्यांत वेळोवेळी अ.प्र.मु.व.सं. (कार्य आयोजना) यांचे कडून पत्र क्र.कक्ष-१४/लेप-२/४६१, दिनांक २८/०७/२०१६ स्मरणपत्रक्र. कक्ष-५१३, दिनांक ०६/०८/२०१६ व पत्र क्रमांक ६०६, दिनांक २९/०८/२०१६ सुचना देण्यांत आलेली आहे.</td>
<td><u>Earlier comment by AG</u><br>1) PAC may instruct the department to update the coupe control forms and felling control forms. PAC would also like to know the action taken against the concerned officers for not preparing and maintaining coupe felling control forms<br>2) In four divisions the deviation proposal involving 30,370 ha were sent to concerned CFs, PCCF but were pending for approval. The reasons for pendency may be stated.</td>
<td>1. कार्य आयोजना संहिता प्रमाणे कार्य आयोजना मधील तरतूदींची अमंलबजावणीचे संनियंत्रण करण्यात येते. संबंधीत प्रादेशीक वनविभागाच्या कार्य आयोजना मध्ये विवीध दिलेले कंट्रोल फॉर्म ची पूर्तता संबंधीत उपवनसंरक्षक (प्रा) करतात.<br><br>या कार्यालयाचे पत्र क्र कक्ष-१४/का.आ./२२४ दि.०४ जून२०१६ अन्वये कार्य आयोजना अमलबजावणी संबंधी संनियंत्रण ठेवण्यासंबंधी उपयुक्त मार्गदर्शक सुचना संबंधीतांना देण्यात आलेले आहे.<br><br>2. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-१४/ले.प./११५६ दि.१५ डिसेंबर २०१५ अन्वये सर्व प्रादेशीक मुख्य वनसंरक्षक यांना कंट्रोल फॉर्मस त्यांचे अधिनस्त असलेले प्रादेशीक वनविभागाकडून पूर्ण करून घेण्याचे सुचना देण्यात आलेले आहे.<br><br>विचलन प्रस्ताव बाबत वर्तमान स्थिती खालील प्रमाणे आहे.<br>
<table>
<tr><th>अ. क्र</th><th>वर्ष</th><th>प्राप्त विचलन प्रस्ताव संख्या</th><th>मंजूर केलेले विचलन प्रस्ताव संख्या</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>1</td><td>2010-11</td><td>125</td><td>00</td><td>सर्व प्रस्ताव प्राप्त तपासणी चालू आहे.</td></tr>
<tr><td>2.</td><td>2011-12</td><td>56</td><td>56</td><td>00</td></tr>
<tr><td>3.</td><td>2012-13</td><td>00</td><td>00</td><td>कोणतेही विचलन प्रस्ताव प्राप्त झालेले नाही.</td></tr>
<tr><td>4.</td><td>2013-14</td><td>72</td><td>00</td><td>सर्व प्रस्ताव प्राप्त तपासणी चालू आहे.</td></tr>
</table>
कंट्रोल फॉर्मस व विचलन प्रस्तावासंबंधी कर्तव्य व जबाबदा-या पूर्ण करण्यासंदर्भात ज्या वन अधिका-यांनी निष्काळजीपणा केला आहे. त्यांचे विरुध्द कार्यवाही केली जाईल.</td></tr>
</table>

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| 2.1.11.2 | **मूल्यांकन शाखेच्या निरीक्षणांचे अनुपालन न करणे.**<br><br>महाराष्ट्र वन विभागाच्या मुल्यांकन विभागाने वन विकास कार्याचे, त्यांचा दर्जा व मानक निर्धारित करण्यासाठी आणि अंमलबजावणीत सुधारणा सुचविण्यासाठी मूल्यांकन केल. लेखापरिक्षणात असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र वन विभागाची मूल्यांकन शाखा,वन विकास कामांचे वर्षभर मूल्यांकन करीत असते आणि त्यात सुधारात्मक उपाययोजना आणि कारवाईचे मुद्दे ज्यामध्ये विभागाच्या कार्यसिध्दीत उल्लेखनीय भर घालण्याचे सामर्थ्य आहे ते, समाविष्ट करून मोठे कष्ट घेऊन मूल्यांकन अहवाल तयार करण्यात येतात.परंतु मूल्यांकन शाखेने केलेले निरीक्षण व शिफारशींचे विभागाव्दारे होणारे अनुपालन निराशाजनक होते. मुख्य वनसंरक्षक (मूल्यांकन) यांच्याद्वारे सादर केलेल्या माहितीवरून असे निदर्शनास येते की, २०१०-१५ दरम्यान ५१ विभागांच्या विरूध्द असलेल्या १,९४५ निरीक्षणापेकी १,६२५ निरीक्षण (८४ टक्के) प्रलंबित होते.<br><br>महाराष्ट्र शासनाने नमूद केले की या बाबीकडे गंभीरतेने लक्ष देण्यात येत आहे आणि याबाबत सर्व मुख्य वनसंरक्षकांना निर्देश दिले आहेत. | रोपवनांचे मुल्यांकनात स्थळ निहाय सुधारणेसाठी निर्देशनास आलेला अभाव व त्यावर गुणवत्ता/उपाययोजना सुचविण्यात येतात. या सुचना सल्ले हे प्रामुख्याने रोपवनाची योग्य तऱ्हेने व वेळेवरच क्षेत्रीय कामे करणेबाबत व नोंद वह्या अद्यावत ठेवणेबाबत असतात. ही बाब गंभिरतेने घेण्यात येत असुन निरीक्षणांबाबत पूर्ततेसाठी सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशीक) यांना सूचना देण्यात आल्या आहेत व पाठपुरावा करण्यात येत आहे. लेखा परिक्षणाच्या वेळी पूर्ततेसाठी प्रलंबित निरीक्षणांची संख्या १६२५ होती. मार्च २०१६ अखेर पूततेसाठी प्रलंबित निरीक्षणाची संख्या १०२५ आहे. | **Earlier comment by AG**<br>PAC may instruct the Department to expedite the compliance to observations raised by evaluation wing. | मुल्यांकन विभागाचा अभिप्रायाची पुर्तता करण्यासाठी सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांना दि.१४.६.२०१६ च्या पत्रान्वये सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदर पत्राची साक्षांकित प्रत संलग्न आहे. |

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| 2.1.11.3 | प्रलंबित वन महसूल<br>निवडलेल्या १३ विभागांत डिसेंबर २०१५ पर्यंत १,४९४ प्रकरणांत (सर्वात जुने प्रकरण ८० वर्षापेक्षाही जुने आहे) रू.१२.३४ कोटी वन महसूल वसुलीकरिता प्रलंबित आहे.एकूण रू.१२.३४ कोटी प्रलंबित महसूलापैकी रू.०.३० कोटीचे प्रलंबन चलनाचे समायोजन न झाल्यामुळे होते. रू.५.९२ कोटी महसूल विभागास वसुली करण्याकरीता कळविण्यात आले होते. रू.२.१२ कोटी न्यायालयाचा अंतिम निर्णय न झाल्यामुळे प्रलंबित होते. ०.४३ कोटी वन कामगार सहकारी संस्थेकडून देय होते. रू.०.४४ कोटी आदिवासी विकास महामंडळा तर्फे देय होते. रू.२.४७ कोटी वन कंत्राटदारांकडून देय होते आणि उर्वरित रू.०.६६ कोटी संकीर्ण म्हणून वर्गीकृत करण्यात आले होते.<br>महाराष्ट्र शासनाने नमूद केले की जास्तीत जास्त वसुली होण्यासाठी ही बाब उच्च स्तरावरील अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आली आहे | परिच्छेद क्रमांक २.१.११.३ मध्ये दर्शविण्यात आलेली वनमहसूलाची थकबाकी माहे डिसेंबर २०१५ ची नसून माहे मार्च २०१५ ची आहे.<br>उपशिर्ष निहाय खालील प्रमाणे वनमहसूल थकबाकी आहे.<br>१) कोषागारातून चालान प्राप्त न झाल्यामुळे असमायोजित राहिलेली थकबाकी रक्कम (रु.२९.८९ लक्ष)<br>२) राजस्व खात्याकडे वसुलीकरीता वर्ग केलेल्या प्रकरणातील वन महसूल थकबाकीची रक्कम<br>(रु. ५९२.०८ लक्ष)<br>३ मा. न्यायालयाच्या निर्णयासाठी थकीत असलेली वन महसूलाची थकबाकी रक्कम (रु. २१२.०० लक्ष)<br>४) जं.का.स. संस्थेकडे थकीत असलेली वनमहसूलाची थकबाकी रक्कम (रु. ४३.१५ लक्ष)<br>५) विविध वनोपजाच्या खरेदी संदर्भात कंत्राटदाराकडे वसुलीसाठी प्रलंबित असलेली थकबाकी रक्कम (रु. २४६.५६ लक्ष)<br>६) उपरोक्त नमुद प्रकरणा व्यतिरिक्त वसुल न झालेली वनमहसूलाची संकिर्ण थकबाकी रक्कम (रु. ६६.२३ लक्ष)<br>आदिवासी विकास महामंडळ यांचे कडून घेणे असलेली वनमहसूलाची थकबाकी रक्कम (रु. ४३.७४ लक्ष)<br>उपरोक्त उपशिर्ष क्रमांक (१) मधील वनमहसूल थकबाकी ही महसूलाचे ताळमेळ (Reconciliation Problem) न झाल्यामुळे आहे. प्रत्यक्षात थकबाकी नाही.<br>उपशिर्ष क्रमांक (२) मधील नमूद वनमहसूल थकबाकी ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. थकबाकीची वसुली आणि वाढ एकत्रीतरित्या होत असते. सदरची वसुली ही महसुल खात्यामार्फत महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेन्यु कोड अंतर्गत करण्यासाठी महसूल खात्याकडे प्रकरणे वर्ग करण्यात आली आहेत. याबाबत संबधित यंत्रणेकडून विविध स्तरावर निरंतर पाठपुरावा करण्यात येत आहे.<br>उपशिर्ष क्रमांक (३) मधील थकबाकी ही न्यायालयाच्या निर्णयासाठी प्रलंबित असलेल्या प्रकरणातील आहे.<br>उपशिर्ष क्रमांक (४) मधील थकबाकी ही जंगल कामगार सहकारी संस्थांकडील आहे. सदर थकबाकी अवसायनात | **Earlier comment by AG**<br>PAC may instruct the Department to expedite the recoveries of outstanding forest revenue | परिच्छेद क्रमांक २.१.११.३ मध्ये दर्शविण्यात आलेली वनमहसूलाची थकबाकी ही माहे डिसेंबर २०१५ ची नसून ती माहे मार्च २०१५ ची आहे.<br>प्रलंबित वन महसूल मुख्यत: चलनाचे ताळमेळ न होणे, जमीन महसूल थकबाकीप्रमाणे वसुलीची प्रकरणे,न्यायालयीन प्रकरणे, अवसायनात गेलेल्या वन मजुर, सहकारी समित्यांची थकबाकी, वनोपज खरेदीदाराकडील थकबाकी आणि आदिवासी विकास महामंडळाकडील थकबाकी यामुळे आहे. प्रलंबित वनमहसूल वसुलीची प्रगती व शिल्लक वनमहसूल याचे विवरण खालील तक्त्यात दिलेले आहे.<br>( रु. लाखांत) |

| अ. क्र. | प्रलंबित महसूल | वसुल महसूल | शिल्लक थकबाकी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २९.८९ | ४.४४ | २५.४४ | चलनाचे ताळमेळ |
| २ | ५९२.०८ | १३.५३ | ५७८.५४ | राजस्व विभागाव्दारे जमीन महसूल थकबाकी प्रमाणे वसुलीची प्रकरणे |
| ३ | २१२ | ०० | २१२ | न्यायालयीन प्रकरणात गुंतलेली रक्कम |
| ४ | ४३.१५ | ०.९८ | ४२.१७ | अवसायनात गेलेले वनमजूर सहकारी समित्यांकडील थकबाकी. |
| ५ | २४६.५६ | १३७.७२ | १०८.८४ | वनोपज खरेदीदाराकडील थकबाकी. |
| ६ | ६६.२३ | ७.८९ | ५८.३४ | विविध थकबाकी |
| ७ | ४३.७५ | ०० | ४३.७५ | आदिवासी विकास महामंडळाकडील थकबाकी |
| एकूण | १२३३.६६ | १६४.५६ | १०६९.०६ | |

वरील विवरणावरुन दिसून येते की, एकुण रु. 1233.66 लक्ष एवढ्या थकबाकीपैकी रु. 164.56 लक्षाची वसुली करण्यात आलेली आहे, आणि 1069.06 लक्षाची वसुली शिल्लक आहे. यापैकी रु. 212 लक्षाची थकबाकी न्यायालयीन प्रकरणात गुंतलेली आहे, आणि रु. 592 लक्षाची थकबाकी राजस्व विभागाव्दारे जमीन महसुल

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | गेलेल्या संस्थाकडील असुन ती वसूल करण्यासाठी त्यांचेकडे कोणत्याही प्रकारची मालमत्ता उपलब्ध नाही. त्यामुळे सदर थकबाकी निर्लेखित करणे हा एकमेव पर्याय आहे. याकरिता संबंधित वनवृत्तांस व वनविभागास सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तसेच काही संस्थांचे वनवृत्ताकडून प्राप्त झालेले निर्लेखन प्रस्ताव शासनाचे मंजुरीकरीता या कार्यालयाकडून सादर करण्यात आले आहे. त्यावर शासन मंजूरी प्रतिक्षीत आहे .<br><br>उपशिर्ष क्रमांक (५) मधील थकबाकी ही वनठेकेदार/कंत्राटदार यांनी विविध वनोपज खरेदी केल्याबाबत पूर्ण रक्कम भरणा न केल्यामुळे शिल्लक असलेल्या रक्कमेसंबधिची आहे. तसेच इतर वनठेक्याच्या संदर्भातील आहे. सदर रक्कम वसूलीसाठी वनविभागाकडून सतत प्रयत्न करण्यात येत आहे.<br><br>उपशिर्ष क्रमांक (६) अंतर्गत थकबाकीची रक्कम अल्पशी असुन वसूलीसाठी जे-जे शक्य आहे, ते-ते प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच ज्या प्रकरणात वसुली करणे संभव नाही, अशा प्रकरणातील थकबाकीची रक्कम शासनाने प्रदान केलेल्या वितीय अधिकाराचे अधिन राहून निर्लेखन करणे बाबतच्या सुचना संबधित यंत्रणेला देण्यात आलेल्या आहे आणि त्यांचे अधिकार क्षेत्राबाहेरील प्रकरणे शासन मंजूरीसाठी पाठविण्याकरीता निर्लेखन प्रस्ताव तयार करुन पाठविणे बाबत सुचना संबधितांना देण्यात आल्या आहेत.<br><br>उपशिर्ष क्रमांक (७) मधील थकबाकी ही आदिवासी विकास महामंडळ, गडचिरोली यांचेकडील आहे. सदर थकबाकीची रक्कम वसूल करण्यासाठी वनविभागामार्फत प्रयत्न सुरु आहेत.<br><br>उपरोक्त शिर्षा अंतर्गत असलेली थकबाकी जास्तीत-जास्त वसूल करण्याकरीता वरिष्ठ स्तरावरुन प्रयत्न करण्यात येत असुन त्यांचे प्रभावीपणे सनियंत्रण करण्यात येत आहे. | | थकबाकी प्रमाणे वसुलीच्या प्रकरणात गुंतलेली आहे. अशा प्रकारे एकुण रु. 804.00 लक्षाची थकबाकी वनविभागाचा अखत्यारीत नाही, जी एकूण थकबाकीच्या 75.20 टक्के इतकी आहे. आदिवासी विकास महामंडळाकडे थकीत असलेल्या उर्वरित रु. 43.75 लक्षाची वसुली करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत, व त्यासाठी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) गडचिरोली यांना पाठपुरावा करण्यास सुचित केले आहे. |

<table>
<tr><th>परि.क्र.</th><th>विषय</th><th>विभागाचे अभिप्राय</th><th>महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय</th><th>विभागाचे अभिप्राय</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td></tr>
<tr><td>२.१.११.४</td><td>अपुरे आंतरिक नियंत्रण:-<br><br>आंतरिक नियंत्रण प्रणाली हे एक व्यवस्थापनेस उपयुक्त साधन आहे ज्याव्दारे योग्य नियम आणि विनियम यांचा कार्य व अहवालाच्या सादरीकरणात अवलंब होत असल्याची हमी मिळते. महाराष्ट्र वन विभागातील आंतरिक नियंत्रण खाली दर्शविल्याप्रमाणे अपुरे आहे.<br><br>13 पैकी तीन विभागांत स्वीय प्रपंजी लेखा रोख पुस्तिका आणि कोषागार पास बुक यांच्या शेवटच्या शिल्लक रकमेत रू.1.25 कोटीचा फरक होता.</td><td>स्वीय प्रपंजी लेखा रोख पुस्तिका व कोषागार पास बुक यातील शिल्लक रकमेचा ताळमेळ घेण्याचे काम प्रगतीत आहे व त्यामुळे शिल्लक रकमेतील फरक ब-यांच प्रमाणात कमी झाल्याचे खालील तक्त्यावरुन दिसुन येते.<br><br>
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विभागाचे नांव</th><th>३१.०३.२०१५ रोजीचा फरक</th><th>३०.०६.२०१६ रोजीचा फरक</th></tr>
<tr><td>१.</td><td>आलाप ल्ली</td><td>९,३४,८२०/-</td><td>३,४३,३६०/-</td></tr>
<tr><td>२</td><td>भामरागड</td><td>९७,५९,१७८/-</td><td>६७,३५,९०६/-</td></tr>
<tr><td>३.</td><td>सिरोंचा</td><td>१७,९३,५२३/-</td><td>१०,६७,५२६/-</td></tr>
<tr><td></td><td>एकुण</td><td>१,२४,८७,५२१/-</td><td>८१,४६,७९२/-</td></tr>
</table>
<br>वरील फरक मुख्यत्वे तेंदु संकलना करीता मजुरांना दिलेले बोनसचे धनादेश न वटल्यामुळे दिसुन येतो. अधिकांश मजुर हे अशिक्षित असुन त्यांचे स्वतःचे बँक खाते नाही. त्यामुळे त्यांना दिलेले धनादेश वटविल्या जात नाही. अशा प्रकरणात नविन धनादेशकाढण्याचे व ते संबंधित मजुरांच्या बँक खात्यात जमा होतील यासाठी प्रयत्न करण्यांत येत आहेत.<br><br>स्वीय प्रपंजी लेखा रोख पुस्तिका व कोषागार पास बुक यातील शिल्लक रकमेचा ताळमेळ घेण्याचे काम पुर्ण करण्याचे व फरक कमीत कमी राहील यादृष्टीने प्रयत्न करण्याच्या सुचना सर्व विभागीय अधिका-यांना निर्गमित करण्यात आल्या आहेत.</td><td><u>Earlier comment by AG</u><br>PAC may instruct the Department to expedite the reconciliation of PLA cash book and Treasury pass book.</td><td>आलापल्ली, सिरोंचा व भामरागड या तिन्ही वनविभागाचे स्वीय प्रपंजी लेखा रोख पुस्तीका आणि कोषागार पासबुक मधील रकमांचे संबंधित कोषागार अधिकारी, यांचेकडुन माहे मार्च/२०१७ अखेरीस ताळमेळ पुर्ण झाले आहे. याबाबतची प्रमाणित प्रत सोबत जोडण्यात आली आहे. विभागाकडुन ताळमेळाची कार्यवाही नियमित होत आहे.<br><br>ताळमेळाची कार्यवाही नियमित करण्याबाबत सर्व संबंधीत वनविभागास मुख्य वनसंरक्षक (मुल्यांकन व राष्ट्रीयीकरण) यांनी दि.१.८.२००१ पत्रान्वये सुचना देण्यात आलेल्या आहेत. (6)<br><br>(प्रत संलग्न)</td></tr>
<tr><td></td><td>महाराष्ट्र अर्थसंकल्प पुस्तिका,1977 नुसार निधीची मागणी,प्राप्ती आणि संवितरण यावर संनियंत्रण ठेवण्यासाठी अर्थसंकल्प नियंत्रण प्रपंजी राखण्यात यावयास पाहिजे.तथापि,निवडलेल्या दोन विभागांत (सातारा आणि सांगली) ही प्रपंजी राखण्यात आली नव्हती.</td><td>सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये महाराष्ट्र अर्थसंकल्प पुस्तीका, १९७७ नुसार निधीची मागणी, प्राप्ती संवितरण यावर संनियंत्राण ठेवण्यासाठी सातारा आणि सांगली या विभागांसाठी अर्थसंकल्प नियंत्राण प्रपंजी राखण्यात आली आहे. तथापी महाराष्ट्र अर्थसंकल्प पुस्तीका, १९७७ नुसार निधीची मागणी, प्राप्ती संवितरण यावर संनियंत्राण ठेवण्यासाठी</td><td></td><td></td></tr>
</table>

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | अर्थसंकल्प नियंत्राण प्रपंजी राखण्यासाठी सर्व विभागांना सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. | | |
| | निवडलेल्या दोन विभागांत (सांगली आणि यावल) साठा प्रपंजीचा (Stock Register) जिल्हा वन अधिकारी/उप-वनसंरक्षक यांचेव्दारे प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येत नव्हती. तसेच, साठा प्रपंजीतील नोंदीही त्यांच्याव्दारे प्रत्यापित करण्यात येत नव्हत्या. | या विभागातील साठा प्रपंजीची (Stock Register) उप-वनसंरक्षक, यावल वनविभाग जळगाव यांचेव्दारे प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली आहे. तसेच साठा प्रपंजीतील नोंदीही त्यांच्याव्दारे सत्यापीत करण्यात आल्या आहेत. तथापी विहित नमुन्यात साठा प्रपंजी राखण्यासाठी व प्रत्यक्ष साठा पडताळणी करण्याकरीता सर्व विभागांना सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच या विभागातील अंर्तगत लेखापरिक्षण पथकास संबंधित वन विभागातील साठा प्रपंजीची तपासणी करुन लेखापरिक्षणाद्वारे निदर्शनास आणुन दिलेल्या त्रूटींची पुर्तता झाल्याबधलची खात्री करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. | | |
| | चार विभागांत उप-वनसंरक्षक रोख शिल्लकाची अनपेक्षित मासिक प्रत्यक्ष पडताळणी करत नव्हते. | सध्याच्या ई- प्रशासनाच्या, Direct money Transfer RTGS, NEFT, Online banking च्या युगात रोख रक्कम हाताळण्याचे प्रमाण बऱ्याच प्रमाणात कमी झाले आहे.<br><br>सदर आक्षेपात नमुद केलेल्या विभागीय कार्यालयात प्रत्यक्ष हाताळलेली रोख रक्कम रु. २५ हजार ते ३० हजार इतकी मर्यादित होती. शासकीय योजनांच्या आणि धोरणांच्या अंमलबजावणीमुळे शासनाद्वारे दिली जाणारी लाभाची रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये थेट जमा करण्यावर भर दिलेला आहे. सदर बदललेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने उपवनसंरक्षक कार्यालयात रोख रक्कम हाताळण्यात येत नाही किंवा अतिशय कमी रक्कम हाताळण्यात येते. तथापी सर्व विभागीय वन अधिका-यांना आकस्मीक रोख तपासणी करण्याच्या व रोख रक्कम कमीत कमी हाताळण्याच्या सुचना देण्यांत आलेल्या आहेत. | | |

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या आर्थीक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. २.१ महाराष्ट्र वन विभागाची कार्यपध्दती या अंतर्गत उप परिच्छेद क्र. २.१.११.४ संदर्भात लोकलेखा समितीची बैठक. (मराठी)

<table>
<tr><th>विषय</th><th>महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय</th><th>विभागाचे अभिप्राय</th></tr>
<tr><td colspan="3"><u>अपुरे आंतरिक नियंत्रण</u><br>आंतरिक नियंत्रण प्रणाली हे एक व्यवस्थापनेस उपयुक्त साधन आहे ज्याव्दारे योग्य नियम आणि विनियम यांचा कार्ये व अहवालांच्या सादरीकरणात अवलंब होत असल्याची हमी मिळते. महाराष्ट्र वन विभागातील आंतरिक नियंत्रण खाली दर्शविल्याप्रमाणे अपुरे आहे.</td></tr>
<tr><td>अ) १३ पैकी तीन विभागांत स्वीय प्रपंजी लेखा रोख पुस्तीका आणि कोषागार पासबुक यांच्या शेवटच्या शिल्लक रक्कमेत १.२५ कोटीचा फरक होता.</td><td></td><td>• <u>मूळ परिच्छेदाच्या अनुषंगाने अभिप्राय</u><br>स्वीय प्रपंजी लेखा रोख पुस्तिका व कोषागार पास बुक यातील शिल्लक रकमेचा ताळमेळ घेण्याचे काम प्रगतीत आहे व त्यामुळे शिल्लक रकमेतील फरक ब-यांच प्रमाणात कमी झाल्याचे खालील तक्त्यावरुन दिसुन येते.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विभागाचे नांव</th><th>३१.०३.२०१५ रोजीचा फरक</th><th>३०.०६.२०१६ रोजीचा फरक</th></tr>
<tr><td>१.</td><td>आलापल्ली</td><td>९,३४,८२०/-</td><td>३,४३,३६०/-</td></tr>
<tr><td>२</td><td>भामरागड</td><td>९७,५९,१७८/-</td><td>६७,३५,९०६/-</td></tr>
<tr><td>३.</td><td>सिरोंचा</td><td>१७,९३,५२३/-</td><td>१०,६७,५२६/-</td></tr>
<tr><td></td><td>एकुण</td><td>१,२४,८७,५२१/-</td><td>८१,४६,७९२/-</td></tr>
</table>
वरील फरक मुख्यत्वे तेंदु संकलना करीता मजुरांना दिलेले बोनसचे धनादेश न वटल्यामुळे दिसुन येतो. अधिकांश मजुर हे अशिक्षित असुन त्यांचे स्वतःचे बँक खाते नाही. त्यामुळे त्यांना दिलेले धनादेश वटविल्या जात नाही. अशा प्रकरणात नविन धनादेशकाढण्याचे व ते संबंधित मजुरांच्या बँक खात्यात जमा होतील यासाठी प्रयत्न करण्यांत येत आहेत.<br>स्वीय प्रपंजी लेखा रोख पुस्तिका व कोषागार पास बुक यातील शिल्लक रकमेचा ताळमेळ घेण्याचे काम पुर्ण करण्याचे व फरक कमीत कमी राहील याद्दष्टीने प्रयत्न करण्याच्या सुचना सर्व विभागीय अधिका-यांना निर्गमित करण्यात आल्या आहेत.</td></tr>
<tr><td></td><td>१. PAC may instruct the department to expedite the</td><td>आलापल्ली, सिरोंचा व भामरागड या तिनही वनविभागाचे स्वीय प्रपंजी लेखा रोख पुस्तीका आणि कोषागार पास बुक मधील रक्कमांचे संबंधीत कोषागार अधिकारी यांचे कडुन माहे मार्च-</td></tr>
</table>

<table>
<tr><th>विषय</th><th>महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय</th><th>विभागाचे अभिप्राय</th></tr>
<tr><td></td><td>reconciliation of PLA Cash book and treasury Pass book</td><td>२०१७ अखेरीस ताळमेळ पुर्ण झाले आहे. विभागाकडुन ताळमेळाची कार्यवाही नियमित होत आहे. कोषागाराकडील ताळमेळाची प्रत सहपत्रीत आहे.<br>प्रस्तुत मुदयाच्या अनुषंगाने मुख्य वनसंरक्षक (मुल्यांकन व राष्ट्रीयीकरण) म.रा. नागपुर यांचे व्दारा स्विय प्रपंजी लेख्याबाबतची कार्य प्रणाली बाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.</td></tr>
<tr><td></td><td>२.Further Progress of reconciliation in respect of other divisions with may be Stated to PAC. Further action taken on other audit observations on internal control mechanism may be furnish to PAC.</td><td>स्वीय प्रपंजी लेखा रोख पुस्तिका व कोषागार पास बुक यातील शिल्लक रकमेचा ताळमेळ घेण्याचे काम प्रगतीत आहे व त्यामुळे शिल्लक रकमेतील फरक ब-यांच प्रमाणात कमी झाल्याचे खालील तक्त्यावरुन दिसुन येते.<br>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विभागाचे नांव</th><th>३१.०३.२०१५ रोजीचा फरक</th><th>३१.०३.२०१८ रोजी अखेरची शिल्लक</th></tr>
<tr><td>१.</td><td>आलापल्ली</td><td>९,३४,८२०/-</td><td>३,४२,५१५/-</td></tr>
<tr><td>२</td><td>भामरागड</td><td>९७,५९,१७८/-</td><td>३७,०६,०६२/-</td></tr>
<tr><td>३.</td><td>सिरोंचा</td><td>१७,९३,५२३/-</td><td>४६,५०९/-</td></tr>
<tr><td></td><td>एकुण</td><td>१,२४,८७,५२१/-</td><td>४०,९५,०८६/-</td></tr>
</table>
<br>महाराष्ट्र राज्यामध्ये एकुण ५१ वनविभाग/ उपविभाग असुन स्वामित्व शुल्काची रक्कम जमा करण्यासाठी एकुण २१ स्वीय प्रपंजी लेखा उघडण्यात आलेला आहे. या पैकी सद्यस्थितीत ११ वनविभागानी कोषागार यांचेकडील वैयक्तीक ठेवीचा पास बुकानुसार दिनांक ३१/१२/२०१८ पर्यंत स्वीय प्रपंजी लेख्याचे ताळमेळ पुर्ण केलेले आहे.</td></tr>
<tr><td>(ब) महाराष्ट्र अर्थसंकल्प पुस्तीका, १९७७ नुसार निधीची मागणी, प्राप्ती आणि संवितरण यावर संनियंत्रण ठेवण्यासाठी अर्थसंकल्प नियंत्रण प्रपंजी राखण्यात यावयास पाहिजे. तथापी, निवडलेल्या दोन विभागांत (सातारा आणि सांगली) ही प्रंपजी राखण्यात आली नव्हती.</td><td></td><td>या सन २०१४-१५ या आर्थीक वर्षामध्ये महाराष्ट्र अर्थसंकल्प पुस्तीका, १९९७ नुसार निधीची मागणी, प्राप्ती आणि संवितरण यावर संनियंत्रण ठेवण्यासाठी सातारा आणि सांगली या विभागामध्ये अर्थसंकल्प नियंत्रण प्रपंजी राखण्यात आली आहे.</td></tr>
</table>

| विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
| --- | --- | --- |
| क) निवडलेल्या दोन विभागांत (सांगली आणि यावल) साठा प्रपंजीची (Stock Register) जिल्हा वन अधिकारी/ उप वनसंरक्षक यांचेव्दारे प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येत नव्हती. तसेच, साठा प्रपंजीतील नोंदीही त्यांच्याव्दारे सत्यापीत करण्यात येत नव्हत्या. | | सांगली व यावल या दोन विभागात साठा प्रपंजीचे (Stock Register) उप- वनसंरक्षक, यावल व सांगली यांचेव्दारे प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आलेली आहे. तसेच साठा प्रपंजीतील नोंदीही त्यांच्याव्दारे सत्यापित करण्यात आल्या आहेत. |
| ड) चार विभागांत उप-वनसंरक्षक रोख शिल्लकाची अनपेक्षित मासिक प्रत्यक्ष पडताळणी करत नव्हते. | | सध्याच्या ई- प्रशासनाच्या, Direct money Transfer RTGS, NEFT, Online banking च्या युगात रोख रक्कम हाताळण्याचे प्रमाण बऱ्याच प्रमाणात कमी झाले आहे.<br>सदर आक्षेपात नमुद केलेल्या विभागीय कार्यालयात प्रत्यक्ष हाताळण्यात येणारी रोख रक्कम फार कमी प्रमाणात असते. शासकीय योजनांच्या आणि धोरणांच्या अंमलबजावणीमुळे शासनाद्वारे दिली जाणारी लाभाची रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये थेट जमा करण्यात येते. |
| इ) मार्च २०१५ पर्यंत महाराष्ट्र वन विभागाच्या आंतरिक लेखापरीक्षा शाखेव्दारे घेण्यात आलेली ७३५ निरिक्षणे विभागाव्दारे अनुपालन न झाल्यामुळे प्रलंबित होती. | | मार्च/२०१५ पर्यंत अंतर्गत लेखापरिक्षणामधील एकुण ७३५ परिच्छेद प्रलंबित होती, त्यापैकी ३३१ परिच्छेद निकाली काढण्यात आलेली आहेत. उर्वरीत ४०४ परिच्छेद निकाली काढण्याकरीता येत्या ३ महिन्यात पूर्ण करण्यात येत आहे. |
| फ) तीन विभागांत (सांगली, ठाणे आणि गडचिरोली) महाराष्ट्र वन विभागाव्दारे जारी फेब्रुवारी १९९३ च्या आदेशाचे उल्लंघन करुन कंत्राटदारांस निविदा न मागविता रु.२.९४ कोटी किंमतीची बांधकाम व लागवडीची कामे देण्यात आली. तसेच, या आदेशांचे उल्लंघन करुन ठाणे विभागाने कंत्राटदारांना रु.१.१५ कोटी रोख प्रदाने केली.<br>महाराष्ट्र शासनाने नमुद केले की, सर्व | | सन २०१३-१४ मध्ये गडचिरोली वनविभागाव्दारे ३३ बांधकामाची कामे हाती घेण्यांत आली. या ३३ कामापैकी २२ कामाचे अंदाजपत्रके २ लाखापेक्षा कमी किंमतीचे होते व उर्वरीत ११ कामाचे अंदाजपत्रक २ लाखापेक्षा अधिक किंमतीचे होते.<br>गडचिरोली जिल्हा अतिशय संवेदनशिल नक्षलग्रस्त दुर्गम क्षेत्रात येत असून या जिल्हयातील कंत्राटदार विशेषत: नक्षलग्रस्त भागातील कमी रकमेची कामे करण्याबाबत उदासीन असतात. आणि म्हणुनच या भागात दोन लाखापेक्षा कमी अंदाजपत्रक असलेल्या गोदामाच्या बांधकामाची कामे वनविभागाव्दारे करण्यांत आली. सदर गोदामाच्या निर्मीतीमुळे गौण वनोपज संकलन करुन त्याची योग्य रितीने साठवणुक करणे सोईस्कर झाले. |

| विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|
| विभागांना लेखापरिक्षेव्दारे निदर्शनास आणण्यात आलेल्या आंतरिक नियंत्रण प्रणाली मधील उणीवा भरुन काढण्याबाबत सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र शासनाने पुढे असेही नमुद केले की, कामाच्या तात्काळ स्वरुपामुळे ठाणे विभागाने रु.१.१५ कोटीचे रोख प्रदान केले.<br>**शिफारस ४:** चुकांचा वेळेत शोध आणि तत्परतेने सुधारात्मक कारवाई सुरू करण्यासाठी कार्य नियोजनाचे वन विभागाव्दारे सनियंत्रण भक्कम असावयास पाहिजे. हानी कमी करण्यासाठी आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी मूल्यांकन शाखेव्दारे करण्यात आलेले निरीक्षण/ शिफारशी यासंदर्भात विभागाने पूर्व क्रियाशील दृष्टिकोन ठेवावयास पाहिजे. वनीकरण कामांची योजना,कार्यान्वयन आणि व्यवस्थापनेत नियमांचे व विनियमांचे काटेकोरपणे पालन होत आहे याची खातरजमा करण्यासाठी आंतरिक नियंत्रण यंत्रणा बळकट करावयास पाहिजे. | 0.31. | त्यामुळे गौण वनोपज **संकलन**, प्रक्रीया व साठवणुक याव्दारे पुरेसा रोजगार या भागातील स्थानिक लोकांना प्राप्त झाला आहे.<br>या करीता दोन लाखाचे वर अंदाजपत्रक असलेल्या अगरबत्ती शेडची कामे थेट नामांकीत कंपनीकडून कच्चा मालाची (सिमेंट, लोखंड, व छताची पत्रे इ.) खरेदी करुन स्थानिक मंजुरामार्फत कामे पुर्ण करण्यांत आली.<br>सांगली उप वनविभागा अंतर्गत वनक्षेत्र सांगली येथे सन २०११-१२ मध्ये मौजे भोसे व मौजे खारसिंगा या गावांमध्ये एकुण ८ ठिकाणी " दंडोबा विकास प्रकल्प" अंतर्गत कठीण भागामध्ये रोपवनाची कामे करण्यात आली. या रोपवनात १ मी. लांबी x १ मी. रुंदी x १ मी. खोली आकाराचे खडडे खोदुन रोपवनाची कामे केली. उपरोक्त कामाकरीता वर्तमानपत्रामध्ये अल्प मुदतीची जाहिरात देवुन विभागाने दरपत्रक मागवुन त्या अनुषंगाने कामे करण्यात आली. या प्रकरणी एकुण ८ रोपवन स्थळाच्या कामाच्या अंदाजपत्रकीय रकमेचा (रु.१३८०२७००-/) व वास्तविक झालेला खर्च (रु.१३७६२३९०/-) याचा तुलनात्मक दृष्ट्या विचार करता रु. ४०३१०/- शासनाची बचत करण्यांत आलेली आहे.<br>मा. उच्च **न्यायालय**, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक ३२४६ वर्ष २००४ Bombay Environment Action Group विरुध्द महाराष्ट्र शासन यामध्ये दिलेल्या आदेशानुसार कांदळवन संरक्षणात्मकदृष्टया अतिक्रमण रोखण्याकरीता सिमाकंनाची कामे करण्याचे निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने ठाणे वनविभागाने कांदळवन क्षेत्राचे सिमाकंन करण्याचे काम मजुरांमार्फत/ ठेकेदारांकडुन तातडीने करण्यात आले आहे. |

कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मा...
मंत्रालय, मुंबई

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| 2.1.12 | **सर्वोत्तम उपक्रम**<br>गडचिरोली वन मंडळ येथे क्षेत्रीय पाहणीत (जानेवारी 2015) असे आढळले की मंडळ कार्यालयाने आदिवासी समाजाचे वन साधन संपत्तीवर अवलंबन घटविणे,पर्यायी रोजगार संधी निर्माण करणे आणि पर्यावरणाचे संरक्षण करणे यासाठी पुढाकार घेऊन अनेक उपक्रम राबविले. या उपक्रमांत आदिवासी समाजाद्वारे उदबत्ती निर्मिती व विक्री,व्यवसाय प्रशिक्षण,ऊर्जा संवर्धन कामे (सौर दिवे) धूररहित चुल्हे इत्यादी समाविष्ट आहे.<br>तसेच, गस्तीस जास्त प्रभावशील करण्यासाठी महाराष्ट्र वन विभागाने 6,415 वैयक्तिक डिजीटल सहाय्यक (Personal Digital Assitance-PDA) उपकरणे खरेदी केली आणि ती वनपालांना दिली ज्यामुळे झाड पाडणे,शिकार करणे,अतिक्रमण,आगीच्या घटना,चोरी इत्यादी वन अपराध घडल्याचे आढळल्यास ते लगेच ई-मेल आणि संदेशाव्दारे उच्च अधिकाऱ्यांस कळविणे त्यांना शक्य होईल. डिसेंबर 2015 पर्यंत सुमारे 6,800 अपराध वैयक्तिक डिजीटल सहाय्यक वर नोंदवण्यात आले आणि उच्च अधिकाऱ्यांस कळविण्यात आले. | वनविभागाद्वारे हाती घेण्यात आलेल्या विविध उपक्रम जसे आदिवासी समाजाचे वन साधन संपत्तीवर अवलंबून घटविणे,पर्यायी रोजगार संधी निर्माण ठेरणे आणि पर्यावरणाचे संरक्षण करणे उद्बत्ती निर्मिती व विक्री, व्यवसाय प्रशिक्षण, ऊर्जा संवर्धन कामे (सोर दिवे), धुरसहित चुलहे, तसेच गस्तीत जास्त प्रभावशील करण्यासाठी ६,४१५ वेयक्तिक डिजीटल सहाय्यक (Personal Digital Assitance-PDA) उपकरणांचा वापर यासाठी लेखापरिक्षणाने केलेल्या प्रशंसेसाठी वनविभाग महालेखाकारांचा आभारी आहे. | | |

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | मार्च 2015 पर्यंत महाराष्ट्र वन विभागाच्या आंतरिक लेखापरिक्षा शाखेद्वारे घेण्यात आलेली 735 निरीक्षणे विभागाद्वारे अनुपालन न झाल्यामुळे प्रलंबित होती. | मार्च/२०१५ पर्यंत ७३५ प्रलंबित निरीक्षणे निकाली काढण्यासाठी वेळोवेळी या कक्षाकडून आढावा घेण्यात आलेला असून सबंधित मुख्य वनसंरक्षक/ उपवनसंरक्षक (प्रादेशिक)/मुख्य वनसंरक्षक / उपवनसंरक्षक (अप्रादेशिक) यांनी निरीक्षणावर सादर केलेल्या उत्तरावर या कार्यालयाकडून १८२ निरीक्षणे निकाली काढण्यात आलेले आहे. उर्वरीत ५५३ निरीक्षणे तत्परतेने निकाली काढण्याबाबत सबंधित कार्यालयास वेळोवेळी सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहे. उर्वरित निरक्षणावर उत्तरे प्राप्त होताच प्रलंबित निरीक्षणे निकाली काढण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात येईल. | | |

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| 2.1.13 | **निष्कर्ष:-**<br>राज्य वन धोरणाची २००६ पासून अंमलबजावणी,विविध समिती/मंडळ यांचे गठन आणि वर्ष २०१०-११ पासून सुमारे रू.४,८९३ कोटी खर्च केल्यानंतरही राज्यातील वन व्याप्ति मागील आठ वर्षाच्या कालावधीपासून १६.४५ टक्क्यांवरच अवरूध्द झाली आहे. "झुडपी जंगल" आणि खाजगी वन जमिनींचे मोठे प्रमाण राखीव/संरक्षित प्रवर्गात सामिल करण्यात आले नाही. परिणामी,राज्य वन विभागाद्वारे या जमिनीवर कोणतेही वन व्यवस्थापन, विकास आणि संवर्धन कार्ये करण्यात येऊ शकली नाहीत. राज्य शासनाद्वारे खारफुटीची अधिसूचना काढण्यात सुध्दा विलंब झाला आहे. वनांच्या व्यवस्थापनेसाठी दीर्घावधी योजना नव्हत्या कारण राज्यातील ५१ पैकी १५ विभागांत, ज्यांचे कार्य नियोजन १९८९-९० ते २०१३-१४ दरम्यान संपुष्टात आले आहे. तेथे एकतर जुनेच कार्य नियोजन अवलंबविण्यात येत होते अथवा कोणतेच कार्य नियोजन नव्हते. वर्ष २०१०-१५ दरम्यान राज्य वन विभागाव्दारे मागणी करण्यात आलेला निधी आणि राज्य शासनाने दिलेला निधी यात खूप जास्त म्हणजेच ५१ टक्के अंतर होते.राष्ट्रीय वन आयोगाने २००६ मध्ये शिफारस केलेल्या कमीत कमी २.५ टक्के तरतुदीच्या विरूध्द राज्यातील वन क्षेत्रावरील तरतुद २०१०-१५ दरम्यान एकुण योजना खर्चाच्या फक्त एक टक्का होती.वन | उपरोक्त परिच्छेदात उत्तरे दिल्याप्रमाणे. | | |

| परि.क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | विकास कराचा विभागास देण्यात आलेला वाटणी भाग अत्यंत कमी होता.जो राज्यातील वन विकास कार्यास सहाय्यभूत ठरेल असे निधीचे अतिरिक्त वर्धनक्षम स्त्रोत नव्हता.निवडलेल्या १३ पेकी १० विभागांत कार्य नियोजनात निश्चित केलेले भौतिक लक्ष्य साध्य करण्यात २८ ते ८४ टक्के तूट होती. बहुधा सर्व कामे परस्पर आधारित आणि क्रमवार साध्य करण्याजोगी असल्यामुळे एका कामाचे लक्ष्य साधता आले नाही तर त्याचा प्रभाव कार्य नियोजनाच्या पुढील कार्याच्या अंमलबजावणीवर पडत होता.राज्याच्या राखीव निधीत जमा केलेला CAMPA निधी तदर्थ CAMPA खात्यात,जो भारत सरकारच्या पर्यावरण व वन विभागाद्वारे प्रशासित होतो.त्यात हस्तांतरित करण्यात आला नाही आणि उपभोगी संस्था व इतर विभागांकडून वन जमिनीचा वापर वनेतर प्रयोजनासाठी करण्याच्या बदल्यात त्यांचेकडून निव्वळ विदयमान मुल्य वसूल करण्यात आले नाही. कार्य नियोजनात विहित केलेल्या लक्ष्यानुसार बांबू कुपांची कापणी करण्यात आली नाही ज्यामुळे महसूल वसुलीत भरमक्कम तूट झाली. विभागाचे संनियंत्रण,मूल्यांकन आणि आंतरिक नियंत्रण कमकुवत होते. | | | |

(शशिकांत मिसे),
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेदासंदर्भात लोकलेखा समितीची बैठक.

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| 2.1.9. | CAMPA निधीचे व्यवस्थापन | | |
| 2.1.9.1 | CAMPA निधीतून अग्राहय खर्च:-<br><br>पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन आणि योजना प्राधिकरणाची (Compensatory Afforestation Fund Manegement and Planing Authority-CAMPA) स्थापना वनेत्तर कामाकरिता वळती केलेल्या वनक्षेत्राची क्षतिपूर्ती करावयासाठी वनीकरण आणि पुनर्जीवन कार्ये वाढविणे यासाठी करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरण व वन मंत्रालयाने तयार केलेली मार्गदर्शक तत्वे, ज्यानुसार CAMPA निधी,एका संस्थेव्दारे,जी राज्य CAMPA या नावाने राज्यात गठित करावयाची आहे त्यास मंजुरी दिली.<br><br>पर्यावरण व वन मंत्रालयाव्दारे निर्गमित (जुलै २००९) CAMPA च्या मार्गदर्शक तत्वानुसार CAMPA मधील पैसा मंजुर कामांच्या वार्षिक योजनेनुसार (Annual Plan Of Operations) वने आणि वन्यजीव व्यवस्थापनेची विकास, परिरक्षण आणि संरक्षण यासाठी वापरावयाचा होता. पर्यावरण व वन मंत्रालयाच्या राष्ट्रीय CAMPA सल्लागार परिषदेने (National CAMPA Advisory Council NCAC) सुस्पष्टपणे (जून २०१०) खर्चाच्या काही बाबी जसे प्रशासकीय खर्च, वन मुख्यालयातील मुलभूत सुविधांना मजबूत करण्याकरिता खर्च,वाहनांच्या पेट्रोल, तेल | **Current observation by A.G:-**<br>1)It is fact that NCAC had clarified that the cost of construction activity cannot be met from CAMPA, the reply of government is not acceptable.<br><br>**Current observation by A.G:-**<br>2) No explanation stated by government for expenditure 19.15 crore on construction work the same may be furnished to PAC. Further department stated that CA works are mandatory, so the position of CA works due, taken up for execution and completed may be given to PAC | १. दिनांक 02/07/2009 अन्वये विहीत राज्य पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वातील "Overarching Objectives and Core Principles या शिर्षाखालील राज्य पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरणाचा हेतू नैसर्गिक वनाचे जतन, वन्यजीव व्यवस्थापन, क्षेत्रात पायाभुत सुविधांचा विकास आणि इतर तत्सम कामे जलदगतीने करण्याचा आहे आणि अनुक्रमांक 3 वर नमुद आहे की राज्य प्राधिकरण हे Ad-hoc कॅम्पाकडून प्राप्त होणाऱ्या रकमांचा विनियोग पर्यायी वनीकरणाची कामे, सहाय्यभुत नैसर्गिक पुनरुत्पादन वनांचे संवर्धन व संरक्षण, पायाभूत सुविधांचा विकास, वन्यजीव संवर्धन व संरक्षण, यासंबंधी इतर संबंधित कामे आणि अनुषंगीक बाबी यासाठी करेल.<br>प्राधिकरणाचा मुख्य उद्देश नैसर्गिक वनांचे पुनरुत्पादन आणि राज्य वनविभागात या कामाशी संबंधीत यंत्रणा उभारणे. तसेच विविध स्तरावरील वन अधिकाऱ्यांना मुख्यत्वेकरून वनपरिक्षेत्र अधिकारी या दर्जापर्यंतच्या विविध स्तरावरील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे हा आहे. याशिवाय प्राप्त रकमांचा विनियोग क्षेत्रिय स्तरावरील कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी तसेच इतर साहित्य खरेदीसाठी करण्यात येईल. यात कामाच्या तपासणीसाठी आणि संरक्षण कार्यासाठी आवश्यक वाहतूक व्यवस्था करणे याचा समावेश होईल."<br><br>२. त्यानंतर National CAMPA Advisory Council च्या दिनांक 24/06/2010 रोजीच्या बैठकीत "अध्यक्षांनी या सभेमध्ये सांगितले की कॅम्पाचा निधी हा वनविभागाच्या मुख्यालयाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरीता वापरता येणार नाही. मात्र या निधीचा उपयोग वनपरिक्षेत्र अधिकारी या दर्जापर्यंतच्या क्षेत्रिय कर्मचाऱ्यांसाठी वापरता येईल. तथापी योजनेत्तर शिर्षाखाली निधीची कमतरता असल्यास या रकमांवर प्राप्त होणाऱ्या व्याजाच्या रकमेतून वनविभागाच्या मुख्यालयी पायाभूत सुविधा निर्माण करता येईल." तथापी या अनुषंगाने राज्य कॅम्पाच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये आवश्यक ते बदल करण्यात आले नाही..<br><br>३. ज्या अर्थी "क्षेत्रात पायाभूत सुविधांचा विकास आणि इतर तत्सम कामे" आणि क्षेत्रिय कर्मचाऱ्यांसाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे, यांचा समावेश मार्गदर्शक |

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | व वंगण यावरील खर्च कार्यालये/रहिवासी इमारती,वन विश्रांती गृह आणि लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांचे निवासस्थान याचे बांधकाम, दुरूस्ती आणि नूतनीकरण आणि वाहनांची खरेदी यावर CAMPA निधीतून खर्च करणे प्रतिबंधित केले.<br><br>CAMPA ची मार्गदर्शक तत्वे आणि NCAC चे निर्देश या विरूध्द PCCF (HOFF) ने राज्य CAMPA मधून १६.४९ कोटी निधी मुख्य वनसंरक्षक, पुणे यांना २०१०-११ मध्ये पुणे येथे "वनभवन" बांधण्यासाठी त्याचा समावेश २०१०-११ च्या कामांच्या वार्षिक योजनेत करून दिला,तसेच एका मंडळ कार्यालयाने (अमरावती) आणि दोन निवडलेल्या विभागांनी राज्य CAMPA निधीतून प्रशिक्षण अकादमी बांधकाम,रस्ते काम, विश्रामगृहाच्या सुरक्षा भिंतींचे बांधकाम,विभागीय कार्यालयाची दुरूस्ती आणि सफेदी इत्यादींसाठी २.६६ कोटी रक्कम खर्च केली.याचा परिणाम पर्यायी वनीकरण कार्यक्रमाचा १९.१५ कोटी निधी हिरावून घेण्यात आला.<br><br>महाराष्ट्र शासनाने नमूद केले की "वन भवन" बांधकामावर CAMPA निधीतून खर्च करण्यात आला कारण खर्चाच्या काही बाबी CAMPA खात्यातुन करण्यावर प्रतिबंध करण्याचे NCAC चे निर्देश सुकाणू (Steering) समितीने २०१०-११ च्या कामाच्या वार्षिक योजनेस मंजुरी दिल्यानंतर प्राप्त झाले.महाराष्ट्र शासनाने पुढे असेही नमूद | **Current observation by A.G:-**<br>3) As above | तत्वातील Overarching Objectives and Core Principles यात असल्याने पुणे येथे वनभवन बांधणे आणि इतर बांधकाम व दुरूस्तीची कामे यांचा समावेश संबंधीत वार्षिक नियोजन आराखडयात करण्यात आला. रू. 19.15 कोटी हा खर्च प्रामुख्याने पुणे येथे वनभवन बांधणे (रू. 16.50 कोटी) व अमरावती, सांगली आणि ठाणे येथे इतर बांधकामे यासाठी करण्यात आला. पुणे येथे वनभवन बांधणे आणि इतर बांधकामे लोकांना सोयीचे होण्याच्या व कार्यक्षम वन व्यवस्थापनाच्या दृष्टीने पुणे येथील विविध अधिकाऱ्यांची विविध ठिकाणी असलेली कार्यालये एकाच ठिकाणी असावीत या विचाराने पुणे येथे वनभवन बांधण्यात आले. वार्षिक नियोजन आराखडा 2010-11 सुकाणू समिती राज्य कॅम्पाने दिनांक 20.07.2010 रोजी मान्यता दिली आणि त्या नंतर ते केंद्र शासनाच्या पर्यावरण व वने मंत्रालयास पाठविण्यात आले. त्यावर केंद्र शासनाच्या पर्यावरण व वने मंत्रालयाने अशा प्रकारच्या इमारती बांधण्याकरीता आक्षेप नोंदविले नाहीत. या उलट National CAMPA Advisory Council च्या 5 व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास अनुसरून केंद्रीय मंत्रालयाने दिनांक 29.01.2015 च्या पत्रान्वये राज्य कॅम्पाच्या मुळ निधीतून अनुज्ञेय नसलेल्या बाबींकरीता नक्त वर्तमान मुल्याकरिताच्या रक्कमेतून 15 टक्के पर्यंत निधी वापरण्यास अनुमती दिली आहे. सदर पत्र सहपत्र 5 म्हणून सोबत जोडलेले आहे. पुणे येथील वनभवन बांधकामाची रक्कम राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जमा करण्यात आली. प्रशिक्षण अकादमीत कर्मचाऱ्यांकरिता निवासस्थाने बांधणे, सांगली विभागातील चौरंगीनाथ वन येथे retaining भिंत बांधणे, ठाणे विभागात वन आगारास भिंत बांधणे या वरील खर्च क्षेत्रीय कर्मचाऱ्यांकरिता निवास्थाने उपलब्ध करणे आणि चौरंगीनाथ येथील वनाचे संरक्षण व वन उत्पादनाचे संरक्षण या बाबींमुळे समर्थनीय ठरतो. ठाणे येथील विभागीय कार्यालयाची इमारत आणि अमरावती येथील वृत्त कार्यालयाची इमारत या वरील खर्च व्याजाच्या रक्कमेतून करण्यात आल्याने समर्थनीय ठरतो.<br>प्रकल्प यंत्रणांकडून पर्यायी वनीकरणांतर्गत कामे करण्याकरीता आणि नक्त वर्तमान मुल्याची रक्कम वेगवेगळ्याने घेण्यात येते आणि पर्यायी वनीकरणाखालील रोपवन हे पर्यायी वनीकरणासाठी राखुन ठेवलेल्या रक्कमेतूनच करण्यात येते. वार्षिक नियोजन आराखडा 2010-11 मध्ये एकुण रू. 89.00 कोटी पैकी रू. 35.70 कोटीचा निधी हा पर्यायी वनीकरणांतर्गत कामासाठी आणि रू. 53.30 कोटीचा निधी नक्त वर्तमान मुल्यांतर्गत विकास कामाकरीता, ज्यात वनभवन पुणे चा समावेश आहे, राखुन ठेवण्यात आलेला होता. पर्यायी वनीकरण कामासाठी राखुन ठेवलेला निधी कोणत्याही प्रकारे बांधकामाकरीता वळता करण्यात आलेला नाही. पर्यायी वनीकरणासाठी असलेले उद्दिष्ट |

<table>
<tr><th>परि.क्र.</th><th>विषय</th><th>महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय</th><th>विभागाचे अभिप्राय</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td></tr>
<tr><td></td><td>केले की इतर बांधकामावर करण्यात आलेल्या रू.२.६६ कोटीचा खर्च राज्य CAMPA च्या कार्यकारी समितीच्या मंजूरीनेच करण्यात आला.<br><br>उत्तर मान्य करणे योग्य नाही कारण २०१०-११ च्या कामाच्या वार्षिक योजनेतून "वन भवन" बांधकामाचा प्रस्ताव जून २०१० मध्ये NCAC चे निर्देश प्राप्त झाल्यावर परत घेता येवू शकला असता. तसेच,रू.२.६६ कोटी खर्च पर्यावरण व वन मंत्रालयाच्या पूर्व परवानगी शिवाय करण्यात आला आणि म्हणूनच तो अनियमित आहे.</td><td></td><td>आणि साध्य खालील तक्त्यात दिलेले आहे. एकुण 2224.83 हेक्टर क्षेत्राचा अनुशेष दिसून आलेला आहे, जो प्रामुख्याने रोपवनाच्या स्थळात बदल होत असल्याने उद्‌भवला आहे व त्यावर कार्यवाही सुरू आहे.<br><br>
<table>
<tr><th rowspan="2">अ.क्र.</th><th rowspan="2">वर्ष</th><th colspan="2">पूर्व पावसाळी कामाचे क्षेत्र (हे.)</th></tr>
<tr><th>लक्ष्य (हे.)</th><th>साध्य (हे.)</th></tr>
<tr><td>1</td><td>2010-11</td><td>5816.023</td><td>5406.743</td></tr>
<tr><td>2</td><td>2011-12</td><td>427.235</td><td>439.609</td></tr>
<tr><td>3</td><td>2012-13</td><td>548.140</td><td>675.239</td></tr>
<tr><td>4</td><td>2013-13</td><td>1785.334</td><td>1254.625</td></tr>
</table>
<br>वरील प्रमाणे<br>या बाबत सादर करण्यात येते की, याबाबत असलेल्या पर्यायी वनीकरण नियम व मार्गदर्शक सुचनानुसार भविष्यात कामे केली जातील तसेच मार्गदर्शन सुचना व पर्यायी नियमाचे उलघंन होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. तरी सदरचा परिच्छेद वगळण्यात यावी हि विंनती.</td></tr>
</table>

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |
| 2.1.9.2 | **तदर्थ CAMPA खात्यात राखीव निधी हस्तांतरीत न करणे**<br>सर्वोच्च न्यायालयाच्या मे 2006 मध्ये निदर्शनास आले की CAMPA अद्याप कार्यान्वित झाले नाही आणि त्यांनी जो पर्यंत CAMPA कार्यान्वित होत नाही तोपर्यंत एक तदर्थ संस्था (तदर्थ CAMPA असे संबोधले जाईल) गठित करावयाचे आदेश दिले. न्यायालयाने आदेश दिले की CAMPA च्या वतीने वसूल करण्यात आलेले सर्व पैसे जे राज्य शासनाच्या विविध कार्यालयांकडे आहे ते तदर्थ CAMPA खात्यात (ज्याचे नियंत्रण पर्यावरण व वन मंत्रालयाकडे आहे) हस्तांतरीत करावयास पाहिजे. महाराष्ट्र वन विभागाने क्षेत्रीय कार्यालयांना आदेश निर्गमित केले (जुलै 2008) की उपयोगकर्ता संस्थांकडून तदर्थ CAMPA स्थापित व्हावयाच्या आधी मिळालेले आणि राखीव निधीत ठेवलेले सर्व पैसे तदर्थ CAMPA खात्यात हस्तांतरीत करण्यात यावे. परंतु महाराष्ट्र शासनाच्या वर्ष 2010-14 च्या वित्त लेख्याच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की, राखीव निधीत जमा केलेले रू.38.33 कोटी अद्याप तदर्थ CAMPA खात्यात हस्तांतरीत करण्यात आले नाही (डिसेंबर 2015) तसेच,निवडलेल्या 13 पैकी सात | **Current observation by A.G:-**<br>1) Further progress in the matter may be stated to PAC | सदर पत्राची प्रत ०१/०१/२००७ व १०/०१/२००८ अन्वये सादर करण्यात आलेली आहे. सदर प्रकरण महालेखाकार कार्यालयाचे स्तरावर अद्याप प्रलंबित आहे. |
| | | **Current observation by A.G:-**<br>2) Further progress in the matter be stated to PAC | महालेखाकार नागपूर आणि मुंबई यांनी घेतलेल्या आक्षेपानुसार अनुक्रमे अलीबाग, गडचिरोली, जळगाव, सांगली, सातारा, सिरोंचा व यावल या ७ वनविभागाकडील प्राप्त माहितीच्या आधारे त्यांचे कडील आक्षेपीत रक्कम त्यांनी जे-रिझर्व्ह फंड मध्ये जमा असल्याचे कळविले आहे. त्याअनुषंगाने महालेखाकार नागपूर व मुंबई यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक १९७३ दिनांक २२/०१/२०१९ अन्वये ताळमेळाची कामे पुर्ण करण्याबाबत पुनःश्च विनंती करण्यात आली आहे. |

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | विभागांत रू.2.08 कोटी राखीव निधीत ठेवले आहे.यामुळे न केवळ रू.38.33 कोटी नऊ वर्षांपेक्षा (2006 ते 2015) जास्त कालावधीसाठी निष्क्रिय ठेवण्यात आले परंतु विविध पर्यायी वनीकरण कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी तेवढा CAMPA निधी अथवा त्याप्रमाणात निधी उपलब्धतेपासून राज्य वन विभागास विनावापर वंचित ठेवण्यात आले.<br><br>महाराष्ट्र शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि मेळ घातल्यानंतर ही रक्कम तदर्थ CAMPA खात्यात हस्तांतरित करण्यात येईल असे आश्वासित केले. | | |

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २.१.९.३ | निव्वळ विद्यमान मूल्याची वसूली न करणे<br><br>पर्यावरण व वन मंत्रालयाने (ऑक्टोंबर २००६) सर्व राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांना वन जमीन वनेत्तर प्रयोजनास्तव वळती करण्यात आल्यास निव्वळ विदयमान मूल्य (NPV) वसूल करावयाचे आदेश दिले,या आदेशानुसार ज्या प्रकरणांत, ३० ऑक्टोबर २००२ पूर्वी तत्वत: मंजूरी देण्यात आली होती आणि ज्यासाठी अंतिम मंजूरी ३० ऑक्टोंबर २००२ पूर्वी अथवा त्यानंतर देण्यात आली होती,अशा प्रकरणात सुध्दा निव्वळ विदयमान मूल्य वसूल करावयास पाहिजे.<br><br>लेखापरिक्षेस असे निदर्शनास आले की महाराष्ट्रात ३२ प्रकल्पांत उपभोगी संस्थांनी,ज्यांना ४७८.८१ हेक्टर जमीन वनेत्तर उपयोगासाठी दिली होती व अंतिम मंजूरी ऑक्टोंबर २००२ नंतर देण्यात आली. त्यांनी निव्वळ विद्यमान मूल्याची (NPV)रक्कम ३०.१८ कोटी डिसेंबर २०१५ पर्यंत अदा केली नव्हती. महाराष्ट्र शासनाने नमूद केले की संबंधित उपभोगी विभागांच्या सचिवांना तसेच इतर उपभोगी संस्थांना त्वरेने निव्वळ विद्यमान मूल्य अदा करण्याबाबत विनंती केली आहे. | | प्रकल्प यंत्रणेला वनविभागाकडून प्रलंबित नक्त वर्तमान मूल्य (NPV) लवकरात लवकर जमा करणेबाबत कळविण्यात आले आहे. तसेच त्यांना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना कळवून प्रकल्प यंत्रणेने नक्त वर्तमान मूल्य (NPV) भरले नाही तर जमीन परत घेण्यात येईल हे कळविले आहे. या कार्यालयाकडून संबंधित प्रकल्प यंत्रणेच्या प्रमुखांना प्रलंबीत नक्त वर्तमान मूल्य (NPV) रक्कम सक्तीने वसूली बाबत समज दिली आहे. सन २०१४-१५ मध्ये एकुण ३२ प्रकल्प यंत्रणेकडून एकुण ३०.२० कोटीचा नक्त वर्तमान मूल्य (NPV) प्रलंबित होता. याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक कडून महालेखाकार, नागपूर यांना कळविले होते. तथापि, रु. ३०.२० कोटी पैकी रु. १२.०१ कोटी प्रलंबित नक्त वर्तमान मूल्यांची रक्कम वसूल करण्यांत आलेली आहे.<br><br>प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) यांचे कार्यालयाकडून दिनांक १५/१०/२००७, १९/१०/२००७ व अर्ध शासकीय पत्र दिनांक १०/०७/२०१७ अन्वये संबंधित प्रकल्प यंत्रणांना कळविण्यास संबंधित वनवृत्तास कळविले आहे. दिनांक ०५/१०/२००७ चे अर्ध शासकीय पत्राने देखील संबंधित विभागाचे प्रधान सचिव /सचिव यांना नक्त |

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | वर्तमान मूल्य (NPV) प्रलंबित निधी बाबत कळविले आहे. प्रधान सचिव (वने) यांनी देखील त्यांचे दिनांक ०८/११/२०१३ व १०/०४/२०१७ चे अर्ध शासकीय पत्रान्वये संबंधित विभागाचे प्रधान सचिव /सचिव यांना प्रलंबित नक्त वर्तमान मूल्य (NPV) भरणेबाबत कळविले आहे. याव्यतिरिक्त अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांचेकडील अ. शा. पत्र दि. १०/०७/२०१७ अन्वये संबंधित मुख्य वनसंरक्षक यांना प्रलंबित नक्त वर्तमान मूल्याची रक्कम वसूल करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.<br>सद्यस्थितीत एकुण २९ प्रकल्प यंत्रणांकडे रू.१८.१९ कोटी नक्त वर्तमान मूल्य (NPV) वसूली प्रलंबित आहे. |

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २.१.१० | **महसूलाची हानी**<br>वन उत्पादन राज्याच्या सामाजिक आर्थिक विकासात एक महत्वपूर्ण भाग अदा करतो.ग्रामीण लोक जे वन क्षेत्रात आणि त्या आसपासच्या विभागांत राहतात. त्यांच्या वाजवी गरजा भागविण्याव्यतिरिक्त, वन उत्पादनाच्या विक्रीतून राज्य राजकोषात मोठया प्रमाणात निधी येतो. इमारतीचे लाकूड,इंधन लाकूड,बांबू आणि इतर बरीच अकाष्ठ वन उत्पादने जसे तेंदु पत्ता,मोहफुले इत्यादीही महत्वाची वन उत्पादने आहेत. | | |
| २.१.१०.१ | **बांबूचे समुपयोजन न केल्यामुळे हानी**<br>कार्य नियोजनानुसार बांबू कूपांचे तीन पातन मालिकांत विभाजन केले जाते आणि प्रत्येक पातन मालिका कापणी दर तीन वर्षाने नियत असते. बांबू कूपाची कापणी न झाल्यामुळे नवीन कोंब जे तीन वर्षानंतर कापणी करणे योग्य होतात. त्यांना पुनर्जीवित होण्यास अडथळा येतो.<br>निवडलेल्या १३ पैकी चार विभागांत कार्य नियोजनात नेमल्याप्रमाणे २०१०-१५ दरम्यान बांबूची कापणी करण्यात आली नाही.त्यामुळे | ---<br>**Current observation by A.G:-**<br>Brief note prepared by Maharashtra Forest Department in February 2015 indicated that due to under-deployment of operational staff, there was loss of 42.65 crore and 1.09 crore on account of illicit cutting of trees and fire incidents. As on March 2015 there was shortage of 890 Foresters and Forest Guards . As Naxalite movement and its activities are frequent in Gadchiroli district, action taken in this regard may be stated to PAC. Further, details of extraction for the year 2011-12 and | विषयाचे अनुषंगाने महालेखाकार (लेप)-II, म.रा., नागपूर यांचे कार्यालयाचे पत्र क्र.पी.ए.सी.सेल/युओआर/परि.क्र.2.1/14-15/ I-139, दिनांक 23/10/2018 अन्वये विचारणा केल्यानुसार सन 2011-12 व 2012-13 या वर्षात बांबू निष्कासनाची माहिती समाविष्ठ करुन अद्यावत अहवाल खालीलप्रमाणे आहे. |

<table>
<tr><th>परि.क्र.</th><th>विषय</th><th>महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय</th><th>विभागाचे अभिप्राय</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td></tr>
<tr><td></td><td>कापणीसाठी नियत क्षेत्र आणि प्रत्यक्ष कापणी केलेले क्षेत्र यांची तुलना करता त्यात २३ ते ९४ टक्के तूट होती. परिणामी २०१०-१५ दरम्यान रू.३७.५२ कोटी अंदाजित महसूलाची हानी बांबूची कापणी न झाल्यामुळे झाली.<br><br>महाराष्ट्र शासनाने असे नमूद केले की, बांबू मुख्यत: चंद्रपूर आणि गडचिरोली वन मंडळात आहे. जे असामाजिक घटकांनी प्रभावित आहेत. परिणामी,त्यांच्यामुळे बांबूच्या कापणीच्या कामात अडथळे येतात. आणि काही वेळी तर काम बंद करावे लागते. या अडचणी असतानाही तेथे बांबू चोरीच्या कोणत्याही घटना नाहीत आणि वाढून राहिलेले बांबू अप्रभावित राहिले आहेत, आणि भविष्यात कधीही कापणीसाठी नेहमी उपलब्ध आहे. म्हणूनच येथे शासनास कोणतीही हानी होत नाही.<br><br>उत्तर मान्य करण्यायोग्य नाही कारण (अ) जानेवारी २०१५ पर्यत महाराष्ट्र वन विभागात ८९० वनपाल आणि वन रक्षकांची कमतरता होती. जर पुरेसे कर्मचारी वर्ग तेथे नियुक्त करण्यात आले असते तर असामाजिक तत्वांची अडचण बऱ्याच प्रमाणात सोडविता आली असती आणि या क्षेत्रातील बांबूची अबाधित कापणी सुध्दा शक्य झाली असती.</td><td>2012-13 is not stated the same may be stated to PAC</td><td>1 )A) गडचिरोली
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>निष्कासन वर्ष</th><th>अपेक्षित उत्पादन</th><th></th><th>प्रत्यक्ष उत्पादन</th><th></th><th>उपलब्ध कुप</th><th>तोडझालेले कुप</th></tr>
<tr><td></td><td></td><td>लांब बांबू</td><td>बांबू बंडल्स</td><td>लांब बांबू</td><td>बांबू बंडल्स</td><td></td><td></td></tr>
<tr><td>१</td><td>२०११-१२</td><td>४१३१३५०</td><td>१०२०२८</td><td>९६२३२६</td><td>५८१४२</td><td>२७</td><td>१३</td></tr>
<tr><td>२</td><td>२०१२-१३</td><td>४८००४६४</td><td>१४३६३३</td><td>१०२५१३०</td><td>३९३६५</td><td>३५</td><td>२६</td></tr>
<tr><td></td><td>एकूण</td><td>८९३१८१४</td><td>२४५६६१</td><td>१९८७४५४</td><td>९७५०७</td><td>६२</td><td>३९</td></tr>
</table>
बांबु निष्कासन कमी होण्याची कारणे<br><br>गडचिरोली जिल्हा नक्षलदृष्टया अतिशय संवेदनशिल आहे. सन 2012 ते 2015 या कालावधीत नक्षलवाद्यांकडून वनविभागाचे 6 परिक्षेत्र कार्यालय जाळपोळ व अभिलेख नष्ट करण्याच्या घटना घडलेल्या आहेत. तसेच याच कालावधीत क्षेत्रिय कामात नक्षलीवाद्यांच्या दहशतीचे वातावरण व त्यांच्याकडून येणा-या धमक्यामुळे वनकर्मचाऱ्यांचे मानसिकदृष्टया खच्चीकरण झाले व त्याचा परिणाम बांबूच्या कामावर झालेला आहे.<br><br>दिनांक 17/04/2018 चे मध्यरात्री नक्षलवाद्यांनी आलापल्ली वनविभागातील घोट डेपोत जाळपोळ केली. ह्यात</td></tr>
</table>

<table>
<tr><th>परि.क्र.</th><th>विषय</th><th>महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय</th><th>विभागाचे अभिप्राय</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td></tr>
<tr><td></td><td>महाराष्ट्र वन विभागाने फेब्रुवारी २०१५ मध्ये तयार केलेल्या संक्षिप्त अहवालावरून असे निर्देशित होत आहे की कर्मचाऱ्यांच्या कमी नियुक्तीमुळे रू.४२.६५ कोटी आणि रू. १.०९ कोटीची हानी अनुक्रमे वृक्षांच्या अवैध कापणीमुळे आणि आगीच्या घटना घडल्यामुळे झाली. याशिवाय ७१.८७६ हेक्टर वन क्षेत्रसुध्दा अतिक्रमणाखाली होते आणि (ब) जर एखाद्या वर्षात एका पातन मालिकेतील बांबूची कापणी झाली नाही तर त्या पातन मालिकेची कापणी तीन वर्षानंतरच करण्यात येवू शकते.ज्यामुळे बांबूच्या दर्जात ऱ्हास होवून महसूलावर हमखास प्रभाव पडतो.</td><td></td><td>इमारती लाकूड, जळाऊ थप्पी इ. चे रू .1.30 कोटीचे हानी झाली. सन 2018 वर्षात 100 हून अधिक नक्षलवादी, पोलीस व ग्रामस्थ पोलीस - नक्षल चकमकीत मारले गेले. याच परिस्थीतीमुळे या वर्षात देखील बांबूचे कामावर परिणाम झालेला आहे.<br>गडचिरोली वनवृत्तात एकुण १३५४ पेसा अंतर्गत गावे अधिसुचनेव्दारे समाविष्ट करण्यात आली आहेत जे एकुण भौगोलीक क्षेत्राचा ८० टक्के भाग समाविष्ट आहे. तसेच सदर गावे ही वनसंपदा सपन्न आहेत.<br>(B) चंद्रपूर<br>या वनवृत्ताची पुनर्रचना सन 2013 मध्ये झाली व त्यानुसार सद्यास्थितीत या वनवृत्तात मध्यचांदा, ब्म्हपुरी व चंद्रपूर हे 3 वनविभाग येतात. या वृत्तात खालीलप्रमाणे बांबू निष्कासनाचे काम करण्यात आले.
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>निष्कासन वर्ष</th><th colspan="2">अपेक्षित उत्पादन</th><th colspan="2">प्रत्यक्ष उत्पादन</th><th>उपलब्ध कुप</th><th>तोड झालेले कुप</th></tr>
<tr><td></td><td></td><td>लांब बांबू</td><td>बांबू बंडल्स</td><td>लांब बांबू</td><td>बांबू बंडल्स</td><td></td><td></td></tr>
<tr><td>१</td><td>२०११ -१२</td><td>३५२१ ३३</td><td>२९९५८ १</td><td>२५२ १४०</td><td>१५३८९ ७</td><td>१८</td><td>१५</td></tr>
<tr><td>२</td><td>२०१२ -१३</td><td>४४७ ६२३</td><td>२५७२४ ३</td><td>३१९ ५७०</td><td>१६४४२ ४</td><td>१५</td><td>१२</td></tr>
<tr><td></td><td>एकूण</td><td>७९९ ७५६</td><td>५५६८ २४</td><td>५७१ ७१०</td><td>३१८३२ १</td><td>३३</td><td>२७</td></tr>
</table>
निष्कासन न करण्यात आलेल्या 6 बांबु कुपांमध्ये बांबु</td></tr>
</table>

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | अतिशय विरळ असल्यामुळे व तोडी योग्य बांबु उपलब्ध नसल्यामुळे सदर कुपांमध्ये निष्कासनाची कामे करण्यात आली नाही. |

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २. | ३. | ४. |
| 2.1.10.2 | चुकीच्या धारणा किंमती (Upset Price) चा अवलंब:-<br><br>महसूल व वन विभागाने निर्गमित केलेल्या (नोव्हेंबर १९८०) शासन निर्णयानुसार मुख्य वन संरक्षकाने त्यांच्या अखत्यारीतील प्रत्येक विक्री डेपोसाठी इमारती लाकडाच्या प्रत्येक प्रजाती आणि दर्जाची वर्ष निहाय दर अनूसुची तयार करून लिलावासाठी धारणा किंमत (Upset Price) निश्चित करण्यासाठी सूचित करावयास पाहीजे.जर इमारती लाकडाच्या मागील लागोपाठ तीन लिलावांतील प्रत्यक्ष विक्री किंमतीची सरासरी,दर अनुसूची नुसार ठरविण्यात आलेल्या किंमतीपेक्षा जास्त असेल तर सरासरी विक्री किंमत ही लिलावासाठीची धारणा किंमत असेल.<br><br>लेखापरिक्षेस असे निदर्शनास आले की मुख्य वनसंरक्षक गडचिरोली यांनी सागवन लाकडाच्या प्रत्येक प्रजाती आणि दर्जाची दर अनुसूची तयार करून त्यांच्या अधिपत्याखालील विक्री डेपोना कळविण्यास सहा ते आठ महिन्यांचा विलंब केला. परिणामी,२०११-१४ मध्ये करण्यात आलेल्या ७,३२३.६४ घनमीटर सागवान लाकडाच्या लिलावासाठी वनसंरक्षक, परिवहन व पणन विभाग बल्लारशा यांनी मागील वर्षाच्या दर अनुसूची नुसार धारणा किंमत निश्चित केली जी त्या वर्षाच्या | **<u>Current observation by A.G:-</u>**<br>The reply is not acceptable as the Government has fixed the system to decide the upset price of timber which was to be followed in any case. In this case department did not follow the system and fixed the upset price at lower side. Further, audit had pointed out delay in finalization of upset price ranging between 6 to 8 months due to which the upset price was fixed on previous years rates. Reasons for delay in preparation of SOR may be stated to PAC. | वनविभागाच्या बल्लारशाह येथील मध्यवर्ती इमारती आगारामध्ये वनसंरक्षक, वाहतुक व विपणन, बल्लारशाह यांच्या द्वारे इमारती मालाचा जाहिर लिलाव शासन निर्णय क्र. 29 एप्रिल 1986 मध्ये नमुद शर्ती व वेळोवेळी वरीष्ठांकडुन प्राप्त मार्गदर्शक सूचनां नुसार करण्यात येतो. या मध्यवर्ती आगारात विक्रीसाठी प्राप्त होणारा इमारती माल प्रामुख्याने गडचिरोली वनवृत्तातील वनविभागातुन आणला जातो. अपेक्षित किंमतीचे निर्धारण करताना मागील 3 लिलावात प्राप्त झालेल्या किंमतीच्या सरासरीचा विचार करण्यात येतो.<br><br>प्रत्येक लिलावात प्राप्त होणारी किंमत ही प्रामुख्याने बाजारपेठेतील मागणी व पुरवठयातील कमतरता तसेच बोली दारांच्या स्पर्धात्मक बोली आणि सर्वसाधारण आर्थिक परिस्थिती यावर अवलंबुन असते. अशा प्रकारे जर पुरेसा इमारती माल उपलब्ध असल्याने पुरेशी मागणी नसल्यास उपस्थित बोलीधारक अपेक्षित किंमती एवढीही बोली देत नाही. परिणामस्वरुप त्यामुळे बरेचसे गट हे विक्रीविना शिल्लक राहतात. सदर गट पुढील लिलावापर्यंत आगारात राहात असल्याने. त्यावर बाहय वातावरणाचा जसे सूर्याच्या तीव्र किरणाचा, उष्ण व थंड हवामानाचा, पावसाचा इ. चा त्यावर विपरीत परिणाम होवुन इमारती मालाचा दर्जा खालावतो. बऱ्याचशा प्रकरणी कमी दर्जाच्या प्रतीमुळे इमारती |

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २. | ३. | ४. |
| | लिलावासाठी लागू असणाऱ्या चालू दर अनुसूची पेक्षा आणि इमारती लाकडाच्या प्रत्यक्ष विक्री किंमतीच्या मागील लागोपाठ तीन लिलावांच्या सरासरीपेक्षा कमी होती.<br><br>महाराष्ट्र शासनाने नमूद केले की, लिलावासाठीची धारणा किंमत फक्त बोलीदाराने नमूद केलेल्या दराच्या मंजुरीसाठी मार्गदर्शकपर होती आणि म्हणूनच खुल्या लिलावात बोलीदाराने देवू केलेल्या दरांसोबत दर अनुसूचीचा काहीही संबंध नव्हता. परंतु मुख्य वनसंरक्षकास दर अनुसूची वेळेवर मंजुर करून सुसूचित करण्याचे निर्देश दिले आहे.<br><br>उत्तर मान्य करण्यायोग्य नाही कारण नोव्हेंबर १९८० च्या शासन निर्णयानुसार लिलावासाठीची धारणा किंमत चालू वर्षाच्या दर अनुसूचीप्रमाणे ठरवावयास पाहिजे होती.<br><br>तसेच,लेखापरिक्षेने २०१०-१५ मधील ११३ लिलावांपैकी यादृच्छिकरित्या निवडलेल्या नऊ लिलावांत जरी मागील तीन लागोपाठच्या लिलावांतील इमारती लाकडाच्या प्रत्यक्ष विक्री किंमतीची सरासरी दर अनुसूचीपेक्षा जास्त होती तरी वन संरक्षक,परिवहन व | | मालाच्या गटांस अपेक्षित किंमत प्राप्त होत नसल्याने ते ब-याच काळ पर्यंत अविक्रीत राहतात. त्यामुळे त्यानंतर होणा-या लिलावात त्याला अपेक्षित किंमतीपेक्षा कमी किंमत प्राप्त होत असल्याने व मालाचा दर्जा अधिक खालावू नये म्हणुन प्राप्त किंमत मंजुर करणे क्रमप्राप्त ठरते. अर्थातच, त्यामुळे प्राप्त महसुलात निश्चितच घट दिसुन येते. असे जरी असले तरी काही अपवादात्मक परिस्थितीत तसेच बाजारपेठेत अचानक मागणीत वाढ झाल्याने सदर मालास अपेक्षित किंमत वा त्यावरील बोली प्राप्त होते. परंतु हे क्वचितच पहायला मिळते. अनुसूचीत दराचे निर्धारण करतांना सर्वसाधारणपणे मागील कालावधीत प्राप्त झालेल्या किंमती विचारात घेण्यात येतात.<br>जर लिलावात ठेवलेल्या मालाचा दर्जा खराब असेल तर कधी कधी सदर गट पूरेशी अपेक्षित किंमत प्राप्त न झाल्याने अविक्रीत राहण्याची जास्त शक्यता असते. अशा प्रकारे अपेक्षित किंमत निर्धारित करतांना अनुसूचीत दर किंवा मागील 3 लिलावात प्राप्त बोलीच्या सरासरीचा आधार हे केवळ “अंदाजित” असतात. परंतु प्रत्यक्ष लिलावाचे वेळी असलेली परिस्थिती, बोली दरामधील स्पर्धा, मालाची उपलब्धता, सर्वसाधारण आर्थिक पर्यावरण व मालाचा दर्जा यावर प्राप्त बोली ठरते. |

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २. | ३. | ४. |
| | पणन विभाग बल्लारशा यांनी लिलावासाठीची धारणा किंमत सरासरी किंमतीपेक्षा कमी निर्धारित केली. विक्री नोंदवहयांची आणखी तपासणी केल्यावर लेखापरिक्षेस असे निदर्शनास आले की लिलावातून प्राप्त झालेले अंदाजित विक्री उत्पन्न हे सरासरी विक्री किंमत लागू केली असता मिळाल्या असत्या अंदाजित उत्पनापेक्षा कमी होते.यामुळे नऊ लिलावांत रू.१.२६ कोटी महसूलाची हानी झाली. लेखापरिक्षेने चाचणीसाठी निवडलेला नमूना मोठा असता व त्याची पडताळणी करण्यात आली असती तर परिगणित केलेली हानी यापेक्षाही जास्त असती<br><br>महाराष्ट्र शासनाने नमुद केले की जरी चुकीच्या पध्दतीचा अवलंब करून लिलावासाठीची धारणा किंमत करण्यात आली असती तरीही हानीचे अनुमान त्या किंमतीच्या आधारावर काढता येऊ शकत नाही. तथापि वनसंरक्षक (परिवहन व पणन) बल्लारशा यांना योग्य पध्दती अवलंबविण्याच्या सूचना जारी केल्या आहेत. | | यापुढे अनुसूचित दर हे विहीत वेळेतच ठरविले जावेत अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे गडचिरोली वनवृत्तात सन २०१८- या वर्षीसाठी अनुसूचित दर निश्चित करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली आहे.<br>2016 पासुन मुख्य काष्ट आगारांवर ई लिलाव प्रक्रीया राबविण्यात येत असुन देशातील कोणताही खरेदीदार या लिलाव प्रक्रीयेत सहभागी होवू शकतो. या लिलावासंबंधी प्रक्रीया ही खरेदीदारांच्या दृष्टीने अत्यंत पारदर्शी व सोपी असुन यामुळे विभागास खरेदीदाराकडुन चांगली किमंत प्राप्त होत आहे. |

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| 2.1.10.3 | आरा गिरणीच्या कमी वापरामुळे हानी<br><br>महाराष्ट्र राज्यात वन विभागाकडे १९६४ पासून आलापल्ली येथे एक आरा गिरणी कार्यान्वित आहे या गिरणीत १० "आरा" यंत्रे आहेत. ज्यापैकी फक्त तीन चालू स्थितीत असून त्यांची क्षमता प्रति दिन ४.५ घनमीटर लाकूड कापण्याची आहे. २०१०-१५ मध्ये ही आरा गिरणी ०.७१ घनमीटर प्रति दिन या दराने परिचलित होती आणि महसूल वसूली केवळ रू.०.२१ कोटी होती जेव्हा की याच काळात प्रचालन खर्च रू.२.४४ कोटी होता.आरा गिरणीचा २०१०-१५ दरम्यान झालेल्या कमी वापरामुळे रू.२.२३ कोटीची हानी झाली.<br><br>महाराष्ट्र शासनाने नमुद केले की प्रचालन किंमत आणि महसूल वसूली यांच्यातील फरक कमी करावयासाठी आरा यंत्राव्दारे कापणी किंमतीत सुधारणा करण्यात येईल आणि आरा गिरणीस एक वर्धनक्षम घटक बनविण्यासाठी योग्य कारवाई करण्यात येईल.<br><br>शिफारस ३: (I) वन विभागाने कार्य नियोजनात | No remarks | नमूद परिच्छेदाच्या अनुषंगाने मुख्य वन संरक्षक (प्रा) गडचिरोली यांचे कार्यालयाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.<br><br>आल्लापल्ली वनविभागातील आरा गिरणीची स्थापना १९६४ मध्ये शासन व नागरिकांकरिता आवश्यक लाकूड कापण्याच्या उद्देश्याने करण्यात आली. सद्यस्थितीत सदर आरा गिरणी द्वारे फर्निचर दुकान व सामान्य नागरिकांकरिता कापलेल्या लाकडांचा घर बांधणी कामाकरिता पुरवठा केला जातो. सदर आरा गिरणी ही या भागातील 50 पेक्षा अधिक फर्निचर दुकान धारकांकरिता उपजीविकेचा स्रोत आहे.<br>सद्य:स्थितीत सदर आरा गिरणी प्रतीवर्षी 250 घनमीटर लाकूड कापत आहे. सदर आरा गिरणीने आपल्या पूर्ण क्षमतेचा वापर केल्यास प्रतिदिन 4.5 घनमीटर लाकूड कटाई करू शकते. याप्रमाणे एक वर्षात अंदाजे १४०० घनमीटर लाकूड कापू शकते.(१ वर्षातील ३१३ कार्यालयीन दिवसांचा विचार केल्यास).<br>तथापि, आलापल्ली येथील शासकीय आरा गिरणीची या भागात आवश्यकतेची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.<br>१. आलापल्ली क्षेत्र हे नक्षल प्रभावित असून या भागातील लोकांची उपजिविका वनावर आधारित आहे. स्थानिक नागरिक लिलावाद्वारे इमारती माल विकत घेतात आणि त्याद्वारे ते आपले लहान फर्निचर मार्ट चालवितात. या भागातील जवळपास ५० हून अधिक फर्निचर दुकाने या आरा गिरणीवर आधारित आहेत. या फर्निचर दुकानांची वार्षिक उलाढाल अंदाजित २ लक्ष पकडल्यास सदर लाकूड व्यवसाय जवळपास १०० लाखांचा आहे. या दृष्टीने हि आरा गिरणी या नक्षल ग्रस्त क्षेत्रामधील युवकांना आजीविकांच्या विविध संधी निर्माण करीत आहे.<br>२. कौशल्य विकास अभियान हा केंद्र शासनाचा अतिशय महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. |

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
| --- | --- | --- | --- |
| १ | २ | ३ | ४ |
| | मंजुर करून समाविष्ट केलेले भौतिक लक्ष्य विभागाद्वारे वेळेवर साध्य करता येईल. याची खातरजमा करावी कारण एका कामाचे लक्ष्य साध्य करण्यातील तूट इतर परस्पर आधारित कामांच्या लक्ष्य साध्यतेवर आणि महसूल अनुकूलतेवर प्रतिकूल प्रभाव पाडते. **(ii) CAMPA** निधीतून ज्या बाबींवर खर्च करणे ग्राह्य आहे त्यावर खर्च करण्यास परावृत्त करावयास पाहिजे कारण त्यामुळे पर्यायी वनीकरण कार्यक्रमाचा निधी हिरावून घेतला जातो. **(iii)** महसूल हानी टाळण्याकरिता वन उत्पादनाची कापणी योग्य वेळी करावयास पाहिजे. | | आलापल्ली येथील तंत्र शिक्षण महाविद्यालयात विशेषतः सुतारकामाचे प्रशिक्षण दिले जाते. सुतारकामावर आधारित व्यवसाय आलापल्ली, भामरागड, सिरोंचा येथील युवकांना भरघोस आर्थिक लाभ देणारा ठरू शकतो. या कौशल्य विकासाच्या युगात, लाकडावर आधारित व्यवसायाच्या भविष्यातील मागणीची पूर्तता करण्याकरीता आल्लापल्ली येथील आरा गिरणी महत्वाची कामगिरी बजावू शकते.<br>३. यापूर्वीचे लाकूड कापण्याचे दर १८००/- रुपये प्रती घनमीटर होते. या क्षेत्रामधील प्रचलित दरानुसार दर संशोधित करून नवीन दर २४००/- रुपये प्रती घनमीटर इतका निश्चित करण्यात आला. यामुळे आरा गिरणीकरिता लागणारा खर्च आणि मिळणारा महसूल यामध्ये घट होण्यास मदत होईल.<br>४. या क्षेत्रात एकही अधिकृत आरा गिरणी नसल्यामुळे, सदर आरा गिरणी बंद झाली तर अनधिकृतपणे लाकडे कापण्याचे प्रमाण वाढेल आणी याचा प्रतिकूल प्रभाव वन संरक्षणावर पडेल.<br>एकंदरीत या भागातील परिस्थितीचा विचार करता आलापल्ली येथील आरा गिरणीला केवळ नुकसान करणारा प्रकल्प या दृष्टीकोनातून न बघता या भागातील युवकांना रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या स्रोताच्या दृष्टीकोनातून बघण्यात यावे असे मत आहे. |

<table>
<tr><th>परि.क्र.</th><th>विषय</th><th>महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय</th><th>विभागाचे अभिप्राय</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td></tr>
<tr><td>2.1.11</td><td colspan="3">संनियंत्रण,मुल्यांकन आणि आंतरिक नियंत्रण:- कोणतीही योजना,कार्यक्रम किंवा प्रक्रिया यांच्या प्रगतीचा माग राखण्यासाठी संनियंत्रण आणि मूल्यांकन हे चुकांचा शोध घेऊन त्यावर तत्परतेने सुधार कारवाई करण्याकरिता आणि भविष्यातील नियोजनासाठी धडा शिकण्याकरिता,अत्यंत महत्वाचे आहे.</td></tr>
<tr><td>2.1.11.1</td><td>कार्य नियोजनाचे अपुरे संनियंत्रण<br><br>▪ नियंत्रण प्रपत्रे न ठेवणे<br><br>कार्य नियोजन विभागाने सर्व वनसंवर्धन कामांवर जसे वृक्ष पातन,सफाई,कापणी (Cut-back) कामे, विरळीकरण इत्यादींवर संनियंत्रण ठेवण्यासाठी कार्य नियोजनाच्या कालावधीची कूप नियंत्रण प्रपत्रे (CCControl forms) तयार करून ती ठेवावयास पाहिजे. तसेच,कार्य नियोजन विभागाने पाडण्यासाठी चिन्हांकित केलेल्या वृक्षांचे आणि तसेच,ठेवण्यात येणाऱ्या वृक्षांच्या दस्तावेजांचे संनियंत्रण ठेवण्यासाठी पातन नियंत्रण प्रपत्रे सुध्दा ठेवावयास पाहिजेत.<br><br>लेखापरिक्षेत असे निदर्शनास आले की, निवडलेल्या सहा पैकी पाच विभागात नियंत्रण प्रपत्रे ठेवण्यात आली नाहीत आणि त्यामुळे वृध्द झाडांना पाडणे,यासह विविध वन संवर्धन कामांबाबत महत्वपूर्ण माहिती या कार्य नियोजन विभागांकडे उपलबध नव्हती. परिणामी,कार्य नियोजन विभाग महसूल निर्मिती कामांवर पुरेसे संनियंण ठेऊ शकला नाही.<br><br>महाराष्ट्र शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की मुख्य वनसंरक्षकांना वनीकरण कामांवर उचित संनियंत्रण ठेवण्यासाठी नियंत्रण प्रपत्रे नियमितपणे सादर करावयाच्या सूचना जारी करण्यात येत आहेत.</td><td><u>Current observation by A.G:-</u><br>Further progress of action taken may be intimated to PAC.</td><td>कुपाचे काम झाल्यानंतर ती माहिती कुप नियंत्रण प्रपत्रात भरून कार्य आयोजना विभागास सादर करणे अपेक्षित आहे. त्याचा उपयोग नविन कार्यआयोजना तयार करताना होतो. परंतु क्षेत्रीय कामांच्या ताणमुळे हे काम वेळेत होत नाही. तथापि याचा कोणताही परिणाम क्षेत्रिय कामावर अथवा उत्पादनावर होत नाही व यामुळे कोणतीही वित्तीय अनियमितता होत नाही. परंतु यापुढे कुप नियंत्रण प्रपत्र वेळेत दिली जावी यासाठी या कार्यालयाकडून दक्षता घेण्यात येत आहे.<br><br>या संदर्भात प्राप्त झालेल्या कुप नियंत्रण प्रपत्रांची वनविभाग निहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.<br>गडचिरोली</td></tr>
</table>

| वर्ष | गडचिरोली | | वडसा | | आलापल्ली | |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्राप्त कुप कंट्रोल फॉर्म | अप्राप्त | प्राप्त कुप कंट्रोल फॉर्म | अप्राप्त | प्राप्त कुप कंट्रोल फॉर्म | अप्राप्त |
| 2010-11 | 24 | 82 | 0 | 76 | 48 | 43 |
| 2011-12 | 0 | 106 | 27 | 49 | 10 | 81 |
| 2012-13 | 0 | 106 | 0 | 76 | 8 | 83 |
| 2013-14 | 0 | 106 | 0 | 76 | 0 | 91 |
| 2014-15 | 0 | 106 | 30 | 46 | 0 | 91 |
| 2015-16 | 0 | 106 | 0 | 76 | 0 | 91 |
| 2016-17 | 17 | 89 | 0 | 76 | -- | -- |
| एकूण | 41 | 701 | 57 | 475 | 66 | 480 |

<table>
<tr><th>परि.क्र.</th><th>विषय</th><th>महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय</th><th>विभागाचे अभिप्राय</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td></tr>
<tr><td></td><td>

• वळतीकरण प्रस्तावांच्या मंजुरीत विलंब

राष्ट्रीय कार्य नियोजन संहिता,2004 अनुसार जर कोणतीही वन संवर्धन कार्ये करण्यात येत नसली अथवा एखादे काम कार्य नियोजनानुसार नसेल तर,ते मंजुर कार्य नियोजनातील कामाची वळवणूक असे समजण्यात येईल.

लेखापरिक्षेस असे निदर्शनास आले की, निवडलेल्या 13 पेकी चार विभागांत 2010-14 दरम्यान 30,370.73 हेक्टर क्षेत्राचे वळतीकरण प्रस्ताव संबंधित वनसंरक्षक/प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे कडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले. जे प्रलंबित आहेत (डिसेंबर 2015)

महाराष्ट्र शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमुद केले की, प्रलंबित वळतीकरण प्रस्तावांवर निर्णय घेण्यासाठी संबंधित वनसंरक्षकास कळविण्यात येईल.

</td><td></td><td>

<table>
<tr><th>वर्ष</th><th colspan="2">सिरोंचा</th><th colspan="2">भामरागड</th></tr>
<tr><th></th><th>प्राप्त कुप कंट्रोल फॉर्म</th><th>अप्राप्त</th><th>प्राप्त कुप कंट्रोल फॉर्म</th><th>अप्राप्त</th></tr>
<tr><td>2010-11</td><td>0</td><td>120</td><td>0</td><td>139</td></tr>
<tr><td>2011-12</td><td>27</td><td>93</td><td>0</td><td>139</td></tr>
<tr><td>2012-13</td><td>0</td><td>120</td><td>0</td><td>139</td></tr>
<tr><td>2013-14</td><td>0</td><td>120</td><td>0</td><td>139</td></tr>
<tr><td>2014-15</td><td>0</td><td>120</td><td>0</td><td>139</td></tr>
<tr><td>2015-16</td><td>0</td><td>120</td><td>0</td><td>139</td></tr>
<tr><td>2016-17</td><td>--</td><td>--</td><td>0</td><td>139</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>27</td><td>693</td><td>0</td><td>973</td></tr>
</table>

अमरावती.

<table>
<tr><th>वनविभाग</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>अमरावती, चंद्रपूर, धुळे व कोल्हापूर वनविभाग</td><td>सदर वनविभाग यांची प्रपत्रे अप्राप्त आहेत.</td></tr>
</table>

ज्या विभागांचे कुप नियंत्रण प्रपत्रे अप्राप्त आहेत त्यांचे स्पष्टीकरण मागविण्यात आलेले आहे .

कार्य आयोजनाच्या तरतुदी प्रमाणे कुपाचे काम करत असताना काही काम होऊ शकले नाही किंवा त्यात स्थानिक परिस्थितीनुरूप काही बदल करावा लागल्यास त्याबाबत विचलन प्रस्ताव सादर केले जातात .

त्या अनुषंगाने चार वनविभागाचे ३०,३७० हे. क्षेत्राचा समावेश असलेले विचलन प्रस्तावाबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्यामुळे यासंबंधी कोणतेही प्रस्ताव प्रलंबित नाहीत.

</td></tr>
</table>

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| 2.1.11.2 | **मूल्यांकन शाखेच्या निरीक्षणांचे अनुपालन न करणे.**<br><br>महाराष्ट्र वन विभागाच्या मुल्यांकन विभागाने वन विकास कार्याचे, त्यांचा दर्जा व मानक निर्धारित करण्यासाठी आणि अंमलबजावणीत सुधारणा सूचविण्यासाठी मूल्यांकन केल. लेखापरिक्षणात असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र वन विभागाची मूल्यांकन शाखा,वन विकास कामांचे वर्षभर मूल्यांकन करीत असते आणि त्यात सुधारात्मक उपाययोजना आणि कारवाईचे मुद्दे ज्यामध्ये विभागाच्या कार्यसिध्दीत उल्लेखनीय भर घालण्याचे सामर्थ्य आहे ते, समाविष्ट करून मोठे कष्ट घेऊन मूल्यांकन अहवाल तयार करण्यात येतात.परंतु मूल्यांकन शाखेने केलेले निरीक्षण व शिफारशींचे विभागाव्दारे होणारे | **Current observation by A.G:-**<br>It was pointed by audit that 84% observations were pending for compliance. Present status of compliance after issue of instructions may be stated to PAC. | रोपवनांचे मूल्यांकन करतांना, स्थळ निहाय रोपवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी उपाययोजना सुचविण्यांत येतात. या सुचनामध्ये प्रामुख्याने रोपवनाची योग्य त-हेने व वेळेचे वेळी क्षेत्रीय कामे करणे, नोंद वहया अद्ययावत ठेवणे अशा प्रकारच्या सूचना असतात.<br>संबधित मुख्य वनसंरक्षक यांना वेळोवेळी दिशानिर्देश जारी केले आहेत. तव्दतच याप्रकरणी वैयक्तिक लक्ष देण्याबाबत सूचना सुध्दा संबधित मुख्य वनसंरक्षकांना देण्यात आलेल्या आहेत. 2010-15 दरम्यान 1625 निरीक्षणे प्रलंबित होती. त्यापैकी क्षेत्रीय कार्यालयाकडील अनुपालनानंतर 346 निरीक्षणे वगळण्यात आली आहेत. आता 1297 निरीक्षणे प्रलंबित आहेत.<br>भविष्यात, विशेष मोहीम राबवून ५०% निरिक्षणे मार्च/२०१९ पर्यंत आणि उर्वरित ५०% निरिक्षणे जुन/२०१९ पर्यंत निकाली काढण्यात येतील. |

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | अनुपालन निराशाजनक होते. मुख्य वनसंरक्षक (मूल्यांकन) यांच्याद्वारे सादर केलेल्या माहितीवरून असे निदर्शनास येते की, २०१०-१५ दरम्यान ५१ विभागांच्या विरूध्द असलेल्या १,९४५ निरीक्षणापेकी १,६२५ निरीक्षण (८४ टक्के) प्रलंबित होते.<br><br>महाराष्ट्र शासनाने नमूद केले की या बाबीकडे गंभीरतेने लक्ष देण्यात येत आहे आणि याबाबत सर्व मुख्य वनसंरक्षकांना निर्देश दिले आहेत. | | |

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| 2.1.11.3 | प्रलंबित वन महसूल<br><br>निवडलेल्या १३ विभागांत डिसेंबर २०१५ पर्यंत १,४९४ प्रकरणांत (सर्वात जुने प्रकरण ८० वर्षापेक्षाही जुने आहे) रू.१२.३४ कोटी वन महसूल वसुलीकरिता प्रलंबित आहे.एकूण रू.१२.३४ कोटी प्रलंबित महसूलापैकी रू.०.३० कोटीचे प्रलंबन चलनाचे समायोजन न झाल्यामुळे होते. रू.५.९२ कोटीं महसूल विभागास वसूली करण्याकरीता कळविण्यात आले होते. रू.२.१२ कोटी न्यायालयाचा अंतिम निर्णय न झाल्यामुळे प्रलंबित होते. ०.४३ कोटी वन कामगार सहकारी संस्थेकडून देय होते. रू.०.४४ कोटी आदिवासी विकास महामंडळा तर्फे देय होते. रू.२.४७ कोटी वन कंत्रांटदारांकडून देय होते आणि उर्वरित रू.०.६६ कोटी संकीर्ण म्हणून वर्गीकृत करण्यात आले होते.<br><br>महाराष्ट्र शासनाने नमूद केले की जास्तीत जास्त वसूली होण्यासाठी ही बाब उच्च स्तरावरील अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आली आहे | **Current observation by A.G:-**<br>Further progress may be intimated to PAC. | परिच्छेद क्रमांक २.१.११.३ मध्ये दर्शविण्यात आलेली वनमहसूलाची थकबाकी माहे डिसेंबर/२०१५ ची नसून माहे मार्च/२०१५ ची आहे.<br>उपशिर्ष निहाय खालीलप्रमाणे वनमहसूल थकबाकी मार्च/१५ नंतर माहे जून/१५ ते जून/२०१८ या कालावधीत खालील प्रमाणे थकबाकीची वसुली झालेली आहे.<br>१. चलाना अभावी प्रलंबित असलेली थकबाकी रक्कम रू.२९.८९ लक्ष पैकी रू.४.४४ लक्षचे चलन प्राप्त झाले असून जून/२०१८ अखेर रू.२५.४४ लक्ष ची चलने प्राप्त व्हावयाची आहेत .प्रलंबित वनमहसूल थकबाकी ही महसूलाचे ताळमेळ (Reconciliation) न झाल्यामुळे दिसते. ती प्रत्यक्षात थकबाकी नाही. ही थकबाकी मुख्य वनसंरक्षक (प्रा) धुळे व मुख्य वनसंरक्षक (प्रा) गडचिरोली यांचेकडील असून याबाबत त्यांचेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.<br>२. २.० राजस्व खात्याकडे वसुलीकरीता वर्ग केलेल्या प्रकरणातील वन महसूल थकबाकीची रक्कम रु.५९२.०८ लक्ष पैकी रु.१३.५३ लक्ष वसुल झालेली असुन जून/२०१८ अखेर रु.५७८.५५ लक्ष रक्कम वसुली करीता शिल्लक आहे.<br>राजस्व खात्याकडे असलेली वसुली ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. सदरची वसुली ही महसुल खात्यामार्फत महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेन्यु कोड अंतर्गत करण्यासाठी महसूल खात्याकडे प्रकरणे वर्ग करण्यात आली आहेत. याबाबित संबंधित यंत्रणेकडून विविध स्तरावरुन सतत पाठपुरावा करण्यात येत आहे. उर्वरीत वसुलीबाबत संबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रा) यांना प्रकरणनिहाय वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सविस्तर अहवाल मांगविण्यात आले आहेत.<br>a. न्यायालयाच्या निर्णयासाठी प्रलंबित थकबाकी रू.२.१२ कोटी आहे. सदर थकबाकी न्यायालयाच्या निर्णयासाठी प्रलंबित असलेल्या प्रकरणातील आहे. न्यायालयीन प्रकरणे जलद गतीने निपटारा होण्याकरीता वनवृत्तस्तरावर वेळोवेळी आढावा घेवून न्यायालयाच्या निर्णया अभावी शासनाची थकबाकी प्रलंबित असल्याची बाब कोर्टाच्या निदर्शनास आणून देण्याबाबत या कार्यालयाचे स्तरावरून सर्व संबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रा) यांना कळविण्यात आले आहे.<br>४.० जंगल कामगार सहकारी संस्थाकडील रु.४३.०० लक्ष थकबाकी पैकी रू.१३५९.०० लक्ष वसूली झाली असून जून/२०१८ अखेर रु. २९४१ लक्ष थकबाकी शिल्लक आहे. सदर थकबाकी अवसायनात गेलेल्या संस्थाकडील असुन ती वसूल करण्यासाठी त्यांचेकडे कोणत्याही प्रकारची मालमत्ता उपलब्ध नाही. त्यामुळे सदर थकबाकी निर्लेखीत करणे हा |

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | एकमेव पर्याय आहे. तसेच काही संस्थांचे वनवृत्ताकडून प्राप्त झालेले निर्लेखन प्रस्ताव शासनाचे मंजूरीकरीता या कार्यालयाकडून सादर करण्यात आले आहे. प्रलंबित प्रकरणी प्रकरण निहाय शासन निर्णयातील तरतूदीनुसार निर्लेखनाबाबत योग्यती कार्यवाही जलद गतीने करुन प्रकरण निकाली काढण्याबाबत निर्देश या कार्यालयाचे स्तरावरुन संबंधित वनवृत्तास देण्यात आले आहे.<br>५.० वनठेकेदार/कंत्राटदार यांचेकडे रु.२४७.०० लक्ष थकबाकी पैकी रू.१३८.०० लक्ष वसुल झाली असून जून/२०१८ अखेर रु.१०९.०० लक्ष थकबाकी शिल्लक आहे. सदर थकबाकी विविध वनोपज खरेदी केल्याबाबत पूर्ण रक्कम भरना न केल्यामुळे शिल्लक असलेल्या रक्कमे संबंधिची तसेच इतर वनठेक्याच्या संदर्भातील आहे. सदर रक्कम वसूलीसाठी वनविभागाकडून सतत प्रयत्न करण्यात येत आहेत. प्रकरणी वसुलीबाबत आढावा घेण्याबाबत संबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रा) यांना सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.<br>६.०० संकीर्ण थकबाकी रू.६६.२३ लक्ष पैकी रू.०.८१ लक्ष वसूल झाली असून जून २०१८ अखेर रू. ६५.४२ लक्ष थकबाकी शिल्लक आहे. संकीर्ण थकबाकी वसूलीसाठी शक्य ते प्रयत्न करण्यात आले आहे. तसेच ज्या प्रकरणात वसुली करणे संभव नाही अशा प्रकरणातील थकबाकीची रक्कम शासनाने प्रदान केलेल्या वित्तीय अधिकाराचे अधिन राहून निर्लेखन करणेबाबतच्या सुचना संबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रा) यांना देण्यात येत आहे आणि त्यांचे अधिकार क्षेत्राबाहेरील प्रकरणे शासन मंजूरीसाठी पाठविण्याकरीता निर्लेखन प्रस्ताव तयार करून पाठविणे बाबत सुचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत.<br>७.० आदिवासी विकास महामंडळ, गडचिरोली यांचेकडील रू.४३.७५ लक्ष थकबाकीची रक्कम वसूल करण्यासाठी वनविभागामार्फत प्रयत्न सुरू आहेत. प्रकरणी वसुलीबाबत आढावा घेण्यास व वसुलीबाबत कार्यवाहीचा आढावा घेण्याबाबत संबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रा) यांना सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.<br>वरीलप्रमाणे जून-२०१८ अखेर एकूण १३ विभागाची एकूण ०७ उपशिर्षाअंतर्गत रू.१२३४.०० लक्ष थकबाकी रक्कमेपैकी रू.१७०.०० लक्ष थकबाकी वसुल करण्यात आलेली आहे. त्याची टक्केवारी १३.७७ आहे. एकूण वसुली पैकी न्यायालयाचे निर्णयावर रू.२१२.०० लक्ष व महसुल खात्याकडे वसुलीकरीता वर्ग रू.५९२.०० लक्ष अशी एकूण रू.८०४.०० लक्ष रक्कम ही वनखात्याच्या अधिकार क्षेत्रातील नाही. जर ही थकबाकी एकूण रु.१२३४.०० लक्षमधुन वगळली तर रु.४३०.०० लक्षपैकी रू.१७७. ६१ लक्ष थकबाकी वनविभागाने कार्यवाही करून जून/२०१८ पर्यन्त वसुल केली आहे. त्याची टक्केवारी ४१.१६% इतकी आहे. |

<table>
<tr><th>परि.क्र.</th><th>विषय</th><th>महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय</th><th>विभागाचे अभिप्राय</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td></tr>
<tr><td>२.१.११.४</td><td>अपुरे आंतरिक नियंत्रण:-<br><br>आंतरिक नियंत्रण प्रणाली हे एक व्यवस्थापनेस उपयुक्त साधन आहे ज्याव्दारे योग्य नियम आणि विनियम यांचा कार्ये व अहवालाच्या सादरीकरणात अवलंब होत असल्याची हमी मिळते. महाराष्ट्र वन विभागातील आंतरिक नियंत्रण खाली दर्शविल्याप्रमाणे अपुरे आहे.<br><br>13 पैकी तीन विभागांत स्वीय प्रपंजी लेखा रोख पुस्तिका आणि कोषागार पास बुक यांच्या शेवटच्या शिल्लक रकमेत रू.1.25 कोटींचा फरक होता.<br><br>महाराष्ट्र अर्थसंकल्प पुस्तिका,1977 नुसार निधीची मागणी,प्राप्ती आणि संवितरण यावर संनियंत्रण ठेवण्यासाठी अर्थसंकल्प नियंत्रण प्रपंजी राखण्यात यावयास पाहिजे.तथापि,निवडलेल्या दोन विभागांत (सातारा आणि सांगली) ही प्रपंजी राखण्यात आली नव्हती.<br><br>निवडलेल्या दोन विभागांत (सांगली आणि यावल) साठा प्रपंजीचा (Stock Register) जिल्हा वन अधिकारीं/उप-वनसंरक्षक यांचेव्दारे प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येत नव्हती. तसेच, साठा प्रपंजीतील नोंदीही</td><td><u>Current observation by A.G:-</u><br>Further progress of reconciliation in respect of other divisions with may be stated to PAC. Further, action taken on other audit observations on Internal Control Mechanism may be furnished to PAC.</td><td>तेंदु हंगामात प्रतिवर्षी आस्थापपनेच्या प्रशासकिय खर्चासाठी प्रतिवर्षी किती रक्कम खर्च होते, तसेच स्वामित्वधानापोटी शासनास प्रतीवर्षी किती महसुल प्राप्त होतो याबाबत वर्षनिहाय/बाबनिहाय आकडेवारी सादर करण्यात येत आहे. (रु. कोटीत)<br>
<table>
<tr><th>तेंदु हंगाम</th><th>तेंदु घटकांची विक्रीतुन प्रतिवर्षी प्रात रक्कम</th><th>प्रशासकिय खर्च</th><th>स्वामित्व धनापोटी (१२%) शासनास प्रतिवर्षी प्राप्त महसुल</th><th>शासनास प्रतिवर्षी प्राप्त महसुल</th></tr>
<tr><td>२०१५</td><td>३०.७३</td><td>१०.३२</td><td>१.२३</td><td>११.५५</td></tr>
<tr><td>२०१६</td><td>५०.५६</td><td>१४.५५</td><td>१.७४</td><td>१६.३०</td></tr>
<tr><td>२०१७</td><td>१६०.०३</td><td>१५.१८</td><td>१.८२</td><td>१७.०१</td></tr>
<tr><td>२०१८</td><td>५०.६६</td><td>१८.०६</td><td>२.१६</td><td>२०.२२</td></tr>
</table>
3.00 वरीलप्रमाणे तेंदू घटकाची विक्री झाल्यानंतर प्राप्त होणारी स्वामित्व शुल्काची रक्कम स्वीय प्रपंची लेख्यामध्ये (PLA) जमा करण्यात येते. यामधून आस्थापना,खर्च व त्यावरील 12% रक्कम स्वामित्व धनापोटी प्राप्त रक्कम शासन मंजुरीअंती शासनाच्या महसूलात जमा केली जाते. तसेच उर्वरित रक्कम तेंदूपाने संकलनकर्त्या मजुरांमध्ये तेंदू बोनस म्हणून वाटप केली जाते. तथापी संकलन कर्त्या मजुरांचे होणारे स्थलांतर वा अन्य कारणांमूळे तसेच ज्या मजुरांची बॅंक खात्याची माहीती अप्राप्त होत असल्याने त्याबाबत वर्तमान पत्रात प्रसिध्दी करुनही मजुरांचा शोध न लागल्यामुळे वाटप करावयाची प्रोत्साहनात्मक रक्कम काही प्रमाणात अवितरित राहते, अशी अवितरीत रक्कम सुध्दा स्वामित्व धनापोटी शासनास महसुल म्हणुन जमा केली जाते.<br>4.00 तेंदु रॉयल्टी रक्कमेतून तेंदु पाने संकलन करणा-या मजुरांना प्रोत्साहनात्मक प्रतिवर्षी तेंदु बोनस किती रक्कम वाटप केली याबाबतची आकडेवारी आणि प्रतिवर्षी मजुरांना तेंदु बोनस म्हणून वाटप केलेली रक्कम वजा केल्यानंतर विभागाकडे पीएलए खात्यामध्ये.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>परि.क्र.</th><th>विषय</th><th>महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय</th><th>विभागाचे अभिप्राय</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td></tr>
<tr><td></td><td>त्यांच्याव्दारे प्रत्यापित करण्यात येत नव्हत्या.<br><br>चार विभागांत उप-वनसंरक्षक रोख शिल्लकाची अनपेक्षित मासिक प्रत्यक्ष पडताळणी करत नव्हते.<br><br>मार्च 2015 पर्यंत महाराष्ट्र वन विभागाच्या आंतरिक लेखापरिक्षा शाखेद्वारे घेण्यात आलेली 735 निरीक्षणे विभागाव्दारे अनुपालन न झाल्यामुळे प्रलंबित होती.<br>तीन विभागांत (सांगली,ठाणे आणि गडचिरोली)महाराष्ट्र वन विभागाव्दारे जारी फेब्रुवारी 1993 च्या आदेशाचे उल्लंघन करून कंत्राटदारांकडून निविदा न मागविता रू.2.94 कोटी किंमतीची बांधकाम व लागवडीची कामे देण्यात आली तसेच,या आदेशाचे उल्लंघन करून ठाणे विभागाने कंत्राटदारांना रू.1.15 कोटी रोख प्रदाने केली.<br><br>महाराष्ट्र शासनाने नमूद केले की सर्व विभागांना लेखापरिक्षेद्वारे निदर्शनास आणण्यात आलेल्या आंतरिक नियंत्रण प्रणाली मधील उणीव भरून काढण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र शासनाने पुढे असेही नमूद केले की कामाच्या तत्काळ स्वरूपामुळे ठाणे विभागाने रू.1.15 कोटीचे रोख प्रदान केले.</td><td></td><td>शिल्लक रक्कमेची खालील प्रमाणे आकडेवारी सादर करण्यात येत आहे.<br>(रु. कोटीत)<br>
<table>
<tr><th>तेंदु हंगाम</th><th>तेंदु घटकांची विक्रीतुन प्रतिवर्षी प्राप्त रॉयल्टी रक्कम</th><th>पीएलए खात्यात जमा करण्यात आलेली रॉयल्टी</th><th>शासन ज्ञापन अन्वये तेंदुपाने संकलन कर्त्या मजुराना वाटप करावयाची बोनस रक्कम)</th><th>तेंदुपाने संकलन कर्त्या मजुराना बोनस म्हणुन वाटप करण्यात आलेली रक्कम</th><th>स्वामित्व धनापोटी शासनास प्रतिवर्षी जमा करण्यात आलेला महसुल</th><th>तेंदुपाने संकलन कर्त्या मजुराना बोनस वाटप तसेच स्वामित्व धनापोटी प्राप्त महसुल शासन जमा केल्यानंतर पीएलए खात्यात शिल्लक रक्कम</th></tr>
<tr><td>1</td><td>2</td><td>3</td><td>4</td><td>5</td><td>6</td><td>7</td></tr>
<tr><td>२०१५</td><td>३०.७३</td><td>३०.७३</td><td>१९.१८</td><td>१७.८९</td><td>१०.९०</td><td>NIL</td></tr>
<tr><td>२०१६</td><td>५०.५६</td><td>५०.५६</td><td>३४.२६</td><td>३०.१७ बोनस वाटप सुरु आहे.</td><td>१४.६४</td><td>NIL</td></tr>
<tr><td>२०१७</td><td>१६०.०३</td><td>१६०.०३</td><td>१४३.०३</td><td>१२७.०० *</td><td>१५.६६</td><td>३.३२</td></tr>
<tr><td>२०१८</td><td>५०.६६</td><td>५०.६६</td><td>३०.३४</td><td>शासन पत्र दि. 24/1/19</td><td>--</td><td>५०.६६</td></tr>
</table></td></tr>
</table>

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | शिफारस 4: चुकांचा वेळेत शोध आणि तत्परतेने सुधारात्मक कारवाई सुरू करण्यासाठी कार्य नियोजनाचे वन विभागाव्दारे सनियंत्रण भक्कम असावयास पाहिजे. हानी कमी करण्यासाठी आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी मूल्यांकन शाखेव्दारे करण्यात आलेले निरीक्षण/ शिफारशी यासंदर्भात विभागाने पूर्व क्रियाशील दृष्टिकोन ठेवावयास पाहिजे. वनीकरण कामांची · योजना,कार्यान्वयन आणि व्यवस्थापनेत नियमांचे व विनियमांचे काटेकोरपणे पालन होत आहे याची खातरजमा करण्यासाठी आंतरिक नियंत्रण यंत्रणा बळकट करावयास पाहिजे. | | आणि या कार्यालयाचे पत्र क्र.767 दि. 28/1/19 नुसार वाटपाची कार्यवाही सुरु झालेली आहे.<br><br>5.00 स्वीय प्रपंजी लेख्यामध्ये शिल्लक रक्कमेबाबत संबधीत वनविभागाकडून नियमितपणे जिल्हा कोषागार कार्यालयाशी ताळमेळ करण्यात येत असुन ताळमेळाच्या माहे डिसेंबर 2018 अखेरच्या प्रती माहीतीकरीता यासोबत सादर करण्यात येत आहेत. तसेच यवतमाळ वनवृत्ताकडील वरीलप्रमाणे अद्यावत माहीती अद्याप अप्राप्त असल्याने यवतमाळ वनवृत्तांची माहीती वगळुन उर्वरित वनविभागांची संकलीत माहिती सादर करण्यात येत आहे. त्याचे प्रमाणे काही वनविभागांकडे स्वीय प्रपंजीखाते उघडण्याबाबत अद्यापही शासन मंजूरी मिळलेली नसल्याने तेंदु रॉयल्टी वन ठेव म्हणून जमा करण्यात येते आणि त्यामधून तेंदु बोनस वितरीत करण्यात येतो आणि उर्वरित शिल्लक वन महसूल म्हणुन जमा करण्यात येत आहे. |

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| 2.1.12 | **सर्वोत्तम उपक्रम**<br>गडचिरोली वन मंडळ येथे क्षेत्रीय पाहणीत (जानेवारी 2015) असे आढळले की मंडळ कार्यालयाने आदिवासी समाजाचे वन साधन संपत्तीवर अवलंबन घटविणे,पर्यायी रोजगार संधी निर्माण करणे आणि पर्यावरणाचे संरक्षण करणे यासाठी पुढाकार घेऊन अनेक उपक्रम राबविले. या उपक्रमांत आदिवासी समाजाद्वारे उदबत्ती निर्मिती व विक्री,व्यवसाय प्रशिक्षण,ऊर्जा संवर्धन कामे (सौर दिवे) धूररहित चुल्हे इत्यादी समाविष्ट आहे.<br>तसेच, गस्तीस जास्त प्रभावशील करण्यासाठी महाराष्ट्र वन विभागाने 6,415 वैयक्तिक डिजीटल सहाय्यक (Personal Digital Assitance-PDA) उपकरणे खरेदी केली आणि ती वनपालांना दिली ज्यामुळे झाड पाडणे,शिकार करणे,अतिक्रमण,आगीच्या घटना,चोरी इत्यादी वन अपराध घडल्याचे आढळल्यास ते लगेच ई-मेल आणि संदेशाव्दारे उच्च अधिकाऱ्यांस कळविणे त्यांना शक्य होईल. डिसेंबर 2015 पर्यंत सुमारे 6,800 अपराध वैयक्तिक डिजीटल | | भारतीय संविधानाच्या 5 व्या सुचिमध्ये नमुद केल्यानुसार राज्य अनुसुचित जमातीच्या कल्याण व विकासासंबंधी बाबीवर योग्य दिशेने प्रयत्न करण्याबाबत कटिबध्द राहील या दृष्टीने गडचिरोली वनवृत्ताद्वारे जिल्हा प्रशासनाच्या निधीतुन या भागातील नागरीकांना गौण वन उत्पादनावर आधारीत संकलन प्रक्रीया व विक्री याद्वारे उपजिविकेचे साधन उपलब्ध करुन देण्याकरीता विविध प्रकल्प राबविण्यात येत आहेत.<br>गडचिरोली जिल्हा हा देखील घनदाट उष्ण कटीबंधीय पानझडी वनाकरीता प्रसिध्द आहे. ज्याच्या एकुण क्षेत्रफळाच्या 76% भाग वनांनी आच्छादलेला आहे. या सोबतच या जिल्हयात आदिवासी जमातीचे प्राबल्य दिसुन येते. गडचिरोली जिल्ह्यातील जवळपास 40% लोकसंख्या आदिवासींची आहे. प्रामुख्याने गोंड आणि माडीया समाजाच्या आदिवासींच्या अद्वितीय संस्कृतीचा समावेश होतो.<br>तसेच गडचिरोली जिल्हा नक्षलवादी चळवळीने देखील प्रभावीत झालेला असून या भागातील सामाजिक, आर्थिक, आणि औद्योगिक विकासाला प्रखरपणे विरोध करणे व नक्षलवादास चालना देवून त्याचे बळकटीकरण करणे हा या चळवळीचा हेतू आहे. यामुळे गडचिरोली जिल्हा १९८२ च्या विभाजनापासून आतापर्यंत सामाजिक, आर्थिक आणि औद्योगीक विकास व आदिवासींच्या कल्याणाच्या बाबतीत अपेक्षित ध्येये अद्यापही गाठू शकला नाही. याचा परिणाम म्हणून सन २०११ च्या राज्य मानव विकास निर्देशांक अहवालात गडचिरोली दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात कमी विकास होत असलेला जिल्हा ठरलेला आहे.<br>अशा प्रतिकूल परिस्थितीत या जिल्हयातील लोकांना उपजिवीकेचे साधन उपलब्ध करुन देणारे प्रकल्प हाती घेण्याची आवश्यकता होती. ज्यामुळे त्यांना शाश्वत उत्पन्न देणारा रोजगार मिळेल व येथील लोकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होईल तसेच या जिल्हयाच्या मानव विकास निर्देशांकात सुधारणा होईल.<br>या प्रकल्पाविषयी अधिक माहिती व त्याचा या भागातील अनुसूचित जमातीवर व स्थानिक |

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | सहाय्यक वर नोंदवण्यात आले आणि उच्च अधिकाऱ्यांस कळविण्यात आले. | | लोकांवर झालेला परिणाम खालीलप्रमाणे आहे.<br><br>१. <u>गडचिरोली अगरबत्ती प्रकल्प</u> — भारत हा वैविध्यपूर्ण संस्कृती असलेला देश असून विविध धर्माच्या लोकांचे सहअस्तीत्व येथे आढळते. त्यामुळेच देवीदेवतांच्या प्रार्थना व पूजेकरीता येथील मंदीरात व घरगुती वापराकरीता अगरबत्तीची मागणी विपुल प्रमाणात आहे. अतिशय सुलभतेने मिळणारा कच्चा माल आणि या क्षेत्रामधील विकासाच्या मोठ्या संधीचा फायदा घेवून गडचिरोली अगरबत्ती प्रकल्पाची संकल्पना साकारली गेली.<br>२. सदर प्रकल्पाकरीता एकात्मिक कृती आराखडा व मानव विकास मिशन द्वारे निधी उपलब्ध केलेला आहे. या भागातील विशेषत: दुर्गम नक्षलग्रस्त क्षेत्रामधील महिलांना गौण वन उत्पादनावर आधारीत शाश्वत रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने गडचिरोली अगरबत्ती प्रकल्पाची सुरुवात करण्यात आली. (बांबू हे गौण वन उत्पादन असून जिल्हयात विपुल प्रमाणात उपलब्ध आहे.)<br>➢ जिल्ह्यात ४६ ठिकाणी गडचिरोली अगरबत्ती प्रकल्प व ३ ठिकाणी बांबूपासून अगरबत्ती काडया तयार करण्याचे प्रकल्प आहेत.<br>➢ महिलांच्या बळकटीकरणाच्या उद्देशाने सदर प्रकल्पामध्ये महिला तथा स्वयंसेवी बचत गटांना प्राधान्य दिले जाते.<br>➢ याव्दारे जवळपास १००० महिलांना वेगवेगळ्या केंद्रावर रोजगार प्राप्त झाला आहे.<br>➢ ढोबळमानाने प्रत्येक महिलेला ५०,०००/- ते ७०,०००/- वार्षिक उत्पन्न मिळते. यामुळे त्यांचे व त्यांच्या कुटुंबियांचे जीवन राहणीमान उंचावले आहे.<br>➢ गडचिरोली अगरबत्ती प्रकल्प मागील ५ वर्षापासून यशस्वीरित्या सुरु आहे. |

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

अ) गडचिरोली वनवृत्तातील एकूण अगरबत्ती केंद्राची माहिती.

| अ. क्र. | विभाग | एकूण अगरबत्ती केंद्र | अगरबत्ती काडया तयार करणारे केंद्र |
|---|---|---|---|
| १ | आलापल्ली | ९ | २ |
| २ | वडसा | ७ | १ |
| ३ | गडचिरोली | १० | - |
| ४ | भामरागड | १० | - |
| ५ | सिरोंचा | १० | - |
| | एकूण | ४६ | ३ |

उपरोक्त अगरबत्ती प्रकल्प हे शासन निर्णय क्रमांक संकीर्ण /2017/प्र.क्र.203/फ-9 दिनांक 8 फेब्रुवारी 2018अन्वये प्रशासनिक नियंत्रण व जबाबदारीसाठी संचालक महाराष्ट्र बांबु विकास मंडळ यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.

2. गोंडवाना हर्बल प्रकल्प:- हर्बल उत्पादन व आयुर्वेदिक औषधी उत्पादने असे एकुण 65 उत्पादन हे गोंडवाना हर्बल प्रकल्प गडचिरोली येथे तयार करण्यात येतात. कच्चा माल ग्रामस्थ व संयुक्त वन व्यवस्थापन बिजा ग्लास, मोहा जाम, मोहा शरबत इ. हर्बल उत्पादन ॲमेझान पोर्टल वा विक्री करण्यासाठी गडचिरोली येथे जनधन वनधन दुकान माहे जुन 2018 मध्ये उघडण्यात आले आहे. त्यांचे परिणाम उत्साह वर्धक आहे.

3. व्यवसायिक शिक्षण - युवकाना कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने नुकतीच कौशल्य विकास कार्यक्रमाची सुरुवात केली आहे. या दृष्टीकोनातुन गडचिरोली वनवृत्ताव्दारे येथील अकुशल सुशिक्षीत आदिवासी युवकांना जे रोजगाराच्या प्रतिक्षेत आहेत त्यांना हॉटेल व्यवस्थापनाचे प्रशिक्षण बांधकामाचे आणि मोटार दुरुस्ती व्यवसायाचे प्रशिक्षण औरंगाबाद येथे देण्यात आले. यामुळे येथील बेरोजगार युवकांना/युवतींना रोजगाराची नवीन द्वारे उघडली गेली व सध्या सदर प्रशिक्षणार्थी नामांकीत पंचतारांकीत हॉटेल्समध्ये तसेच कारखान्यात नोकरी करीत आहेत.

4. शिल्पग्राम प्रशिक्षण केंद्र गडचिरोली:- गडचिरोली येथे उभारण्यात आलेल्या शिल्पग्राम प्रकल्पात100 स्थानिक आदिवासी युवक युवतीनां 3 महिन्यांचे प्रशिक्षण 4 सत्रात प्रति सत्र 25 प्रशिक्षणार्थी प्रमाणे बांबु धातू इत्यादीपासून वस्तु तयार करावयाचे हस्तकला प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. त्यांना गडचिरोली कला केंद्रामार्फत रोजगार उपलब्ध करुन देण्यात तसेच त्यांच्या कलाकृती विक्री करण्यास मदत होणारआहे.

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | **5. उर्जा संवर्धन कामे:-** सध्या वाढत्या औद्योगिकीकरणामुळे हरीतगृह वायुच्या उत्सर्जनात वाढ झाल्याने जागतिक तापमान वाढीचे संकट जगावर ओढवले आहे. गडचिरोली वनवृत्ताकडुन संयुक्त वन व्यवस्थापन समितीव्दारे सौरदिवे वितरित करण्यात आलेले आहेत. गडचिरोली वनवृत्तद्वारे आतापर्यंत 6510सौर दिव्याचे वितरण केलेले आहे.<br>**6. निर्धुर चुली:-** आदिवासी लोक स्वयंपाक घरात पांरपारीक पध्दतीच्यां चुलींचाच वापर करतात ज्यामध्ये जळाऊ लाकडांचा जास्त प्रमाणात वापर होत असतो.<br>या अनुषंगाने गडचिरोली वनवृत्ताकडुन जिल्हयातील पारंपारिक चुलीचा वापर करणा-या कुंटूबांना जळाऊ लाकडाऐवजी **Pallets** वापर करुन पेटणा-या निर्धुर चुल वितरित करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे केवळ पर्यावरणाचाच बचाव होणार नाही तर पारंपरिक पध्दतीच्या चुलीचा वापर करणा-या व्यक्तीच्या डोळयांना होणारा संसर्ग व त्यामुळे निर्माण होणारा आंधळेपणाला देखील आळा घालता येईल.<br>गडचिरोली वनवृत्ताद्वारे आतापर्यंत 122700 निर्धुर चुलीचे वितरण केले आहे. |

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
| --- | --- | --- | --- |
| १ | २ | ३ | ४ |
| 2.1.13 | **निष्कर्षः-**<br>राज्य वन धोरणाची २००६ पासून अंमलबजावणी,विविध समिती/मंडळ यांचे गठन आणि वर्ष २०१०-११ पासून सुमारे रू.४,८९३ कोटी खर्च केल्यानंतरही राज्यातील वन व्याप्ति मागील आठ वर्षाच्या कालावधीपासून १६.४५ टक्क्यांवरच अवरूध्द झाली आहे. "झुडपी जंगल" आणि खाजगी वन जमिनींचे मोठे प्रमाण राखीव/संरक्षित प्रवर्गात सामिल करण्यात आले नाही. परिणामी,राज्य वन विभागाद्वारे या जमिनीवर कोणतेही वन व्यवस्थापन, विकास आणि संवर्धन कार्ये करण्यात येऊ शकली नाहीत. राज्य शासनाद्वारे खारफुटीची अधिसूचना काढण्यात सुध्दा विलंब झाला आहे. वनांच्या व्यवस्थापनेसाठी दीर्घावधी योजना नव्हत्या कारण राज्यातील ५१ पैकी १५ विभागांत, ज्यांचे कार्य नियोजन १९८९-९० ते २०१३-१४ दरम्यान संपुष्टात आले आहे. तेथे एकतर जुनेच कार्य नियोजन अवलंबविण्यात येत होते अथवा कोणतेच कार्य नियोजन नव्हते. वर्ष २०१०-१५ दरम्यान राज्य वन विभागाव्दारे मागणी करण्यात आलेला निधी आणि राज्य शासनाने दिलेला निधी यात खूप जास्त म्हणजेच ५१ टक्के अंतर होते.राष्ट्रीय वन आयोगाने २००६ मध्ये शिफारस केलेल्या कमीत कमी २.५ टक्के तरतुदीच्या विरूध्द राज्यातील वन क्षेत्रावरील तरतुद २०१०-१५ दरम्यान एकुण योजना खर्चाच्या फक्त एक टक्का होती.वन विकास कराचा विभागास देण्यात आलेला वाटणी भाग अत्यंत कमी होता.जो | | राज्य योजनेअंतर्गत अर्थसंकल्पात वन विभागाच्या निधीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. सन 2018-19 या आर्थिक वर्षात राज्ययोजनेच्या अर्थसंकल्पात 2.83 % वनविभागाचा वाटा आहे.<br>• झुडपी जंगलाबाबत अधिसुचना ○:-<br>भारतीय वनसर्वेक्षणच्या 2017 च्या अहवालानुसार 92116.77 हे. झुडपी जंगल क्षेत्रापैकी 83304.673 हे क्षेत्र दिनांक 1/2/2019 पर्यंतअधिसुचित करण्यात आलेले आहे. आणि 4251.07 झुडपी जंगल क्षेत्राच्या अधिसुचनेबाबत कार्यवाही शासनस्तरावर प्रलंबित आहे. या अनुषंगाने (82304.673+4251.07) असे एकुण 86285.743 हे झूडपी जंगल क्षेत्र मार्च 2019 पर्यंत अधिसुचित करण्यात येईल. यापैकी 5560.397 हे. झुडपी जंगल क्षेत्र अधिसुचित करण्याबाबत संबंधीत वनविभागाचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे.<br>• फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडियाव्दारे सन 2017 मध्ये प्रकाशित इंडिया स्टेट फॉरेस्ट रिर्पोटनुसार सध्या 304 वर्ग कि.मि. कादंळवन क्षेत्र आहे त्यापैकी 15087.67 हे. भारतीय वन अधिनियम 1927च्या कलम 4 नुसार अधिसुचित करण्यात येत आहे.खाजगी वनक्षेत्रावरील कांदळवन क्षेत्र 13285.22 हे. पैकी 1774.84 हे क्षेत्रास वनक्षेत्र म्हणुन अधिसुचित करण्यात आले आहे.<br>• पाणथळ क्षेत्रः- सन 2015चा राज्य वन अहवालानुसार 1548 चौ कि.मि. होते. त्यात 432 चौ कि.मि. ची वाढ झाल्याचे मागिल अहवालानुसार दिसुन येते. वनक्षेत्रातील जलसंवर्धनाचे कामामुळे वनक्षेत्रातील पाणथळ क्षेत्रात वाढ |

| परि.क्र. | विषय | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | राज्यातील वन विकास कार्यास सहाय्यभूत ठरेल असे निधीचे अतिरिक्त वर्धनक्षम स्त्रोत नव्हता.निवडलेल्या १३ पेकी १० विभागांत कार्य नियोजनात निश्चित केलेले भौतिक लक्ष्य साध्य करण्यात २८ ते ८४ टक्के तूट होती. बहुधा सर्व कामे परस्पर आधारित आणि क्रमवार साध्य करण्याजोगी असल्यामुळे एका कामाचे लक्ष्य साधता आले नाही तर त्याचा प्रभाव कार्य नियोजनाच्या पुढील कार्याच्या अंमलबजावणीवर पडत होता.राज्याच्या राखीव निधीत जमा केलेला CAMPA निधी तदर्थ CAMPA खात्यात,जो भारत सरकारच्या पर्यावरण व वन विभागाद्वारे प्रशासित होतो.त्यात हस्तांतरित करण्यात आला नाही आणि उपभोगी संस्था व इतर विभागांकडून वन जमिनीचा वापर वनेतर प्रयोजनासाठी करण्याच्या बदल्यात त्यांचेकडून निव्वळ विदयमान मुल्य वसूल करण्यात आले नाही. कार्य नियोजनात विहित केलेल्या लक्ष्यानुसार बांबू कूपांची कापणी करण्यात आली नाही ज्यामुळे महसूल वसुलीत भरभक्कम तूट झाली. विभागाचे संनियंत्रण,मूल्यांकन आणि आंतरिक नियंत्रण कमकुवत होते. | | झाल्याची प्रामुख्याने दिसुन येथे.<br>• कार्य आयोजना:- आजमितीस 51 वनविभागापैकी 38 वनविभागाचे कार्यआयोजना मंजुर असुन 7 कार्यआयोजनाचे प्रस्ताव केंद्र शासनाचे मंजुरीसाठी प्रलंबित आहे. फक्त 6 कार्यआयोजनाचे प्रस्ताव प्रगती प्रथावर असुन प्रथम टप्प्याचे मंजुरीसाठी स्थायी समितीसमोर मार्च/2019 मध्ये ठेवण्यात येतील.<br>• वनविभागाच्या विकास कामाकरीता अनुदानाची कमतरता भासत नाही. |

(शशिकांत भिसे),
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

**साक्ष :**

**परिच्छेद क्रमांक २.१.९ CAMPA निधीचे व्यवस्थापन—**

**परिच्छेद क्रमांक २.१.९.१ CAMPA निधीतून अग्राह्य खर्च—**

२.१ उक्त परिच्छेदाबाबत अधिक माहिती घेण्याच्या दृष्टीने समितीने दिनांक ५ व १२ फेब्रुवारी, २०१९ रोजी महसूल व वन (वन) विभागाचे प्रधान सचिव व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी उक्त परिच्छेदाबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी नमूद केले की, कॅम्पाबद्दल महालेखाकारांचा आक्षेप असा होता की, राष्ट्रीय सल्लागार परिषद (एनसीएची कमिटी) राष्ट्रीय स्तरावर असते. त्यांनी कॅम्पामधून पायाभूत सुविधांची कामे हाती घेण्यात येऊ नये असे म्हटलेले आहे. तरीदेखील कॅम्पामधून १९.१५ कोटी रुपयांचे बांधकाम घेण्यात आलेले आहे, असा आक्षेप होता. याबाबत सन २००९ च्या कॅम्पाच्या ज्या मार्गदर्शक सूचना आहेत, त्यामध्ये स्पष्टपणे असा उल्लेख केलेला आहे की, पायाभूत सुविधांची कामे घेता येतील. २००९ च्या ज्या मार्गदर्शक सूचना आहेत त्याला माननीय सर्वोच्च न्यायालयाने याची तपासणी केलेली आहे. त्यानंतर महालेखापालांच्या अहवालात जे निरीक्षण केलेले आहे तेही तितकेच बरोबर आहे. राष्ट्रीय सल्लागार परिषदने (एनसीएने) दिनांक २४ जून २०१० रोजी बैठक घेतली होती. त्यातील इतिवृत्तामध्ये एक वाक्य असे आलेले आहे की, पायाभूत सुविधांची कामे स्टेट हेड क्वॉर्टरची घेण्यात येऊ नये. जर घ्यायची असतील तर ती आरएफओ (वन परिक्षेत्र अधिकारी) ॲण्ड बिलो अशा स्तरावरील जे अधिकारी असतील त्यांचे ऑफिसेस आणि क्वॉटर्ससाठी घेण्यात यावीत. तरीदेखील पुणे येथील वन भवन, सीसीएफ (मुख्य वन संरक्षक) आणि इतर कार्यालये एकाच ठिकाणी येण्याची आवश्यकता होती म्हणून त्या ठिकाणी १६.५० कोटी रुपये कॅम्पाचे प्रिन्सीपल रक्कम वापरून विभागाने ती कामे घेतलेली आहेत. हे कामे घेण्यामध्ये यात कुठल्याही मार्गदर्शक तत्वाचे पालन न करणे असा उद्देश नव्हता. याची मार्गदर्शक सूचनांमध्ये तरतूद होती. राष्ट्रीय सल्लागार परिषदची (एनसीएची) बैठक झाली होती. त्या इतिवृत्तानंतर मार्गदर्शक सूचनांमध्ये बदल होणे अपेक्षित होते, परंतु ते काही बदल झाले नव्हते. त्यानंतर कामाची आवश्यकता या सर्व गोष्टी ध्यानात घेऊन ही सर्व कामे केलेली आहेत. यावर यामध्ये सर्वात महत्वाचा मुद्दा विभागाने विसरू नये असे महालेखाकारांचे मत आहे, व समितीचेही मत आहे. ॲक्टमध्ये फार स्पेसिफिक असेल की विभागाला पायाभूत सुविधांसाठी पैसे वापरताच येत नाहीत. कॅम्पाचा ॲक्ट विभागाने कोठेतरी डायव्हर्ट केला असल्याचे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये कॅम्पाचा पूर्वी ॲक्ट नव्हता. हा ॲक्ट अलिकडेच झालेला आहे. त्याचे नियम सुद्धा आलेले आहेत. त्याच्यापूर्वी अडॉप्ट कॅम्पाच्या मागदर्शक सूचना होत्या. मुळतः या कॅम्पामध्ये फॉरेस्ट कन्झर्व्हेशन ॲक्टखाली विभाग वनेतर (नॉन फॉरेस्ट) उद्देशासाठी जमीन वापरतो, त्यासाठी संबंधित संपादित संस्थाकडून जो निधी घेतो, तो या कॅम्पामध्ये जातो. त्यातून विभाग दोन प्रकारची कामे घेतो. विभाग पर्यायी वनीकरण त्यामध्ये घेतो. दुसरे एनपीव्ही अकाऊंट आहे. एनपीव्ही रकमेमधून इतर कामे घेण्यात येतात. ॲक्ट हा अलिकडे आलेला आहे. नवीन झालेला आहे. सन २०१४-२०१५ मध्ये मार्गदर्शक सूचना विभागाकडे होत्या. त्याच्या आधारेच ही सर्व कामे होत होती. मार्गदर्शक सूचनांमधील तरतुदीनुसार ॲक्टीव्हिटी पर्मीशिबल आहे. राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या (एनसीएच्या) एका मिनीटस्‌मध्ये त्यावेळी ऑब्जर्व्हेशन होते की, खर्च हा पायाभूत सुविधांवर करण्यात येऊ नये. करायचा असेल तर तो आरएफओ (वन परिक्षेत्र अधिकारी) आणि त्याच्या कनिष्ठ स्तरावरील जे अधिकारी, कर्मचारी असतील त्यांच्यासाठी करण्यात यावा. मागदर्शक सूचनांमध्ये हे होते आणि याला सुप्रीम कोर्टाने वेटिंग केलेले होते, त्यानुसार हे केलेले आहे. सन २०१६ मध्ये कॅम्पचा कायदा आलेला आहे. त्यापूर्वी या मार्गदर्शक सूचनांना सुप्रीम कोर्टाने स्वतः मान्यता दिली होती. विभागाचे नवीन नियम हे सन २०१८ पर्यंत कार्यान्वित झालेले आहेत. त्यापूर्वी विभाग मार्गदर्शक सूचना वापरत होता. राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या (एनसीएच्या) बैठकीमध्ये त्यावेळी अध्यक्षांनी तशा सूचना केल्या होत्या. त्यामध्ये पायाभूत सुविधा निर्माण करू नये, असा उल्लेख होता. फक्त कनिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांसाठी हा निधी खर्च करावा. जे इंटरेस्ट कम्पोनंटमधून अशा प्रकारची इतर पायाभूत सुविधा निर्माण करू शकतो. सन २०१५ मध्ये राष्ट्रीय सल्लागार परिषदेने (एनसीएने) पुन्हा पाचवी बैठक घेतली. त्यामध्ये त्यांनी एनपीव्हीचे १५ टक्के कम्पोनंटला मान्यता दिली. ते सर्व काम इनॲडमिसेबल आहे ते करता येते. एनसीएची दुसरी बैठक होती त्यामध्ये मात्र बंदी घातली होती असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

विभागाने खर्च कधी केलेला आहे? अशी विचारणा समितीने केली असता, खर्च सन २०१५ च्या पूर्वी झालेले आहे. ते वेगवेगळया वर्षात झालेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

ज्यावेळी नियम अलाऊड नव्हते त्यावेळी झालेले आहे आणि आता अलाऊड झालेले आहे. आता १५ टक्क्यापर्यंत अलाऊड झालेले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, सन २०१५ च्या मार्गदर्शक सूचनामध्ये सिद्ध झालेले आहे.आता नवीन नियम आलेले आहेत. त्यामध्ये रेंज फॉरेस्ट ऑफिसरपर्यंत (वन परिक्षेत्र अधिकारी) हे अलाऊड केलेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

ज्यावेळी नियम नव्हते किंवा ज्यावेळी अलाऊड नव्हते त्यावेळी विभागाने डायव्हर्जन ऑफ फंड्स केलेले आहे. पायाभूत सुविधा नव्हत्या म्हणून विभागाने केलेले आहे. गरज होती. प्रायोरिटी समजली असे विभागाचे मत असल्याचे, समितीने निदर्शनास आणले असता, मार्गदर्शक सूचनांनुसार ही ॲक्टीव्हीटी घेणे परमींसीबल होते. दिनांक २४/६/२०१० रोजी एमओईएफचे मंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये ही ॲक्टीव्हीटी घेण्यात येऊ नये, असे ठरले होते. घ्यायचे असेल तर आरएफओ (वन परिक्षेत्र अधिकारी) आणि त्यांच्या बिलो जी कार्यालये आहेत. त्यांच्याच कार्यालयासाठी, निवासस्थानासाठी हे घेण्यात यावे. या बैठकीच्या आधारे मार्गदर्शक तत्वे बदलली नाहीत असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

Guidelines or minutes of the meeting, what prevails? अशी विचारणा समितीने केली असता, मार्गदर्शक सूचना आहे ज्याला सुप्रीम कोर्टाने वेटींग केलेले आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

Guidelines specifically mentions that dept have to utilize it for forestry purposes and the minutes are only clarifying that it prohibits certain things. Guidelines are specifically saying that it should be used only for development, maintenance and protection of forest and wildlife management, as per the approved APO. असे महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणले असता, Department read out the provisions of the Guidelines. Overarching Objectives and Core Principles are the guidelines issued by the MoEF for utilizing CAMPA funds. Paragraph 3 of the guidelines read as, " The State CAMPA would administer the amount received from the Adhoc CAMPA and utilize the monies collected for undertaking compensatory afforestation, assisted natural regeneration, conservation and protection of forests, infrastructure development, wildlife conservation and protection and other related activities and for matters connected therewith or incidental thereto." It is very much mentioned that infrastructure development can be taken. विभागाकडून मागदर्शक सूचनेची प्रत समितीला सादर करण्यात येईल. कोणतेही काम कॅम्पाच्या निधीतून घेताना एक प्रक्रिया आहे. त्या प्रक्रियेमध्ये विभागामार्फत त्याचा एपीओ बनविण्यात येतो. विभाग वार्षिक आराखडा तयार करतो. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्टेअरिंग कमिटी आहे. त्या स्टेअरिंग कमिटीची त्याला मान्यता घेण्यात येते. त्यानंतर केंद्र सरकारकडे एमओईएफला पाठविण्यात येते आणि एमओईएफ त्याला मान्यता देते. मान्यता दिल्यानंतर पैसे रिलीज करतात. त्या वर्षीच्या एपीओमध्ये पैसे रिलीज केले जातात. त्या वर्षाच्या एपीओमध्ये मार्गदर्शक सूचनांच्या आधारे या कामाची आवश्यकता होती म्हणून हे सुंदर कार्यालय कॅम्पाच्या निधीतून पुणे येथे झालेले आहे. पुण्यामध्ये विखुरलेल्या अवस्थेमध्ये जी कार्यालये होती ती सर्व त्या ठिकाणी आलेली आहेत. विभागाने एपीओमध्ये त्याचा समावेश केलेला होता. मुख्य सचिवांची त्याला मान्यता घेतली होती असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

डायव्हर्जन ऑफ फंड ला एमओईएफची मान्यता नव्हती. विभागाने एमओईएफला पाठविले. एमओईएफने त्याला मान्यता दिली का? अशी विचारणा समितीने केली त्याचप्रमाणे महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणले की, Committee just read para 3 of the Guidelines. However, para 11 deals with utilization of the money. In that there is no mention of infrastructure at all. त्यामध्ये असे डायव्हर्जन अलाऊड नाही किंवा तसे कोठे मेन्शन नाही. पायाभूत सुविधांसाठी खर्च केलाच पाहिजे किंवा करता येऊ शकेल. मूळ प्रश्न असा आहे की, या कॅम्पाचे जी संस्था तयार केली त्यामध्ये स्पेसिफिक एम्स आहेत. विभागाला पायाभूत सुविधा तयार करायच्या असतील तर त्यासाठी वार्षिक आराखड्यामध्ये ही बाब समाविष्ट करायला पाहिजे होती. विभागाच्या बजेटमधून ते काम करावयास पाहिजे होते. विभागाने एकंदरीतच कॅम्पाचे स्पीरीट डिलीट केलेले आहे. आता ते कितीही खुलासा देत असतील तर ते संयुक्तीक नाही. याच धर्तीवर सर्व ठिकाणी काम करणे आवश्यक होते. फक्त पुण्यातच का? उद्या तर मेळघाट मध्येही करायला हरकत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाने मार्गदर्शक तत्वाच्या आधारे एपीओमध्ये या कामाचा समोवश केला. त्या वर्षी स्टेअरिंग कमिटी मुख्य सचिवांची आहे. त्यांचीही मान्यता घेतली. मान्यता घेतल्यानंतर तो एपीओ विभागाने केंद्र सरकारला सबमिट केला. त्या आधारे केंद्र शासनाने निधी सुद्धा रिलीज केला. त्यावेळी मार्गदर्शक सूचना अस्तित्वात होत्या असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

त्याचे फॉर्मेशन अफॉरेस्टेशन करण्यासाठी केलेले आहे. विभागाला जर एखादी पायाभूत सुविधा तयार करावयाची असेल तर dept. should make provision in the Budget. याला स्टेट प्लॅनमधून पैसे मिळत नव्हते का? हा खर्च झालेला आहे. विभागाने एमओईएफची नंतर परवानगी घेतली हे यापुढे होऊ नये असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीने केलेल्या सूचनांची विभागामार्फत नोंद घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी विदित केले.

**परिच्छेद क्रमांक २.१.९.२ तदर्थ CAMPA खात्यात निधी हस्तांतरीत न करणे-**

उक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना कॅम्पा फंडामध्ये निधी जमा करण्यासाठी विभागाने महालेखाकार कार्यालयाला प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यांच्या मंजुरीनंतर विभागाला लगेच हे करता येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Non transfer of reserve funds into adhoc CAMPA Account, यात काय राहिले आहे आता? अशी विचारणा समितीने केली असता, २ कोटी ८ लाख रुपये ही रक्कम आहे. तदर्थ कॅम्पा निधी निर्माण होण्याच्या अगोदर हा पैसा विभागाला एजेन्सीकडून मिळत होता. जे रिझर्व्ह नावाचे खाते असायचे त्यामध्ये हा निधी असायचा. तेथून ॲडॉप्ट कॅम्पामध्ये विभागाला शिफ्ट करायचा आहे. तो ट्रॅन्सफर करण्यासाठी महालेखाकार कार्यालयाकडून परवानगी मिळत असते. तसा प्रस्ताव विभागाने महालेखाकार यांच्या कार्यालयाकडे पाठविलेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

महालेखाकार कार्यालयाने परवानगी दिली की विभाग लगेच निधी काढणार आहे का? अशी विचारणा समितीने केली असता, परवानगी दिल्यानंतर लगेच निधी काढणार आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

**परिच्छेद क्रमांक २.१.९.३ निव्वळ विद्यमान मूल्याची वसूली न करणे—**

उक्त परिच्छेदासंबंधी माहिती देण्यात यावी असे समितीने निदेशित केले असता, यामध्ये वन जमीन, वनेत्तर प्रयोजनासाठी वळती करण्यासाठी विविध यंत्रणा यामध्ये जलसंपदा किंवा सार्वजनिक बांधकाम विभागमध्ये कोणताही प्रोजेक्ट तयार करायचा असेल तर विभागाकडे ते प्रस्ताव सादर करतात. यासाठी त्या यंत्रणेला तीन प्रकारची रक्कम भरावी लागते. जेवढी जमीन वनाखाली होती, जी वळती (डायव्र्हट) होते तेवढी जागा त्यांना द्यायला लागते. तेवढी जमीन वनेत्तर जमीन म्हणून त्यांना द्यावी लागते. दुसरे असे की, त्या जमिनीवर वृक्षारोपण करण्यासाठी जी किंमत येईल त्या वृक्षारोपणाची किंमत द्यावी लागते. जी जागा विभाग वळती (डायव्र्हट) करतो त्या जागेचे निव्वळ विद्यमान मूल्य (एनपीव्ही) द्यावे लागते. समजा ५० हेक्टर जागा गेली की तेवढी ५० हेक्टर वनेतर जमीन द्यावी लागते. या ५० हेक्टरवर जे वृक्षारोपण करावयाचे आहे त्या वृक्षारोपणाची किंमत जमा करावी लागते. तिसरी बाब म्हणजे ५० हेक्टर्स वन जमीन गेलेली आहे त्याचे निव्वळ विद्यमान मूल्य (एनपीव्ही) जमा करावे लागते. मुद्दा असा आहे की, काही विभागांनी निव्वळ विद्यमान मूल्य (एनपीव्ही) दिलेले नाही. ती वसूली करावी यासंबंधीचा हा मुद्दा आहे. ज्यावेळी लेखापरीक्षण झाले त्यावेळी ३०.३२ कोटी रुपयांची रक्कम वसूल करावयाची होती. राज्य सरकारच्या या यंत्रणा आहेत. यांच्याकडे पाठपुरावा करून विभागाने रक्कम वसुल केलेली आहे. शिल्लक वसुली १८.१९ कोटी रुपये राहिलेली आहे. विभागाचा जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेसोबत पाठपुरावा सुरू आहे. हा फरक का निघाला तर नंतर निव्वळ विद्यमान मूल्यामध्ये (एनपीव्ही) वाढ झाली. ती फरकाची रक्कम आहे. अशा पद्धतीची ही रक्कम आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

बजेट केले नाही म्हणून रक्कम विभागाकडे नाही की अन्य कारणे आहेत? महालेखाकारांच्या आणि विभागाच्या आकड्यांमध्ये थोडा फरक आहे. विभाग १८ कोटी म्हणत आहेत आणि महालेखाकारांचे म्हणणे १९ कोटी २४ लाख रुपये आहेत. For how many days it has been delayed and what are the reasons for that ? ती जमीन वळती करून घेण्याआधी पैसे घेण्याची पद्धत नाही का? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडून दोन टप्प्यामध्ये स्टेज वन आणि स्टेज टू अशी मान्यता घेण्यात येते. सुरुवातीला स्टेज वन साठी संबंधित यंत्रणा प्रस्ताव सादर करते डीसीएफकडे (उप वन संरक्षक) त्यानंतर ते सीसीएफकडे (मुख्य वन संरक्षक) पाठविले जाते. पीसीसीएफ (प्रधान मुख्य वन संरक्षक) नोडल ऑफिसरकडून राज्य शासनाकडे येते. राज्य शासन शिफारस करून केंद्र सरकारकडे पाठविते. केंद्र शासन त्याला मुलभूत मंजुरी देते. त्याला विभाग स्टेज वन म्हणतो. स्टेज वनला मान्यता देताना अटी टाकलेल्या असतात. (एनपीव्ही) निव्वळ विद्यमान मूल्य भरावे, जमीन द्यावी अशा या अटी असतात. त्याच स्टेजला त्यांना पैसे भरावे लागणार आहेत. तो कप्लायन्स केला की, मगच विभाग अंतिम मंजुरीकरीता स्टेज टु साठी याच मार्गाने प्रस्ताव सादर करणार आहे.

स्टेज वनच्या मंजुरीनंतर पैसे भरणे अपेक्षित आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

ही थकबाकी स्टेज वन नंतरची आहे की, स्टेज टू नंतरची आहे, अशी विचारणा समितीने केली असता, ही सर्व प्रकरणे जुनी आहेत, स्टेज वन ला मान्यता मिळाल्यानंतर जी रक्कम येणे आहे ती वसूल करून पुढे पाठवितो, त्यानंतर स्टेज टू मिळतो. जी प्रकरणे प्रलंबित दिसत आहेत ती २००२ ते २००६ या काळातील आहेत. काहींना स्टेज वन मिळाला होता व काहींना स्टेज टू मिळाला होता. असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

स्टेज वन झाल्यानंतर पैसे भरणे अपेक्षित आहे. नियम असा आहे की, पैसे भरल्यानंतर स्टेज टू पूर्ण होते. त्यानंतर जमीन द्यावयाची असते. जमीन दिलेली आहे परंतु पैसे भरलले नाहीत अशी किती प्रकरणे आहेत. स्टेज टू झाल्यानंतर जमीन हंस्तांतरीत करायचा असा नियमआहे

असे सचिवांनी सांगितले असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता अलिकडील काळात असे झाले नसून ही जुनी प्रकरणे आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

जुन्या प्रकरणांना नियम वेगळा होता काय ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यावेळी नियम सुव्यवास्थित झालेले नव्हते, ते बदलत गेले होते, असे विभागीय प्रतिनीधींनी सांगितले.

सुव्यवस्थित झाले नव्हते म्हणजे त्यावेळी विभाग नियम पाळत नव्हता असा त्याचा अर्थ होतो, तो मुद्दा नाही. जुन्या प्रकरणांसाठी हेच नियम होते किंवा नाही याबाबत सागण्यात यावे असे समितीने निदेशित केले असता, पूर्वी नियमाची अंमलबजावणी काटेकोरपणे होत नव्हती, असे विभागीय प्रतिनीधींनी विदित केले.

नियम होते किंवा नाही हे महत्वाचे आहे पूर्वी नियमांची अंमलबजावणी काटेकोरपणे होत नव्हती ही बाब नंतरची आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, नियम होते. असे विभागीय प्रतिनीधींनी विदित केले.

मूलभूत मंजुरी (इनप्रिन्सीपल अप्रुव्हल) झाल्यानंतर जमीन हस्तांतरीत करण्यात येत होती किंवा कामासाठी परवानगी देण्यात येत होती व पैसे नंतर दिले जात होते ? अशी विचारणा समितीने केली असता, सुप्रीम कोर्टाकडून (एनपीव्ही) निव्वळ विद्यमान मूल्य वसूल करण्याच्या ऑर्डर नंतर आल्या आहेत. त्यावेळच्या ऑर्डर नुसार स्टेज वन क्लिअर झाल्यावर लागू करावे असे होते. आधीच काही प्रकरणात स्टेज वन क्लिअर होता. त्यानंतर वसुली करण्याच्या नोटीसा काढण्यात आल्या. त्यापैकी ही प्रलंबित रक्कम आहे. यामध्ये जिल्हा परिषदांचे बहुमत आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

शासकीय प्रकल्पाअंतर्गत ४०० हेक्टर जमीन दिल्याची ही सर्व प्रकरणे आहेत. यामध्ये जलसंपदा, ग्रामविकास व ऊर्जा विभागांच्या जमिनी असतील. वन विभागाचे बुक ॲडजेस्टमेंट असते. पैशाचे व्यवहार सहसा होत असतील असे समितीला वाटत नाही. कोणी पीआयएल दाखल केली व कोर्ट मॅटर झाले तर तशी प्रकरणे वेगळी आहेत. इंटरनल बुक ॲडजेस्टमेंट करून ही प्रकरणे संपविता येत नाहीत काय ? या प्रकरणात बुक ॲडजेस्टमेंट करण्याची शक्यता आहे काय ? तसे असेल तर ते का करण्यात येत नाही ? असे मुद्दे समितीने उपस्थित केले असता, केंद्र शासनाकडील तदर्थ कॅम्पा फंडमध्ये हा निधी भरावा लागतो. दोन विभागातील ही कार्यवाही नाही त्यामुळे हा सर्व पैसा केंद्र शासनाकडील कॅम्पा फंडाकडे जातो. तेथून तो निधी प्रत्येक राज्याला वितरित होत असतो अशी ही प्रक्रिया आहे. त्यामुळे आताच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बुक ॲडजेस्टमेंट करणे अवघड आहे, असे विभागीय सचिवानी समितीस अवगत केले.

विभागाच्या अधिकाऱ्यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पूर्वी असे नियम नव्हते, हे खरे आहे काय ? पूर्वी पासून नियम तेच असावेत. स्टेज वन नंतर पैसे घ्या व नंतर स्टेज टू ला हस्तांतरीत करा. फक्त पूर्वी नियमांची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जात नव्हती. १९ कोटी रुपयांची वसुली किती दिवसात करण्यात येईल. यापुढे अशा घटना होऊ नये यासाठी काय उपाययोजना करण्यात येतील ? अशी विचारणा समितीने केली असता, ही सर्व प्रकरणे जुनी आहेत, जुन्या प्रकरणात बऱ्याच वेळा काही ॲडीशनल रक्कम म्हणजे रिव्हाईज एनपीव्ही, त्यातील गॅप राहिली मग ती वसूल करण्यात यावी. अशा पद्धतीची ही सर्व प्रकरणे आहेत. कालांतराने ही सर्व प्रक्रिया व्यवस्थित झाली. स्टेज वन नंतर स्टेज टू देण्यापूर्वी १०० टक्के कम्प्लायन्स केला जात होता. अलिकडील काळात थकबाकी नाही ही जुनी प्रकरणे आहेत. सर्व यंत्रणांना विभागामार्फत पत्र व्यवहार करण्यात आला आहे. त्यामध्ये असे नमूद केले की, विभागाचा डायव्हर्जनसाठी यापुढे कोणताही प्रस्ताव आला तर जोपर्यंत पूर्वीची थकबाकी भरली जात नाही तोपर्यंत नवीन प्रस्तावाची प्रक्रिया करण्यात येणार नाही. भविष्यात असे अजिबात होणार नाही याचे कारण असे की, पूर्वी मार्गदर्शक सूचना होत्या आता कॅम्पाचा कायदा व नियम आले आहेत. त्यामुळे हे १०० टक्के बंधनकारक आहे, त्याशिवाय पुढील प्रक्रिया विभाग करुच शकणार नाही ती काळजी घेण्यात येईल, असे विभागीय सचिवानी समितीस अवगत केले.

कॅम्पाचा कायदा केव्हा आला आहे. अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१६ मध्ये कॅम्पाचा कायदा पारीत झालेला आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले. केंद्र शासनाकडे कॅम्पानुसार पैसे जमा होतात तो निधी १०० टक्के राज्याकडे येतो काय ? हा निधी वन वाढविण्यासाठी वापरावयाचा आहे असे समितीचे मत असल्याचे समितीने सांगितले असता, पूर्वी हा सर्व निधी केंद्र शासनाच्या कॅम्पा निधीकडे जात होता, असे विभागीय सचिवानी विदित केले.

हा निधी कोठून कसा येत होता ते सविस्तर सांगण्याबाबत समितीने निदेशित केले असता, जे डायव्हर्जन होत होते त्यासाठी एजन्सी विभागास निधी देत होत्या. तो निधी केंद्र शासनाच्या तदर्थ कॅम्पा फंडमध्ये जमा होत होता. त्यानंतर प्रत्येक राज्याकडून वार्षिक प्लॅन मंजूर करून केंद्र शासनाकडे सादर करण्यात येतो. त्यानंतर आपल्या राज्याची एकूण जी रक्कम त्या फंडात जमा झाली आहे त्यापैकी १० टक्के रक्कम प्रत्येक वर्षी देण्यात येत होती. ९० टक्के रक्कम त्या फंडात महाराष्ट्र राज्याच्या नावाने जमा आहे, असे विभागीय प्रतिनीधींनी समितीस अवगत केले.

तो सर्व निधी राज्य शासनाला वापरावयास दिला जातो की, त्यामध्ये देखील थकबाकी आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, १० टक्के प्रमाणे १०० टक्के निधी राज्य शासनाला वापरावयास दिला जातो, असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

सुप्रीम कोर्टात पीआयएल कोणत्या विषयासंदर्भात सुरू आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१६ मध्ये नवीन कायदा आल्यानंतर त्यांच्याकडे जो निधी जमा आहे तो प्रत्येक राज्याला परत द्यावयाचा आहे. त्यासाठी वेगवेगळे टेक्निकल इश्यू निर्माण झाले आहेत. त्यासाठी शीर्ष निर्माण करायचा आहे. शासनामार्फत महालेखापालांकडून मंजुरी घेण्यात येणार आहे. राज्य कॅम्पा फंडाचा शीर्ष निर्माण केल्यानंतर केंद्र शासनाकडून प्रत्येक राज्याला त्यांचा निधी परत करण्यात येणार आहे. त्यासाठी ४ ते ५ महिने लागतील. त्यानंतर पुढील डायव्हर्जनची फक्त १० टक्के रक्कम केंद्र शासनाकडे जाणार आहे व ९० टक्के रक्कम राज्य शासनाच्या खात्यामध्ये राहणार आहे, असे विभागीय प्रतिनीधींनी समितीस अवगत केले.

आता ९० टक्के रक्कम राज्याकडे राहील व १० टक्के रक्कम केंद्र शासनाकडे जाईल. सुप्रीम कोर्टात पीआयएल कशा संदर्भात सुरू आहे. हा निधी राज्यांना मिळत नाही यासंदर्भात ती याचिका आहे काय ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता, आता कॅम्पा फंडातील सर्व निधी केंद्र शासनाकडे असून पूर्वी सर्व निधी केंद्र शासनाकडे जात होता, त्यापैकी १० टक्के निधी राज्य शासनाकडे येत होता व ९० टक्के निधी केंद्र शासनाकडे जमा राहत होता. नवीन कायद्यानुसार केंद्र शासनाकडील राज्याची ९० टक्के निधीची रक्कम जवळपास ३०५० कोटी रुपये आहे ती राज्य शासनाला मिळणार आहे. नवीन कायद्यानुसार पूर्वी केंद्र शासनाकडे निधी दिला जाता होता तो निधी आता राज्यातील फंडामध्ये १०० टक्के जमा होईल. त्यातील १० टक्के निधी केंद्र शासनाला देण्यात येणार आहे अशी ही नवीन व्यवस्था करण्यात आली आहे. असे विभागीय सचिवानी समितीस अवगत केले.

रु. ३०५० कोटी रुपयांची थकबाकी राज्य शासनाला कधीपर्यंत मिळणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, ही प्रक्रिया सुरू आहे, त्यामुळे त्याबाबत काही दिवस वाट पहावी लागेल, असे विभागीय सचिवानी विदित केले.

हा निधी आल्यानंतर तो वनासाठी वापरण्यात यावा. त्या रकमेतून वन विभागात पायाभूत सुविधा तयार करण्यात येऊ नये असे समितीने सूचित केले असता, यामध्ये दोन भाग असतात एक कॉम्पेसेक्टरी (संवेदी) अ फॉरेस्ट स्टेशन म्हणजे १०० हेक्टर जागा एका प्रकल्पासाठी गेली. १०० हेक्टर वनेत्तर जमीन द्यावयाची आहे व त्यावर वृक्षारोपण करायचे आहे. वृक्षारोपणाची रक्कम वेगळया पद्धतीने देण्यात येते ती १०० टक्के रक्कम वृक्षारोपणासाठी वापरावयाची आहे. दुसरा भाग (एनपीव्ही) निव्वळ विद्यमान मूल्य आहे. यामधून वन व्यवस्थापन व वन विभागांना सहाय्य करण्याची कामे यामधून घ्यावयाची आहेत. यामध्ये वाहने, प्रशिक्षण, पायाभूत सुविधा तयार करावयाचे असेल, वन नाके तयार करावयाचे असेल, प्रोटेक्शन मेजर घ्यावयाचे असेल, अशी इतर कामे (एनपीव्ही) निव्वळ विद्यमान मूल्य रकमेतून करावयाची आहेत. No compromise in compensatory afforestation. ते १०० टक्के वृक्षारोपणासाठी करावेच लागणार आहे. (एनपीव्ही) निव्वळ विद्यमान मूल्य मार्गदर्शक सूचनांनुसार जे परमिशिबल आहे ते त्यातून घ्यावे लागणार आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

(एनपीव्ही) निव्वळ विद्यमान मूल्य खूप जास्त असते. जलसंपदा विभागाचे अनुशेषातील सर्व प्रकल्प अनफिजिबल होत आहेत. अडचण अशी आहे की, त्यांचे काही नॉम्स् आहेत. एक हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी किती निधी खर्च केला पाहिजे. (एनपीव्ही) निव्वळ विद्यमान मूल्य जास्त झाल्यामुळे सदर प्रकल्प अनफिजिबल होतो. त्यामुळे विदर्भातील अनुशेष तसाच शिल्लक राहतो. दुर्दैवाने सर्व वन विदर्भात आहे. कोणताही प्रकल्प घ्यावयाचा असला तर वनाची अडचण निर्माण होते. ती अडचण सोडविली तर (एनपीव्ही) निव्वळ विद्यमान मूल्य जास्त होते ती रक्कम त्यामध्ये ॲड झाली तर तो प्रकल्प अनफिजिबल होतो. त्यामुळे वित्त विभाग तो प्रकल्प नाकारतो. ही सायकल अशीच सुरू राहते. असे समितीने निदर्शनास आणले असता, हे निकष केंद्र शासनाने ठरविलेले आहेत. त्यामध्ये जमीन, वृक्षारोपणाची रक्कम व निव्वळ विद्यमान मूल्य (एनपीव्ही) द्यावे लागेल असे विभागीय सचिवानी विदित केले.

वृक्षारोपणाची रक्कम कोण देईल ? अशी विचारणा समितीने केली असता, ज्यांच्यासाठी ही जमीन वळती करण्यात येते त्या यंत्रणेने या तिन्ही बाबींची रक्कम द्यावयाची असते. यामध्ये निव्वळ विद्यमान मूल्य (एनपीव्ही) तुलनात्मक फार कमी आहे. सहा लाखापासून ते दहा लाख प्रति हेक्टर अशी सरासरी त्या त्या अवस्थेनुसार असते. याचा हेतू असा असतो की, इतकी वन विभागाची जमीन जाणार आहे, पुन्हा ती जमीन मिळणार नाही असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

एनपीव्हीचा हेतू काय आहे ? तसेच निव्वळ विद्यमान मूल्य त्यासाठीच आहे, वृक्षारोपणाची रक्कम वेगळी आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, वन संरक्षण संबंधी ज्या सहाय्य करणाऱ्या बाबी पाहिजे त्यामध्ये तो खर्च करावयाचा आहे. पैसे भरताना या तिन्ही बाबींसाठी वेगवेगळे पैसे भरावयाचे आहेत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

१८ कोटी रुपये वसूल व्हायचे बाकी आहेत त्यासंदर्भातील अद्ययावत स्थिती काय आहे, अशी विचारणा समितीने केली असता, सुरुवातीला एकूण ३० कोटी २० लक्ष रुपये होते. आता ही रक्कम १८ कोटी पर्यंत आली आहे. सर्व विभागांशी पत्रव्यवहार करून कळविले की, ही रक्कम भरावी अन्यथा वन विभागामार्फत पुढील प्रकल्पाची प्रक्रिया करण्यात येणार नाही असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

**परिच्छेद क्रमांक २.१.१० महसूलाची हानी—**

**परिच्छेद क्रमांक २.१.१०.१ बांबूचे समुपयोजन न केल्यामुळे हानी—**

सन २०१४ पासून नवीन नियम आलेला आहे, विभागाचा अहवाल सन २०१० ते २०१४ मधील आहे. या कालखंडात समायोजन न केल्यामुळे हानी झाली असा महालेखाकारांचा आक्षेप आहे. विभागाने असे कारण दिले आहे की, सन २०१४ पासून तेथील रहिवाशांना बांबूबाबत सर्व अधिकार देण्यात आले आहेत. बांबू संवर्धनात मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष झाले, तूट निर्माण झाली त्यामुळे राजस्वाची हानी झाली असा महालेखापालांचा आक्षेप आहे. त्याबाबत धोरण काय होते व न करण्याची कारणे काय आहेत ? सन २०१० ते २०१४ या कालावधीबाबत सांगावे असे समितीने निदेशित केले असता, सन २०१० ते २०१४ या कालावधीत चंद्रपूर व गडचिरोली येथे बांबू जास्त होते. गडचिरोली परिसराची विभागणी ए.बी.सी अशा विभागात करण्यात आली आहे. असे तीन पार्ट तयार केले आहेत. बांबूची सायकल ही तीन वर्षांची असते. त्यानुसार बांबूची तोड करण्यात येते. विभागाने जे अंदाजपत्रक (इस्टीमेट) तयार केले त्यापेक्षा कमी तोड झाली आहे. त्यामुळे महसूल कमी झाला आहे. त्याचे मुख्य कारण असे आहे की, गडचिरोली जिल्ह्यात अनेक वर्षांपासून नक्षलवादी यांचा प्रभाव वाढलेला आहे. बांबूची वने दाट असल्यामुळे त्यामध्ये लपण्यासाठी त्यांना जागा तयार होते. त्यामुळे बांबू तोडण्यासाठी त्या लोकांचा विरोध असतो. त्यामुळे त्या भागात मागील दहा वर्षांपासून बांबूची तोड होत नाही. विभागाने अंदाजपत्रक तयार केले तरी प्रत्यक्षात तोड खूप कमी प्रमाणात झाली आहे. सन २०१२ ते २०१४ मध्ये सहा रेंज अधिकाऱ्यांवर नक्षलवाद्यांनी हल्ला केला. तेथील कार्यालये तोडण्यात आली. दोन वाहने जाळण्यात आली. सहा प्रकरणांमध्ये त्यांनी विभागाच्या अधिकारी/कर्मचारी यांवर हल्ला केला आहे. मागच्या आठवड्यात घोटमध्ये त्यांनी डेपो जाळला आहे. त्यामध्ये दोन कोटी रुपयांचे टिंबर व वनसंपदा जळालेली आहे. या कारणांमुळे फिल्डवर काम करणे फार अडचणीचे होत आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

गडचिरोलीचे समितीस ज्ञात आहे. चंद्रपूरमध्ये काय परिस्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०११-२०१२ व सन २०१२-१३ मध्ये चंद्रपूरमध्ये अंदाजपत्रकानुसार ७ कोटी ९९९ लक्ष रुपये अपेक्षित होते असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

अंदाजे ६० टक्के लक्ष्य साध्य करण्यात आले आहे. चंद्रपूरमध्ये नक्षलवाद नसल्यामुळे तेथे जास्त काम होणे अपेक्षित आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, चंद्रपूरमध्ये आवश्यक ती कामे झाली आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

वन विभाग उद्दिष्ट ठरवित आहे. त्यानुसार बंडलचे उत्पादन ७५ टक्के झाले. प्रत्यक्ष उत्पादन ६० टक्के झाले. ६ बांबू कॅम्पमध्ये उत्पन्न कमी झाले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, त्या ठिकाणी बांबू कमी असल्यामुळे उत्पन्न कमी झाले आहे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

वन विभाग जे उद्दिष्ट ठरविते त्यानुसार ते साध्य झालेले नाही. तेथे सामाजिक अशी कोणतीही अडचण नव्हती. विभागाचे नियोजन चुकत आहे असे विभागाला वाटत नाही काय ? २०१४ चे नियम चंद्रपूर येथे लागू असतील अशी विचारणा समितीने केली असता, त्यास विभागीय प्रतिनिधींनी सहमती दर्शवून चंद्रपूरमध्ये पेसा परिसर खूप कमी आहे. गडचिरोलीमध्ये ८० टक्के परिसर पेसाचा आहे इतर ठिकाणी विभाग काम करीत असतो असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

वन विभागामध्ये कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे ती कधी भरण्यात येणार आहे. ८९० फॉरेस्टर कमी आहेत, त्यामुळे कामाचे रिझल्ट विभागाला कसे काय मिळतील ? अशी विचारणा समितीने केली असता, रिक्त जागांबाबत गंभीरतेने विचार करण्याची गरज आहे. फिल्डवरील पदे रिक्त झाल्यानंतर त्यांची भरण्याची प्रक्रिया सुरू होते. शासनाची मंजुरी घेणे नंतर भरती करणे, भरती झाल्यावर त्यांना प्रशिक्षणासाठी पाठविणे यासाठी जवळपास तीन वर्षांचा कालावधी लागतो, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

विभाग सांगतो की, ९० टक्के कर्मचारी विभागाकडे आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, फॉरेस्ट बीट गार्ड आहेत, प्रत्येक बीटमध्ये एक बीटगार्ड असतो. दोन बीटगार्ड खाली राहिले तर त्या दोन बीटमध्ये कोणताही कर्मचारी नसतो. त्यामुळे वन विभागाची १०० टक्के पदे भरणे आवश्यक असतात. भरतीची समस्या आता संपणार आहे, आता मेगा भरतीमध्ये १०० टक्के पदे भरण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे. रिक्त पदे लवकरात लवकर भरण्यात येतील, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

भरती केल्याशिवाय विभागाला रिझल्ट मिळणार नाही. बिल्टचा काय विषय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, बील्टचा विषय आता सन २०१४ पासून संपलेला आहे. पूर्वी बील्टचे लीज ॲग्रीमेंट होते आता ते संपलेले आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले. बील्टचे ॲग्रीमेंट सप्टेंबर, २०१३ मध्ये संपलेले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, आता बिल्ट बंद झाले आहे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

ते उत्पादन कमी सॉल्टेज झाले, त्यामध्ये विभागाने बिल्टला वेळेवर ऑर्डर दिली नाही आणि त्यांचे रेट देखील वेळेवर निश्चित केले नाहीत, त्यामुळेही उत्पादन कमी झाले आहे असे विभागाच्या लेखा उत्तरातच सांगितले आहे. Nothing was done on time असे मत समितीने व्यक्त केले असता, बिल्टचे लिज ॲग्रिमेंट रिन्युएबल लागले होते. त्यामुळे त्यांचे उत्पादन कमी झाले होते असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

त्यामुळे राज्याचे नुकसान झाले आहे. उत्पादनामध्ये कमी आली आहे. आपल्याला सांगण्यात आलेले नक्षलवाद हे कारण आहेच. Incompetence of the higher ranking Officers is also the reason. मात्र वेळेवर नियोजन केले नाही हेही कारण आहे. आता विभाग त्याबाबत बोलायलाच तयार नाही. विभाग अंडर स्टाफ्ड होता. मात्र वरिष्ठ अधिकारी ओव्हर स्टाफ्ड आहे. रिऑर्गनायझेशन झाले आहे. वरचा म्हणजे हेडक्वॉर्टरला राहणारे कर्मचारी जादा आहे आणि फिल्डवर राहणारे कर्मचारी कमी आहे. महालेखाकारांचा देखील हाच आक्षेप आहे की, कर्मचाऱ्यांच्या कमी नियुक्त्यांमुळे ४२ कोटी रुपये आणि १ कोटी रुपये अशी हानी अनुक्रमे वृक्षांच्या अवैध कापणीमुळे आणि आगीच्या घटनेमुळे झाली आहे. एका बाजूला वरिष्ठ अधिकारी आहेत आणि दुसऱ्या बाजूला कर्मचारी नाही. जवळपास ४२ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. अवैध वृक्ष कापणीमुळे ४२ कोटी रुपये आणि आगीमुळे काही कोटी रुपये नुकसान झाले आहे. समिती आगीबाबत समजू शकते. कारण आगीचा धोका कधीही उद्‌भवू शकतो. मात्र विभागाचे अवैध वृक्ष कापणीला नियंत्रण नाही. कापणीचे व्हॅल्युएशन देखील विभागच करतो. लाकूड ४२ कोटी रुपयांचे आहे की ११२ कोटी रुपयांचे आहे, माहीत नाही, शेवटी व्हॅल्युएशन कोण करते हाही महत्त्वाचा भाग आहे. Rs. 42 crores due to under deployment of staff and Rs. 1 crore due to illicit cutting. शेवटी इलिसिट फेलिंगचे व्हॅल्युएशन कोण करते हाही प्रश्न आहे. व्हॅल्युएशन ४२ कोटी रुपयांचे झाले किंवा ५० कोटी रुपयांचे झाले ते करणारे अधिकारीच आहेत. खाजगी जागांत इमारतींचे लाकूड आहे. खाजगीपणे कोणीही हार्वेस्टिंग करीत नाही, लावत नाहीत, काढून देत नाहीत, मात्र तसे वन विभागातून देतात No. Rs. 1.09 crore due to fire incidents and Rs. 42.65 crore due to illicit cutting of trees. ४२.६५ कोटी रुपये आणि १.०९ कोटी रुपये इतकी हानी अनुक्रमे असे दिले आहे, म्हणजे ४२.६५ कोटी रुपये वृक्षांच्या अवैध कापणीमुळे आणि आगीच्या घटनेमुळे १.०९ कोटी रुपये हानी असे आहे. विभाग अनुक्रमे म्हणत आहात म्हणजे ४२ कोटी रुपये वृक्ष कापणी व १.०९ कोटी रुपये आग यासाठी आहे, असे समितीने निदर्शनास आणून दिले असता, A.G. can clarify on this. There was loss of Rs. 42.65 crore due to under deployment of staff and Rs. 1.09 crore on account of illicit cutting of trees and fire incidents, असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

अंडरडिप्लॉयमेंटमुळे वृक्ष कापणी झाली आणि आग लागली असे विभागाचे म्हणणे आहे. त्यामुळे इलिसिट कटिंगमुळे ४२ कोटी रुपयांचे नुकसान आहे आणि आगीमुळे झालेले नुकसान १.०९ कोटी रुपयांचे आहे. महालेखाकारांच्या परिच्छेदाप्रमाणे ४२ कोटी रुपये इलिसिट कटिंग आणि १.०९ कोटी रुपये आग असे आहे. विभागाचा यापेक्षा काही वेगळे सांगायचे असेल तर सांगावे असे समितीने निदेश दिले असता, महालेखाकारांनी मान्य करावे. विभागाचे इंटरप्रिटेशन असे आहे. Illicit tree cutting and fire हा एक गट केलेला आहे व त्यामुळे नुकसान १.०९ कोटी रुपयांचे आहे, इतर लॉसेस अंडरडिप्लॉयमेंट आणि बाकी कारणांमुळे ४२.६५ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. However, this is subject to confirmation from A.G., या गोष्टींबाबत विभाग म्हणून गांभीर्याने घेतले आहे. अंडर स्टाफमुळे हे झाले आहे असे म्हणणे आहे. विभागात मागच्या वर्षी पूर्ण भरतीप्रक्रिया शंभर टक्के केली आहे आणि यावर्षी देखील मेगाभरतीमध्ये कव्हर करीत आहोत. कनिष्ठ पदे भरणे आवश्यक आहे. विभागामार्फत ती प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल विभागाचा एसपी, गडचिरोली, पोलीस विभाग, जिल्हाधिकारी यांच्याशी सतत संपर्क आहे. विशेषतः गडचिरोलीचा सधन भाग आहे, तेथे मोठ्या प्रमाणात वनसंपदा आहे, बांबू आहे. पण तेथे नक्षल कारवायांमुळे अडचणी निर्माण होतात. त्या बाबतीत पोलीस संरक्षण घेऊन जेवढे करता येईल तेवढे करण्याचा प्रयत्न निश्चितपणे करीत आहोत. राज्य शासनाने बांबूच्या बाबतीत काही नवीन धोरणे अंगिकारली आहेत. बांबू हा केवळ वन विभागापुरता मर्यादित होता. तो आता ॲग्रो फॉरेस्ट्री प्रॉडक्ट झाला आहे. बांबूवर बंधने होती, त्याला टीपी लागायची, आता बांबू टीपीमुक्त केला आहे आणि त्यानंतर केंद्र सरकारनेसुद्धा बांबू हा ग्रास आहे तो टिंबर नाही, अशी व्याख्या केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये देखील मोठ्या प्रमाणात बांबू वाढणार आहे आणि तो वाढायला सुरुवातही झाली आहे. मागच्या वर्षीचा फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडियाचा रिपोर्ट आहे, त्यानुसार अलीकडच्या काळात महाराष्ट्रातील बांबू क्षेत्र ४४६४ चौ.कि.मी.ने वाढले आहे. पण ते आणखी वाढवून बांबू क्लस्टर, बांबूसाठी बांबू बोर्ड तयार केले आहेत, बांबू रिसर्च ट्रेनिंग सेंटर तयार केले आहे. बांबू या विषयासाठी मोठ्या प्रमाणात वन विभागात प्रयत्न केले जात आहेत असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

बांबूला ग्रासमध्ये कन्व्हर्ट केल्यानंतर बांबू हा वनाच्या व्याख्येत राहतो की नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, तो आता टिंबर या व्याख्येतून गेला आहे. टिंबर असेल तर परवानगी लागते. ट्री फेलिंगची परवानगी असते असे विभागीय सचिवांनी विदित केले.

वन क्षेत्र मोजण्यात येईल तेव्हा त्यामध्ये बांबूची लागवड असलेले क्षेत्र धरणार आहात का ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यास विभागीय प्रतिनिधींनी होकारार्थी उत्तर देऊन ते बांबूची लागवड करणारे क्षेत्र त्यामध्ये धरणार आहे असे समितीस अवगत केले.

पण विभागाने कापणीची परवानगी दिली आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाने टीपी परवानगी दिली आहे म्हणजे टीपी दिली आहे. वन क्षेत्रामध्ये बांबू असेल तर त्याला टीपीची परवानगी वन विभागासाठी लागणार आहे. पण शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात बांबू लावायचा असेल तर आता कोणत्याही परवानगीची गरज राहणार नाही. शेवटचा मुद्दा फायर व इलिसिट ट्री फेलिंग संदर्भात आहे. त्याबाबतीत २-३ उपाययोजना केल्या आहेत आणि त्याचा निकालही मिळत आहे. आताच सांगितले की, अशी यंत्रणा उभी केली आहे की, जेथे इंटेलिजन्स कलेक्शनला मदत होत आहे. विभागाने मागच्या २ वर्षांपूर्वी १९२६ हा टोल फ्री क्रमांक सुरू केला आहे. कोणीही या क्रमांकावर कॉल करू शकते आणि बातमी देऊ शकते. विभाग लगेच ४८ तासांच्या आत त्यावर कार्यवाही करतो. आरोग्याचा क्रमांक १०८, पोलिसांचा क्रमांक १०० असे आहेत, तसा वन विभागाचा १९२६ हा इमर्जन्सी क्रमांक सर्व भारतभर एमओयूएफने जाहीर केला आहे, ज्याची सुरुवात पूर्वी राज्यात केली आहे. या माध्यमातून फॉरेस्ट फायर आणि इलिसिट ट्री फेलिंग यासाठी भरपूर माहिती मिळत आहे. विभाग त्यावर लगेच कार्यवाही करीत आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

त्याकरिता लाईन्स किती आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, महाराष्ट्रात यासाठी ८ डेडिकेटेड लाईन्स आहेत. विभागाने मुंबईलाच आऊटसोर्स पद्धतीने कॉल सेंटर केले आहे. कोणत्याही लॅण्डलाईन किंवा मोबाईलवरून कॉल करू शकतो. फॉरेस्ट फायर असेल किंवा काहीही असेल तरी त्याची मदत घेता येऊ शकते असे विभागीय सचिवांनी विदित केले.

कॉल सेंटर मराठी भाषेत आहेत की दुसऱ्या कोणत्या भाषेत आहेत ? त्याचप्रमाणे आतापर्यंत किती तक्रारी आल्या आहेत, त्याचा रिस्पॉन्स चांगला आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, मराठी, हिंदी व इंग्रजी अशा तीनही भाषेत आहेत व रिस्पॉन्स खूपच चांगला आहे. विभागाने अलीकडे नांदेडमध्ये मोठ्या प्रमाणात कारवाया केल्या आहेत. यामुळे इंटेलिजन्ससाठी निश्चितपणे मदत होत आहे. विभागाने नागपूरला कमांड कंट्रोल रुम तयार केली आहे. या द्वारे सर्व इंटेलिजन्स कलेक्शन केले आहे. विभाग वनाचे पाच शत्रू मानतो. त्यामध्ये फॉरेस्ट फायर आहे, इलिसिट ट्री फेलिंग आहे, वनजमिनीवरील अतिक्रमण आहे, इलिसिट ग्रेझिंग आहे आणि पोचिंग आहे. विभाग या पाच गोष्टींबाबत पूर्ण मॉनिटिंग या फॉरेस्ट कमांड कंट्रोल रुममध्ये करीत असतो. त्यामुळे भविष्यात यावर निश्चितपणे आळा घालण्यासाठी मदत होईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाने चांगला निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांना तसेच इतर माणसांनाही टीपीची गरज नाही. त्यामुळे त्यांनी स्वतःच्या जागेवर करावे. वनजमिनीमध्ये नक्षलाईटची अडचण नाही. तेथे बांबूंचे संगोपन विभागाच्या नियमम व कायदे याप्रमाणे वेळेवर झाले पाहिजे, जेणेकरून मोठ्या प्रमाणात जी हानी आढळते ती आढळणार नाही आणि बांबू उत्पादन फार कमी होत आहे, ते वाढविता येईल. विभाग बाकीच्याही गोष्टी करीत आहे. केंद्र सरकारचे आदेश आले हेही चांगले झाले आहे. त्यामुळे त्या अनुषंगाने बांबूचे उत्पादन वाढेल. विभागाने वनातील बांबूचे उत्पादन घटू नये, वनाचा उपयोग पूर्ण झाला पाहिजे आणि त्या दृष्टीने असणारा शॉर्टफॉल विशेषतः चंद्रपूर जिल्ह्यात दिसतो, तो वाढविण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी असे समितीने सूचित केले.

**परिच्छेद क्रमांक २.१.१०.२ चुकीच्या धारणा किमतीचा (upset price) अवलंब—**

उक्त परिच्छेदामध्ये वेळेवर चुकीची धारणा किंमत (अपसेट प्राईज) निश्चित केली नाही. विभाग सांगत आहे की, निर्देश दिले आहेत, आता ते वेळेवर करतील. लिलाव केला जातो. आता ई-निविदा सुरू केली आहे. लिलाव केला आहे, त्यामध्ये वेळेवर आणि योग्य अपसेट प्राईज व रेट लिस्ट निश्चित न केल्यामुळे कमी अपसेट प्राईज निश्चित करण्यात आली आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, निरीक्षणामध्ये विभागाचे थोडे वेगळे मत आहे. मुद्दा चुकीची अपसेट प्राईज या संदर्भात आहे. विभाग अपसेट प्राईज निश्चित करतो. विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मागील ३ वर्षांतील विक्रीची सरासरी घेऊन त्यानुसार अपसेट प्राईज निश्चित करण्यात येते. ई-ऑक्शन असेल किंवा कोणतेही ऑक्शन असेल तर त्यामध्ये तो रेट धरला जातो. परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, शेड्युल रेट निश्चित केले नाहीत आणि त्यामुळे अपसेट प्राईज चुकीची झाली आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

एसओआर ६-८ महिन्यांनी उशिरा झाले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, शेड्युल ऑफ रेटचा आधार अपसेट प्राईज करताना घेत नाही. मागील ३ वर्षांच्या खरेदी-विक्री व्यवहार यांचा विचार केला जातो. आपले एसओआर हे बेसिकली इतर बाबी म्हणजे चोरी

झाली किंवा काही झाले असेल तर त्यासाठी कॅल्क्युलेशनसाठी आधार घेण्यासाठी असतात. विभाग एक बाब मान्य करतो की, एसओआर नियमितपणे केला पाहिजे. मात्र त्यामध्ये गडचिरोलीकडून विलंब झाला आहे हे निश्चितपणे विभागास मान्य आहे. विभागामार्फत त्यानुसार सूचना देऊन कार्यवाही करण्याबाबत सांगण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वस्त केले.

विभागाला ही बाब मान्य आहे तर मग त्याबाबतीत काय कारवाई केली ? अशी विचारणा समितीने केली असता, एसओआर निश्चित करायचा राहिला होता, तो आता निश्चित करण्यात आला आहे. असे विभागीय सचिवांनी विदित केले.

महालेखाकारांनी दुसरा एक मुद्दा काढला आहे की, अपसेट प्राईज काढण्याची निश्चित पद्धत आहे, ती विभागाने वापरलेली नाही आणि त्यांनी लोअर साईडमध्ये अपसेट प्राईज ठरविली आहे. महालेखाकारांनी व्हेटिंग करून शेवटचे निरिक्षण सांगितले आहे. विभागाने त्या संदर्भात उत्तर दिले आहे. मात्र महालेखाकारांचे म्हणणे असे आहे की, विभागाने दिलेले जस्टिफिकेशन योग्य नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, शेड्युल ऑफ रेट असतो. मागील वर्षी जो एकूण लिलाव झाला आहे तो पाहण्यात येतो. गडचिरोली जिल्हा आणि त्यामध्ये ५ विभाग आहेत, तेथे जेवढे सेल डेपो आहेत, तेथे प्रत्येक ग्रेडवाईज माल असतो तसेच लांबी व रुंदी असा माल असतो, त्याची ॲव्हरेज प्राईज धरुन शेड्युल ऑफ रेट काढले जातात आणि त्याप्रमाणे उपयोग केला जातो. इतर विभागाची लाकडाची मागणी आली तर त्यांना ते दर लावायचे असतात, त्यासाठी शेड्युल ऑफ रेट असतो. इतर विभागांना माल पुरवायचा असतो किंवा वन विभागासाठी काही काम करायचे असते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

समितीला शेड्युल रेटच्या संदर्भातील विषय समजला आहे. समितीने अपसेट प्राईजबाबत विचारणा केली असता, शासनाच्या अपसेट प्राईजबाबत सन १९७१ च्या सूचना होत्या असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

त्या सूचनांचे पालन झाले नाही असेच महालेखाकार म्हणत आहेत, असे समितीने निदर्शनास आणले असता, त्या सूचनांचे पालन झाले असे नाही. सन २००३ मध्ये पीसी ऑफिसने अपसेट प्राईज कशी लावायची या संदर्भात मार्गदर्शक सूचना काढल्या होत्या. त्यामध्ये स्पष्ट सूचना दिली आहे की, मागील ३ वेळच्या लिलावांची सरासरी धरुन अपसेट प्राईजने लावावी. विभागाने त्या सूचनांचे पालन केले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

विभागाने त्या सूचनांचे पालन केले नाही म्हणूनच आक्षेप काढण्यात आला आहे. विभागाला मूळतः ही पद्धत पटते का, ही चांगली पद्धत आहे असे वाटते का की, मागच्या ३ वेळचे ऑक्शन प्राईजचे ॲव्हरेज काढून करण्यात येते. ३ वेळचे ऑक्शन किती कालावधीच्या अगोदरचे असते ? What is the frequency of auctions ? अशी विचारणा समितीने केली असता, नॉर्मली एका विभागात ६ वेळा लिलाव होतो. डेपोमध्ये माल असेल तर दोन महिन्यांमध्ये लिलाव जनरली होतो. ३ लिलावांचा म्हणजे करंट मार्केट ट्रेंड लक्षात घेऊन ॲव्हरेज प्राईज काढायची आहे आणि त्यानुसार अपसेट प्राईज लावायची आहे अशी सूचना आहे. जनरली तसेच असते, असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

इस केस में ऐसा हुआ कि विभाग का जो एसओआर आया है उससे भी नीचे अपसेट प्राईस आया है. एसओआर डिले हुआ इसलिए विभागाने आवरेज का अपसेट प्राईस निकल लिया. The upset price which Department fixed was not the average of three years, that was below the average of three years. Ballarshah fixed the upset price at previous year SOR which was lower than the current SOR applicable to the year of auction, as well as, the average of actual sale price of timber for previous three consecutive auctions असे समितीने निदर्शनास आणले असता, ३ कन्जन्क्टिव्ह ऑक्शन असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

मागच्या वर्षीच्या एसओआरच्या आधारावर आहे. कारण विभागाचा एसओआर वेळेवर आला नाही. How often you prepare SOR ? अशी विचारणा समितीने केली असता, सप्टेंबर किंवा ऑक्टोबर महिन्यात होते असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

वेळेवर करावे, ते वेळेवर झाले नाही, ६-८ महिने विलंब झाला आहे, विभागाने मागील एसओआर घेतला आणि ३ कंन्जन्क्टिव्ह इअर ऑक्शनचा ॲव्हेरज घेतला नाही. विभागाने मागचा एसओआर घेऊन ॲव्हरेज काढला नाही. एस.ओ.आर. किस तरह से बनाया जाता है ? अशी विचारणा समितीने केली असता, एस.ओ.आर. चा व अपसेट प्राईसचा आपसात काही संबंध नाही. मागील वर्षी एप्रिल महिन्यापासून मार्च पर्यंत जे लिलाव झालेले आहेत त्या डिव्हिजनमध्ये त्या लांबीच्या, गोलाईच्या लाकडांची जी सरासरी किंमत आलेली आहे, त्या आधारे एस.ओ.आर. फिक्स केला जातो. सी.सी.एफ. किंवा सी.एफ. डिसाईड करतो असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

ज्या साईजचे लाकूड कट केलेले असेल त्या लाकडाचे १ एप्रिल ते ३१ मार्च या वर्षभरात जेवढे लिलाव झाले असतील त्याचा ॲव्हरेज काढून त्या साईजचा एस.ओ.आर. फिक्स केला जातो, का ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यास सहमती दर्शवून टिंबरच्या ग्रेड १, ग्रेड २, ग्रेड ३, ग्रेड ४, ग्रेड ५, ग्रेड ६ अशा ६ प्रकारच्या ग्रेड आहेत. त्यामध्ये २ मीटर, ३ ते ४ मीटर, ४ ते ५ मीटर, ५ ते ६ मीटर अशी लांबी असते. तसेच, त्यामध्ये १५ ते ३० सेंटीमीटर, ३० ते ६० सेंटीमीटर अशी गोलाई असते. प्रत्येक ग्रेडचे, प्रत्येक लांबीचे, प्रत्येक गोलाईचे वेगवेगळे दर काढून त्याचा ॲव्हरेज काढला जातो त्याला शेड्यूल ऑफ रेट्स असे म्हटले जाते. या दराप्रमाणे दुसऱ्या विभागांना सप्लाय करावयाच्या मालाचे दर लावण्यात येतात असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

त्या ३ लिलावांचा ॲव्हरेज विभागाने या केसमध्ये विचारात घेतलेला नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, ३ लिलावांचे ॲव्हरेज धरुन अपसेट फिक्स करायचे. त्या प्रमाणे लिलाव केला जातो. सन २०१६ पासून संपूर्ण लिलाव ई ऑक्शन द्वारे करण्यात येत आहे. त्यामध्ये इलेक्ट्रॉनिक ऑक्शन होते. त्यामध्ये अपसेटला तशी काही व्हॅल्यू राहिलेलीच नाही. ई ऑक्शनमध्ये संपूर्ण देशातील व्यापारी भाग घेतात. जवळपास १२०० व्यापारी रजिस्टर्ड झालेले आहेत. महाराष्ट्राव्यतिरिक्त तेलंगणा, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, केरळ, दिल्ली, छत्तीसगढ, झारखंड येथील व्यापारी ई ऑक्शनमध्ये भाग घेत आहेत. त्यामुळे विभागाने जरी शून्य किंमत लावली तरी संगणकावर ऑक्शन होतो. त्यामध्ये कोणीही व्यापारी भाग घेऊ शकतो, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

विभागाने सांगितले त्या प्रमाणे खरोखर संपूर्ण देशातील व्यापारी यामध्ये भाग घेतात काय ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यास विभागीय प्रतिनिधींनी होकारार्थी उत्तर दर्शविले.

त्या त्या एरियातील व्यापाऱ्यांची मक्तेदारी तयार झालेली असते. तेच लोक भाग घेतात, तेवढेच लोक लिलाव करतात. त्या त्या लाईनमधील जे जे लोक आहेत तेच लिलाव करतात. त्यामध्ये देशभरातील लोकांनी यावे परंतु, ते येत नाहीत. ई ऑक्शन झाल्यानंतर विभागाला काय अनुभव आला, विभागाला पहिल्यापेक्षा जास्त रेट मिळाले की कमी मिळाले ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने याचे ॲनालिसीस केलेले आहे. २० ते २५ टक्के जास्त कर मिळालेला आहे. विभागाला आता जवळजवळ २० ते २५ टक्के जास्त प्राईस मिळालेली आहे. आता बल्लारशाह डेपोमध्ये २ लाख ७० हजार रुपये मिळाले असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

विभागाने सन २०१६ मध्ये चांगले काम गेले. परंतु, सन २०१० ते सन २०१४ या काळात विभागाने मागच्या ३ निविदांचा सरासरी घेतलेली नाही. जे एस.ओ.आर. दिनांक २८ मार्च, २०१३ रोजी मागच्या कालखंडासाठी जाहीर झाले त्यालाच आधार धरुन त्यांनी अपसेट प्राईस काढली, या विषयावर महालेखाकारांचा परिच्छेद आहे. We are discussing about the fault done by the earlier Officers ? अशी विचारणा समितीने केली असता, एस.ओ.आर. व सेल प्राईसचा आपसामध्ये काही संबंध नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

एस.ओ.आर. चा विषय विचारात घेऊ नका. आता विभागाने सांगितले की, ३ कंझ्युकीटीव्ह टेंडरचा ॲव्हरेज घेतला पाहिजे. मात्र तो घेतलेला नाही, याबाबत काय करायचे ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाला त्याची खात्री करावी लागेल, असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

खात्री करावी लागेल असे का म्हणत आहेत ? ते तर रेकॉर्डवर आहे. ज्यांनी चूक केली त्यांच्यावर कारवाई करावी. यामुळे किती नुकसान झाले? अशी विचारणा समितीने केली असता, नुकसान हा फार सब्जेक्टिव्ह विषय असेल. विभाग जी अपसेट लावतो ती गोपनीय असते, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

विभागाने मूळ किंमत काय पकडली आहे, विभागाने ३ रेट्सची सरासरी काढून करायला पाहिजे होती ना, विभागाने त्या सरासरीपेक्षा बेस प्राईस जास्त ठेवली की कमी ठेवली ? प्रधान मुख्य वन संरक्षक नुकसान काही नाही असे म्हणत आहे. बेस प्राइज कमी ठेवली म्हणून तर सरासरी काढलेली नाही. त्यामुळे नुकसान कॅलक्युलेट कराण्यात यावे व त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी असे समितीने निर्देशित केले असता, बल्लारशाह डेपोमध्ये हे कोणत्या वर्षी झाले याची विभागाकडून चौकशी करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी आश्वस्त केले.

विभागाने या परिच्छेदाच्या आधारावर संबंधित अधिकारी जर सेवानिवृत्त झाले नसतील तर त्यांच्यावर कारवाई करण्याच्या डिटेल योजनेसहित समिती समोर आले पाहिजे होते, असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता, एखाद्या लिलावामध्ये जर तसे झाले असेल तर विभागामार्फत त्याची चौकशी करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

महाराष्ट्र शासनाने नमूद केले की, जरी चुकीच्या पद्धतीचा अवलंब करून लिलावासाठीची धारणा किंमत करण्यात आली असती तरीही हानीचे अनुमान त्या किंमतीच्या आधारावर काढता येऊ शकत नाही. तथापि, वनसंरक्षक, बल्लारशाह यांना योग्य पद्धती अवलंबिण्याच्या सूचना जारी केल्या आहेत. अशा सूचना अशा घटना यापुढे होऊ नयेत याकरिता जारी केल्या. मात्र ही जी चूक झाली आहे, त्याबाबतची जबाबदारी

विभागाला निश्चित करायला लागणार आहे. त्यावेळेस कोण अधिकारी होते ? विभागाचे सर्व ११३ लिलाव महालेखाकारांनी तपासले आहेत. सर्व लिलावांमध्ये असेच विदाऊट ॲव्हरेज झाले आहे काय? ११३ लिलाव असेच झाले आहेत. ११३ केसेसमध्ये अपसेट प्राईस ठरविताना विभागाने मागील ३ टेंडरचे ॲव्हरेज रेट्स घेतले नाहीत. विभागाचे म्हणणे आहे की, 'यामध्ये नुकसान झाले की नाही हे सांगता येणार नाही. मात्र यापुढे असे होऊ नये याकरिता सूचना देण्यात आल्या आहेत.' हे योग्य नाही. समिती एस.ओ.आर. चा मुद्दा मान्य करतो. परंतु, विभागाने सांगितले की, मागील ३ टेंडरचे ॲव्हरेज घेतले पाहिजेत. मात्र ते घेतले नाहीत, यावरच एजींचा परिच्छेद आहे. त्या अनुषंगाने झालेल्या नुकसानाचे पूर्ण मूल्यांकन करावे व ज्या लोकांनी चुका केल्या असतील त्या लोकांवर कारवाई करून समितीला १५ दिवसांच्या आत कळविण्यात यावे असे समितीने निर्देशित केले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली, परंतु, अद्यापपर्यंत त्यासंदर्भातील माहिती अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्रमांक २.१.१०.३—आरा गिरणीच्या कमी वापरामुळे हानी :**

विभागामार्फत आरा गिरणीचा कमी वापर होतो. कमी वापर करण्याची कारणे काय आहेत ? त्यांची दररोजची क्षमता साडेचार घनमीटर लाकूड कापण्याची आहे. विभागाचा वापर खूप कमी आहे, याची कारणे काय आहेत, मागणी नाही काय किंवा इतर काही अडचण आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, गडचिरोली जिल्ह्यात चंद्रपूर पासून १२० कि.मी. अंतरावर आलापल्ली हा फार दुर्गम भाग आहे. पूर्वीच्या काळात तेथे जंगलात लाकडाचे काम होत होते तेव्हा ते लाकूड कापण्यासाठी काही सुविधा नव्हती. विभागाने तेथे सन १९६४ मध्ये एक आरा गिरणी उभारली होती. त्यावेळेस तेथे जे लाकूड येत होते त्याची किंमत फार कमी होती. ते आरा गिरणीमध्ये कट करून ट्रक द्वारे बल्लारशाह येथे पाठविण्यात येत होते. त्यामुळे त्याला ट्रान्सपोर्ट खर्च कमी येत होता. त्यावेळेस त्याची मागणी खूप होती. विभागाने तेथे १० केंद्र सुरू केली होती. हळूहळू विभागाचा वापरही कमी झालेला आहे. त्यामुळे त्या आरा गिरणीचा काही वापर होत नाही. १० पैकी १ किंवा २ आरा गिरणी सुरू आहेत. बाकी बंद पडलेल्या आहेत. त्यांची आता आवश्यकता नाही. विभागामध्ये टिंबरची गरज कमी झालेली आहे. आता लाकूड कापत नाही त्यामुळे आता आरा गिरण्या बंद झालेल्या आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

विभागाने त्यांचे लाकूड कापण्याचे रेटही वाढवून दिले आहेत. या आरा गिरण्या खाजगी आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, आरा गिरण्या शासनाच्या आहेत. त्या आरा गिरणी ५० वर्षे इतक्या जुन्या झालेल्या आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

या आरा गिरणीवर विभाग २४०० प्रती घन मीटर पासून कापणीचे पैसे घेण्यात येतात. या आरा गिरणी सुरू ठेवण्यामध्ये नुकसान आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, तेथील लाकूड कापणारा कर्मचारी कायमस्वरुपी आहे. त्यांचे वेतन वगैरे सर्व खर्च धरुन एवढा खर्च येतो, असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

विभागामार्फत जेवढे काम करण्यात येते व त्यांना जो पगार मिळतो त्यानुसार त्या कॉस्ट व्हायाबिलिटीमध्ये बसतात की नाही की, शासनाकडून निधी द्यावा लागतो ? आरा मशीनचे इन्फ्रास्ट्रक्चर कॉस्ट धरू नका परंतु, ऑपरेशनल कॉस्ट, होणारे काम व मिळणारी किंमत या दृष्टीने या गिरण्या ऑपरेशनल आहेत काय, कमीत कमी नो लॉस नो प्रॉफिटवर आरा मशीन चालल्या पाहिजेत. केवळ रोजगार हमी योजना चालवू नका. एका बाजूला २ कोटी ३३ लक्ष रुपयांचे ऑपरेशनल नुकसान झाले. एस्टॅब्लिशमेंट व इन्फ्रास्ट्रक्चर कॉस्ट शून्य आहे. ती गृहीत न धरता याला जर एवढी ऑपरेशनल कॉस्ट असेल तर बंद करण्यात यावी किंवा याला ऑपरेशनल सारखे चालवावे, असे समितीने सूचित केले असता, विभागामार्फत या मुद्यांची नोंद घेण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

दरवर्षी २-२ कोटी रुपयांचे नुकसान करीत आहात हे काय चालले आहे, एका बाजूला १० टक्केही काम करत नाही व पूर्ण कर्मचारी वृंद ठेवलेला आहे. कमर्शिअल दृष्टीने नो लॉस, नो प्रॉफिट असे चालवावे परंतु शासनाचे नुकसान होता कामा नये. प्रायव्हेट आरा मशीन एका भागातून दुसऱ्या भागात शिफ्ट करावयाच्या असतील किंवा एखाद्या माणसाची बंद आरा मशीन दुसऱ्या माणसाला विकत घेऊन शिफ्ट करावयाची असेल तर ती शिफ्ट करण्यासाठीची कार्यपद्धती काय आहे? पी.सी.सी.एफ.च्या परमिशनने ती शिफ्ट करता येते ना ? त्याचा पंचनामा वगैरे झाला नसेल तर लायसन रद्द करणे वगैरे प्रकार केला जातो का? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये सुप्रीम कोर्टाच्या आदेशामुळे सीईसीने मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, आरा गिरणी जरी सुरू नसली तरी दरवर्षी तिचे लायसन्स रिन्यू करून त्याचे पैसे भरले पाहिजेत. जर लायसन्स रिन्यू केले नाही तर ते लायसन्स रद्द होते. लायसन्स सुरू असेल तर ती शिफ्ट करता येईल. पैसे भरले नसतील व लायसन्स रद्द झाले असेल तर शिफ्ट करता येणार नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

यामध्ये काही तरी मार्ग असेलच ना ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता, त्याची एक प्रक्रीया आहे. एक फॉर्म असतो. ट्रान्सफर ॲप्लिकेशन करायचे. याबाबतचा नियम असा आहे की, जेथे शिफ्ट करायचे आहे तेथे १० कि.मी. पर्यंत रिझर्व्ह फॉरेस्ट नसावे. अशा एरियामध्ये

शिफ्टिंगची परमिशन मिळते. त्यांना जेथे शिफ्ट करावयाचे आहे त्याबाबत त्यांनी डी.एफ.ओ. कडून एक एन.ओ.सी. घ्यायची की, तेथे रिझर्व्ह फॉरेस्ट नाही. ती एन.ओ.सी. मिळाल्यानंतर जेथून शिफ्ट करावयाचे आहे त्यांची एन.ओ.सी. घेऊन शिफ्ट करण्यात यावे, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

ती परवानगी सुरू असलेल्या मशिन्सनाच मिळणार आहे. लायसन्स नसेल तर काय केले जाते ? अशी विचारणा समितीने केली असता, लायसन्स नसेल तर ती आरा गिरणी बंद होते. असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

लायसन्स रिन्यू न केल्याने एखादी बंद असलेली आरा मशीन शिफ्ट करावयाची असेल तर काय प्रोसिजर आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, लिगली ती आरा मशीन बंद झालेली आहे. Now, it is not to be renewed as per the guidelines. त्यासाठी शासनाने एक स्टेट लेव्हल कमिटी बनवलेली आहे. त्या एस.एल.सी. कमिटीकडे हे मॅटर जाईल. त्या कमिटीचे सदस्य काय करायचे याबाबतचा निर्णय घेतील. जनरली विभाग अशी परमिशन देत नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

या आरा मशिनबाबत इतक्या मोठ्या प्रमाणात लॉस होत असेल तर शासनाने याचा पुनर्विचार करावा. नो लॉस नो प्रॉफिट या तत्त्वावर तेथील लोकांना सहाय्य म्हणून या आरा गिरण्या चालविण्यास हरकत नाही. परंतु, प्रॉडक्शन जास्त करण्यात यावे. जेणेकरून लॉसेस कमी होतील व नो लॉस नो प्रॉफिट या तत्त्वावर त्या गिरण्या चालेविणे योग्य होईल. १० पैकी केवळ २ मशिन्स चालवायच्या व त्याकरिता सर्व कर्मचारीवृंद ठेवायचा हे समितीला योग्य वाटत नाही, असे मत समितीने व्यक्त करून विभागाने या गिरण्या नो लॉस नो प्रॉफिट पर्यंत आणा नाही तर त्या बंद करण्याबाबत किंवा त्या को-ऑपरेटिव्ह सोसायटीला देण्याबाबत विचार करावा, असे सूचित केले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास होकारार्थी उत्तर दर्शविले.

आरा गिरण्या नीट चालविण्याचाच हा मुद्दा आहे. प्रॉडक्शन १० टक्के आहे. समितीने प्रॉडक्शन वाढविण्याबाबत सांगितले आहे. प्रॉडक्शन वाढविल्यास हा प्रश्न सुटेल. परंतु, १० पैकी २ मशीन चालवायच्या, १० टक्क्यांवर प्रॉडक्शन करायचे, सर्व कर्मचारी ठेवायचा असे दिसते. विभागाने कर्मचारी कमी करावेत, त्यांना व्ही.आर.एस. द्यावी. त्या गिरण्या बंद कराव्या असे समितीचे मत नाही. कारण त्या लोकांना लाकूड पुरविण्याचेही लक्ष्य असलेच पाहिजे, असे मत समितीने व्यक्त केले.

**परिच्छेद क्रमांक २.१.११.१ - कार्य नियोजनाचे अपुरे संनियंत्रण :**

कार्य नियोजनाचे अपुरे संनियंत्रण या परिच्छेदात मोठ्या प्रमाणात नियंत्रण प्रपत्र प्रलंबित आहेत. गडचिरोली, वडसा, आलापल्ली, सिरोंचा, भामरागड येथे तर सन २०१०-२०११ पासून प्रलंबित आहे. वन विभागाचे ३०३७० हेक्टर क्षेत्राचा समावेश असलेले विचलन प्रस्ताव, विचलन प्रस्ताव म्हणजे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विचलन म्हणजे डेव्हीएशन. त्याने जर सांगितल्याप्रमाणे काम केले नसेल तर त्याचा प्रस्ताव वरच्या स्तरावरील अधिकाऱ्यांकडे पाठवून त्याची मंजुरी घ्यायची असते, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

विभागाने विचलन प्रस्तावावर आवश्यक ती कार्यवाही केली आहे असे नमूद केले आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

जे प्रपत्र प्रलंबित आहेत त्याबाबत सांगण्यात यावे असे समितीने निदेश दिले असता, वन विभागामध्ये ५१ टेरिटोरियल विभाग असतात. ३५ जिल्ह्यांमध्ये ५१ विभाग आहेत. प्रत्येक विभागाचे १ ते दीड लाख हेक्टरचे एक नियतक्षेत्र असते. काही विभाग छोटे आहेत तर काही विभाग मोठे आहेत. या संपूर्ण एरियामध्ये ऑपरेशन करण्यासाठी २० वर्षांचा एक वर्किंग प्लान तयार केला जातो. वन विभाग हा असा एकमेव विभाग आहे की, जेथे पुढच्या २० वर्षांसाठी ॲडव्हान्स प्लानिंग केली जाते. या वर्किंग प्लानला केंद्र शासनाची टिम मंजुरी देते. त्याप्रमाणे त्या विभागामध्ये काम केले जाते. त्याचे ॲन्युअल कुप असतात. विभागाला २० वर्षामध्ये काम करायचे असते त्यामुळे ॲन्युअल कुप्स असतात. त्या कुप्समध्ये वर्किंग प्लानच्या प्रिस्क्रिप्शनप्रमाणे काम केले जाते. काम केल्यानंतर पुढच्या वर्षी कुप कंट्रोल फॉर्म म्हणजे त्या कुपचे किती क्षेत्र होते, त्यात कोणते काम प्रस्तावित होते, किती काम केले गेले, कोणते काम केले गेले नाही, किती खर्च झाला असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

कुप नियंत्रण फॉर्म भरले गेले नाहीत हाच मुद्दा आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, काही लोकांनी फार कमी फॉर्म भरुन पाठविले. या नियंत्रण प्रपत्राचा (कंट्रोल फॉर्मचा) वापर पुढचा प्लान तयार होतो तेव्हा केला जातो. पुढचा प्लान तयार होण्यापूर्वी हे लोक फॉर्म भरुन पाठवितात. त्यांनी ॲन्युअली फॉर्म पाठविले पाहिजेत. काही लोकांनी फॉर्म पाठविलेले नाहीत. त्या सर्वांना विभागामार्फत सूचना देण्यात आल्या आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

७ वर्षांचा आराखडा समिती समोर आलेला आहे. विभागाने लेखी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, १० टक्के लोकांनी फॉर्म भरलेले नाहीत. केलेल्या कामाची पूर्ण माहिती त्या फॉर्ममध्ये द्यायची आहे. मात्र ती दिली जात नाही. How will you plan for future without the information from the ground level ? अशी विचारणा समितीने केली असता, समितीचे म्हणणे बरोबर असून त्याबद्दल विभागाने सर्वांना सूचना दिलेल्या आहेत. सर्वांना कारणे दाखवा नोटिस दिलेली आहे. हे फॉर्म लवकरच भरुन घेतले जातील, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वास्त केले.

विभागाचे मत आहे की, पुढील प्लॅनिंगच्या वेळी पाहतो परंतु पुढील प्लॅनिंग वीस वर्षांनंतर होणार आहे. याचा अर्थ वीस वर्षे काहीच पाहायचे नाही का ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता, ज्यावेळी प्लॅन रिव्हाइज होतो त्यावेळी सर्व माहिती घेतली जाते, असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

नागपूर येथे पूर्वी एक पी.सी.सी.एफ. होते आता चार-पाच आहेत, हे तरी विभाग मान्य करतो की नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, समितीचे म्हणणे मान्य असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

विभागाने सांगितले की, याबाबत कारवाई करण्यात येईल. समितीचा प्रश्न असा आहे की, विभागाने काय कारवाई केली आहे ? नियंत्रण प्रपत्राच्या (कंट्रोल फॉर्मच्या) विचलनसंबंधी कर्तव्ये व जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासंदर्भात ज्या वन अधिकाऱ्याने निष्काळजीपणा केला आहे त्यांच्याविरुद्ध कारवाई केली जाईल, असे विभागाच्या लेखी उत्तरामध्ये नमूद केले आहे. परंतु सदर कारवाई कधी केली जाईल ? त्याचप्रमाणे या प्रकरणात निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांची नावेही समितीस सांगण्यात यावी. यावर ज्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी मॉनिटरींग करणे आवश्यक होते त्यांनीही ते का केले नाही, हेही पाहिले पाहिजे. कारण कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाते परंतु ज्या अधिकाऱ्यांनी मॉनिटरींग करणे अपेक्षित आहे त्यांनी काय केले ? सन २०१२-१३ पासूनचे हे विषय असूनही विभागाच्या उत्तरामध्ये दिले आहे की, त्यांच्याविरुद्ध कारवाई केली जाईल. एवढया दिवसांनंतरही असे उत्तर येत आहे. आतापर्यंत का कारवाई केली नाही ? कार्यवाही कोणी करणे अपेक्षित होते, जर त्यांनी कारवाई केली नसेल तर त्यांच्यावर मॉनिटरींग कोणी करणे अपेक्षित होते व जर मॉनिटरींग केले नसेल तर का केली नाही ? विभागाच्या कार्यपद्धतीनुसार कोणत्या अधिकाऱ्यांनी मॉनिटरींग करणे आवश्यक होते ? असे मुद्दे समितीने उपस्थित केले असता, डब्ल्यू.पी.ओ. (वर्किंग प्लॅन ऑफीसर) यांनी मॉनिटरींग करणे अपेक्षित असते. डी.सी.एफ. आणि सी.एफ. यांचा यामध्ये समावेश होतो, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

कनिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांनी कार्यवाही केली नाही ते थोडा वेळ बाजूला ठेवून त्यांच्यावर मॉनिटरींग करणाऱ्या अधिकाऱ्यांनीही त्याची जबाबदारी का पार पाडली नाही ? सदर अधिकाऱ्यांची नावे व ते कुठे कार्यरत आहेत याबाबत देखील माहिती देण्यात यावी असे समितीने निदेशित केले असता, यामध्ये विलंब झाला आहे व ती वस्तुस्थिती आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

विभागाने दिलेल्या उत्तरामध्ये नमूद केले आहे की, कारवाई केली जाईल. यावर काय कारवाई करणार ? कधी करणार ? व कोणावर करणार ? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता, विभागामार्फत दोन गोष्टी करण्यात येईल. पहिली म्हणजे कारवाई व दुसरी म्हणजे राहिलेले काम पूर्ण करणे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

एका महिन्याच्या आत कारवाई केली पाहिजे, असे समितीने निदेशित केले असता, मागील सात-आठ वर्षांचे काम विभागाला ड्राईव्ह घेऊन करावे लागेल त्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी लागेल. विभागाने सांगितल्याप्रमाणे ही जबाबदारी डब्ल्यू.पी.ओ. व सुपरव्हिजन करणाऱ्या अधिकाऱ्यांची असून त्याच दोन महिन्यांमध्ये विभागाकडून जबाबदारी निश्चित करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले.

**परिच्छेद क्रमांक : २.१.११.२ : मुल्यांकन शाखेच्या निरीक्षणांचे अनुपालन न करणे.**

उक्त परिच्छेदाबाबत विभागाने यापूर्वी सांगितले होते की, मूल्यांकन शाखेने केलेल्या १६२५ निरिक्षणांपैकी १०२५ प्रकरणे शिल्लक आहेत परंतु आताच्या नवीन माहितीमध्ये सांगितले आहे की, १२९७ निरिक्षणे प्रलंबित आहेत. सदर दोन्ही आकडेवारीत एवढी तफावत कशी ? प्रलंबित प्रकरणांची टक्केवारी ८४ टक्के एवढी आहे. विभागाच्या दोन्ही उत्तरांमध्ये फरक आहे. यावरुन सुरूवातीचे उत्तर चुकीचे होते असे समजायचे का ? अशी विचारणा समितीने केली असता, मूल्यांकन शाखेने केलेल्या निरिक्षणांच्या अगोदरच्या आकडेवारीमध्ये मार्च, २०१६ अखेरपर्यंत म्हटलेले आहे व आताच्या आकडेवारीमध्ये सन २०१०-१५ दरम्यानचा कालावधी आहे. कदाचित यामध्ये कालावधीचा फरक असू शकतो. तरीही विभागाकडून हे पुन्हा तपासून पाहण्यात येईल असे विभागीय सचिवांनी विदित केले.

समितीला सन २०१०-१५ दरम्यानचीच आकडेवारी हवी आहे. त्या दरम्यान १०२५ प्रकरणे प्रलंबित होती. ही आकडेवारी तपासून घ्यावी. तसेच दुसरा मुद्दा म्हणजे प्रलंबित प्रकरणांची टक्केवारी ८४ टक्के असून ती खूप जास्त आहे. याची कारणे काय आहेत व याला जबाबदार कोण आहे ? याबाबत दिनांक १४ जून, २०१६ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या असून त्याला अडीच वर्षांचा कालावधी लोटला आहे. मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) यांनी याबाबत काय कार्यवाही केली ? अशी विचारणा समितीने केली असता, वन विभागामध्ये वृक्षरोपणाचे मूल्यांकन करण्यासाठी मूल्यांकन गट/संघ (इव्हॅल्यूएशन टिम) आहे. ते मूल्यांकन करून त्यांचे ऑब्झर्व्हेशन्स देतात व त्याला मूल्यांकन निरिक्षणे (इव्हॅल्यूएशन ऑब्झर्व्हेशन) असे म्हणतात. त्यांच्या रिपोर्टच्या आधारे कम्प्लायन्स केला जातो. सी.सी.एफ. चे दौरे कमी झाले आहेत, वृक्षारोपण नोंदवही (प्लान्टेंशन रजिस्टर) भरलेली नाही, अशा प्रकारचे त्यांचे ऑब्झर्व्हेशन्स असतात. त्याचा कम्प्लायन्स केला जातो. लेखापरिक्षण झाले त्यावेळी १९४५ आक्षेप प्रलंबित होते आणि अहवाल दिला होता की, १६२५ प्रकरणे प्रलंबित होते. आता डिव्हिजनवाईज आकडेवारी घेतली आहे त्यामध्ये १२६९ प्रकरणे प्रलंबित आहेत. मार्च महिन्यापर्यंत हे काम पूर्ण करण्याबाबत संबंधितांना सूचना दिल्या आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

सन २०१५ पासून २०१९ या चार वर्षांच्या कालावधीत प्रकरणे केवळ ७०० ने कमी झाले आहेत. असे असताना मार्च महिन्यापर्यंत १२०० प्रकरणांची पूर्तता होईल का ? जोपर्यंत कालमर्यादा ठरवून देत नाहीत, जबाबदारी निश्चित करीत नाहीत तोपर्यंत कार्यवाही होणार नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, मार्च, २०१९ पर्यंत ५० टक्के व उर्वरित जून, २०१९ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना विभागाने संबंधितांना दिल्या आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

दिनांक १४ जून, २०१६ रोजीच्या पत्राच्या शेवटच्या परिच्छेदात नमूद केले की, मूल्यांकनानंतर संबंधित उपवनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी रोपवन कामात आढळून आलेल्या त्रूटी व आक्षेपांबाबतचा पूर्तता अहवाल ३० दिवसांमध्ये मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांना सादर करावा. असे असतानाही अडीच वर्ष उलटूनही ३० दिवस आणखी झाले नाहीत का ? जर असे असेल तर या पत्राला अर्थ काय आहे ? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, याबाबतची कार्यवाही पूर्ण करून घेण्यात येईल तसेच मुल्यांकन शाखेच्या प्रलंबित निरिक्षणासाठी विभागामार्फत ड्राइव्ह घेण्यात येईल. ५० टक्के प्रकरणे मार्च, २०१९ पर्यंत व उर्वरित ५० टक्के जून, २०१९ पर्यंत पूर्ण करण्यासाठी शेवटची मुदत दिलेली आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

या प्रकरणात वरीष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. कारण वरिष्ठ अधिकारी सुटून जातात व कारवाई मात्र निम्न संवर्गातील कर्मचाऱ्यांवर होते, असे मत समितीने व्यक्त केले असता, ५० टक्के प्रकरणे मार्च, २०१९ पर्यंत व उर्वरित ५० टक्के जून, २०१९ पर्यंत पूर्ण करण्यात येईल व जर असे झाले नाही तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागाने उपरोक्त नमूद केलेल्या कालमर्यादेत हे पूर्ण करण्यात यावे. परंतु गेल्या अडीच वर्षांपासून कार्यवाही केली नाही त्यांच्यावर काय कारवाई करणार, हा समितीचा प्रश्न आहे. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) हे विभागाच्या पत्रांना केराची टोपली दाखवित आहेत. त्यांच्यावर विभाग काय कारवाई करणार ? ज्या विभागांमध्ये जास्त प्रकरणे प्रलंबित असतील त्यांच्यावर कडक कारवाई करावी. तसेच २५ टक्क्यांपेक्षा कमी प्रकरणे प्रलंबित असतील तर त्यांच्याबाबत वेगळी भूमिका घ्यावी. पुढील तीन-तीन महिन्यांची मुदत देऊन प्रत्येकी पन्नास-पन्नास टक्के प्रकरणे निकाली काढण्याची त्यांना मुदत देऊन जुलै अखेरपर्यंत हे काम संपवावे. कोणत्या विभागामध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त प्रकरणे प्रलंबित आहेत, संबंधित अधिकाऱ्यांची नावे व आज ते कोणत्या पदावर कार्यरत आहेत त्याची माहिती समितीस सादर करावी. तसेच याबाबतची कार्यवाही करून त्याचा अनुपालन अहवाल समितीस सादर करावा, असे समितीने निदेशित केले असता विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

**परिच्छेद क्रमांक : २.१.११.३ : प्रलंबित वन महसूल**

या परिच्छेदात वन महसूल वसूली प्रकरणी मोठया प्रमाणात वसुली झाली आहे परंतु महसुली वसुलीसाठी केवळ आर.आर.सी. काढून उपयोग होणार नाही. लिलाव करून वसुली करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. विभागाने केवळ जिल्हाधिकारी यांना वसुली करण्यासाठी सांगितले तर वसुली होणार नाही. संबंधितांच्या मालमत्तांचे लिलाव करून पैशांची वसुली केली पाहिजे. ५ कोटी ९२ लाख रुपयांची यामध्ये वसुली आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागीय प्रतिनिधींनी सहमती दर्शविली.

**परिच्छेद क्रमांक : २.१.११.४ : अपुरे आंतरिक नियंत्रण**

उक्त परिच्छेदात एकूण चार मुद्दे आहेत परंतु विभागाने एकाच मुद्दयाबाबत उत्तर दिले आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, सदर मुद्दा स्वीय प्रपंजी लेखा (पी.एल.ए) खात्याबद्दलचा आहे. मार्च, २०१७ पर्यंतचे अकाउंट रिकन्सिल झाले आहेत. विभागामार्फत तेंदुचा

लिलाव करून सन २०२० मध्ये बोनस वाटप करण्यात येईल. त्यासाठी अकाउंट टॅली केले जातात. मार्च, २०१७ पर्यंतचे अकाउंट टॅली झाले आहेत. सन २०१९ ची देखील कार्यवाही सुरू आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

यामध्ये आणखी तीन मुद्दे आहेत. १३ पैकी ३ विभागांमध्ये स्वीय प्रपंजी लेखा रोखपुस्तिका आणि कोषागार पासबुक यांच्या शेवटच्या शिल्लक रकमेत १ कोटी २५ लाख रुपयांचा फरक होता. त्याचबरोबर सातारा आणि सांगलीमध्ये वेगवेगळी स्वीय प्रपंजी लेखा (पी.एल.ए) खाते ठेवण्यात आले नाहीत. वन अधिकारी व उप वन संरक्षकांकडून त्याची प्रत्यक्ष पडताळणी होत नाही. ४ विभागांमध्ये उप-वनसंरक्षक रोख शिल्लकाची अनपेक्षित मासिक प्रत्यक्ष पडताळणी करत नव्हते, असे आक्षेपित मुद्दे आहेत परंतु याबाबत विभागाने काहीही उत्तर दिलेले नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, याबाबतची माहिती विभागामार्फत समितीस सादर करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वस्त केले.

२ कोटी ९४ लाख रुपयांची बांधकामे कोणतीही टेंडर्स न काढता केली असून त्याचे देखील स्पष्टीकरण विभागाकडून देण्यात आले नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, सदर परिच्छेदाचे उत्तर देणे बाकी आहे हे विभागाच्या लक्षात आले आहे त्यामुळे ८ दिवसात ते मुद्दे समितीला सादर करण्यात येईल, असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले. व वेळेअभावी साक्ष पुढील दिनांकास घेण्यात येईल असे समितीने निदेशित केले.

उपरोक्त परिच्छेदा संदर्भात समितीची दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ रोजी पुनःश्च साक्ष घेतली. या परिच्छेदाबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी विदित केले की, यामध्ये पहिला मुद्दा असा आहे की, १३ विभागांपैकी गडचिरोली जिल्ह्यातील आलापल्ली, भामरागड, सिरोंचा असे ३ विभागामध्ये पर्सनल लेजर अकाऊंट आणि ट्रेझरी पासबुकामध्ये १.२५ कोटी रुपयांचा फरक आढळून आला होता. विभागाने यासंदर्भात ड्राईव्ह घेतलेला आहे. पहिल्यांदा सबमिशन करतेवेळी ८१ लाख ४६ एवढी शिल्लक राहिली होती आणि उर्वरित पेमेंट दिलेले आहे. सद्यःस्थितीत ४० लाख ९५ हजार ८६ रुपये शिल्लक राहिले आहेत. विभागाने आढावा घेतलेला आहे. सन २०१० ते सन २०१५ या कालावधीतील रक्कम आहे. या रक्कमेमधून मजुरांना बोनस द्यावयाचा आहे. तेंदूपत्ता कलेक्शनमध्ये टेंडर काढले जाते. संबंधित कंत्राटदार मजुरांना मजुरी दिली जाते. त्यानंतर कंत्राटदाराकडून रॉयल्टीची रक्कम भरली जाते आणि ती एस्टाब्लिशमेंट चार्जेस मायनस केल्यानंतर मजुरांना बोनस स्वरुपात दिली जाते. त्यावेळी संबंधित मजुरांच्या नावे धनादेश दिले जातात. परंतु, धनादेश अदा न केल्यामुळे ती रक्कम आहे. आता मजुरांचे पत्ते शोधलेले आहेत. तीन महिन्यानंतर धनादेश लॅप्स होतो. तो पुनःश्च रिन्यूव्ह करून ती प्रक्रिया पार पाडलेली आहे. त्यानुसार आता ४० लाख ९५ हजार ८६ एवढी रक्कम देण्याचे राहिलेले आहे. यावर दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ रोजी ही रक्कम देण्याचे राहिलेली आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, ३१ मार्च, २०१८ पर्यंत ४० लाख ९५ हजार ८६ एवढी रक्कम देण्याचे राहिलेले आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

वन विभागाने तीन विभागाची माहिती दिलेली आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागीय सचिवांनी त्यास होकारार्थी उत्तर दर्शविले. २१ पीएलए अकाऊंट ५१ वन विभागात सुरू केले जाईल असे सांगितले आहे. यापैकी १० कोषागारांकडे व्यक्तिगत ठेवीच्या पासबुकनुसार ताळमेळ पूर्ण झालेला आहे. सन २०१० ची काय परिस्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, २१२१ विभागाची माहिती घेण्यात आली आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

अर्थसंकल्प नियंत्रण प्रपंजी काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, प्रत्येक वर्षी प्रत्येक विभागात ॲन्युअल प्लॅन ऑफ ऑपरेशन बनविण्यात येते. यामध्ये कोणकोणती ॲक्टीव्हिटी करावयाची आहे आणि त्यासाठी प्रत्येक ॲक्टिव्हीटी करण्यासाठी शासनाकडे निधीची मागणी केली जाते. यामध्ये मेजर आणि मायनर हेड असतात. त्यासाठी रजिस्टर बनविले जाते. त्यानुसार अक्टिव्हीटी करण्यासाठी निधी मिळावा म्हणून मागणी केलेली आहे. त्यानंतर शासनाने किती निधी दिलेला आहे, हे प्रत्येक विभागात ठेवले जाते. आता बीडीएस प्रणाली कार्यान्वित झालेली आहे. त्यानुसार ती माहिती संगणकावर उपलब्ध असते. त्यानुसार अशा प्रकारचे रजिस्टर प्रत्येक विभागात मेंटेन केले जाते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

१०० टक्के बीडीएस प्रणाली कार्यान्वित होऊ शकत नाही. अनेक वेळेस कॅश ट्रॅन्झॅक्शन होत असतात असे समितीने निदर्शनास आणले असता, या ठिकाणी कॅशचा संबंध येत नाही. बजेट कंट्रोल नावाचे रजिस्टर असते असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

आरएफओला ट्रान्सफर केलेले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास होकारार्थी उत्तर दर्शवून बजेट कंट्रोल सिस्टिम असते असे समितीस अवगत केले.

निवडलेल्या दोन विभागांत साठा प्रापंजीवर (स्टॉक रजिस्टरवर) स्वाक्षरी केली आहे, असे नमूद केलेले आहे. But at the time of Audit it was not done असे समितीने निदर्शनास आणले असता, नमूद करण्याचे राहिलेले आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

नंतर करून घेतलेले आहे. But now is it regularly used or not? आता सिस्टिम कार्यान्वित केली पाहिजे. लेखापरीक्षणात परिच्छेद आल्यानंतर असे लक्षात आले होते की, व्हेरिफिकेशन वेळेवर होत नाही. परंतु, विभागाने व्हेरिफिकेशन केलेले आहे, असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. आता रेग्युलरली नियम आणि कायद्याची अंमलबजावणी केली जाते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, ५१ विभाग आहेत. प्रत्येक विभागात साठा प्रापंजी (स्टॉक रजिस्टर) असते. आर्थिक वर्षात साहित्याची जेवढी खरेदी होते, त्याची नोंद रजिस्टरमध्ये होते. ३१ मार्च नंतर खर्चमेळ करून जून महिन्यात एसीएफने साठा प्रापंजी (स्टॉक रजिस्टर) सर्टिफाय करावयाचे असते. ज्यावेळी लेखापरिक्षण झाले, त्यावेळी दोन विभागाच्या नोंदवहीची तपासणी केली नव्हती. आता दरवर्षी नोंदवहीची तपासणी केली जाते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

गेल्या अनेक वर्षापासून तपासणी झालेली नाही असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. त्यानुसार पद्धती कार्यान्वित करावी असे मत समितीने नोंदविले होते हे समितीने निदर्शनास आणले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शवून लेखापरिक्षणाच्या वेळी दोन विभाग होते. ५१ विभागांना सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे असे समितीस अवगत केले.

उप वनसंरक्षक रोख शिल्लकाची अनपेक्षित मासिक पडताळणी करीत नव्हते. रक्कम कमी आहे, असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. दोन रुपये असले तरी तपासणी केलीच पाहिजे. याबाबतची पडताळणी ही जबाबदार अधिकाऱ्यांकडून वेळेवर केलीच पाहिजे. परंतु, अशा प्रकारची पडताळणी केलेली नाही. आता पडताळणी करण्याची गरज नाही, असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. पडताळणी करण्याची गरज आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, एका विभागात १० ते १२ रेंजर्स असतात. उप वन संरक्षक (DFO) प्रत्यक्ष जाऊन शिल्लक कोठे आहे हे तपासून घेण्याची तरतूद आहे. त्यानुसार काही ठिकाणी डीएफओने तपासणी केलेली आहे तर काही ठिकाणी असे झालेले नाही. यासंदर्भात दौऱ्याच्या वेळी कॅशची तपासणी करून घेण्यासाठी सर्वांना सूचना दिलेल्या आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

सन २०१५ पासून निरीक्षण अनुपालनापैकी ३३१ निकाली काढले आहेत. तसेच ४०४ निरीक्षण अनुपालन तीन महिन्यात निकाली काढले जातील असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. गेल्या ४ वर्षात निरीक्षण अनुपालनापैकी ३३१ निकाली काढले आहेत. आता ४०४ निरीक्षण अनुपालन तीन महिन्यात निकाली कसे काढणार ? अशी विचारणा समितीने केली असता, ३ महिन्याच्या आत एक विशेष मोहिम राबवून सर्व निकाली काढले जाणार आहेत. यासंदर्भात संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत. यासंदर्भात विभागीय स्तरावर आढावा घेण्यात येत आहे असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

३ महिन्याच्या आत विशेष मोहिम राबवून सर्व निकाली काढण्यासाठी विभागाने कोणत्या सूचना दिलेल्या आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, वर्षनिहाय परिच्छेद कोणत्या कारणासाठी प्रलंबित आहेत, याबाबतची माहिती घेण्यासाठी सूचना दिलेल्या आहेत. कम्प्लायन्स करून आढावा घेतला जातो. त्यानंतर उणिवा दूर केल्यानंतर परिच्छेद वगळला जातो असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

गेल्या ४ वर्षात निरीक्षण अनुपालनापैकी ३३१ निकाली काढले आहेत. आता ४०४ निरीक्षण अनुपालन तीन महिन्यात निकाली कसे काढणार ? यावरुन लेखापरिक्षण परिच्छेदाकडे कसे दुर्लक्ष होत आहे, हे दिसून येत आहे. यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केलेले असल्यामुळे त्यांना योग्य त्या सूचना दिल्या तर ते कामाला लागतील. एक विशेष मोहिम राबवून ते निकाली काढण्यासाठी प्रयत्न करावेत असे समितीने सूचित केले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

तीन विभागांत (सांगली, ठाणे आणि गडचिरोली) महाराष्ट्र वन विभागाद्वारे जारी केलेल्या फेब्रुवारी, १९९३ च्या आदेशाचे उल्लंघन करून विभागाने थातुरमातूर उत्तर दिलेले आहे. प्रधान महालेखाकाराने वैध परिच्छेद काढलेला आहे. २ कोटी ९४ लक्ष किंमतीचे बांधकाम व लागवडीचे कामे कोणतीही निविदा न काढता दिलेली आहेत. २ लक्ष रुपये कमी किंमतीची कामे काही कारणांसाठी दिली ते इथपर्यंत ठीक आहे. परंतु, २ लक्ष रुपये किंमतीच्या वरील कामासाठी काय अडचण आहे ? २ लक्ष रुपये किंमतीच्या वरील कामासाठी निवीदा काढली नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, या मुद्याची माहिती घेतलेली आहे. यामध्ये तीन वेगवेगळे विषय आहेत. पहिला विषय गडचिरोली जिल्ह्याशी संबंधित आहे. गडचिरोली जिल्ह्यात सन २०१० ते सन २०१५ मध्ये अगरबत्तीचा प्रकल्प सुरू केला होता. गोंडवाणा हब येथे दोन महत्वाचे प्रकल्प सुरू झालेले आहेत. गडचिरोली जिल्ह्यात एनटीएफपी हे उत्पादन असते आणि ते खूप मोठ्या प्रमाणावर घेतले जात आहे. त्यांच्या गोळ्या केल्यानंतर पॅकिंग करून विकले जाते. गडचिरोली अगरबत्ती प्रोजेक्ट आणि गोंडवाणा हब प्रोजेक्ट सुरू केलेला आहे. त्या ठिकाणी गोडाऊनची आवश्यकता होती. तत्कालीन जिल्हाधिकारी व उप वन संरक्षक यांनी असे ठरवले की, प्रत्येक तालुक्यामध्ये गोदाम बनवले पाहिजेत जेणेकरून आदिवासींकडून

जे एन. टी. एफ. पी. येईल त्याचा साठा करून त्याची विक्री करता येईल. त्यासाठी हे काम मोठ्या प्रमाणात घेतले होते. त्यांनी २५ x ८ फूटांचे छोटे छोटे २२ गोदाम बांधले होते. त्याचे एस्टिमेट बनवले असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

एका गोदामाची किंमत किती होती ? २ लाखांत गोदाम कसे काय बांधले, ते लाकडाचे होते काय ? २ लाखांत सिमेंट-कॉंक्रिटच्या स्लॅबच्या गोदामाचे बांधकाम कसे केले, ते किती स्क्वेअरफूटाचे गोदाम आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, एका गोदामाची किंमत २ लाखांच्या आत होती, गोदामाचे बांधकाम केले. २५ x ८ चे २०० स्क्वेअर फूटाचे गोदाम आहे. त्याला स्लॅब नाही. ते साठा करण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात बांधलेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

विभागाने तुकड्या-तुकड्यांमध्ये काम केले. २ लाखांच्या कामाची निविदा न काढल्यामुळे समितीने प्रश्न विचारलेले आहेत. दुसरा मुद्दा असा आहे की, सांगली जिल्ह्यामध्ये १ कोटी ३८ लाखांचे काम फक्त ०.३ टक्के कमी करून त्या माणसाला देऊन टाकले. विभागाने असे केल्याने ४० हजारांचा फायदा झाला. १ कोटी ३८ लाखांचे काम ०.३ टक्के बिलो व विदाऊट टेंडर करून घेतले आणि ४० हजार रुपयांची बचत झाली असे सांगून विभाग त्याला जस्टिफाय करीत आहे असे मत समितीने नाराजीने व्यक्त करून समितीकडून गडचिरोली जिल्ह्याबाबत काही एक्सक्युज मान्य करण्यात येईल. मात्र सांगली येथील ०.३ टक्क्यांबाबत टेंडर न काढण्याचे विभाग कसे काय जस्टिफाय करतो? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, विभागाने हे काम एकाच व्यक्तीकडून केलेले नाही असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

विभागाने हे काम एकाच व्यक्तीकडून का करून घेतले नाही, हाच समितीचा मुद्दा होता. महालेखापालांनी हाच आक्षेप काढला आहे. हे इतके मोठे काम होते. ते एकत्रित टेंडर काढून का केले नाही ? गडचिरोली येथील अडचण अनुभवण्यात येते. ते समितीला मान्य आहे की, तेथे काम करून घ्यायचे हाच मुद्दा आहे. लघू वन उपजला कोठे तरी गोदामात ठेवायचे होते ते काम विभागाने केले. मात्र सांगली जिल्ह्यात सर्व व्यवस्थित आहे. तेथील कामाचे टेंडर न काढण्याचे कारण काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, सांगली जिल्ह्यामध्ये सन २०१४-२०१५ मध्ये दंडोबा विकास प्रोजेक्ट घेतला होता. तेथील भूरचना पाहिली तर, नियमित वृक्षारोपणासाठी जशी भूरचना पाहिजे तशी ती नाही. वेगळ्या पद्धतीचा डोंगर तेथे आहे. ही वेगळ्या पद्धतीची साईट आहे. त्यावेळेस तत्कालीन मंत्री महोदयांची अशी सूचना होती की, तेथेही ग्रीन कव्हर पाहिजे. असा निर्णय झाला होता. त्यानंतर विभागाला हे वृक्षारोपणाचे काम घ्यावे लागले. नेहमीच्या वृक्षारोपणाच्या साईटपेक्षा ही निराळी साईट होती. त्यामुळे या ठिकाणी १ x १ x १ या पद्धतीचे खड्डे घेतले गेले. सामान्य वृक्षारोपणामध्ये असे खड्डे घेत नाही. त्या ठिकाणी जास्त उंचीची रोपे लावायची होती तसेच तेथे ठिबक सिंचनाची व्यवस्था करायची होती, तरच त्या ठिकाणची झाडे जगतील, अशी ही वेगळी साईट होती. हा जर एकाच ठिकाणचा पॅच असता तर विभाग म्हणतो त्या प्रमाणे निश्चितपणे एकच टेंडर काढले पाहिजे होते. परंतु, ८ वेगवेगळ्या ठिकाणी या साईट होत्या. त्यामुळे टेंडर काढायच्याऐवजी विभागाने वर्तमानपत्रात जाहिरात दिली आणि वेगवेगळ्या आयटम्स प्रमाणे दर मागवून घेतले, म्हणजे १ x १ x १ असे खड्डे करणाऱ्या यंत्रणेकरिता दर मागवून घेतले. त्यानंतर जास्त उंचीच्या रोपांसाठी वेगळे दर मागवून घेतले. अशा प्रकारे वेगवेगळ्या आयटम्ससाठी वेगवेगळे दर मागवून घेतले, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

यावरच आक्षेप आहे. विभागाने या कामात विभागणी करून, त्याचे तुकडे करून, वेगवेगळे काम करून एकत्रित टेंडर काढण्याचे टाळले. हाच तर समितीचा मुद्दा आहे असे मत समितीने व्यक्त केले.

काम जर ८ ठिकाणी असेल तर १-१ काम कमीत कमी १७-१८ लाखांचे असेलच. अंदाजे १ कोटी ४० लाखांची ८ कामे विभागाने केली. त्यामुळे १८ ते २० लाखांचे काम नक्की होऊ शकते. त्यादृष्टीने विभागाने जर ८ ठिकाणी एकत्रित टेंडर काढले असते, ते जास्त आले असते तरी हा विषय आला नसता. निविदा प्रक्रिया टाळण्यासाठीच विभागाने एका कामाचे एवढे तुकडे केले. ८ कामांचे ८ नाही तर ४० तुकडे झाले. ८ गावांमध्ये ८ कामे व एका कामाचे पुन्हा ३-४ तुकडे केले. खड्डा कोणी वेगळा करणार, पाईप कोणी वेगळा लावणार, रोपांचे काम कोणी वेगळा करणार, असे विभागाने केले. महालेखापालांचे असे म्हणणे होते की, They agree regarding 8 tenders. ८ टेंडर काढले पाहिजे होते कारण बऱ्याच ठिकाणी काम होते. १ टेंडर काढले नाही, ८ काढले तरी चालते. परंतु, विभागाने ८ कामांनाही फाटे फोडले व जस्टिफाय करून दिले की, ४० हजार कमी झाले. हे ०.३ टक्के लेस आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, वन विभागामध्ये जी वृक्षारोपणाची कामे असतात ती वन विभागच करते. त्याचे कधीच टेंडर काढले जात नाही. खड्डे करणे, नर्सरीमध्ये रोपे तयार करणे ही कामे वन विभागच करते. वन विभाग कधीही वृक्षारोपणाच्या कामासाठी टेंडर काढत नाही. ही एक विशिष्ट साईट होती. तेथील हार्ड स्ट्राटा पाहता त्या ठिकाणी वन विभागालाही अंतर्गत काम करणे अवघड होते. अशा पद्धतीचे काम करणारी यंत्रणा टेंडर काढूनही मिळाली असती का, हे माहीत नव्हते. त्यामुळे त्यावेळेस असा निर्णय घेतलेला दिसत आहे की, विभागाला वेगवेगळ्या यंत्रणा एंगेज कराव्या लागतील. खड्डयांसाठी एक यंत्रणा निश्चित करावी लागेल. मोठी रोपे बाहेरच्या नर्सरीतून घ्यावी लागतात असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

गोंदिया जिल्ह्यामध्ये खड्डयांचे काम इ.जी.एस. मधून करण्यात येते. खड्डयांसाठी १ रुपयाही खर्च करीत नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, विभाग कुठलेही टेंडर काढत नाही. एक तर इ.जी.एस. मधून किंवा यातूनच काम करतो. विभागाला कल्पना आहे की, सांगली-कोल्हापूर बेल्टमध्ये एम.आर.ई.जी.एस. खाली करण्यात येते, त्याचप्रमाणे मोठी रोपे बऱ्याचदा राज्यातही मिळत नाहीत असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाला हे योग्य वाटते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, ही एक वेगळी परिस्थिती आहे. विभाग कधीही विभागांतर्गत टेंडर द्वारे काम करीत नाही. विशिष्ट परिस्थिती होती म्हणून त्यावेळेस हा निर्णय घेतलेला आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

१ मीटर लांबी, १ मीटर खोली व १ मीटर रुंदीचा खड्डा खोदण्याकरिता मीटरला काय दर दिला गेला ? जलयुक्त शिवारामध्ये सॉफ्ट स्ट्राटासाठी २७ रुपये घनमीटरचा दर आहे. बी अँड सी च्या सी.एस.आर. मध्ये ८४ रुपये घनमीटरचा दर आहे. येथे विभागाने खड्डे खोदण्याचे काम काय दरने दिले ? ते एस्टिमेटच बी अँड सी प्रमाणे झाले. सी.एस.आर. दर कोणता वापरला, काय मीटर दराने खड्डे खोदायचे काम दिले ? यांनी ८ ठिकाणी काम केले. त्या ८ ठिकाणचे काम ८ वेगवेगळ्या यंत्रणांना दिले. समजा खड्डे खोदायचे असतील तर खड्डे खोदणारी एका ठिकाणी वेगळी यंत्रणा व दुसऱ्या ठिकाणी वेगळी यंत्रणा असे ८ वेळा केले, तसेच ८ ठिकाणी रोपे लावायची होती तर, ती एकाच नर्सरीतून घेतली की, ८ नर्सरीतून घेतली, विभागाने याबाबत नेमके काय केले आहे? बी अँड सी चे कुठले तरी दर वापरले असतील ना ? विभागाने कोणते दर वापरले ? अशी विचारणा समितीने केली असता, मातीचे उत्खनन समृद्धी महामार्गासाठी १५० रुपये घनमीटरने केले जाते. बी अँड सी च्या सी.एस.आर. मध्ये त्याचे दर ८४ रुपये घनमीटर आहेत. तेच काम जलयुक्त शिवारमध्ये असेल तर २७ रुपये घनमीटरने असताना कितीही खोदा तरीही बिलो टेंडर २० टक्के जाते. समृद्धी महामार्गासाठी या सरकारच्या ३ वेगवेगळ्या यंत्रणांनी ३ वेगवेगळ्या प्रकारचे दर दिलेले आहेत. १ घनमीटर माती खोदायची व १०-२० फूटांवर नेऊन टाकायची असे ते काम आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

खड्डे खोदण्याच्या कामाचे दर किती होते, त्याबाबतची माहिती विभागाकडे आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, आता तो तपशिल विभागाकडे नाही. विभागामार्फत तो तपशिल समितीला नंतर देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले. तथापि सदरहू माहिती अप्राप्त आहे.

वन विभागात अशा कामांसाठी टेंडर काढण्याची पद्धतच नाही. परंतु, विभागाने जे दर वापरले त्याचा काही तरी बेस असेल ना ? त्याच्या ०.३ टक्क्यांनी विभागाने कमी केले. जो दर वापरला तो कोणता वापरला हे सांगितले तर विषय संपेल असे समितीने निदेशित केले असता, त्या कामांना त्यावेळेस तांत्रिक मान्यता घेऊनच हे सर्व केलेले आहे. फक्त आता ते दर विभागाकडे नाहीत ते विभागामार्फत नंतर सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

कामाचे तुकडे करून २५-३० लोकांना हे काम देण्यात आले. एका ठिकाणी कमीत कमी ३ लोकांना काम देण्यात आले. अशा प्रकारे २५ लोकांना काम देण्यात आले. एकाच माणसाला ८ ठिकाणी काम देता येत नाही त्यामुळे कामाचे ८ तुकडे करून टेंडर काढले असते तर हा प्रश्न उपस्थित झाला नसता. विभागाने तुकडे करून काम केले. Dept have not done this work departmentally. Dept have given this work on offer-letter basis. This is not proper. विभागाकडून काम करून घेतले असते तर समितीला ते देखील मान्य असते. परंतु, विभागाकडून काम करून घेतले नाही. विभागाने फक्त ऑफर लेटरवर, बिलो सी.एस.आर.वर ०.३ टक्क्यांनी दिले, असे दिसते. समितीच्या मते हे योग्य नाही. विभाग स्वतः काम करु शकतो. त्यात काही अडचण नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, सर्वच केसमध्ये १०० टक्के विभागच काम करते. परंतु, हार्ड स्ट्राटामुळे कामाचे स्वरुप थोडे वेगळे होते असे विभागीय सचिवांनी विदित केले.

बी अँड सी ने हार्ड स्ट्राटामध्येही एस्कलेशनचे दर अंतिम केलेले आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, तेथील हार्ड स्ट्राटा लक्षात घेऊन १ x १ x १ असे खड्डे खोदायचे, उंच रोपे घ्यायची. उंच रोपे हैदराबाद येथून आणावी लागतात. ती महाराष्ट्रात मिळत नाहीत. एकाच व्यक्तीला एका कामाचे सर्व कम्पोनट देणे, या पद्धतीची यंत्रणा नाही. त्यामुळे विशेष प्रसंगामध्ये हा निर्णय घ्यावा लागला असे विभागीय सचिवांनी विदित केले.

दिनांक ११ फेब्रुवारी, १९९३ रोजीच्या वन विभागाच्या शासन निर्णयामध्ये २ लाखांच्या वरच्या कामाचे टेंडर काढावे असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. “Instructions for execution of various construction works in forest department.” असे समितीने निदर्शनास आणले असता, सर्व कन्स्ट्रक्शन वर्क किंवा इतर वर्क हे टेंडर द्वारेच केले जाते. परंतु, हे वृक्षारोपणाचे काम होते. त्यामध्ये विभाग इतर माध्यमातून अजिबात काम करीत नाही, टेंडर द्वारे करीत नाही. ते विभागामार्फतच होते. परंतु, त्या ठिकाणी विशिष्ट परिस्थिती होती असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

It is not just plantation, it is also drip irrigation scheme. त्यामध्ये इतर कामेही आहेत. ते फक्त खड्डे खोदण्याचे काम नव्हते. तेथे जर ठिंबक सिंचन यंत्रणा लावली असेल तर कृषीचा ठिंबक सिंचन लावण्याचा पर हेक्टरचा दर वापरला आहे काय ? बी अँड सी चा सी.एस.आर. एक्सलेशेन दर वापरला आहे काय ? या प्रश्नांचे स्पष्टीकरण आले पाहिजे असे समितीने निदेशित केले असता, यातील जे जे कम्पोनट आहेत मग ते खड्डे आहेत, उंच रोपे आहेत, ठिंबक सिंचनची व्यवस्था आहे, याचे जे दर आहेत हे सर्व त्या त्या तांत्रिक मान्यता घेऊनच केलेले आहे असे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले.

विभागास चौकशी करून कारवाई करण्याची गरज वाटत नसेल तर समितीचे काही म्हणणे नाही असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता, त्यावेळेस जे झाले ते विभागाने समितीसमोर स्पष्ट केले असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

हे जरी त्यावेळेस झालेले असले तरी आता विभागाने तत्कालीन अधिकाऱ्यांवर कारवाई करावी असे समितीने निदेशित केले असता, हे काम विशिष्ट परिस्थितीमध्ये केलेले असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

हे काम विशिष्ट परिस्थितीमध्ये केलेले पहिलेच काम आहे. हे अपवादात्मक परिस्थितीतील काम आहे म्हणून ते केले पाहिजे, असे काही आदेश होते काय? अशी विचारणा समितीने केली असता, वन विभागामध्ये वृक्षारोपणाचे सर्व काम विभागच करतो. कारण यामध्ये श्रम आधारीत काम जास्त असते. ती परिस्थिती वेगळी होती. डोंगराळ भाग होता. हार्ड स्ट्राटा होता. इंजिनिअर्सनी विभागाचे दर लावूनच अंदाजित खर्च (एंस्टीमेट) तयार केला होता. त्यांना तांत्रिक मान्यता मिळालेली आहे. प्रशासकीय मान्यता देऊन हे काम केलेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

हे सर्व काम खास बाब म्हणून विदाऊट टेंडर देण्यात यावे अशी काही ऑर्डर फाईलमध्ये आहे काय ? विशिष्ट परिस्थितीमध्ये खास बाब म्हणून काम करून घ्यावे, असे काही आदेश आहेत काय? वरिष्ठ अधिकाऱ्यांनी फाईल सादर करून असे आदेश घेतले आहेत काय? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता, विभागामार्फत ही बाब तपासून घेऊन माहिती सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले. तथापि अद्यापपर्यंत विभागाकडून माहिती अप्राप्त आहे.

विभागाने अशा प्रकारची ॲक्टिव्हीटी पुढे कोणत्याही परिस्थितीत विदाऊट टेंडर करु नये, अशी समितीची शिफारस आहे. विशिष्ट परिस्थिती असली तरी टेंडर काढण्यास काही हरकत नाही. शॉर्ट टेंडर नोटीस काढावी, असे समितीने सूचित केले असता, विभागाने त्यास सहमती दर्शविली.

**अभिप्राय व शिफारशी :**

**परिच्छेद क्रमांक २.१.९ " CAMPA निधीचे व्यवस्थापन "**

**परिच्छेद क्रमांक २.१.९.१ " CAMPA निधीतून अग्राह्य खर्च "**

**अभिप्राय :**

३.१ पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन आणि योजना प्राधिकरणाची (Compensatory Afforestation Fund Management and Planning Authority-CAMPA) स्थापना वनेत्तर कामाकरिता वळती केलेल्या वनक्षेत्राची क्षतिपूर्ती करावयासाठी वनीकरण आणि पुनर्जीवन कार्ये वाढविणे यासाठी करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरण व वन मंत्रालयाने तयार केलेली मार्गदर्शक तत्त्वे, ज्यानुसार CAMPA निधी, एका संस्थेद्वारे, जी राज्य CAMPA या नावाने राज्यात गठित करावयाची आहे त्यास मंजुरी दिली.

CAMPA च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार CAMPA मधील पैसा मंजुर कामांच्या वार्षिक योजनेनुसार (Annual Plan Of Operations) वने आणि वन्यजीव व्यवस्थापनेचा विकास, परिरक्षा आणि संरक्षण यासाठी वापरावयाचा होता.

पर्यावरण व वन मंत्रालयाच्या राष्ट्रीय CAMPA सल्लागार परिषदेने (National CAMPA Advisory Council - NCAC) सुस्पष्टपणे (जून, २०१०) खर्चाच्या काही बाबी जसे प्रशासकीय खर्च, वन मुख्यालयातील मुलभूत सुविधांना मजबूत करण्याकरिता खर्च, वाहनांच्या पेट्रोल, तेल व वंगण यावरील खर्च कार्यालये/रहिवासी इमारती, वन विश्रांती गृह आणि लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांचे निवासस्थान याचे बांधकाम, दुरूस्ती आणि नूतनीकरण आणि वाहनांची खरेदी यावर CAMPA निधीतून खर्च करणे प्रतिबंधित केले. परंतु CAMPA ची मार्गदर्शक तत्त्वे आणि NCAC चे निर्देश या विरूद्ध प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) [PCCF (HOFF)] ने राज्य CAMPA मधून रु.१६.४९ कोटी निधी मुख्य वनसंरक्षक, पुणे यांना सन २०१०-११ मध्ये पुणे येथे " वन भवन " बांधण्यासाठी त्याचा समावेश सन २०१०-११ च्या कामांच्या वार्षिक योजनेत करून दिला,तसेच एका मंडळ कार्यालयाने (अमरावती) आणि दोन निवडलेल्या विभागांनी राज्य CAMPA निधीतून प्रशिक्षण अकादमी बांधकाम, रस्तेकाम, विश्रामगृहाच्या सुरक्षा भितींचे बांधकाम,विभागीय कार्यालयाची दुरूस्ती आणि सफेदी इत्यादींसाठी रु.२.६६ कोटी रक्कम खर्च केली.याचा परिणाम पर्यायी वनीकरण कार्यक्रमाचा रु.१९.१५ कोटी निधी हिरावून घेण्यात आला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

विभागाने या प्रकरणी असा खुलासा केला की, वार्षिक नियोजन आराखडा सन २०१०-११ हा रु. ८९.०० लक्षचा तयार करण्यात आला असून सदर आरखडयात वनभवन, पुणे इमारतीचा समावेश होता. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत, वार्षिक नियोजन आराखडा सन २०१०-११ ला सुकाणू समिती राज्य कॅम्पा यांच्या दिनांक २० जूलै, २०१० च्या सभेत मान्यता प्रदान करण्यात आली. पुणे येथील वन विभागाची कार्यालये एकत्रित एकाच इमारतीत ठेवण्याच्या उद्देशाने पुणे येथील बांधकामाचे प्रस्तावासह वार्षिक नियोजन आराखडा सन २०१०-११ ला मान्यता प्रदान करण्यांत आली.

खर्चाच्या काही बाबी CAMPA खात्यातून करण्यावर प्रतिबंध करण्याचे NCAC च्या दिनांक २४ जून, २०१० च्या सभेचे इतिवृत्त पाठविण्यापुर्वीच वार्षिक नियोजन आराखडा सन २०१०-११ ला सुकाणू समितीच्या दिनांक २० जुलै, २०१० च्या सभेत मान्यता प्रदान करण्यात आली व सदर काम करण्यात आले.

त्याचप्रमाणे वन कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाची आवश्यकता असून कर्मचाऱ्यांकरिता निवास सुविधा पुरविणे, कार्यालय दुरुस्ती, विश्रामगृहाच्या संरक्षक भिंतीचे काम या सर्व बाबी आवश्यक असल्यामुळे सदर घटकाअंतर्गतची तरतूद ही राज्य कॅम्पाचे ध्येय व उद्दिष्टानूसार आहे, म्हणून त्या कामास मान्यता प्रदान करून निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे असेही विभागाने स्पष्ट केले.

कोणतेही काम कॅम्पाच्या निधीतून घेताना त्याची एक विशिष्ट प्रक्रिया असते. त्यानुसार एपीओ (APO) बनविणे, वार्षिक आराखडा तयार करणे, त्यानंतर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्टेअरींग कमिटीची त्याला मान्यता घेणे व त्यानंतर प्रस्ताव केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाकडे पाठवून मान्यता घेणे ही संपुर्ण प्रक्रिया पार पडल्यानंतर निधी वितरीत केला जातो. त्यावर्षी या कामांची आवश्यकता होती व पुण्यामध्ये विखुरलेल्या स्वरुपात असलेली कार्यालये एकत्र आणणे ही गरज होती त्यामुळे ही कामे कॅम्पा निधीतून करण्यात आली. वार्षिक नियोजन आराखडयातील प्रस्तावित असलेली, विविध प्रकारची कामे वेळीच पुर्ण करणे, कॅम्पा निधीचा पुर्ण विनियोग करणे. कामाचा दर्जा व गुणवत्ता इत्यादी बाबी विचारात घेऊन वार्षिक नियोजन आराखडयातील मंजूर बाबीवरील खर्च पुर्ण करण्याकरिता, कार्यकारी समिती राज्य कॅम्पा यांचे सभेत कॅम्पाचे निधीचे पुर्नविनियोजन करण्यात आले आणि त्याप्रकारचे सन २०१२-१३ अंतर्गत पुर्नविनियोजन प्रस्ताव सुकाणू समिती

राज्य कॅम्पा यांनी दिनांक १२ मार्च २०१३ च्या सभेत मान्यता प्रदान केलेली आहे असेही समितीस स्पष्ट करण्यात आले. यावर महालेखाकारांनी आक्षेप नोंदवित " वन भवन " बांधकामाचा प्रस्ताव मान्य झाला असला तरीही जून, २०१० मध्ये NCAC चे निर्देश प्राप्त झाल्यावर तो परत घेता येऊ शकला असता. तसेच,रू.२.६६ कोटी खर्च पर्यावरण व वन मंत्रालयाच्या पूर्व परवानगीशिवाय करण्यात आला आणि म्हणूनच तो अनियमित असल्याचे नमूद केले.

**शिफारस :**

**३.२ पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन आणि योजना प्राधिकरणाची (Compensatory Afforestation Fund Management and Planning Authority-CAMPA) स्थापना वनेत्तर कामाकरिता वळती केलेल्या वनक्षेत्राची क्षतिपूर्ती करावयासाठी वनीकरण आणि पुनर्जीवन कार्ये वाढविणे यासाठी करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरण व वन मंत्रालयाने तयार केलेली मार्गदर्शक तत्त्वे, ज्यानुसार CAMPA निधी, एका संस्थेद्वारे, जी राज्य CAMPA या नावाने राज्यात गठित करण्यास मंजुरी दिली.**

**CAMPA च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार CAMPA मधील पैसा मंजूर कामांच्या वार्षिक योजनेनुसार (Annual Plan of Operations) वने आणि वन्यजीव व्यवस्थापनेचा विकास, परिरक्षा आणि संरक्षण यासाठी वापरावयाचा होता. त्याचप्रमाणे राष्ट्रीय CAMPA सल्लागार समितीने देखील खर्चाच्या काही बाबी CAMPA खात्यातून करण्यावर प्रतिबंध घातला. तरीही या निधीमधून वनभवनाचे बांधकाम तसेच प्रशिक्षण अकादमीचे बांधकाम, रस्तेकाम, विश्रामगृहांच्या सुरक्षा भिंतीचे बांधकाम व कार्यालयाची दुरुस्ती करण्यात आली, ज्यामुळे CAMPA निधीचा मूळ उद्देशच असफल झाला व CAMPA अंतर्गत येणाऱ्या उद्दिष्टपुर्तीत निश्चितच बाधा निर्माण झाली असे मूळ आक्षेप सदरहू परिच्छेदाच्या अनुषंगाने महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत.**

**समितीने यासंदर्भात विस्तृत छाननी केली असता राष्ट्रीय स्तरावर अस्तित्त्वात असलेल्या सल्लागार परिषदेने कॅम्पा निधीमधून पायाभूत सुविधांची कामे हाती घेऊ नये. तसेच या निधीमधून पायाभूत सुविधांची कामे घेताना राज्य मुख्यालयाची (State Head quarter) कामे घेण्यात येऊ नये. कामे घ्यायची झाल्यास तर ती वनपरिक्षेत्र अधिकारी किंवा त्याखालील स्तरावरील अधिकाऱ्यांचे कार्यालय आणि निवासस्थानासाठी घेण्यात यावीत असे स्पष्ट केलेले असताना या निधीमधून रु.१९.१५ कोटीचे बांधकाम करण्यात आले. विभागाने CAMPA च्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे निश्चितच बंधनकारक आहे. विभागाने यासंदर्भात समितीसमोर स्पष्ट केले की, कुठल्याही मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करण्याचा विभागाचा उद्देश नव्हता. National CAMPA Advisory Council च्या दिनांक २४ जून २०१० रोजीच्या बैठकीचा निर्णय व त्याचे इतिवृत्त सुकाणु समितीच्या सभेत या कामांना मान्यता मिळाल्यानंतर प्राप्त झाले व त्यामुळे हे काम करण्यात आले. तसेच NCAC च्या उपरोक्त बैठकीत "अध्यक्षांनी या सभेमध्ये सांगितले की, कॅम्पाचा निधी हा वन विभागाच्या मुख्यालयाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरिता वापरता येणार नाही. मात्र या निधीचा उपयोग वनपरिक्षेत्र अधिकारी या दर्जापर्यंतच्या क्षेत्रिय कर्मचाऱ्यांसाठी वापरता येईल. तथापि, योजनेत्तर शिर्षाखाली निधीची कमतरता असल्यास या रकमांवर प्राप्त होणाऱ्या व्याजाच्या रकमेतून वन विभागाच्या मुख्यालयी पायाभूत सुविधा निर्माण करता येईल." तथापि, याअनुषंगाने राज्य कॅम्पाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आवश्यक ते बदल करण्यात आले नाही. वास्तविकतः राष्ट्रीय सल्लागार परिषदेची बैठक झाल्यानंतर मार्गदर्शक सूचनांमध्ये त्याअनुषंगाने सुधारणा होणे आवश्यक होते, परंतु ते बदल झाले नाहीत. त्यामुळे कामाची आवश्यकता विचारात घेऊनच ही सर्व कामे केलेली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. यावर समितीने आक्षेप नोंदवित आता कॅम्पाच्या कायद्यामध्येच हा निधी पायाभूत सुविधांसाठी न वापरण्याबाबत स्पष्ट तरतूद आहे. परंतु पुर्वी कॅम्पाचा कायदा व नियम नव्हते, तर फक्त मार्गदर्शक सूचना अस्तित्त्वात होत्या. मुळात कॅम्पाची स्थापना ही वनेत्तर कामाकरिता वळती केलेल्या वनक्षेत्राची क्षतीपुर्ती करावयासाठी वनीकरण व पुनर्जीवन कार्ये वाढविणे यासाठी करण्यात आली. त्यामुळे मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन होणे अभिप्रेत व आवश्यक आहे. तरीही सदरहू निधी वळता करून अन्य कामांसाठी वापरण्यात आला. मार्गदर्शक सूचनांच्या आधारेच ही कामे झाली असल्याचे विभागाचे म्हणणे स्विकारार्ह नाही. राष्ट्रीय सल्लागार परिषदेत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचनांमध्ये अभिप्रेत असलेले आवश्यक ते बदल व सुधारणा करण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणेचीच आहे. परंतु ते करण्यात आले नाही. परंतु या तांत्रिक त्रुटीच्या आधारे विभागाला या कृतीचे समर्थन करता येणार नाही.**

**राज्याने पायाभूत सुविधांसाठी खर्च करायला समितीचा कोणताही आक्षेप नाही व शासकीय कामांची तातडी, महत्त्व व आवश्यकता याबाबतही समितीची कोणतीही वेगळी भूमिका नाही व हे कामे केली देखील पाहिजेत. फक्त हा खर्च CAMPA निधीमधून करणे समर्थनीय आहे किंवा कसे यापुरतीच ही बाब समितीसाठी मर्यादीत आहे. कॅम्पा निधी तयार करण्याचा उद्देश हा अतिशय विशिष्ट स्वरुपाचा असताना त्यातून हा खर्च विभागाने न करता अशा पायाभूत सुविधांसाठी राज्याच्या वार्षिक आराखड्यामधून ही बाब करून घेणे अधिक योग्य ठरले असते. ही कामे राज्याच्या अर्थसंकल्पातून देखील विभागाला करणे शक्य आहे. अशा परिस्थितीत ती कॅम्पा निधीतून करणे म्हणजे त्या निधीचा मुळ उद्देशच बाजुला सारण्यासारखे आहे. विभागाला जर काही कामे पायाभूत सुविधेसाठी करायचे असेल तर त्यांनी राज्याच्या निधीमधून तशी तरतूद करून घेऊन ते काम करणे अभिप्रेत व आवश्यक आहे. परंतु कोणत्याही परिस्थितीत कॅम्पा निधी हा त्यासाठी विहित उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठीच वापरणे आवश्यक आहे व विभागीय प्रतिनिधींनी देखील याची भविष्यात नोंद घेण्यात येईल असे समितीसमोर आश्वासित केले. अतः विभागाने कॅम्पा निधीमधून कामे करताना त्यासाठी विहित प्रयोजनासाठीच हा निधी वापरावा. कॅम्पा निधीतून ज्या बाबींवर खर्च करणे अग्राह्य आहे त्यावर खर्च करण्यास परावृत्त करावे, जेणेकरून पर्यायी वनीकरणाच्या कार्यक्रमाचा निधी हिरावून घेतला जाणार नाही व CAMPA निधीअंतर्गत करावयाच्या उद्दिष्टपुर्तीच्या अंमलबजावणीत कोणताही अडथळा वा बाधा निर्माण होणार नाही. विभागाने ही कामे राज्याच्या अंदाजपत्रकातून तरतूद करून करावीत. तसेच या कॅम्पा निधीमधून करावयाच्या कामांसंदर्भात अधिक स्पष्टता आणण्यात यावी व राष्ट्रीय कॅम्पा सल्लागार परिषदेने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्य कॅम्पाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आवश्यक ते बदल वा सुधारणा वेळोवेळी करून ते अद्ययावत करण्यात यावे व याच्या अंमलबजावणीतील विसंगती कोणत्याही परिस्थितीत टाळावी तसेच सदरहू प्रकरणी मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.९.२ "तदर्थ CAMPA खात्यात राखीव निधी हस्तांतरीत न करणे"**

**अभिप्राय :**

३.३ सर्वोच्च न्यायालयाच्या मे, २००६ मध्ये निदर्शनास आले की CAMPA अद्याप कार्यान्वित झाले नाही आणि त्यांनी जो पर्यंत CAMPA कार्यान्वित होत नाही तोपर्यंत एक तदर्थ संस्था (तदर्थ CAMPA असे संबोधले जाईल) गठित करावयाचे तसेच CAMPA च्या वतीने वसूल करण्यात आलेले सर्व पैसे जे राज्य शासनाच्या विविध कार्यालयांकडे आहे ते तदर्थ CAMPA खात्यात (ज्याचे नियंत्रण पर्यावरण व वन मंत्रालयाकडे आहे) हस्तांतरित करण्याचे आदेश दिले व त्याअनुषंगाने महाराष्ट्र वन विभागाने उपयोगकर्ता संस्थांकडून तदर्थ CAMPA स्थापित व्हावयाच्या आधी मिळालेले आणि राखीव निधीत ठेवलेले सर्व पैसे तदर्थ CAMPA खात्यात हस्तांतरीत करण्यात यावे असे क्षेत्रीय कार्यालयांना आदेश निर्गमित केले. परंतु महाराष्ट्र शासनाच्या वर्ष २०१०-१४ च्या वित्त लेख्याच्या पडताळणीत दिसून आले की, राखीव निधीत जमा केलेले रू.३८.३३ कोटी अद्याप तदर्थ CAMPA खात्यात हस्तांतरीत करण्यात आले नाही. तसेच, निवडलेल्या १३ पैकी सात विभागांत रू.२.०८ कोटी राखीव निधीत ठेवले आहे.यामुळे न केवळ रू.३८.३३ कोटी नऊ वर्षांपेक्षा जास्त कालावधीसाठी निष्क्रिय ठेवण्यात आले परंतु विविध पर्यायी वनीकरण कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी तेवढा CAMPA निधी अथवा त्याप्रमाणात निधी उपलब्धतेपासून राज्य वन विभागास विनावापर वंचित ठेवण्यात आले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. विभागाने ही वस्तुस्थिती मान्य केली आणि रकमेचा मेळ घातल्यानंतर ही रक्कम तद्र्थ CAMPA खात्यात हस्तांतरित करण्यात येईल असेही आश्वासित केले.

त्याचप्रमाणे महालेखाकार यांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये निवडलेले १३ पैकी सात वन विभाग अनुक्रमे अलिबाग, गडचिरोली, जळगांव, सांगली, सातारा, सिरोंचा आणि यावल यांचेकडे रु. २.०८ कोटी रक्कम राखीव निधीत ठेवले असल्याबाबत आक्षेप घेण्यात आले आहे. त्यास अनुसरुन या कार्यालयामार्फत उपरोक्त वन विभागाने कोणत्या कारणास्तव सदर निधी राखीव निधीत ठेवला आहे याची शहानिशा करण्यांत येत असून जर ही रक्कम ॲडहॉक कॅम्पाच्या खात्यात वळती करण्याची गरज असेल तर तशी कार्यवाही तातडीने करण्यांची उपाययोजना करण्यात येईल. केंद्र शासनाच्या दिशा निर्देशानूसार वृक्षतोडी व वन्यजीव कामासाठी लागणारी काही रक्कम विभागीयस्तरावर राखीव निधीत ठेवण्याची तरतूद असून याबाबत खात्री करणे आवश्यक आहे असे विभागाकडून सांगण्यात आले.

**शिफारस :**

**३.४ तदर्थ CAMPA खात्यात राखीव निधी हस्तांतरित न करणे यासंदर्भात सदरहू आक्षेप नोंदविण्यात आले असून यासंदर्भात विभागाद्वारे विदित करण्यात आले की, सन २००५-०६ या आर्थीक वर्षामध्ये CAMPA च्या वतीने वसूल करण्यात आलेली रक्कम महालेखाकार कार्यालय यांचेकडे मुख्य लेखाशिर्ष ८२३५ गौण लेखाशिर्ष २००-पर्यायी वनीकरण याअंतर्गत राखीव निधी मध्ये जमा करण्यात आलेली होती. परंतु ती रक्कम महालेखाकार, नागपूर यांचे कार्यालयामार्फत गौण शिर्ष २००–food grain reserve fund या लेखा शिर्षात दर्शविण्यात आली. त्याअनुषंगाने लेखा शिर्षात दुरुस्ती करून सुधारित लेखाशिर्षात रक्कम वळती करणेबाबत महालेखाकार, नागपूर यांना कळविण्यांत आले जेणेकरून सदरहू रक्कम कॅम्पा कडे वर्ग करण्यात येईल. सदर प्रकरण महालेखाकार कार्यालयाचे स्तरावर अद्याप प्रलंबित आहे.**

**अतः या प्रकरणी कॅम्पा फंडामध्ये निधी हस्तांतरित करण्यासाठीचा प्रस्ताव महालेखाकार कार्यालयाकडे सादर करण्यात आला असून तो विचाराधीन आहे व त्याअन्वये ताळमेळाची कामे पुर्ण करण्याबाबत महालेखाकार, नागपूर यांना विभागाने पत्राद्वारे कळविले आहे. त्यांच्या मंजुरीनंतर हा निधी कॅम्पा फंडामध्ये हस्तांतरित करण्यात येईल असे समितीस सांगण्यात आले. कॅम्पा निधीमध्ये वृद्धी होण्याच्यादृष्टीने व त्या निधीमधून नियमानुसार विदित कामे विभागाला वेळोवेळी पुर्ण करता येणेसाठी हा निधी तातडीने तदर्थ कॅम्पा खात्यात तात्काळ जमा होणे आवश्यक होते. परंतु तो जमा करण्यात आला नाही. अतः हा निधी तात्काळ कॅम्पा निधीमध्ये जमा करण्यात यावा तसेच अलिबाग, गडचिरोली, जळगाव, सांगली, सातारा, सिरोंचा आणि यावल यांचेकडेही राखीव निधीत ठेवलेल्या रु.२.०८ कोटी रकमेची तात्काळ पुर्ण शहानिशा करण्यात यावी व तो निधी तातडीने कॅम्पा निधीत वर्ग करण्यात यावा. तसेच यासंदर्भातील निधीच्या ताळमेळाची प्रकरणे महालेखाकार कार्यालयाकडे विचाराधीन आहेत. या सर्व बाबींचा तातडीने ताळमेळ घालून तात्काळ महालेखाकार कार्यालयाकडे यासाठी पाठपुरावा करून योग्य ते समन्वय ठेवून हा निधी कॅम्पा निधीमध्ये हस्तांतरित करण्यात यावा व भविष्यात असे आक्षेप टाळावेत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.९.३ “निव्वळ विद्यमान मूल्याची वसुली न करणे”**

**अभिप्राय :**

३.५ पर्यावरण व वन मंत्रालयाने (ऑक्टोंबर २००६) सर्व राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांना वन जमीन वनेत्तर प्रयोजनास्तव वळती करण्यात आल्यास निव्वळ विदयमान मूल्य (NPV) वसूल करावयाचे आदेश दिले,या आदेशानुसार ज्या प्रकरणांत, दि.३० ऑक्टोबर,२००२ पूर्वी तत्वतः मंजुरी देण्यात आली होती आणि ज्यासाठी अंतिम मंजुरी दि.३० ऑक्टोंबर,२००२ पूर्वी अथवा त्यानंतर देण्यात आली होती, अशा प्रकरणात सुद्धा निव्वळ विदयमान मूल्य वसूल करावयास पाहिजे. परंतु महाराष्ट्रात ३२ प्रकल्पांत उपभोगी संस्थांनी, ज्यांना ४७८.८१ हेक्टर जमीन वनेत्तर उपयोगासाठी दिली होती व अंतिम मंजुरी ऑक्टोंबर २००२ नंतर देण्यात आली. त्यांनी निव्वळ विद्यमान मूल्याची (NPV) रक्कम रु.३०.१८ कोटी डिसेंबर २०१५ पर्यंत अदा केली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

मा.सर्वोच्च न्यायालयाचे दि. ०३ ऑक्टोबर २००६ चे आदेशानुसार ज्या प्रकल्पांचे वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत चे प्रस्तावांस केंद्र शासनाने दि. ३० ऑक्टोबर २००२ नंतर अंतिम मान्यता दिली आहे. तसेच ज्या प्रस्तावांना तत्वतः मान्यता दि. ३० ऑक्टोबर २००२ पुर्वी प्राप्त झाली होती व अंतिम मान्यता दि. ३० ऑक्टोबर २००२ नंतर देणेत आली आहे, अशा सर्व प्रस्तावांत यंत्रणेकडून नक्त वर्तमान मूल्य (Net Present Value) वसूल करणे आवश्यक आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाचे दि. ०३ ऑक्टोबर २००६ चे आदेशाची अंमलबजावणी पूर्वलक्षी प्रभावाने असल्यामुळे याबाबत वनविभागाकडून विशेष कार्यक्रमानूसार अशी रक्कम मंजूर करण्याची कार्यवाही करणे क्रमःप्राप्त ठरते. त्यानुसार सन २००८-०९ मध्ये असे सर्व प्रस्तावांच्या व त्यात शिल्लक असलेल्या वसूल करावयाच्या नक्त वर्तमान मुल्याचा आढावा घेण्यात आला. त्यानूसार सुमारे १९० प्रस्तावांमध्ये रु.२११.४१ कोटी थकीत नक्त वर्तमान मुल्य वसुलीपैकी एकूण ३२ प्रकरणांमध्ये रु.३०.१८ कोटी नक्त वर्तमान मुल्यांची रक्कम वसूल करावयाची प्रलंबित राहिली असून त्याबाबत विभागाकडून पाठपुरावा सुरू आहे. तसेच केंद्र शासनाचे निर्देशाप्रमाणे प्रलंबित नक्त वर्तमान मुल्य अदा न केल्यास त्यांचे प्रकल्पाची मान्यता रद्द करण्यात येवू शकते असेही प्रकल्प यंत्रणेला कळविल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर स्पष्ट केले.

वन जमीन वनेत्तर प्रयोजनासाठी वळती करणेसंदर्भातील कार्यवाही दोन टप्प्यात होत असून टप्पा-१ मध्ये संबंधित यंत्रणा यासंदर्भातील प्रस्ताव सादर करून तो उप वनसंरक्षक, मुख्य वनसंरक्षक, प्रधान मुख्य वनसंरक्षक मार्फत राज्य शासनाची शिफारस करून केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येतो. या टप्पा-१ ला केंद्र शासनाकडून अटी शर्ती विहित करून मान्यता देण्यात येते. ज्यात निव्वळ विद्यमान मुल्य भरावे व जमीन द्यावी या देखील अटीचा समावेश असतो. टप्पा-१ ची १०० टक्के पुर्तता झाल्याशिवाय टप्पा-२ ची परवानगीच देता येत नाही. याचाच अर्थ निव्वळ विद्यमान मुल्य भरल्याशिवाय टप्पा-२ पुर्णच होवू शकत नाही व त्यास अंतिम मंजुरी मिळू शकत नसताना ही प्रक्रिया

विभागाने मुल्य वसूल न करता पुर्ण केली. परिणामी अशाप्रकारे मोठ्या प्रमाणात थकबाकी राहिली. टप्पा-१ ची मान्यता घेवून निव्वळ विद्यमान मुल्य भरल्यानंतरच टप्पा-२ ची मान्यता घेणे आवश्यक व अभिप्रेत असताना त्याची पुर्तता झालेली नाही. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी पुर्वलक्षी प्रभावाने करणे आवश्यक ठरल्यामुळे ही वसुली प्रलंबित राहिली व ही फार जुनी प्रकरणे असल्याचे समितीसमोर विभागीय प्रतिनिधींनी मान्य केले. अतः नियम अस्तित्वात असताना त्याची काटेकोर पद्धतीने अंमलबजावणी झाली नाही ही वस्तुस्थिती आहे.

**शिफारशी :**

**३.६ (१) निव्वळ विद्यमान मुल्याची वसुली न करणे संदर्भात महालेखाकारांनी सदरहू आक्षेप नोंदविलेले आहेत. वन जमीन वनेत्तर प्रयोजनासाठी वळती करावयाची असल्यास तीन प्रकारची रक्कम भरणे आवश्यक असते. जेवढी जमीन वन क्षेत्राखाली होती त्याच्या बदल्यात तेवढी वनेत्तर जमीन त्यांना द्यावी लागते. तसेच त्या जमिनीवर वृक्षारोपणासाठी आवश्यक असलेली किंमत द्यावी लागते. त्याचप्रमाणे जी जागा विभाग वळती करतो त्या जागेचे निव्वळ विद्यमान मुल्य (NPV) द्यावे लागते व हेच निव्वळ विद्यमान मुल्य दिलेले नाही. या प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हा पुर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आल्यामुळे याअंतर्गत एकूण वसूलपात्र रु.३०.३२ कोटी रकमेपैकी सद्यःस्थितीत रु.१८.१९ कोटी इतकी वसुली प्रलंबित असून शासनाच्या संबंधित विभागांकडे यासंदर्भात पाठपुरावा सुरू असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.**

**वास्तविकतः या सर्व जमिनी शासकीय प्रकल्पांतर्गत शासनाच्याच अन्य विभागाला दिलेल्या आहेत. त्यामुळे शासकीय विभागांकडून करावयाच्या या वसुली संदर्भातील विषय शासनस्तरावरुनच आतापर्यंत निकाली निघणे आवश्यक होते. हा निधी केंद्र शासनाकडील तदर्थ कॅम्पा फंडमध्ये भरावा लागतो व तेथून तो प्रत्येक राज्याला वितरीत होत असतो. राज्य शासनाच्या स्तरावरुनच विभागांतर्गत समन्वय, नियोजनानेच ही संपुर्ण कार्यवाही पार पाडणे आवश्यक असताना वास्तविकतः महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदवेपर्यंत ही प्रकरणे शासनस्तरावर प्रलंबित ठेवणे हे निश्चितच उचित नाही. राज्य व केंद्र शासनाच्या स्तरावरील ही अंतर्गत बाब असतानाही त्याची पुर्तता व पालन योग्यरित्या झाले नाही, परिणामी हे आक्षेप नोंदविण्यात आले. सन २०१६ मध्ये कॅम्पाचा कायदा व नियमच अस्तित्वात आल्यामुळे त्याचे पालन करणे आता बंधनकारकच आहे. टप्पा-१ नंतर १०० टक्के पुर्तता झाल्याशिवाय टप्पा-२ ची परवानगीच देण्यात येत नाही. त्यामुळे भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती होणे शक्य नाही. परंतु या आक्षेपित प्रकरणांमध्ये मात्र टप्पा-१ ची पुर्तता न करताच टप्पा-२ ची मंजूरी देण्यात आली जे निश्चितच कायदेशीर व समर्थनीय नाही. त्यामुळे केवळ प्रलंबित वसुली वसुल करण्यापुरतेच हे प्रकरण मर्यादित आहे. अतः सदरहू प्रकरण राज्य स्तरावरील निरनिराळ्या विभागांतर्गत हाताळावयाचे असल्यामुळे विभागीय प्रतिनिधींनी संबंधित विभागाच्या सचिवांसमवेत एकत्रित समन्वय ठेवून ही अंदाजित रु.१८.१९ कोटी इतकी वसुलपात्र रक्कम कालबद्ध पद्धतीने वसुल करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**(२) तसेच हा निधी केंद्र शासनाच्या कॅम्पा निधीमध्ये जमा होऊन तो पुन्हा राज्यांनाच प्राप्त होणारा असतो व नविन कायद्यानुसार ९० टक्के निधी राज्याला परत देण्यात येतो व १० टक्के निधी केंद्र शासनाकडे ठेवण्यात येतो. याअनुषंगाने सद्यःस्थितीत राज्याला प्राप्त व्हावयाची रक्कम ही थोडी थोडकी नसून तब्बल रु.३,०५० कोटी एवढी थकबाकी आहे. ही थकबाकीची रक्कम केंद्र शासनाकडून राज्य शासनाला प्राप्त होणेबाबतची प्रक्रिया सुरू असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. अतः केंद्राकडून राज्य शासनाला प्राप्त व्हावयाच्या निधीसंदर्भात तातडीने वरिष्ठ स्तरावरुन पाठपुरावा करण्यात येऊन ही रक्कम राज्य शासनाकडे प्राप्त करून घ्यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.१० "महसुलाची हानी"**

**परिच्छेद क्रमांक २.१.१०.१ "बांबूचे समुपयोजन न केल्यामुळे हानी"**

**अभिप्राय :**

३.८ कार्य नियोजनानुसार बांबू कूपांचे तीन पातन मालिकांत विभाजन केले जाते आणि प्रत्येक पातन मालिका कापणी दर तीन वर्षाने नियत असते. बांबू कूपाची कापणी न झाल्यामुळे नवीन कोंब जे तीन वर्षानंतर कापणी करणे योग्य होतात. त्यांना पुनर्जीवित होण्यास अडथळा येतो. निवडलेल्या १३ पैकी चार विभागांत कार्य नियोजनात नेमल्याप्रमाणे सन २०१०-१५ दरम्यान बांबूची कापणी करण्यात आली नाही. त्यामुळे कापणीसाठी नियत क्षेत्र आणि प्रत्यक्ष कापणी केलेले क्षेत्र यांची तुलना करता त्यात २३ ते ९४ टक्के तूट होती. परिणामी सन २०१०-१५ दरम्यान रू.३७.५२ कोटी अंदाजित महसुलाची हानी बांबूची कापणी न झाल्यामुळे झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

यासंदर्भात विभागाने विदित केले की, बांबू मुख्यतः चंद्रपूर आणि गडचिरोली वन मंडळात आहे. जे असामाजिक घटकांनी प्रभावित आहेत. परिणामी, त्यांच्यामुळे बांबूच्या कापणीच्या कामात अडथळे येतात. आणि काही वेळा तर काम बंद करावे लागते. या अडचणी असतानाही तेथे बांबू चोरीच्या कोणत्याही घटना नाहीत आणि वाढून राहिलेले बांबू अप्रभावित राहिले आहेत, आणि भविष्यात कधीही कापणीसाठी नेहमी उपलब्ध आहे. म्हणूनच येथे शासनास कोणतीही हानी होत नाही. विभागाचे उपरोक्त स्पष्टीकरण महालेखाकारांनी अमान्य केले व स्पष्ट केले की, माहे जानेवारी, २०१५ पर्यत महाराष्ट्र वन विभागात ८९० वनपाल आणि वन रक्षकांची कमतरता होती. जर पुरेसे कर्मचारी वर्ग तेथे नियुक्त करण्यात आले असते तर असामाजिक तत्त्वांची अडचण बऱ्याच प्रमाणात सोडविता आली असती आणि या क्षेत्रातील बांबूची अबाधित कापणी सुद्धा शक्य झाली असती.

महाराष्ट्र वन विभागाने फेब्रुवारी,२०१५ मध्ये तयार केलेल्या संक्षिप्त अहवालावरून असे निर्देशित होते की, कर्मचाऱ्यांच्या कमी नियुक्तीमुळे रू.४२.६५ कोटी आणि रू. १.०९ कोटीची हानी अनुक्रमे वृक्षांच्या अवैध कापणीमुळे आणि आगीच्या घटना घडल्यामुळे झाली. याशिवाय ७१.८७६ हेक्टर वन क्षेत्रसुद्धा अतिक्रमणाखाली होते आणि जर एखाद्या वर्षात एका पातन मालिकेतील बांबूची कापणी झाली नाही तर त्या पातन मालिकेची कापणी तीन वर्षानंतरच करण्यात येऊ शकते. ज्यामुळे बांबूच्या दर्जात ऱ्हास होवून महसूलावर हमखास प्रभाव पडतो असेही महालेखाकारांनी विदित केले.

यासंदर्भात विभागाने खुलासा केला की, गडचिरोली जिल्ह्यात एकूण मंजूर पदांपैकी ९५% वनरसंरक्षक कार्यरत आहेत. त्यामुळे पदांची कमतरता तेथे नाही. परंतु नक्षलवादासारख्या गंभीर समस्यामुळे तेथे वन विभागाच्या कामावर प्रतिकूल परिणाम होतो. गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवादाच्या तसेच यंत्रसामुग्रीची जाळपोळ, वन कर्मचाऱ्यांना मारहाणीच्या घटना तिथे नियमित घडतात. परिणामी तेथील कर्मचाऱ्याच्या होणाऱ्या मानसिक खच्चीकरणाचा परिणाम कूप कामावर सुद्धा झाला. तसेच मे.बिल्ट व महाराष्ट्र शासन यांच्यात सन २००४ मध्ये १० वर्षाकरिता बांबू पुरवठा करण्याबाबत करार करण्यात आला होता. परंतु सन २००९ मध्ये बांबू पुरविण्याचे सुधारीत दराबाबत एकमत न होऊ शकल्यामुळे त्या विरुद्ध सदरहु कंपनीने न्यायालयात याचिका दाखल केली व न्यायालयाने यात सन २००९-१० या वर्षासाठी दर निश्चित करून दिले. परंतु बांबू तोडणीसाठी शिल्लक राहिलेला कमी कालावधी व नक्षलवादी समस्या यामुळे सन २०१३-१४ पर्यंत या बांबूचे उत्पादन नगण्य होते व त्यानंतर पेसा कायदा लागू झाल्यामुळे हे अधिकार ग्रामसभांना गेले. आता पेसा कायद्याच्या अनुषंगाने दिनांक १९/०८/२०१४ रोजी अधिसूचना जारी करून अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांना बांबू निष्कासनाचे अधिकार प्रदान करण्यात आलेत. यामुळे सन २०१४ पासून अनुसूचित क्षेत्रात वन विभागाला बांबू निष्कासनाचे अधिकार नाही. त्यामुळे हा प्रश्न उद्‌भवणारा नसून ती आता त्या-त्या ग्रामसभांची जबाबदारी असल्याचे विभागाने समितीसमोर स्पष्ट केले.

गडचिरोली, चंद्रपूर या भागात मोठ्या प्रमाणात वनसंपदा आहे. नक्षली कारवाया, रिक्त पदे, अवैध कापणी, आगीच्या घटना अशा अनेक अडचणी त्या भागात आहेत. तरीही शासनाने बांबूच्या संदर्भात अनेक नविन धोरणे अंगीकारली आहेत. पहिले बांबू हा केवळ वन विभागापूरता मर्यादित असल्यामुळे त्याच्यावर बरीच बंधने होती व त्यास टिपी लागू होता. परंतु आता केंद्र शासनाने बांबू हा ग्रास असून टिंबर नाही अशी व्याख्या करून बांबू टिपीमुक्त केल्यामुळे त्यास परवानगीची गरज नाही व शेतकऱ्यांच्या शेतामध्ये देखील तो लावता येतो. वन क्षेत्रामध्ये बांबू असेल तर त्यास वन विभागाची परवानगी लागते. पण शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात जर बांबू लावला असेल तर त्याच्या कापणीसाठी कोणत्याही परवानगीची गरज नाही. आग व अवैध कापणी संदर्भात विभागाने अनेक उपाययोजना केल्या असून त्यात टोल फ्री क्रमांक सुरू करून त्याअनुषंगाने प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर ४८ तासांच्या आत कारवाई करण्यात येते. तसेच अवैध कापणीवर व आगींवर देखील विभागामार्फत कारवाई करण्यात येते. यासाठी नागपूर येथे कमांड कंट्रोल रुम देखील तयार करण्यात आली आहे. ज्याचे संनियंत्रण विभागामार्फत करण्यात येऊन अनेक अनियमित बाबींवर नियंत्रण मिळविणे व भविष्यात अशा बाबींवर आळा घालण्यासाठी निश्चितच मदत होते. तसेच गडचिरोली येथे आदिवासी समाजाचे वन साधन संपत्तीवर अवलंबन घटविणे, पर्यायी रोजगार संधी निर्माण करणे आणि पर्यावरणाचे संरक्षण करणे यासाठी पुढाकार घेऊन अनेक उपक्रम राबविले. या उपक्रमांत आदिवासी समाजाद्वारे उदबत्ती निर्मिती व विक्री, व्यवसाय प्रशिक्षण, ऊर्जा संवर्धन कामे (सौर दिवे) धूररहित चुल्हे इत्यादी समाविष्ट आहे. तसेच, गस्तीस जास्त प्रभावशील करण्यासाठी महाराष्ट्र वन विभागाने ६,४१५ वैयक्तिक डिजीटल सहाय्यक (Personal Digital Assistance-PDA) उपकरणे खरेदी केली आणि ती वनपालांना दिली ज्यामुळे झाड पाडणे, शिकार करणे, अतिक्रमण, आगीच्या घटना, चोरी इत्यादी वन अपराध घडल्याचे आढळल्यास ते लगेच ई-मेल आणि संदेशाद्वारे उच्च अधिकाऱ्यांस कळविणे त्यांना शक्य होईल. डिसेंबर, २०१५ पर्यंत सुमारे ६,८०० अपराध वैयक्तिक डिजीटल सहाय्यक वर नोंदवण्यात आले आणि उच्च अधिकाऱ्यांस कळविण्यात आले असेही समितीस सांगण्यात आले.

**शिफारस :**

**३.९ वन उत्पादन राज्याच्या सामाजिक आर्थिक विकासात एक महत्वपूर्ण भाग अदा करतो. ग्रामीण लोक जे वन क्षेत्रात आणि त्या आसपासच्या विभागांत राहतात. त्यांच्या वाजवी गरजा भागविण्याव्यतिरिक्त, वन उत्पादनाच्या विक्रीतून राज्य राजकोषात मोठया प्रमाणात निधी येतो. इमारतीचे लाकूड, इंधन लाकूड, बांबू आणि इतर बरीच अकाष्ठ वन उत्पादने जसे तेंदु पत्ता, मोहफुले इत्यादीही महत्वाची वन उत्पादने आहेत. ज्याच्या माध्यमातून विभागाला मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होत असतो. परंतु सदरहू प्रकरणी बांबूचे समुपयोजन न केल्यामुळे बांबू संवर्धनात मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष झाल्यामुळे झालेली तुट व महसूलाची हानी यासंदर्भात महालेखाकारांनी सदरहू आक्षेप नोंदविलेले आहेत.**

**सदरहू आक्षेप सन २०१०-१४ या कालावधीतील असून गडचिरोली जिल्ह्यातील ८०% भाग अनुसूचित क्षेत्रात येत असून यामध्ये जिल्ह्यातील १३९४ गावांचा समावेश होतो व तेथील बहुतांश भागात नैसर्गिक साधनसंपत्ती विपुल प्रमाणात आढळते. आता पेसा कायद्यांतर्गत सन २०१४ पासून तेथील ग्रामसभांना बांबू निष्कासनाचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. परंतु त्यावेळी तसे अधिकार नव्हते. याअगोदर वन विभागामार्फतच या बांबूची कापणी होत होती. परंतु ही कमी झाल्यामुळे महसूलात तूट झाली असे आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. मुख्यतः गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यात अशी प्रकरणे झाल्याचे दिसून येते. गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात नक्षलवादी कारवाया होत असून त्यात जाळपोळ, शासकीय मालमत्तेचे नुकसान व वन कर्मचाऱ्यांवर हल्ले देखील यातून होत असतात. या बांबूच्या वनांमध्ये नक्षलवाद्यांना लपण्यासाठी जागेचा उपयोग होत असल्यामुळे हे बांबू तोडण्यासाठी त्यांचा विरोध असतो व त्यामुळेच ही कापणी कमी होते. नक्षलग्रस्त विभाग म्हणून गडचिरोली संदर्भात येणाऱ्या अडचणी काही प्रमाणात समितीला मान्य आहेत. परंतु चंद्रपूरमध्ये नक्षलवादी कारवाया नसतानाही तेथे देखील ही तूट झाल्यामुळे निश्चितच शासनाच्या महसूलाचे नुकसान झाले आहे. इतकेच नव्हेतर कापणी न झाल्यामुळे बांबूच्या दर्जात ऱ्हास होवून बांबूच्या पुढील वाढीला देखील बाधा आली. बांबू कापणीसाठी वन विभागाने जे उद्दिष्ट ठरविले ते निश्चितच साध्य झाले नाही. त्यातच वन विभागात मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असल्यामुळे देखील या कामावर त्याचा परिणाम झाल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.**

**उत्पादनामध्ये झालेल्या त्रुटी संदर्भात नक्षलवाद, रिक्त पदे ही कारणे नक्कीच आहेत याबाबत समितीचे दुमत नाही. परंतु मे.बिल्टला वेळेवर कार्यादेश न देणे, त्यांचे दर वेळेत निश्चित न करणे, प्रक्रिया राबविण्यात झालेला विलंब ही देखील कारणे कमी उत्पादनास कारणीभूत आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. त्याचप्रमाणे अवैध कापणी, अतिक्रमण व आगीच्या घटनांमुळे देखील कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले आहे. अवैध वृक्षतोडीवर विभागाचे कोणतेही नियंत्रण नाही. इतकेच नव्हेतर कापणीचे आर्थिक मुल्यमापन किंवा दर हेही विभागच ठरवित असते. कापणी केलेले लाकूड हे कित्येक पटीने जास्त किंमतीचे असताना अधिकाऱ्यांच्या संगनमताने ते कमी दर्शविण्यात येणे या देखील अनियमितता घडतात. वन अधिकाऱ्यांच्या संगनमताशिवाय अशा बाबी तेथे घडूच शकत नाही. यासंदर्भात महालेखाकारांनी शासनास झालेल्या नुकसानीची नोंदविलेली रक्कम पाहता विभागाने हा विषय गांभीर्याने हाताळणे आवश्यक होते असे समितीचे स्पष्ट मत आहे.**

**विदर्भात बांबूचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात असल्यामुळे त्याचे संगोपन, त्यावर प्रक्रिया, त्यातून तयार करण्यात येणारे निरनिराळे उत्पादन व त्याअनुषंगाने मोठ्या प्रमाणात प्राप्त होणारा महसूल पाहता महसूल हानी टाळण्याकरिता वन उत्पादनाची कापणी योग्यवेळी करावी व विभागाने या आक्षेपांची गंभीर दखल घेऊन त्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी भविष्यात आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच बांबूची कापणी, त्याची दर निश्चिती प्रक्रिया, उत्पादन, विक्री इत्यादी सर्व बाबींसंदर्भात अधिकाधीक पारदर्शकता ठेवण्याच्यादृष्टीने उपाययोजना करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.१०.२ "चुकीच्या धारणा किंमतीचा (Upset Price) अवलंब"**

**अभिप्राय :**

३.१० महसूल व वन विभागाने निर्गमित केलेल्या (नोव्हेंबर, १९८०) शासन निर्णयानुसार मुख्य वन संरक्षकाने त्यांच्या अखत्यारीतील प्रत्येक विक्री डेपोसाठी इमारती लाकडाच्या प्रत्येक प्रजाती आणि दर्जाची वर्ष निहाय दर अनूसुची तयार करून लिलावासाठी धारणा किंमत (Upset Price) निश्चित करण्यासाठी सूचित करावयास पाहीजे. जर इमारती लाकडाच्या मागील लागोपाठ तीन लिलावांतील प्रत्यक्ष विक्री किंमतीची सरासरी, दर अनुसूचीनुसार ठरविण्यात आलेल्या किंमतीपेक्षा जास्त असेल तर सरासरी विक्री किंमत ही लिलावासाठीची धारणा

किंमत असेल. परंतु मुख्य वनसंरक्षक गडचिरोली यांनी सागवान लाकडाच्या प्रत्येक प्रजाती आणि दर्जाची दर अनुसूची तयार करून त्यांच्या अधिपत्याखालील विक्री डेपोना कळविण्यास सहा ते आठ महिन्यांचा विलंब केला. परिणामी, सन २०११-१४ मध्ये करण्यात आलेल्या ७,३२३.६४ घनमीटर सागवान लाकडाच्या लिलावासाठी वनसंरक्षक, परिवहन व पणन विभाग बल्लारशा यांनी मागील वर्षाच्या दर अनुसूचीनुसार धारणा किंमत निश्चित केली जी त्या वर्षाच्या लिलावासाठी लागू असणाऱ्या चालू दर अनुसूची पेक्षा आणि इमारती लाकडाच्या प्रत्यक्ष विक्री किंमतीच्या मागील लागोपाठ तीन लिलावांच्या सरासरीपेक्षा कमी होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

तसेच लेखापरिक्षेने सन २०१०-१५ मधील ११३ लिलावांपैकी यादृच्छिकरित्या निवडलेल्या नऊ लिलावांत जरी मागील तीन लागोपाठच्या लिलावांतील इमारती लाकडाच्या प्रत्यक्ष विक्री किंमतीची सरासरी दर अनुसूचीपेक्षा जास्त होती तरी वन संरक्षक, परिवहन व पणन विभाग बल्लारशा यांनी लिलावासाठीची धारणा किंमत सरासरी किंमतीपेक्षा कमी निर्धारित केली. विक्री नोंदवह्यांची आणखी तपासणी केल्यावर निदर्शनास आले की लिलावातून प्राप्त झालेले अंदाजित विक्री उत्पन्न हे सरासरी विक्री किंमत लागू केली असता मिळाले असलेल्या अंदाजित उत्पनापेक्षा कमी होते. यामुळे नऊ लिलावांत रू.१.२६ कोटी महसूलाची हानी झाली. लेखापरिक्षेने चाचणीसाठी निवडलेला नमूना मोठा असता व त्याची पडताळणी करण्यात आली असती तर परिगणित केलेली हानी यापेक्षाही जास्त असती असेही आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

लिलावासाठीची धारणा किंमत फक्त बोलीदाराने नमूद केलेल्या दराच्या मंजुरीसाठी मार्गदर्शकपर होती आणि म्हणूनच खुल्या लिलावात बोलीदाराने देवू केलेल्या दरांसोबत दर अनुसूचीचा काहीही संबंध नव्हता. तसेच जरी चुकीच्या पद्धतीचा अवलंब करून लिलावासाठीची धारणा किंमत करण्यात आली असली तरीही हानीचे अनुमान त्या किंमतीच्या आधारावर काढता येऊ शकत नाही. तथापि वनसंरक्षक (परिवहन व पणन) बल्लारशा यांना योग्य पद्धती अवलंबविण्याच्या सूचना जारी केल्या आहेत असे विभागाने समितीसमोर स्पष्ट केले.

विभागाने पुढे असाही खुलासा केला की, खुल्या लिलावात लाकडाची किंमत बाजारात चालू दराप्रमाणे मिळते. खरेदीदारांना धारणा किंमत माहिती राहत नसल्याने लाकडाची मिळणारी किंमत धारणा किंमतीवर आधारित राहत नाही. त्यामुळे धारणा किंमत चुकीची लावल्यामुळे शासनाचे नुकसान झाले असा निष्कर्ष काढणे संयुक्तिक नाही. तथापि, अनुसूचि दर वेळेवर लावण्याबाबत तसेच प्रचलित नियमाप्रमाणे धारणा किंमत ठरविण्याचे निर्देश संबंधितांना दिले असल्याचेही विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

**शिफारस :**

**३.११ सदरहू प्रकरणी लिलावासाठी वेळेवर आणि योग्य दरपत्र निश्चित न केल्यामुळे कमी धारणा किंमत (Upset Price) निश्चित करण्यात आली असे आक्षेप सदरहू परिच्छेदात नमूद करण्यात आले आहेत. विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मागील ३ वर्षातील विक्रीची सरासरी घेऊन त्यानुसार अपसेट प्राईज निश्चित करणे आवश्यक व अभिप्रेत होते. परंतु ते करण्यात आले नाही व त्यामुळे शासनाच्या महसूलाचे नुकसान झाले.**

**त्याअनुषंगाने विभागामार्फत सूचना देवून कारवाई करण्याबाबत समितीसमोर मान्य व आश्वासित केले. धारणा किंमत निश्चिती करताना शासनाच्या यासंदर्भातील सूचनांचे पालन केले नाही, त्याचप्रमाणे एसओआर देखील ६ ते ८ महिन्यांच्या विलंबाने निर्धारीत करण्यात आले. चोरी किंवा अन्य प्रकरणी निर्धारणाच्या आधारासाठी एसओआर हे उपयुक्त असल्यामुळे त्याचे निर्धारण नियमितरित्या व अविलंब करणे आवश्यक असतानाही त्यास विलंब झाला. विभागाकडून येणारा एसओआर वेळेत न आल्यामुळे मागच्या वर्षीच्या एसओआरच्या आधारावर ही निर्धारणा करण्यात आली हा देखील आक्षेप आहे. वास्तविकतः एसओआर व धारणा किंमतीचा आपसात काहीही संबंध नाही. एस.ओ.आर. विलंबाने आला पण मागील ३ वर्षाचे विक्रीची सरासरी वा मागील वर्षाच्या एस.ओ.आर. प्रमाणे जी किंमत जास्त असेल ती घेणे क्रम:प्राप्त होते. आता हा एसओआर निश्चित करण्यात आला आहे तसेच सन २०१६ पासून संपुर्ण लिलाव हे ई-लिलाव पद्धतीने होत असून त्यात संपुर्ण देशातील व्यापारी भाग घेतात. त्यामुळे आता अपसेट प्राईजला तसा काहीच अर्थ राहिलेला नाही. ई-लिलावामुळे पहिल्यापेक्षा २० ते २५ टक्के जास्त दर आता मिळालेला आहे. विभागाने आता अवलंबिलेली कार्यपद्धती निश्चितच सुधारणात्मक आहेत. परंतु सन २०१०-१४ दरम्यानच्या व्यवहारासंदर्भात महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेपांची दखल देखील विभागाने घेणे आवश्यक आहे. या कालावधीत विभागाने मागच्या ३ निविदांची सरासरी न घेता सन २०१३ मधील एसओआर ग्राह्य धरुनच धारणा किंमत काढली. परिणामी त्याअनुषंगाने शासनाच्या झालेल्या महसूलाच्या नुकसानीची गणना करण्यात यावी व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी असे समितीने निदेश दिले असता बल्लारशा डेपोमध्ये झालेल्या या बाबीची चौकशी करण्यात येईल असे समितीस आश्वासित करण्यात आले. वास्तविकतः चुकीच्या पद्धतीचा**

**अवलंब करून लिलावासाठीची धारणा किंमत निश्चित करण्यात आली असली तरीही हानीचे अनुमान त्या किंमतीच्या आधारावर काढता येवू शकत नाही. तथापि, योग्य पद्धती अवलंबिण्याच्या सूचना वनसंरक्षक, बल्लारशा यांना दिलेल्या असून अशा घटना पुढे होवू नये असेही निर्देश देण्यात आल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. अतः महालेखाकारांनी नोंदविलेल्या या आक्षेपाच्या अनुषंगाने झालेल्या नुकसानाचे पुर्ण मुल्यांकन करावे व यात जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करून १५ दिवसाच्या आत समितीस कळविण्यात यावे असे समितीने निर्देश दिले असता विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली असतानाही सदर माहिती अद्यापही विभागाकडून अप्राप्त आहे. अतः या प्रकरणी तात्काळ कारवाई करून केलेल्या कारवाईची माहिती समितीस १ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.१०.३ "आरा गिरणीच्या कमी वापरामुळे हानी"**

**अभिप्राय :**

३.१२ वन विभागाकडे १९६४ पासून आलापल्ली येथे एक आरा गिरणी कार्यान्वित आहे या गिरणीत १० "आरा" यंत्रे आहेत. ज्यापैकी फक्त तीन चालू स्थितीत असून त्यांची क्षमता प्रति दिन ४.५ घनमीटर लाकूड कापण्याची आहे. सन २०१०-१५ मध्ये ही आरा गिरणी ०.७१ घनमीटर प्रति दिन या दराने परिचलित होती आणि महसूल वसूली केवळ रू.०.२१ कोटी होती जेव्हा की याच काळात प्रचालन खर्च रू.२.४४ कोटी होता. सन २०१०-१५ दरम्यान आरा गिरणीच्या झालेल्या कमी वापरामुळे रू.२.२३ कोटीची हानी झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

गडचिरोली जिल्ह्यातील आलापल्ली या अत्यंत दुर्गम भागात जंगलात लाकडाचे काम करण्यासाठी कोणतीही सुविधा नव्हती. त्यामुळे विभागाने तेथे सन १९६४ मध्ये एक आरा गिरणी उभारली. त्यावेळेस तेथे येणाऱ्या लाकडाची किंमत फार कमी होती. ते त्या आरा गिरणीमध्ये कापून बाहेर पाठविण्यासाठी वाहतूक खर्च देखील कमी होता. त्यामुळे या आरा गिरणीला त्यावेळी खूप मागणी होती. त्यामुळे विभागाने तेथे आणखी १० आरा यंत्रे कार्यान्वित केली. परंतु कालांतराने या गिरणीचा वापर कमी झाला व सद्यःस्थितीत १० पैकी केवळ १ ते २ आरा यंत्रे सुरू असून उर्वरित सर्व यंत्रे बंद पडलेली आहेत. इतकेच नव्हेतर या आरा गिरण्यांचे दर देखील आता वाढविण्यात आल्यामुळे त्याचा वापरही कमी होत आहे. परंतु या आरा गिरण्यांचा वापर होत नसतानाही आजतागायत तेथील कर्मचारी मात्र तेथे कायमस्वरुपी कार्यरत आहेत. आरा गिरणीला कोणतेही उत्पन्न नसून तेथील कर्मचाऱ्यांचा पगार नियमितरित्या सुरू आहे, ही देखील बाब अनाकलनीय आहे. परिणामी या कर्मचाऱ्यांच्या वेतनाची संपुर्ण जबाबदारी शासनावर आहे. परंतु तेथे उत्पन्न मात्र काहीही नाही.

**शिफारस :**

**३.१३ आलापल्ली क्षेत्र हे नक्षल प्रभावित असून या भागातील लोकांची आजिविका वनावर आधारित आहे. स्थानिक नागरिक लिलावाद्वारे इमारती माल विकत घेतात आणि त्याद्वारे ते आपले लहान फर्निचर मार्ट चालवितात. या भागातील जवळपास ५० हून अधिक फर्निचर दुकाने या आरा गिरणीवर आधारित आहेत. त्याचप्रमाणे आलापल्ली येथील तंत्र शिक्षण महाविद्यालयात विशेषतः सुतारकामाचे प्रशिक्षण दिले जाते. सुतारकामावर आधारित व्यवसाय आलापल्ली, भामरागड, सिरोंचा येथील युवकांना भरघोस आर्थिक लाभ देणारा ठरू शकतो. या कौशल्य विकासाच्या युगात, लाकडावर आधारित व्यवसायाच्या भविष्यातील मागणीची पूर्तता करण्याकरीता आलापल्ली येथील आरा गिरणी महत्वाची कामगिरी बजावू शकते. तसेच या क्षेत्रात एकही अधिकृत आरा गिरणी नाही. यामुळे एकंदरीत या भागातील परिस्थितीचा विचार करता या आरा गिरणीची तेथे निश्चितच आवश्यकता आहे. परंतु सद्यःस्थितीत तेथे १० पैकी केवळ १-२ यंत्रे सुरू असून उर्वरित यंत्रे बंद आहेत. तसेच दर वाढविल्यामुळे देखील त्याचा वापर कमी होत आहे. परंतु असे असतानाही तेथे अद्यापही कायमस्वरुपी पुर्णवेळ कर्मचारी वर्ग कार्यरत आहे. परिणामी उत्पन्न नसताना आस्थापना खर्च मात्र पुर्ण लागत आहे. ही बाब अनाकलनीय असून शासनाने त्यांच्या आर्थिक हिताचा देखील विचार करणे आवश्यक आहे.**

**विभागाने या आरा गिरण्यांचे नियोजन निदान ना-नफा ना-तोटा या तत्वावर सुरू ठेवले पाहिजे किंवा या कर्मचाऱ्यांना अन्य ठिकाणी काम दिले पाहिजे. जितकी मशीन क्रियान्वीत आहे तितकेच कर्मचारी ठेवून बाकीची मशीन व कर्मचारी इतरत्र प्रस्तापित करण्याबाबत शासनाने विचार करावा जेणेकरून मशीनचा व मनुष्यबळाचा योग्य व व्यावहारीक वापर होऊ शकेल, ज्यामुळे शासनाचे कमी नुकसान होईल. महालेखाकारांच्या आक्षेपानूसार एकीकडे या आरा गिरण्यांच्या कमी वापरामुळे रु.२.२३ कोटीची हानी झाल्याचे नमूद आहे. तर दुसरीकडे आस्थापना खर्च मात्र सुरूच आहे. अशा परिस्थितीत या आरा**

**गिरण्या विभागाने आर्थिक बाबींचे नियोजन करूनच चालवाव्या अन्यथा त्या बंद कराव्यात असेही समितीने सूचित केले. कोणत्याही परिस्थितीत यात शासनाने आर्थिक नुकसान होवू नये यादृष्टीने या आरा गिरण्यांचे व्यवस्थापन व नियोजन करणे आवश्यक आहे. त्या भागामध्ये जर या आरा गिरण्यांची आवश्यकता नाही, तर त्या स्थलांतरीत करण्याच्या पर्यायाचा देखील शासनाने विचार करावा. उपरोक्त परिस्थिती पाहता या आरा गिरण्यांच्याबाबत व त्याअनुषंगाने शासनाला होणाऱ्या आर्थिक नुकसानीबाबत शासनाने पुनर्विचार करावा. प्रचालन किंमत आणि महसूल वसुली यांच्यातील फरक कमी करावयासाठी आरा यंत्राद्वारे कापणी किंमतीत सुधारणा करण्यात यावी आणि आरा गिरणीस एक वर्धनक्षम घटक बनविण्यासाठी योग्य कारवाई करण्यात यावी. त्यासाठी आवश्यक ती उपाययोजना नियोजनबद्ध पद्धतीने राबवावी. ना-नफा ना-तोटा तत्वावर या गिरण्या चालविता येण्यासारख्या असल्यास त्या पर्यायांचा देखील विचार व्हावा. या गिरण्या काही सहकारी संस्थांना चालविण्यासाठी देता येतात किंवा कसे याबाबतचा देखील शासनाने विचार करावा व या आरा गिरण्यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त उत्पन्न शासनाला प्राप्त होण्याच्यादृष्टीने व त्यातूनच आस्थापना खर्च देखील भागविता येईल अशा पद्धतीने आवश्यक ती उपाययोजना शासनस्तरावरुन तातडीने करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.११ "संनियंत्रण, मूल्यांकन आणि आंतरिक नियंत्रण"**

**परिच्छेद क्रमांक २.१.११.१ "कार्य नियोजनाचे अपूरे संनियंत्रण"**

**अभिप्राय :**

३.१४ कार्य नियोजन विभागाने सर्व वनसंवर्धन कामांवर जसे वृक्ष पातन, सफाई, कापणी (Cut-back) कामे, विरळीकरण इत्यादींवर संनियंत्रण ठेवण्यासाठी कार्य नियोजनाच्या कालावधीची कुप नियंत्रण प्रपत्रे (CC Control forms) तयार करून ती ठेवावयास पाहिजे. तसेच, कार्य नियोजन विभागाने पाडण्यासाठी चिन्हांकित केलेल्या वृक्षांचे आणि तसेच, ठेवण्यात येणाऱ्या वृक्षांच्या दस्तावेजांचे संनियंत्रण ठेवण्यासाठी पातन नियंत्रण प्रपत्रे सुद्धा ठेवावयास पाहिजेत. परंतु निवडलेल्या सहा पैकी पाच विभागात नियंत्रण प्रपत्रे ठेवण्यात आली नाहीत आणि त्यामुळे वृद्ध झाडांना पाडणे, यासह विविध वन संवर्धन कामांबाबत महत्वपूर्ण माहिती या कार्य नियोजन विभागांकडे उपलब्ध नव्हती. परिणामी, कार्य नियोजन विभाग महसूल निर्मिती कामांवर पुरेसे संनियंत्रण ठेऊ शकला नाही. तसेच राष्ट्रीय कार्य नियोजन संहिता,२००४ अनुसार जर कोणतीही वन संवर्धन कार्ये करण्यात येत नसली अथवा एखादे काम कार्य नियोजनानुसार नसेल तर, ते मंजूर कार्य नियोजनातील कामाची वळवणूक असे समजण्यात येईल. परंतु निवडलेल्या १३ पैकी चार विभागांत सन २०१०-१४ दरम्यान ३०,३७०.७३ हेक्टर क्षेत्राचे वळतीकरण प्रस्ताव संबंधित वनसंरक्षक/प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचेकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले असून ते प्रलंबित आहेत असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

दरवर्षी उप वनसंरक्षक प्रादेशिक हे त्यांचे विभागांचे कुप कंट्रोल फॉर्म अद्यावत करतात व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांना प्रत्येक वर्षाचा अहवाल ऑक्टोबर महिन्यात पाठवितात. नंतर मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) हे त्या त्या विभागाची कुप कंट्रोल फार्मची तपासणी करून अहवाल संबंधित कार्य आयोजन विभागाला डिसेंबर अखेर पर्यंत सादर करीत असतात. तसेच विचलन प्रस्तावास मान्यता मिळण्यास झालेल्या उशिरा बाबतः विचलन प्रस्ताव हे उप वनसंरक्षक (प्रा) हे तीन प्रतीत तयार करून मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांना ऑक्टोबर अखेर पर्यंत सादर करतात. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) हे विचलन प्रस्तावाची तपासणी करून संबंधित कार्य आयोजना विभाग यांना डिसेंबर अखेरपर्यंत सादर करतात. कार्य आयोजना अधिकारी हे विचलन प्रस्ताव संबंधित अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांना पाठवित असतात. जर विचलन प्रस्ताव किरकोळ स्वरुपाचे असल्यास त्यावर शिफारस करून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) नागपूर यांचे कडून मंजूर करून घेतात. विचलन प्रस्ताव मोठ्या स्वरुपाचे असल्यास त्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येते. सन २०१२-१३, सन २०१३-१४ सन २०१४-१५ या वर्षाकरिता कुप कंट्रोल फॉर्म व विचलन प्रस्ताव प्राप्त झालेले नसून यासंदर्भात पाठपुरावा सुरू असल्याचे विभागाने समितीस सांगितले.

**शिफारस :**

**३.१५ कार्यनियोजनाचे अपूरे संनियंत्रणाबाबत महालेखाकारांनी सदरहू आक्षेप नोंदविलेले असून यात विशेषतः नियंत्रण प्रपत्रे न ठेवणे व वळतीकरण प्रस्तावांच्या मंजुरीत विलंब असे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. कोणतीही योजना, कार्यक्रम किंवा प्रक्रिया यांच्या प्रगतीचा माग राखण्यासाठी संनियंत्रण आणि मूल्यांकन हे चुकांचा शोध घेऊन त्यावर तत्परतेने सुधार कारवाई करण्याकरिता आणि भविष्यातील नियोजनासाठी धडा शिकण्याकरिता, अत्यंत महत्त्वाचे आहे. सदरहू आक्षेप अत्यंत**

**गंभीर असून सन २०१०-११ पासून ही नियंत्रण प्रपत्रे प्रलंबित आहेत. तसेच जवळजवळ ३३७० हेक्टर क्षेत्राचे वळतीकरण / विचलन प्रस्ताव देखील मंजुरीविना प्रलंबित आहेत. कुपाचे काम झाल्यानंतर ती माहिती कुप नियंत्रण प्रपत्रात भरुन कार्य आयोजन विभागास सादर करणे अपेक्षित आहे. ज्याचा उपयोग नवीन कार्ययोजना तयार करताना होतो. काम केल्यानंतर कुप्स कंट्रोल फॉर्म भरण्यात येतात. ज्यामध्ये क्षेत्र / प्रस्तावित किती कामे झालीत व कोणती कामे केली व किती खर्च झाला या माहितीचा समावेश असतो. परंतु हे कुप नियंत्रण फॉर्म भरले गेले नाही. जर अशी माहितीच विभागाकडे प्राप्त झाली नाही तर विभाग पुढील नियोजन कशाच्याआधारे तयार करेल अशी समितीने विचारणा केली असता यासंदर्भात सर्व संबंधितांना विभागाने सूचना दिलेल्या असून कारणे दाखवा नोटीस देखील दिलेली आहे व हे फॉर्मस् लवकरच भरुन घेतले जातील असे समितीसमोर सांगण्यात आले. नियंत्रण प्रपत्रे व विचलन प्रस्तावासंबंधी कर्तव्ये व जबाबदाऱ्या पुर्ण करण्यासंदर्भात ज्या वन अधिकाऱ्याने निष्काळजीपणा केला आहे त्यांचेविरुद्ध कारवाई केली जाईल असेही विभागाने त्यांच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे. परंतु समितीच्या साक्षीला येईस्तोवर अशाप्रकारची कोणतीही कारवाई विभागाने केली नव्हती. ज्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या सर्व बाबींवर देखरेख व संनियंत्रण ठेवणे अभिप्रेत व आवश्यक होते, त्यांनी त्यांची जबाबदारी पार पाडली नाही. सन २०१२-१३ पासून हे विषय प्रलंबित असून या प्रकरणी विभागाकडून आजतागायत कोणतीही कारवाई केली गेली नाही. वास्तविक विभागाने ही कारवाई करूनच समितीसमोर येणे आवश्यक होते, परंतु तसे झाले नाही. अतः या सर्व संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी असे समितीने निदेशीत केले असता २ महिन्यामध्ये या प्रकरणी जबाबदारी निश्चित करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले. परंतु अद्यापही आश्वासित माहिती समितीस अप्राप्त आहे. अतः या प्रकरणी तात्काळ संबंधितांवर कारवाई करण्यात यावी. तसेच नियंत्रण प्रपत्रे व विचलन प्रस्तावासंबंधीचे प्रलंबित असलेले कार्य तातडीने व कालबद्ध पद्धतीने पुर्ण करण्यात यावे व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.११.२ "मूल्यांकन शाखेच्या निरीक्षणांचे अनुपालन न करणे"**

**अभिप्राय :**

३.१६ महाराष्ट्र वन विभागाच्या मूल्यांकन विभागाने वन विकास कार्याचे, त्यांचा दर्जा व मानक निर्धारित करण्यासाठी आणि अंमलबजावणीत सुधारणा सूचविण्यासाठी मूल्यांकन केले. महाराष्ट्र वन विभागाची मूल्यांकन शाखा, वन विकास कामांचे वर्षभर मूल्यांकन करीत असते आणि त्यात सुधारात्मक उपाययोजना आणि कारवाईचे मुद्दे ज्यामध्ये विभागाच्या कार्यसिद्धीत उल्लेखनीय भर घालण्याचे सामर्थ्य आहे ते, समाविष्ट करून मोठे कष्ट घेऊन मूल्यांकन अहवाल तयार करण्यात येतात. परंतु मूल्यांकन शाखेने केलेले निरीक्षण व शिफारशींचे विभागाद्वारे होणारे अनुपालन निराशाजनक होते. यासंदर्भात सादर झालेल्या माहितीवरून सन २०१०-१५ दरम्यान ५१ विभागांच्या विरूद्ध असलेल्या १,९४५ निरीक्षणापैकी १,६२५ निरीक्षण (८४ टक्के) प्रलंबित होते असे दिसून आल्याचे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

रोपवनांचे मुल्यांकनात स्थळनिहाय सुधारणेसाठी निदर्शनास आलेला अभाव व त्यावर गुणवत्ता/उपाययोजना सुचविण्यात येतात. या सूचना, सल्ले हे प्रामुख्याने रोपवनाची योग्य तऱ्हेने व वेळेवरच क्षेत्रीय कामे करणेबाबत व नोंदवह्या अद्यावत ठेवणेबाबत असतात. ही बाब विभागाने गंभिरतेने घेणे आवश्यक व विभागाच्या हिताचे असतानाही त्याची पुर्तता झाली नाही. प्रलंबित १६२५ निरिक्षणांपैकी या विषयाची समितीने विस्तृत छाननी केली असता मार्च २०१६ अखेर पूर्ततेसाठी प्रलंबित निरीक्षणाची संख्या १०२५ इतकी होती.

**शिफारस :**

**३.१७ मुल्यांकन शाखेच्या निरीक्षणांचे अनुपालन न करणे संदर्भात सदरहू आक्षेप नोंदविण्यात आले असून विभागाने नव्याने सादर केलेल्या माहितीमध्ये १०२५ निरीक्षणे प्रलंबित असल्याचे दिसून येते. या आकड्यातील फरकामागील कारणमिमांसा समितीने विचारली असता आताची आकडेवारी ही सन २०१०-१५ या कालावधीची आहे व अगोदरची आकडेवारी मार्च, २०१६ अखेरपर्यंतची आहे. यामुळे हा आकडेवारीतील फरक दिसून येतो. तरीही विभागाकडून ही बाब पुन्हा तपासण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. तसेच ही प्रकरणे इतक्या मोठ्या प्रमाणात प्रलंबित राहण्याची कारणे काय ? तसेच यामध्ये दोषी असणाऱ्यांवर विभागाने काय जबाबदारी निश्चित केली, अशी विचारणा समितीने केली असता मुल्यांकन विभागाच्या अभिप्रायाची पुर्तता करणेसंदर्भात दि.१४.६.२०१६ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्याचे समितीस सांगण्यात आले. अशाप्रकारे मूल्यांकन शाखेच्या निरिक्षणांचे अनुपालन न केल्यामुळे त्याआधारे करण्यात येणारी पुढील पुर्तता होऊ शकली नाही. त्याचप्रमाणे सीसीएफ चे दौरे कमी झाले व वृक्षारोपणवही देखील भरलेली नाही. प्रलंबित प्रकरणांबाबत**

**मार्च महिन्यापर्यंत हे काम पूर्ण करण्याबाबत संबंधितांना सूचना दिल्याचे समितीस सांगण्यात आले. प्रलंबित प्रकरणांची संख्या पाहता जोपर्यंत कालमर्यादा निश्चित केल्या जात नाहीत किंवा संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात येत नाही तोपर्यंत ही कारवाई होणे शक्य नाही असेही समितीने विदीत केले.**

**दि.१४.०६.२०१६ रोजीच्या पत्रात रोपवन कामात आढळून आलेल्या त्रुटी व आक्षेपासंदर्भात पुर्तता अहवाल ३० दिवसात मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांना सादर करणे आवश्यक असतानाही अडीच वर्षे उलटून देखील त्याची पुर्तता विभागाने केली नाही. याचा अर्थ विभागाच्या पत्राला कोणताही अर्थ शिल्लक राहिला नाही असे समितीने विदीत केले असता याबाबतची कार्यवाही पूर्ण करून घेण्यात येईल व मूल्यांकन शाखेच्या प्रलंबित निरीक्षणांसाठी विभागा ारे मोहिम घेण्यात येईल व ५० टक्के प्रकरणे मार्च, २०१९ पर्यंत व उर्वरित ५० टक्के प्रकरणे जून, २०१९ पर्यंत पूर्ण करण्याची शेवटची मुदत दिलेली असून त्या कालावधीत जर ती प्रकरणे निकाली काढण्यात आली नाहीत तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल असे समितीसमोर आश्वासित करण्यात आले. अतः उपरोक्त आक्षेपांच्या अनुषंगाने ही सर्व प्रकरणे विशेष मोहिम राबवून कालबद्ध पद्धतीने निकाली काढण्यात यावीत. सर्व प्रकरणे सरसकट एकाच निकषांवर न तपासता ज्या विभागामध्ये २५ टक्क्यांपेक्षा कमी प्रकरणे प्रलंबित असतील त्याबाबतीत वेगळी भूमिका विभागाने घ्यावी व ज्या विभागात २५ टक्क्यांपेक्षा जास्त प्रकरणे प्रलंबित असतील त्यासंदर्भात कडक कारवाई करण्यात यावी. तसेच हे काम कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावे व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कार्यपद्धती विहित करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.११.३ "प्रलंबित वन महसूल"**

**अभिप्राय :**

३.१८ निवडलेल्या १३ विभागांत डिसेंबर २०१५ पर्यंत १,४९४ प्रकरणांत रु.१२.३४ कोटी वन महसूल वसुलीकरिता प्रलंबित आहे. एकूण रु.१२.३४ कोटी प्रलंबित महसूलापैकी रु.०.३० कोटीचे प्रलंबन चालानांचे समायोजन न झाल्यामुळे होते, रु.५.९२ कोटी महसूल विभागास वसुली करण्याकरीता कळविण्यात आले होते, रु.२.१२ कोटी न्यायालयाचा अंतिम निर्णय न झाल्यामुळे प्रलंबित होते, रु.०.४३ कोटी वन कामगार सहकारी संस्थेकडून देय होते, रु.०.४४ कोटी आदिवासी विकास महामंडळातर्फे देय होते, रु.२.४७ कोटी वन कंत्राटदारांकडून देय होते आणि उर्वरित रु.०.६६ कोटी संकीर्ण म्हणून वर्गीकृत करण्यात आले होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

समितीने या प्रलंबित वन महसूलाबाबत अद्ययावत माहिती घेतली असता कोषागारातून चालान प्राप्त न झाल्यामुळे महसूलाचा ताळमेळ नसल्यामुळे असमायोजित राहिलेली थकबाकी रक्कम रु.२९.८९ लक्ष यापैकी रु.२५.४४ लक्ष चा ताळमेळ प्रलंबित आहे. राजस्व खात्याकडे वसुलीकरिता वर्ग केलेल्या प्रकरणातील वन महसूल थकबाकीची रक्कम रु.५.९२ कोटीपैकी रु.१३.५३ लक्ष वसूल झाली असून रु.५.७९ कोटी वसुली शिल्लक आहे. महसूल थकबाकी ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. थकबाकीची वसुली आणि वाढ एकत्रीतरित्या होत असते. सदरची वसुली ही महसूल खात्यामार्फत महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेन्यु कोड अंतर्गत करण्यासाठी महसूल खात्याकडे प्रकरणे वर्ग करण्यात आली आहेत. याबाबत संबंधित यंत्रणेकडून विविध स्तरावर निरंतर पाठपुरावा करण्यात येत आहे. मा.न्यायालयाच्या निर्णयासाठी थकीत असलेली वन महसूलाची थकबाकी रक्कम रु.२.१२ कोटी इतकी असून सदरहू थकबाकी न्यायालयाच्या निर्णयाअभावी प्रलंबित असण्याची बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्याबाबत संबंधितांना कळविण्यात आले आहे. जंगल कामगार सहकारी संस्थेकडे थकीत असलेली वनमहसूलाची थकबाकी रक्कम रु.४३.१५ लक्ष यापैकी रु.१३.५९ लक्ष वसुली झाली असून रु.२९.४१ लक्ष थकबाकी शिल्लक आहे. जंगल कामगार सहकारी संस्थांकडील थकबाकी अवसायनात गेलेल्या संस्थाकडील असुन ती वसूल करण्यासाठी त्यांचेकडे कोणत्याही प्रकारची मालमत्ता उपलब्ध नाही. त्यामुळे सदर थकबाकी निर्लेखित करणे हा एकमेव पर्याय आहे. याकरिता संबंधित वनवृत्तांस व वनविभागास सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तसेच काही संस्थांचे वनवृत्ताकडून प्राप्त झालेले निर्लेखन प्रस्ताव शासनाचे मंजुरीकरिता या कार्यालयाकडून सादर करण्यात आले आहे. त्यावर शासन मंजुरी प्रतिक्षित आहे. तसेच वसूल न झालेल्या वन महसूलाच्या रकमेबाबत वसुली करणे शक्य नाही. त्यामुळे निर्लेखनाचा प्रस्ताव सादर करणेबाबत संबंधितांना निदेशीत करण्यात आले आहे. विविध वनोपजाच्या खरेदी संदर्भात कंत्राटदाराकडे वसुलीसाठी प्रलंबित असलेली थकबाकी रक्कम रु.२.४६ कोटी यापैकी रु.१.३८ कोटी वसूल झाली असून रु.१.०९ कोटी शिल्लक आहे. उपरोक्त नमूद प्रकरणांव्यतिरिक्त वसूल न झालेली वन महसूलाची संकिर्ण थकबाकी रक्कम रु.६६.२३ लक्ष यापैकी रु.८१ हजार वसूल झाले असून रु.६५.४२ लक्ष थकबाकी शिल्लक आहे. आदिवासी विकास महामंडळ यांचेकडून घेणे असलेली वन महसूलाची थकबाकी रक्कम रु.४३.७४ लक्ष वसूल करण्याचे प्रयत्न विभागाच्या स्तरावरून सुरू आहेत.

या व्यतिरिक्त उपरोक्त शिर्षाअंतर्गत असलेली थकबाकी जास्तीत जास्त वसूल करण्याकरीता वरिष्ठ स्तरावरुन प्रयत्न करण्यात येत असून त्यांचे प्रभावीपणे संनियंत्रण करण्यात येत असल्याचे विभागाने समितीस सांगितले.

**शिफारस :**

**३.१९ सदरहू परिच्छेदात प्रलंबित वन महसुलाबाबत महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. वन महसूल वसुली प्रकरणी काही प्रमाणात वसुली झाल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच काही प्रकरणात महसुली वसुली म्हणून संबंधितांच्या मालमत्तेवर महसुली थकबाकीचे (RRC) आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. यावर समितीने आक्षेप नोंदवित केवळ RRC चे आदेश निर्गमित केले म्हणजे विभागाची जबाबदारी संपली असे नाही. कित्येक प्रकरणांमध्ये केवळ RRC चे आदेश काढून ते अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविल्यानंतर विभाग अशा प्रकरणांचा कोणताही पाठपुरावा करीत नाही. त्यामुळे वस्तुतः ही वसुली होत नाही. अतः विभागाने प्रत्यक्षात ही वसुली होण्यासाठी RRC काढल्यानंतर काही विहित कालावधीनंतर मालमत्तेचा लिलाव करण्याच्या प्रक्रियेचा तातडीने अवलंब करावा व त्यातून वसुलपात्र रकमेची वसुली तात्काळ करावी असे समितीने सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली. अतः या प्रकरणामध्ये प्रलंबित असलेली वसुलपात्र मोठी रक्कम पाहता ती तातडीने वसुल करून उर्वरित सर्व वसुली कालबद्ध पद्धतीने तातडीने करावी तसेच न्यायालयात प्रलंबित प्रकरणांचा योग्य पाठपुरावा करून व ज्येष्ठ वकीलाची नियुक्ती करून प्रकरणाचा निकाल तातडीने लावून घेणेकरिता आवश्यक ती पुढील कार्यवाही विभागाने तात्काळ करावी. तसेच ही वसुली वेळेत करणे क्रमःप्राप्त असताना इतक्या वर्षापर्यंत ही वसुली न करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.११.४ “ अपुरे आंतरिक नियंत्रण ”**

**अभिप्राय :**

३.२० आंतरिक नियंत्रण प्रणाली हे एक व्यवस्थापनेस उपयुक्त साधन आहे ज्याद्वारे योग्य नियम आणि विनियम यांची कार्ये व अहवालाच्या सादरीकरणात अवलंब होत असल्याची हमी मिळते. परंतु महाराष्ट्र वन विभागातील आंतरिक नियंत्रण अपुरे होते. १३ पैकी तीन विभागांत स्वीय प्रपंजी लेखा रोख पुस्तिका आणि कोषागार पास बुक यांच्या शेवटच्या शिल्लक रकमेत रू.१.२५ कोटीचा फरक होता. महाराष्ट्र अर्थसंकल्प पुस्तिका,१९७७ नुसार निधीची मागणी, प्राप्ती आणि संवितरण यावर संनियंत्रण ठेवण्यासाठी अर्थसंकल्प नियंत्रण प्रपंजी राखण्यात यावयास पाहिजे. तथापि, निवडलेल्या दोन विभागांत (सातारा आणि सांगली) ही प्रपंजी राखण्यात आली नव्हती. निवडलेल्या दोन विभागांत (सांगली आणि यावल) साठा प्रपंजीची (Stock Register) जिल्हा वन अधिकारी/उप वनसंरक्षक यांचेद्वारे प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येत नव्हती. तसेच, साठा प्रपंजीतील नोंदीही त्यांच्याद्वारे प्रत्यापित करण्यात येत नव्हत्या. चार विभागांत उप वनसंरक्षक रोख शिल्लकाची अनपेक्षित मासिक प्रत्यक्ष पडताळणी करत नव्हते. मार्च,२०१५ पर्यंत महाराष्ट्र वन विभागाच्या आंतरिक लेखापरिक्षा शाखेद्वारे घेण्यात आलेली ७३५ निरीक्षणे विभागाद्वारे अनुपालन न झाल्यामुळे प्रलंबित होती. सांगली, ठाणे आणि गडचिरोली या तीन विभागांत महाराष्ट्र वन विभागाद्वारे जारी फेब्रुवारी, १९९३ च्या आदेशाचे उल्लंघन करून कंत्राटदारास निविदा न मागविता रु.२.९४ कोटी किमतीची बांधकामे व लागवडीची कामे देण्यात आली. तसेच या आदेशांचे उल्लंघन करून ठाणे विभागाने कंत्राटदारांना रु.१.१५ कोटी रोख प्रदाने केली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

स्वीय प्रपंजी लेखे, रोख पुस्तिका व कोषागार पासबुक यामधील फरकासंदर्भात समितीने विचारणा केली असता यासंदर्भात विभागाने मोहिम राबविली असता पहिल्यांदा रु.८१.४६ लक्ष एवढा फरक राहिला होता. सद्यःस्थितीत हा फरक रु.४०,९५,०८६/- इतका आहे. मुख्यत्वे हा फरक तेंदु संकलनाकरीता मजुरांना दिलेले बोनसचे धनादेश न वटल्यामुळे दिसून येतो. अधिकांश मजूर हे अशिक्षित असून त्यांचे स्वतःचे बँक खाते नाही. त्यामुळे त्यांना दिलेले धनादेश वटविले जात नाही. अशा प्रकरणात नवीन धनादेश काढण्याचे व ते संबंधित मजुरांच्या बँक खात्यात जमा होतील यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. माहे मार्च, २०१७ पर्यंतच्या शिल्लक रकमेचा ताळमेळ घेण्याचे काम पुर्ण झालेले आहे व सन २०१९ पर्यंतची कार्यवाही देखील सुरू असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. त्याचप्रमाणे १३ पैकी ३ विभागांमध्ये स्वीय प्रपंजी लेखा रोख पुस्तिका आणि कोषागार पासबुके यांच्या शेवटच्या शिल्लक रकमेत तफावत आढळून आली. त्याचप्रमाणे सातारा व सांगलीमध्ये स्वतंत्र स्वीय प्रपंजी लेखा खाते ठेवण्यात आले नाही. २१ पीएलए अकाऊंट आता ५१ वन विभागात सुरू केले जाईल व यापैकी १० कोषागारांकडे व्यक्तीगत ठेवीच्या पासबुकनुसार ताळमेळ पुर्ण झालेला असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. निवडलेल्या दोन विभागात साठा प्रपंजीवर स्वाक्षरी करण्यात आल्याचेही समितीस सांगण्यात आले. तसेच वन अधिकारी व उप वनसंरक्षकाकडून रोख शिल्लकेची अनपेक्षित

मासिक प्रत्यक्ष पडताळणी वेळेवर होत नव्हती. आता दरवर्षी नोंदवहीची पडताळणी व तपासणी केली जाते व याअनुषंगाने आवश्यक ती कार्यपद्धती कार्यान्वित करण्याबाबत समितीने सूचित केले.

तसेच उप वनसंरक्षक रोख शिल्लकाची अनपेक्षित मासिक पडताळणी करीत नव्हते. अधिकाऱ्यांकडून ही तपासणी नियमित होणे अत्यावश्यक आहे. अतः दौऱ्याच्यावेळी रकमेची तपासणी करून घेण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्याचे समितीस सांगण्यात आले. सन २०१५ पासून प्रलंबित निरीक्षण अनुपालनापैकी ३३१ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून ४०४ प्रकरणे येत्या ३ महिन्यांच्या आत एक विशेष मोहिम राबवून निकाली काढण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या असून विभागीय स्तरावर त्याचा आढावा घेण्यात येत असून कोणत्या कारणासाठी ही प्रकरणे प्रलंबित होती याचा देखील तपास करण्यात येत असल्याचेही समितीसमोर सांगण्यात आले.

यात अधिक गंभीर बाब म्हणजे निविदा न मागविता रु.२.९४ कोटी किमतीची बांधकाम व लागवडीची कामे कंत्राटदारास देण्यात आली. वन विभागाने माहे फेब्रुवारी, १९९३ मध्ये जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन या प्रकरणी केले असून महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप हे निश्चितच वस्तुस्थितीला धरून आहेत. रु.२ लक्ष किमतीच्या आतील कामांबाबत समितीचे काहीही म्हणणे नाही. परंतु रु.२ लक्षपेक्षा अधिक किमतीच्या कामासाठी निविदा काढूनच कामाचे प्रदान करणे अत्यावश्यक असताना त्याचे उल्लंघन करण्यात आल्याचे दिसून येते. याबाबत समितीने विचारणा केली असता गडचिरोली जिल्ह्यात अगरबत्तीचा प्रकल्प सुरू केला होता तसेच गोंडवाना हब येथे महत्वाचे दोन प्रकल्प सुरू झाले होते. त्याठिकाणी गोडाऊनची मोठ्या प्रमाणात आवश्यकता होती. त्यासाठी २२ गोदामे बांधण्यात आली असून एका गोदामाची किंमत रु.२ लाखाच्या आत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

अशाप्रकारे तुकड्या तुकड्यांमध्ये ही कामे देणे अत्यंत आक्षेपार्ह आहे. गडचिरोली सारख्या नक्षलग्रस्त भागात मुळात कामे करण्यास असलेली उदासिनता पाहता अपवादात्मक परिस्थितीत तेथील कामाच्या निविदेसंदर्भात विभागाची भूमिका ग्राह्य धरण्यास समितीस हरकत नाही. परंतु सांगली, ठाणे अशा ठिकाणी निविदा न काढण्याचे कोणतेही समर्थन विभाग करू शकत नाही. इतक्या मोठ्या प्रमाणातील हे काम एकत्रित निविदा काढून करण्याची आवश्यकता असताना त्याचे तुकडे पाडून निविदा न काढता देण्यात येणे हे अत्यंत आक्षेपार्ह असून यासंदर्भात महालेखाकारांनी गंभीर आक्षेप नोंदविलेले आहेत.

यासंदर्भात खुलासा करताना विभागाने सांगली जिल्ह्यामध्ये सन २०१४-१५ मध्ये शासनाने "दंडोबा विकास प्रकल्प" अंतर्गत कठीण भागामध्ये रोपवनाची कामे करण्यात आली होती. तेथील भूरचना पाहता ती नियमित वृक्षारोपणासाठी आवश्यक अशी भूरचना नसून तेथे वेगळया पद्धतीचा डोंगर आहे. त्यामुळे तेथे खड्डे वेगळ्या पद्धतीने खणणे आवश्यक होते. तसेच त्या ठिकाणी जास्त उंचीची रोपे लावून ठिबक सिंचन व्यवस्था देखील करणे आवश्यक होते. हा संपुर्ण पॅच एकाच ठिकाणचा नसून वेगवेगळ्या आठ ठिकाणी या साईट होत्या. त्यामुळे निविदा काढण्याऐवजी विभागाने वर्तमान पत्रात जाहिरात देवून वस्तुनिहाय (आयटमप्रमाणे) दर मागवून घेतले. या कार्यपद्धतीवर समितीने गंभीर आक्षेप नोंदवित केवळ निविदा टाळण्याच्या दृष्टीने हे सगळे प्रकार केल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे.

वन विभागामध्ये वृक्षारोपण, खड्डे, नर्सरीमध्ये रोपे तयार करण्याची कामे वन विभागच करते. वन विभाग त्यासाठी कोणतीही निविदा काढत नाही. परंतु या विशिष्ट साईटवर हार्ड स्ट्राटा पाहता १ × १ × १ असे खड्डे खोदणे आवश्यक होते तसेच या ठिकाणी लागवड करणेसाठी उंच रोपे लागत असून ती हैद्राबाद येथून आणावी लागतात ती महाराष्ट्रात मिळत नाही. त्यासाठी एकाच व्यक्तीला या सर्व कामांचे एकत्र प्रदान करण्याच्या पद्धतीची यंत्रणा नाही, त्यामुळे विशेष प्रसंगामध्ये हा निर्णय घ्यावा लागला. याठिकाणी वन विभागालाही अंतर्गत कामे करणे अवघड असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला. अतिशय विशिष्ट प्रकारची परिस्थिती याठिकाणी होती त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला. जलशिवार योजनेच्या कामासाठी, सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांसाठी निरनिराळे दर अस्तित्वात असताना हे खड्डे खोदण्याच्या कामासाठी किती दर देण्यात आला याबाबत समितीने माहिती विचारली असता तो तपशिल समितीला सादर करण्यात येईल असे समितीस आश्वासित करण्यात आले. परंतु अद्यापही ही माहिती समितीस अप्राप्त आहे.

सदरहू प्रकरणी अशी विशिष्ट परिस्थिती पाहता त्या कामांना त्यावेळेस तांत्रिक मान्यता घेवूनच हे सर्व करण्यात आल्याचे समितीस सांगण्यात आले. एकाच व्यक्तीला हे संपुर्ण काम देता येत नाही म्हणूनच कामाचे तुकडे करण्यात आले व ते विनानिविदा प्रदान करण्यात आले. विभागाच्या अभियंत्यांनी विभागाचे दर लावूनच अंदाजित खर्च तयार केला होता व त्यांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेवूनच ही कामे करण्यात आलेली आहेत असेही विभागाने सांगितले असता, यावर समितीने आक्षेप नोंदवित ही सर्व कामे खास बाब म्हणून विनानिविदा करणेबाबतचे आदेश नस्तीमध्ये आहेत काय ? अशी समितीने विचारणा केली असता ही बाब तपासून समितीस सादर करण्यात येईल असे आश्वासित करण्यात आले. तथापि, अद्यापही विभागाकडून ही माहिती अप्राप्त आहे. विभागाने अशाप्रकारे कामाचे तुकडे पाडून विनानिविदा कामाचे प्रदान करणे निश्चितच अयोग्य असून कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाही.

**शिफारशी :**

**३.२१ (१) महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहू आक्षेप हे अत्यंत महत्त्वाचे असून विभागांतर्गत लेखापरिक्षण व अंतर्गत नियंत्रण यामध्ये मोठ्या प्रमाणात त्रुटी असल्याचे दर्शविते. जे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविलेले आहेत, ते वास्तविकत: विभागाच्या अंतर्गत लेखापरिक्षणात निदर्शनास येणे आवश्यक होते. परंतु तसे न होता महालेखाकारांनी ही छाननी केल्यामुळे ही गंभीर प्रकरणे निदर्शनास आली. यावरुनच विभागाचे अंतर्गत नियंत्रण हे अत्यंत कमकुवत असल्याचे स्पष्ट होते. परिणामी महसूलाचे झालेले प्रचंड नुकसान पाहता यात मोठ्या प्रमाणात अनियमितता, आर्थिक शिस्तीचे उल्लंघन झालेले दिसून येते. या सर्व व्यवहारांवर व लेखा विषयक बाबींवर विभागाचे कोणतेही संनियंत्रण नसल्याचे स्पष्टपणे दिसून येते. या सर्व आक्षेपित प्रकरणी विभागाने तात्काळ खर्चाचा व शिल्लक रकमेचा ताळमेळ घालावा. नियमितरित्या अर्थसंकल्प नियंत्रण प्रपंजी राखण्यात यावे. साठा प्रपंजी नोंदीही सत्यापीत करण्यात याव्यात. नियमितरित्या प्रत्यक्ष मासिक पडताळणी करण्यात यावी व लेखे अद्ययावत करण्यात यावे. त्याचप्रमाणे कामाचे तुकडे पाडून निविदा काढण्याची बाब देखील अत्यंत गंभीर व अयोग्य आहे. या संपुर्ण प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**३.२२ (२) सदरहू परिच्छेदांच्या माध्यमातून महालेखाकारांनी नोंदविलेले सर्व आक्षेप अत्यंत गंभीर आहेत. राज्याच्या राखीव निधीत जमा केलेला CAMPA निधी तदर्थ CAMPA खात्यात, जो भारत सरकारच्या पर्यावरण व वन विभागाद्वारे प्रशासित होतो. त्यात हस्तांतरित करण्यात आला नाही आणि उपभोगी संस्था व इतर विभागांकडून वन जमिनीचा वापर वनेतर प्रयोजनासाठी करण्याच्या बदल्यात त्यांचेकडून निव्वळ विद्यमान मुल्य वसूल करण्यात आले नाही. कार्य नियोजनात विहित केलेल्या लक्ष्यानुसार बांबू कूपांची कापणी करण्यात आली नाही ज्यामुळे महसूल वसुलीत भरभक्कम तूट झाली. विभागाचे संनियंत्रण, मूल्यांकन आणि आंतरिक नियंत्रण कमकुवत होते. चुकांचा वेळेत शोध आणि तत्परतेने सुधारात्मक कारवाई सुरू करण्यासाठी कार्य नियोजनाचे वन विभागाद्वारे संनियंत्रण भक्कम असावयास पाहिजे. हानी कमी करण्यासाठी आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी मूल्यांकन शाखेद्वारे करण्यात आलेले निरीक्षण/शिफारशी यासंदर्भात विभागाने पूर्व क्रियाशील दृष्टिकोन ठेवावयास पाहिजे. वनीकरण कामांची योजना, कार्यान्वयन आणि व्यवस्थापनेत नियमांचे व विनियमांचे काटेकोरपणे पालन होत आहे याची खातरजमा करण्यासाठी आंतरिक नियंत्रण यंत्रणा बळकट करावयास पाहिजे असे समितीचे स्पष्ट मत आहे. त्याची विभागाने अंमलबजावणी करावी व असे सर्व आक्षेप भविष्यात टाळावेत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**३.२३ (३) तसेच हा निधी केंद्र शासनाच्या कॅम्पा निधीमध्ये जमा होवून तो पुन्हा राज्यांनाच प्राप्त होणारा असतो व नवीन कायद्यानुसार ९० टक्के निधी राज्याला परत देण्यात येतो व १० टक्के निधी केंद्र शासनाकडे ठेवण्यात येतो. याअनुषंगाने सद्य:स्थितीत राज्याला प्राप्त व्हावयाची रक्कम ही थोडीथोडकी नसून तब्बल रु. ३,०५० कोटी एवढी थकबाकी आहे. ही थकबाकीची रक्कम केंद्र शासनाकडून राज्य शासनाला प्राप्त होणेबाबतची प्रक्रिया सुरू असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. अत: केंद्राकडून राज्य शासनाला प्राप्त व्हावयाच्या निधीसंदर्भात तातडीने वरिष्ठ स्तरावरुन पाठपुरावा करण्यात येऊन ही रक्कम राज्य शासनाकडे प्राप्त करून घ्यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट-अ

विवरणपत्र क्र. ७

# MINUTES OF MEETING OF STEERING COMMITTEE CONSTITUTED UNDER CAMPA, HELD ON 20.7.2010

The Steering Committee constituted by the Government of Maharashtra vide its Resolution No. FLD/`1009/C.N.660/F-10, dated 25.9.2009, held its first meeting on 20/7/2010 under the Chairmanship of Chief Secretary, Maharashtra State. The following officers were present in the said meeting.

1) Shri J.P. Dange, Chief Secretary, Maharashtra State and Chairman of Steering Committee
2) Shri B.P.Pandey, Addl. Chief Secretary (Forests) and Member of Steering Committee.
3) Shri C.S.Joshi, Principal Chief Conservator of Forests (HoFF), M.S. Nagpur, Member of Steering Committee.
4) Shri Viddyadhar Kanade, Principal Secretary (Finance) and Member of Steering Committee.
5) Shri A.K. Joshi, Chief Wildlife Warden and Member of Steering Committee.
6) Shri D.C. Pant, Addl. Principal Chief Conservator of Forests (Budget, Planning & Development) Maharashtra State and Member of Steering Committee.
7) Smt. A.A. Karkhanis, Deputy Secretary,( Planning) - The representative of Principal Secretary (Planning) -
8) Shri Aditya Dhanwate, Tiger Research Foundation and Member, Steering Committee
9) Shri Shailendra Bahadur, Chief Conservator of Forests & Nodal Officer, M.S. and Member-Secretary, Steering Committee.

2. The meeting started with briefing of the members about the Hon'ble Supreme Court's order dated 10/7/2009, GOI guidelines of July, 2009

regarding constitution of State CAMPA and consequent Government of Maharashtra Orders relating to constitution of Governing Body, Steering Committee, Executive Committee vide Revenue & Forest Department Resolution No FLD/1009/CR-660/F-1 dated 25/9/2009, dated 29/1/2010. The members were also apprised of the procedures prescribed vide Government of Maharashtra Resolution dated 4/1/2010 regarding utilization of proceeds received in the State CAMPA. The members were further informed that the Government have authorized the Chairperson and the Member Secretary of the Executive Committee to open a savings account of the State CAMPA in a nationalized bank. The contents of the relevant Government Resolutions were read out by the Member Secretary and the Committee took note of each provisions of the orders and the role of various Committees in the entire set up of State CAMPA.

The Member Secretary intimated to all the members present that an account in the name of the State CAMPA has been opened in the Union Bank of India pursuant to the Govt. approval dated 04/01/2010. The proceeds received from Government of India amounting to a sum of Rs. 89 Crore has been deposited in the said account. The members took note of the same and approved this action in view of the fact that the State Government had already approved opening of a joint account of the State CAMPA.

After taking a note of constitution of various bodies of the State CAMPA, the chairman opined that instead of having same NGOs in all the bodies of State CAMPA, different NGOs should be included in the Governing Body, Steering Committee and the Executive Committee so that there is greater interaction with NGO sector. This was agreed by all members and it was decided that 2 new NGOs would be proposed for the Executive Committee, in lieu of the present ones and another 2 new NGOs would be proposed for the Governing Body in the same manner. The Member-Secretary was requested to move suitable proposal for Government approval to the same.

5. The Member Secretary of the Steering Committee informed the members that as required, the Executive Committee has finalized the A.P.O. for 2010-2011 (Annual Plan Operations) after discussing the same in its meetings held on 12/03/2010 & 03/04/2010. Accordingly a request was made to the Government in Revenue and Forest Department for seeking the Steering Committee's approval. The Chairman, while appreciating efforts of the Executive Committee for preparation of APO (2010-2011), stated that the Executive Committee should also formulate the procedures for its regular working and seek the Steering Committee's approval to those. The requirement was noted and the Member Secretary was requested to formulate the same and place before the Steering Committee expeditiously.

6. The Agenda items were then taken up for deliberations. It was explain by the Principal Chief Conservator of Forests, (HoFF), that three subjects have been kept for consideration of the Steering Committee. The first is pertaining to the approval of A.P.O. (2010-11) having a provision of Rs. 89.00 Crores, the second is regarding opening of Molecular Diagnostic and Forensic Centre at Nagpur for the wild animals in cooperation with MAFSU and third and the last is regarding engaging of services of retired ACF (one), Head Clerk (one), Accountants (two) for the secretariat of State CAMPA.

7. The issue regarding secretarial assistances to State CAMPA office at Nagpur was taken up first. It was noted that administrative expenses of CAMPA could be met from the interest amount as per Government of India guidelines of 2nd July, 2009 (para 11(ii)) and the Government Resolution dated 04/01/2010 (para 3(b)) of the State Government. However, the members opined that engaging personnel should not lead to permanent

liability and/ or litigations. Hence, services of suitable retired persons were found to be more useful. The Committee approved the proposal for engaging the services of retired personnel (ACF-1, Head Clerk-1, Account-2) subjected to the condition that publicity would be given through local news papers at Nagpur inviting expression of interest and personnel are selected by the Executive Committee on merits.

8. The second item of agenda was then taken up for consideration. It was opined by the Chairman that the Forest Department instead of having a Micro Biology Lab at Nagpur in MAFSU Campus which would basically be a referral centre, should try to have a tie-up with veterinary clinics at suitable places so that animals could be treated at the earliest whenever need arose. Hence the proposal of financing Molecular Diagnostic and Forensic Centre in MAFSU campus at Nagpur was dropped.

9. The proposed APO (2010-11) as approved by the Executive Committee was then taken up for consideration. The components of APO were presented by the Member Secretary through a power point presentation and the individual items included for implementation were explained in detail. The Committee, at the outset, decided that the financial year as used by the Government departments would also be applicable in the instant case as well. All the accounts would be maintained for the period from 1st of April to 31st of March of succeeding year. Continuing his presentation, the Member Secretary explained to the Steering Committee, that the total amount available with the State CAMPA at present is Rs. 39 Crore which includes the amount for mandatory works as per Forest (Conservation) Act,1980 clearance conditions stipulated by the Government of India as well as NPV proceeds for which the Government has laid down the guidelines in para 4 ( c) of its resolution dated 4th January, 2010. The works permissible for funding from NPV include, natural assisted regeneration, forest management, protection, infrastructure development, wildlife protection and

management. The mandatory works are according to certain conditions and additional conditions impose on the Project Authority, duly approved by the Government of India while according Forest (Conservation) Act, 1980 clearance. There are 31 conditions listed in the proposals. The APO gives details of all such projects and the funds recovered for such mandatory works. The Principal Chief Conservator of Forests (HoFF) pointed out that Compensatory Afforestation (CA), additional Compensatory Afforestation, penal Compensatory Afforestation and Catchment Area Treatment (CAT) form a major component of mandatory works. The projects against which funds have been recovered for mandatory C.A., additional C.A. and penal C.A. together required creation of new plantation over 18545 ha. land. As against that for the present 7655.5 ha. plantation has been proposed in the APO. Likewise, CAT works worth Rs. 48.02 crore are required to be taken up. But looking to the requirement of micro planning and intensity of supervision needed for such works CAT works worth Rs. 8.31 crore only are envisaged in the first year in APO. The other works are also phased in a similar way.

10. The Principal Chief Conservator of Forest (HoFF) then brought to the notice of the members present that FDCM Ltd's own plantations in the past were liquidated and the company needs to be compensated for that. The amount has been accordingly earmarked in APO. The members agreed to this proposition subject to the condition that such amount would be used only for creation of new plantations and not for any other purpose. The Principal Chief Conservator of Forests (HoFF) further explain the utility of providing NPV funds to F.D.C.M. Ltd. as their facilities for collection and treatment of superior quality seeds and nurseries would be beneficial to the Forest Department also. The NPV funds for the FDCM Ltd. is basically for the adoption of technological improvement in forestry sector. With these deliberations the Committee approved the FDCM component.

11. The Steering Committee then discussed the NPV component of APO earmarked for Forest Department. It was explained that investment has been proposed largely as per norms of usual departmental works. JFM activity has been given top priority and nearly 28% of the amount has been assigned for this activity in the year 2010-11, which will further increase in the later years, as it is a three/four years scheme. Total of 260 villages have been proposed in year 1. The Chairman stated that, greater representation should be given to the regions with lower forest cover. The Chairman also stressed the need for issuing a revised resolution regarding JFM. It was pointed out by one of the members that Rs. 30 lacs should be provided for imparting training to villagers pertaining to bamboo articles, in JFM villages. However, it was stated by the Chairman that it should be done only after bamboo species is declared as Minor Forest Produce under Maharashtra Transfer of Ownership of Minor Forest Produce in the Scheduled Areas Act, 1997. It was stated by the Chairman that the plantation target and other wages related components should be revised to the extent necessary due to wage escalation. It was reiterated that the APO amount in terms of money should be kept fixed. As regards to the APO component related to Mobility and Communication, it was directed by the Chairman that all the purchases should be made strictly as per the State Government's existing rules and procedures. The allotment of vehicles should be made against written off vehicles giving preference to such officers who are working on functional posts, like the Working Plans, Research, Evaluation, and Education etc. Regarding communication, it was further explained to the Committee that GPS enabled PDAs will be provided up-to range level. ICT application would be initiated in the State Forest Department with the help of M.P. Forest Department. Regarding infrastructure development, the Principal Chief Conservator of Forests (HoFF) explained that the provision of residential quarters has been made largely for the field level staff like Forest guards and Foresters. Similarly a provision has been made for a office

building of C.C.F. (Territorial) Pune, that will also house other forest offices now scattered in Pune. The upgradation of technology for the purpose of Working Plans was also explained to the Steering Committee. The Committee accorded its approval to this proposals of APO (2010-11).

12. After detailed deliberation the Steering Committee accorded its approval to the Annual Plan of Operations for the financial year 2010-11 with the following specific stipulations :

a. The financial outlays would not be increased for different components. Wherever necessary on account of wage rate increase and / or cost escalation physical targets would be reduced proportionately. This exercise would be done by the Executive Committee.

b. Areas with relatively less forest cover would be given preference in afforestation works including those under JFM. The Executive Committee would redistribute targets accordingly.

c. JFM works be taken up only after revision of present Government Resolution.

d. Purchase of Jeeps / cars would be done for replacement of existing vehicles after writing-off old vehicles and preference would be given to functional units.

e. The Executive Committee would devise appropriate procedures for execution of works and accounting and seek the Steering Committee's approval. Till such approval existing Government procedures would be adopted for incurring expenditure.

f. A copy of APO with minutes of proceedings of Steering Committee meeting would be furnished to the Government of India.

g. The works would be evaluated through external agency. GPS readings of work sites would be obtained for all land treatment related works and civil works for use in monitoring and evaluation.

h. The cost of liquidated plantations of FDCM will be provided to the Corporation subject to the condition that the amount so reimbursed shall be used only for raising fresh plantations.

The meeting ended with votes of thanks to the Chair.

000

PARA. 2.1.9.2

**प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर**
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकरी, महाराष्ट्र राज्य, नागपूर, पहिला माळा, बी विंग, वनभवन, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१**
**दुरध्वनी क्र. (०७१२) २५५६९१६ ई मेल- apccfnodal@mahaforest.gov.in**

क्र.कक्ष-१७/नोसेल/मुले/ले.प/प्र.क्र.१४(१६-१७)/780 /२०१८-१९
नागपूर - ४४० ००१, दिनांक :- 04/07/2018

प्रति,

महालेखाकार,
लेखा व हकदारी,-१
महाराष्ट्र, मुंबई.

विषय :- सन २०१४-१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवाला संदर्भात लोकलेखा समितीच्या पुढील बैठकीत वन विभागाच्या होणा-या साक्षी संदर्भात. परिच्छेद क्रमांक २.१.९.२

संदर्भ :- १) शासन पत्र एफडीएम-२०१६/प्र.क्र.१७९/फ-२, दिनांक २६/०६/२०१८.
२) महालेखाकार, नागपूर यांचे कडील अर्ध शासकीय पत्र क्र. वन (लेखा) ९ मु.ले.शि.-८२३५/२, दिनांक १०/०१/२०१८.
३) या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-१७/NOCEL/HC/२५००, दिनांक ०९/०१/२००७

उपरोक्त संदर्भिय पत्र १ अन्वये, वर्ष २००५-०६ या वित्तीय लेखाचे अवलोकन केले असता पृष्ठे-२३४-२३६ या विवरण क्र.८२३५ चे राखीव निधीचे अंतर्गत लघु शिर्ष-२०० व इतर निधी-फुडग्रेन जमा निधी अंतिम दर्शविण्यात आला आहे. वार्षिक समायोजन अंतर्गत अंतिम प्रविष्टी अन्वये "पर्यायी वनिकरण विषेश निधी" हा हस्तांतरीत केले असून ते वन विभागाशी संबंधीत असल्याचे महालेखाकार, मुंबइ यांना कळविले आहे.

महालेखाकार, नागपूर यांनी या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१७/NOCEL/HC/२५०० दिनांक ०९/०१/२००७ आणि पत्र क्रमांक कक्ष-१७/मुले/२१६१, दिनांक १४/१२/२००७ चे रोजीचे महसूल व वनविभाग, मंत्रालय, शासन निर्णय-१००९/प्र.क्र.६०१/फ-१०, दिनांक २२/०५/१९९० आणि पत्र क्रमांक एफएलडी-१०८९/प्र.क्र.५०१/फ-१०, दिनांक २०/१२/२००२ अन्वये असे स्पष्ट होते की, लघुशिर्ष-२०० -Food Grain Reserve Fund चा नसून लघुशिर्ष वन विभागाशी संबंधीत "पर्यायी वनिकरण विषेश निधी" चा आहे. सोबत "List of Major and Minor Head" पुस्तकात सुध्दा "Food Grain Reserve Fund" सादी लघुशिर्ष -१०९ आहे. जो या बाबींची स्पष्टता दर्शवित आहे की, लघुशिर्ष-२०० हा पर्यायी वनिकरणा करिता विषेश निधी आहे. असे सुध्दा संदर्भिय पत्रान्वये वनविभागाचे तेच मत असल्याने, वनविभाग मुले/शि.८२३१ चे अंतर्गत लघुशिर्ष २०० मध्ये दर्शविलेला निधी प्रमाणित करुन देण्यात यावा. लेखापुस्तक महालेखाकार (लेखा व हकदारी), मुंबई व्दारा प्रकाशित करण्यात येत असल्याने, लेखा पुस्तकात चुकुन मुले/शि.२०० "Food Grain

Reserve Fund" दर्शविला असल्यास तो सुधारीत करुन "पर्यायी वनिकरण विषेश निधी" च्या अंतर्गत दर्शविण्यात याव. असे सुध्दा संदर्भिय महालेखाकार यांचे पत्रात नमुद आहे. वन विभागाचे उपलब्ध लेखा नुसार रुपये ११.९४९५ कोटी इतका दिसून येत आहे.

तरी, उपरोक्त प्रकरणी महालेखाकार नागपूर यांनी संदर्भिय पत्रात नमुद केलेप्रमाणे दुरुस्ती केली किंवा कसे? याबाबतची सद्यास्थिती विनाविलंब या कार्यालयास कळविण्यात यावी. जेणेकरुन पुढील आवश्यक ती कार्यवाही करणे सोईचे होईल.

सहपत्र :- वरीलप्रमाणे

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी
महाराष्ट्र राज्य, नागपूर

अ.प्र.मु.व.व.के.अ.
म.रा. नागपूर यांचे कडून मान्य मसुदा

प्रतिलिपी :- सचिव (वने) महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना संदर्भिय शासन पत्राचे अनुषंगाने सहपत्रासह माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस सादर.

प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म. रा. नागपूर यांना त्यांचेव्दारे पत्र क्र. ९८, दिनांक २८/०६/२०१८ अन्वये सहपत्रासह माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.

PAKH. 81.9.5

**Status Report of Pending N.P.V.**

| Sr. No. | Circle | Division | Project | I.D. No. | ea (Ha.) | Dt. Of Stage-I Sanctioned | Dt. Of Final Approval | Am[illegible]t of Net Present Value to be collected | Amount of N.P.V. actually collected | Balance to be collected. | Name of Agency | Name of Department |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1 | Dhule | Yawal | M.I.T.Matran Nala 68.00 ha. | 2707 | 68.000 | 9.8.2002 | 30.6.2004 | 47192000 | 0 | 47192000 | Ex.Eng.Minor Irr.Div, Jalgaon | Minor Irr.Dept. |
| 2 | Dhule | Yawal | M.I.T.Lohara Chinchati 45.00 ha. | 2705 | 45.000 | 9.8.2002 | 02.08.2004 | 40500000 | 0 | 40500000 | Ex.Eng.Minor Irr.Div, Jalgaon | Minor Irr.Dept. |
| | Dhule | Dhule | Lower Panjra Proj. Akkalpada 174.38 | 1052 | 174.380 | 12.02.2001 | 19.05.2006 | 109161880 | 109161880 | 0 | Ex.Eng(Local Sec.)M.I.Div. Dhule | Irr.(Local Sector) Dept. |
| 3 | Dhule | Dhule | P.T.Nane 20.00 ha. | 997 | 20.000 | 13.07.1999 | 11.02.2003 | 12520000 | | 12520000 | Ex.Eng(Local Sec.)M.I.Div. Dhule | Irr.(Local Sector) Dept. |
| | **T.Dhule** | **Apr-16** | | | **307.380** | | | **209373880** | **109161880** | **100212000** | **10.02** | |
| 4 | Nashik | Malegaon Sub.Dn. | Kuttarbari P.T. | 1316 | 8.240 | 16.04.1999 | 30.03.2005 | 6394240 | 0 | 6394240 | Ex.Engineer M.I.(Local Sector) Dn.Nashik | Irr.Dept (Local Sector) |
| 5 | Nashik | E.Nashik | Bhormal P.T. | 1558 | 2.000 | 19.04.2001 | 29.06.2006 | 1552000 | 0 | 1552000 | Ex.Engineer M.I.(Local Sector) Dn.Nashik | Irr.Dept (Local Sector) |
| 6 | Nashik | E.Nashik | Pangarbari P.T. | 1279 | 3.600 | 17.09.2001 | 30.06.2006 | 2088000 | 0 | 2088000 | Ex.Engineer M.I.(Local Sector) Dn.Nashik | Irr.Dept (Local Sector) |
| 7 | Nashik | E.Nashik | Umbarvihir.P.T. | 1277 | 1.800 | 26.02.2001 | 06.07.2006 | 1396800 | 0 | 1396800 | Ex.Engineer M.I.(Local Sector) Dn.Nashik | Irr.Dept (Local Sector) |
| 8 | Nashik | W.Nashik | Kelvihir P.T. | 1292 | 2.270 | 24.01.2002 | 17.07.2003 | 1575380 | 0 | 1575380 | Ex.Engineer Minor Irr.Dn. (West) Z.P. | Zilla Parishad Nashik |
| 9 | Nashik | W.Nashik | Khadakohal P.T. | 1286 | 4.100 | 06.03.1997 | 02.09.2004 | 2689600 | 0 | 2689600 | Ex.Engineer Minor Irr.Dn. (West) Z.P. | Zilla Parishad Nashik |
| 10 | Nashik | W.Nashik | Kacharpada P.T. | 1288 | 2.800 | 09.04.1997 | 02.09.2004 | 1624000 | 0 | 1624000 | Ex.Engineer Minor Irr.Dn. (West) Z.P. | Zilla Parishad Nashik |
| 11 | Nashik | W.Nashik | Dhulghat P.T. | 1287 | 1.900 | 09.04.1997 | 02.09.2004 | 1102000 | 0 | 1102000 | Ex.Engineer Minor Irr.Dn. (West) Z.P. | Zilla Parishad Nashik |
| 12 | Nashik | W.Nashik | Galvat P.T. | 1281 | 3.000 | 26.02.2001 | 27.06.2006 | 2328000 | 0 | 2328000 | Ex.Engineer Minor Irr.Dn. (L.S.) Dn Nashik | Irr.Dept. |
| 13 | Nashik | W.Nashik | Kolastipada P.T. | 1289 | 2.850 | 10.05.2001 | 18.09.2006 | 1977900 | 0 | 1977900 | Ex.Engineer Minor Irr.Dn. (West) Z.P. | Zilla Parishad Nashik |
| | **T.Nashik** | **Mar-16** | | | **32.560** | | | **22727920** | **0** | **22727920** | **2.27** | |
| 14 | Kolhapur | Satara | Renewal of 14 Stone quarries | 2434 | 5.795 | 03.07.2002 | 14.07.2003 | 3402310 | 0 | 3402310 | Dy.C.F.Satara | Forest Department |
| 15 | Kolhapur | Satara | Renewal of 2 Stone quarries | | | 03.07.2002 | 15.07.2004 | 225360 | 0 | 225360 | Dy.C.F.Satara | Forest Department |
| | **T.Kolhapur** | **Jun-16** | | | **5.795** | | | **3627670** | **0** | **3627670** | **0.36** | |
| 16 | Thane | Thane | Mumbra Stone Quarry | 2191 | 1.220 | 27.08.1999 | 24.11.1999 and revised 04.05.2005 | 655400 | 0 | 655400 | Mumbra Stone Industries, Mumbra | Private |
| 17 | Thane | Dahanu | Construction of Village tank at Kondhan | 447 | 0.520 | /B/076/2000/ FCW/1775 28.08.2000 | FLD-1200/CR-380/F-10 13.09.2006 | 379600 | 0 | 379600 | Ex.Eng.Thane M.I.Dn.Kalwa, Thane | Irr.Dept |

| Sr. No. | Circle | Division | Project | I.D. No. | Area (Ha.) | Dt. Of Stage-I Sanctioned | Dt. Of Final Approval | Amount of Present Value to be collected | Amount of N.P.V.actually collected | Balance to be collected. | Name of Agency | Name of Department |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 18 | Thane | Shahapur | Restoration of forest land by Shri Vishwanath Malbari | 11188 | 10.108 | | 8-C/34/2003/FCW/2611 dt.25.12.200325.12.2003 | 7399056 | 0 | 7399056 | Shri V.M.Malbari Village Chandroti, Ta.Shahaur Dist. Thane | Private |
| | T.Thane | Sep-16 | | | 11.848 | | | 8434056 | 0 | 8434056 | 0.84 | |
| 19 | Nagpur | Nagpur | Katangdhara M.I.Tank Tq.Hingna | 2108 | 5.080 | 13.07.1999 | 28.11.2005 | 2946400 | 0 | 2946400 | Ex.Engg.Minor Ir.Dept.Zilla Parishad, Nagpur | Ex.Engg.Minor Ir.Dept.Zilla Parishad, Nagpur |
| 20 | Nagpur | Nagpur | Dhaga Bazargaon M.I.Tank | 852 | 7.530 | 16.04.1999 | 14.09.2005 | 5746520 | 0 | 5746520 | Ex.Engineer, Minor Irr.Dept.Nagpur | Ex.Engineer, Minor Irr.Dept.Nagpur |
| 21 | Nagpur | Nagpur | Shri Niraj S.Kedia Dongergaon | 1876 | 0.990 | 30.09.1997 | 20.11.2002 | 1879200 | 574200 | 1305000 | Shri Neerj S.Kedia, Nilgagan Society Dhantoli, Nagpur. | Private |
| 22 | Nagpur | Nagpur | M/S Sabir Stone Metal Dongargaon | 1967 | 1.990 | 24.07.1998 | 27.01.2005 | 1154200 | 0 | 1154200 | M/sSabir Stones Metal Plot No.908A, Hanuman Mandir Rd. Chhawni Nagpur | Private |
| 23 | Nagpur | Wardha | Jawahar Urdu High School Ashti | 1939 | 0.350 | 10.08.2000 | 23.07.2004 | 203000 | 0 | 203000 | Sec.Jawahar Urdu High School Ashti | Private |
| 24 | Nagpur | Bhandara | Kardi Tank | 1853 | 21.000 | 26.10.1998 | 31.10.2005 | 12180000 | 0 | 12180000 | Ex.Engineer, M.I.Deptt (L.S.)Gondia | Irrigation (Local Sector) |
| 25 | Nagpur | Gondia | Dhamditola (4.98 ha.) | 2351 | 4.980 | 20.06.2001 | 10.11.2003 | 4482000 | 4422000 | 60000 | Ex.Engineer, Medium Project Dn. Nagpur. | Irrigation |
| 26 | Nagpur | Gondia | Gardanpur (13.80 ha.) | 552 | 13.800 | 28.307.1993 | 22.09.2003 | 12420000 | 0 | 12420000 | Ex.Engineer,Bagh Itiadoh Dn.Gondia | Irrigation |
| 27 | Nagpur | Gondia | Surtoli (8.62 ha.) | 558 | 8.620 | 14.12.1993 | 19.01.2005 | 7930400 | 0 | 7930400 | | Irrigation |
| 28 | Nagpur | Gondia | M.B.Patel High School (0.81 ha.) | 2511 | 0.810 | 16.11.2000 | 14.11.2005 | 562140 | 0 | 562140 | Secretary,Adarsh Edu.So.Sawari (Jawaharnagar)Bhandar | Private |
| | T.Nagpur | Mar-17 | | | 65.150 | | | 49503860 | 4996200 | 44507660 | 4.45 | |
| 29 | Pune | Junnar | Chilhewadi Medium Irrigation Project 54.16 ha. | 2118 | 54.160 | 26.02.1999 | 01.03.2004 | 30492080 | 20000000 | 10492080 | Ex.Engg.Pimpalgaon Joga Dam Dn. Narayangaon Tal. Junnar Dist. Pune | Irr. Dept. |
| | T.Pune | Dec,13 | | | 54.160 | | | 30492080 | 20000000 | 10492080 | 1.05 | |
| 30 | Gadchiroli | Gadchiroli | Laying OFC line Dhanora to Murumgaon | 11437 | | 21.06.2003 | 11.12.2008 | 2392000 | 0 | 2392000 | Divisional Engineer Telecom BSNL Chandrapur | BSNL |
| | Gadchiroli | Jan-17 | | | | | | 2392000 | | 2392000 | 0.24 | |
| | Gr.Total | | | | 476.893 | | | 326551466 | 134158080 | 192393386 | 19.24 | |

PARA-2.1.11.2 A-5

**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख),म. रा. नागपूर यांचे कार्यालय.**
'वन भवन', रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर 440 001.
E-mail apccfbpd@gmail.com Phone: 0712-2556785 Fax 0712-2550675

15 JUN 2016

क्र.कक्ष-1/रोहयो/मुल्यां/प्र.क्र.10(भाग-1)/14-15/ 520 /16-17
नागपूर 440 001, दिनांक : 15जुन, 2016

विषय:- विविध योजनांतर्गत रोपवन व वनीकरणाबाबत सूचना.

संदर्भ:-1) प्रधान मुख्य वन संरक्षक, म.रा., यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-14/काआ/76/127/92-93/नागपूर दि. 5/8/1994.
2) प्रधान मुख्य वन संरक्षक, म.रा.,यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-1/योजना/इए/मवाप्र/95-96 /93/नागपूर दि.13/10/1995.
3) प्रधान मुख्य वन संरक्षक, म.रा.,यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-1/इए/मवाप्र/359/सा96-97 /नागपूर दि.27/5/1996.
4) प्रधान मुख्य वन संरक्षक, म.रा.,यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-1/योजना/मवाप्र/646/सा 96-97 /नागपूर दि.2/7/1996.
5) प्रधान मुख्य वन संरक्षक, म.रा.,यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-1/योजना/इए/मवाप्र692(अ)/ नागपूर दि.5/7/1998.
6) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक, (अर्थसंकल्प नियोजन व विकास) म.रा.,यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष1/रोहयो/प्रक्र.10/1469/2014-15 नागपूर दि.6/12/2014.
7) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक, (अर्थसंकल्प नियोजन व विकास) म.रा.,यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-1/रोहयो/प्रक्र.10/ 2 / 2014-15 नागपूर दि.1/4/2015.

वरील संदर्भाद्वारे रोपवन कामाबाबत तपशीलवार सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. मुल्यांकन शाखेकडून मुल्यांकन संहितेतील तरतुदीनुसार मुख्यत्वे पुर्वपावसाळी रोपवन कामांचे मुल्यांकन, तृतीय वर्षीय रोपवन कामांचे मुल्यांकन व द्विस्तरीय (10 वर्षीय) रोपवनाचे मुल्यांकन ही कामे नियमित करण्यात येतात. तसेच सदर मुल्यांकना दरम्यान कामात आढळुन आलेल्या त्रुटी अगर उणिवा याबाबतीत आक्षेप नोंदवुन रोपवन कामात सुधारणा सुचविल्या जातात. तथापी रोपवन कामात सुचविण्यात आलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने आक्षेपांची पुर्तता वेळोवेळी केली जात नाही. सदर बाब कार्यमुल्यांकन लेखापरीक्षणात महालेखाकार नागपूर यांनी नमुद केली आहे. शिवाय मुल्यांकन अहवालाद्वारे यापुर्वी निदर्शनास आणुन दिलेल्या अनेक त्रुटी वारंवार आढळुन येत असल्याने यशस्वी रोपवनाचे प्रमाण कमी झाले आहे. सदर परिस्थितीत सुधारणा होण्याकरिता व रोपवनाच्या मुल्यांकन कामातील अडचणी दुर करण्यासाठी वरील संदर्भिय पत्रान्वये देण्यात आलेल्या सुचना शिवाय खालीलप्रमाणे अतिरीक्त सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**1) रोपवन क्षेत्रासंबंधी नकाशे तयार करणे:-**

उपचार नकाशात तयार करण्याबाबतीत सविस्तर सुचना वरिल संदर्भीय पत्र क्र.7 अन्वये देण्यात आले आहेत. त्यानुसार निवडलेल्या रोपवन क्षेत्रास देण्यात येणाऱ्या शास्त्रोक्त उपचाराबाबत तपशिल उपचार नकाशात दर्शविण्यात यावा. मात्र अनेकदा उपचार नकाशातच ग्रीड्स दर्शवुन त्यामध्येच ग्रीड क्रमांक दिले जातात. त्यामुळे

क्षेत्रासाठी प्रस्तावीत उपचार व ग्रीड यांची नकाशावरुन स्पष्ट कल्पना येत नाही. यासाठी प्रत्येक रोपवनस्थळाकरिता 1) स्थळदर्शक नकाशा 2) ग्रीड नकाशा 3) उपचार नकाशा असे तीन प्रकारचे नकाशे तयार करण्यात यावेत. स्थळदर्शक नकाशामध्ये रोपवनाचे ठिकाण, वनपरिक्षेत्र, नियतक्षेत्र, कम्पार्टमेंट नं., कुप नं., गाव सर्व्हे नं. इत्यादी संबंधी तपशील देण्यात यावा. ग्रिड नकाशामध्ये रोपवन क्षेत्रातील बेस लाईन, ग्रिड लाईन, ग्रिड क्रमांक दर्शवावेत.

**2) ग्रीडची हद्द कायम राखणे:-**

रोपवनाचे ग्रीड मध्ये विभागणी साठी तात्पुरत्या स्वरुपात ग्रीड लाईन टाकुन खुणा केल्या जातात. विशेषत: 10वर्षीय रोपवनाचे मुल्यांकन करतांना ग्रीडचे सिमांकन नसल्याने निवडलेल्या ग्रीड मधील मोजदाद करतांना कामात अडचणी येतात. त्यामुळे मुल्यांकन करणे सुलभ व्हावी यासाठी ग्रिडची आखणी कायमस्वरुपी करण्यात यावी.

**3) जिवंत रोपांची टक्केवारी:-**

रोपवनात जिवंत रोपांची टक्केवारी व रोपांची सरासरी उंची दरवर्षी मे व ऑक्टोंबर महिन्यात मोजदाद करुन 5 व्या वर्षापर्यंत त्याचा तपशील रोपवन नोंदवहीत लिहिण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच पर्यायी वनीकरण रोपवनाबाबत जिवंत रोपांची टक्केवारी व सरासरी उंची याचा तपशिल 10 वर्षापर्यंत रोपवन नोंदवहीत देणेबाबत वरील संदर्भीय पत्र क्र. 7 अन्वये सुचना आहेत. मुल्यांकन कामातुन प्राप्त झालेल्या माहितीवरुन काही बाबतीत असे निर्देशनास आले आहे की, तृतीय वर्षी व त्यापुढे पाचव्या वर्षापर्यंत यशस्वी असलेली काही रोपवनात मात्र प्रत्यक्ष द्विस्तरीय (10 वर्षीय) रोपवनाचे मुल्यांकन करतांना जिवंत रोपांची टक्केवारी अत्यंत कमी होऊन रोपवने अयशस्वी ठरली आहेत. त्यामुळे जिवंत रोपांची टक्केवारी 6 व्या वर्षापासुन 10 व्या वर्षापर्यंत निश्चित कोणत्या वर्षी कमी झाली व कोणत्या कारणास्तव कमी झाली हे समजु शकत नाही. याकरिता रोपवनाचे 6 ते 10 वर्षापर्यंत रोपवन क्षेत्रात जिवंत वृक्षांची टक्केवारी व वृक्षांची वेढी यांची दरवर्षी माहे मे मध्ये वर्षातून एकदा मोजदाद करुन त्याची नोंद रोपवन वहीत घेण्यात यावी. नियतक्षेत्र वनरक्षक यांनी रोपवनाच्या दहा वर्षापर्यंत ज्या-ज्या वेळी रोपवन कार्यभार हस्तांतरण होईल तेव्हा कार्यभार हस्तांतरण यादीमध्ये नियतक्षेत्रातील रोपवनांच्या यादीमध्ये प्रत्येक रोपवनातील जिवंत रोपांची टक्केवारी नमुद करावी.

**4) आक्षेपांच्या पुर्ततेसाठी कालमर्यादा:-**

विभागीय वनअधिकारी मुल्यांकन विभाग हे घटकनिहाय रोपवन कामाचे मुल्यांकन करतात व मुल्यांकन दरम्यान रोपवन कामात आढळुन आलेल्या त्रुटी व आक्षेपार्ह बाबींची प्रत पुर्ततेसाठी संबंधीत उपवनसंरक्षक (प्रादेशीक) यांना सादर करतात. मात्र त्रुटींची पुर्तता केळीच केली जात नाही. काही बाबतीत मुल्यांकनापासुन 7-10 वर्षाच्या कालावधी उलटुनही अद्याप त्रुटींची पुर्तता न झाल्याने प्रकरणे प्रलंबीत आहेत. यामुळे मुल्यांकन घटकाच्या अहवालासंबंधीत आक्षेपांची पुर्तता करण्यासाठी कार्यपद्धती व कालमर्यादा निश्चित करणे क्रमप्राप्त ठरते. याकरीता मुख्य वनसंरक्षक (प्रादेशीक) यांनी उपवनसंरक्षक (प्रादेशीक) यांच्या सभेमध्ये प्रलंबित आक्षेपाबाबत नियमीत आढावा घ्यावा. मूल्यांकनातील प्रलंबित आक्षेपांचा आढावा घेण्याचा विषय ठेवण्यात आलेल्या सभेस संबंधित विभागीय वन अधिकारी, मूल्यांकन विभाग यांनाही सभेस उपस्थित राहण्यासाठी कळविण्यात यावे. मुल्यांकनानंतर संबंधीत उपवनसंरक्षक (प्रादेशीक) यांनी रोपवन कामात आढळुन आलेल्या

त्रुटी व आक्षेपांबाबत त्यांचा पुर्तता अहवाल 30 दिवसात मुख्य वनसंरक्षक (प्रादेशीक) यांना सादर करावा व उपवनसंरक्षक (प्रादेशीक) यांचे अहवाल प्राप्त झाल्यापासुन 10 दिवसात मुख्य वनसंरक्षक (प्रादेशीक) यांनी त्यांचा अभिप्राय विभागीय वन अधिकारी, मुल्यांकन यांना पाठवावा.

प्रमुवसं.(वबप्र) यांचेकडून मान्य मसूदा

प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वन बल प्रमुख)
महाराष्ट्र राज्य, नागपूर करिता

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशीक) (सर्व)
उप वन संरक्षक/ विभागीय वन अधिकारी / स्वतंत्र उपविभागाचे उप विभागीय वन अधिकारी (सर्व)

प्रतिलीपी:

1) सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
2) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर
3) प्रधान मुख्य वन संरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर
4) प्रधान मुख्य वन संरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), पुणे
5) प्रधान मुख्य वन संरक्षक यांचे कार्यालयातील अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
6) मुख्य वन संरक्षक शिक्षण वृत्त, पुणे
7) वन संरक्षक, कार्य आयोजना विभाग (सर्व)
8) मुख्य वनसंरक्षक (मुल्यांकन), महाराष्ट्र राज्य, नागपूर

A-6

04:05 FAX 07122556908 P.C.C.F.H.S.NAGPUR PARA 21.11 004

# प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

अत्यंत महत्वाचे/ तातडीचे / फॅक्सद्वारे

**विषय:-स्विय प्रपंची लेख्याबाबतची कार्य प्रणाली बाबत.**

क्रमांक कक्ष-२०(२)/प्र.क्र.१/ 843 /०९-१०
नागपूर ४४० ००१,दिनांक 01/08/09

प्रति,

**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)**
नागपूर/ अमरावती/ औरंगाबाद/ यवतमाळ

**वनसंरक्षक (प्रादेशिक)**
उत्तर चंद्रपूर/ दक्षिण चंद्रपूर वनवृत्त
चंद्रपूर

संदर्भ:- शासन निर्णय क्रमांक एमएफपी-२१०४/प्र.क्र.६७/फ-१, दिनांक १/११/२००७

विषयांकित प्रकरणी संदर्भिय शासन निर्णयान्वये सन २००६ तेंदू हंगामापासून प्रोत्साहनात्मक रक्कम वाटप करण्याबाबतचे निर्देश देण्यांत आलेले आहेत. त्या अनुषंगाने विभागीयस्तरावर वाटपाची कार्यवाही सुरू आहे. सदर प्रक्रिया बाबत खालील प्रमाणे माहिती १० दिवसात सादर करावी.

१.० तेंदूपाने संकलनकर्त्यांना स्विय प्रपंची लेख्यामधून प्रोत्साहनात्मक रक्कम वाटप करण्याची तरतुद आहे. त्या अनुषंगाने सन २००६, २००७ व २००८ तेंदू हंगामात प्रत्येक विभागावार (PLA wise) त्या त्या वित्तीय आर्थिक वर्षात किती रक्कम जमा झाली, किती रक्कम वाटप करण्यांत आली, वन महसूल म्हणून किती रक्कम जमा करण्यांत आली, याबाबतची सन २००७-०८, २००८-०९, २००९-१० ची वर्षनिहाय माहिती तसेच त्या आर्थिक वर्षा अखेर किती रक्कम शिल्लक होती. (२००९-१० या वर्षातील ३१ जुलै अखेर किती रक्कम शिल्लक आहे याबाबत ची माहिती) सादर करण्यात यावी.

२.० शासनाने ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे सदर स्वीय प्रपंची लेखा महालेखाकार तसेच नियंत्रण अधिकारी यांना सादर केलेला आहे किंवा कसे,याबाबतची खात्री करून स्पष्ट अहवाल सादर करणे.

३.० विभागीयस्तरावर स्वीय प्रपंची लेख्याचे पासबुक प्रमाणे वर्षाचे सुरवातीस व त्यांनतर जमा झालेली रक्कम, वितरीत झालेली रक्कम व शिल्लक रक्कम (वर्षवार) इत्यादींचा ताळमेळ सादर केलेले रोखलेख्यांशी केले गेले किंवा कसे व केले नसल्यास, तर त्याबाबत योग्य तपासणी करून वस्तुस्थिती दर्शक अहवाल सादर करण्यांत यावा.

प्रोत्साहनात्मक रक्कम वाटप संबंधीचे वरील लेखा तपासणी व संनियत्रणासाठी विभागीय वन अधिकारी (तेंदू)/ विभागीय वन अधिकारी (योजना) तसेच तेंदू शिषाअंतर्गत

P.C.C.F.M.S.NAGPUR.

मंजूर अधिकारी व कर्मचारी यांचे पूर्ण सहकार्य घेण्यात यावे. व पुर्तता अहवाल या कार्यालयास १५ दिवसाचे आत सादर करावा, ही विनंती.

अ. प्र. मुख्य वनसंरक्षक (मु. व रा.)
यांचेकडून अनुमोदित

मुख्य वनसंरक्षक
(मुल्यांकन व राष्ट्रीयीकरण
महाराष्ट्र राज्य, नागपू

प्रतिलिपी:- प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना दिनांक ४/८/२००१ झालेली प्रत्यक्ष चर्चा व सूचनांचे अनुषंगाने माहितीस सादर.

प्रत:- वनसंरक्षक (तेंदू) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना. त्यांनी तेंदू संबंधी प्रदेशी लेखापरीक्षणाबाबत योग्य पाठपुरावा करावा, व आवश्यकते प्रमाणे कार्यालयास भेट देऊनही याबाबीचा पाठपुरावा करावा.

# परिशिष्ट-ब

(शा.म.मु.) एचबी ८२७-१६ (७००-६-२०१९)

## मंगळवार, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१९

## लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४.३५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(५) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(७) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(८) श्री. सुरेश धानोरकर, वि.स.स.

(९) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(११) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(१२) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(१३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव,

(२) श्री. अ.चां. कोल्हे, उ. स. तथा नि. अ.,

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

**निमंत्रित :—**

**महालेखाकार कार्यालय :**

(१) श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई

(२) श्रीमती हेमा मुनिवेंकटप्पा, महालेखाकार, नागपूर

**वित्त विभाग :—**

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले. व को.) विभाग

**विभागीय प्रतिनिधी :—**

**महसूल व वन (वन) विभाग :—**

(१) श्री. विकास खारगे, प्रधान सचिव, महसूल व वन (वन) विभाग

(२) श्री. उमेशकुमार अग्रवाल, प्रधान मुख्य वन संरक्षक,

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. २.१ यासंदर्भात प्रधान सचिव, महसूल व वन (वन) विभाग तसेच इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

## मंगळवार, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९

## लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरू होऊन दुपारी २.४० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(४) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(५) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(७) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उ. स. तथा नि.अ.,

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

**निमंत्रित :—**

**महालेखाकार कार्यालय :**

श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई

**वित्त विभाग :—**

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले. व को.) विभाग

**विभागीय प्रतिनिधी :—**

**महसूल व वन (वन) विभाग :—**

श्री. विकास खारगे, प्रधान सचिव, महसूल व वन (वन) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. २.१ यासंदर्भात प्रधान सचिव, महसूल व वन (वन) विभाग तसेच इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

## शुक्रवार, दिनांक २८ जून, २०१९

### लोकलेखा समिति

समितीची बैठक शुक्रवार, दिनांक २८ जून, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४.०० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(५) ॲड. पराग अळवणी, वि.स.स.

(६) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(७) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव,

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उ.स.तथा नि.अ.,

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव,

(४) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी,

(५) श्री. रवींद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील महसूल व वन (वन) (परिच्छेद क्र. २.१) या विभागासंदर्भात समितीने तयार केलेला प्रारूप अहवाल विचारात घेऊन संमत करण्यात आला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई